सन २०१०-११ मध्ये प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल वार्षिक दराने खरेदीकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७.०१.२०१० मध्ये तत्वतः मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.०५-०८.०२.२०१० चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.०९.०२.२०१० ते दि.१८.०२.२०१० अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.१५.०२.२००८ अखेर अशी निविदा स्वीकारणेची अंतिम मुदत ठेवणेत आलेली आहे.

वरीलप्रमाणे निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविणेत आलेल्या असून क्र.१ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्र.२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डी.डी.अथवा रोखीची भरणा पावती व इतर कागदपत्रांची तसेच स्वतंत्र पॅकींगमध्ये नमुन्यांची मागणी केलेली होती. उपसमितीचे दिनांक ११.०३.२०१० रोजीचे सभेत

प्राप्त नमून्यांमधून नमूने निवडलेले आहेत. निवडलेल्या नमूनाधारकांना आजचे सभेत समक्ष चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निवडलेल्या नमुनेधारकांचे नांव | जात/ प्रकार | मुळ दर रुपये | एकुण दर रुपये | वाटाघाटी नंतरचे अंतिम दर रुपये |
|---|---|---|---|---|---|
| **०१.** | **तांदुळ - सोना मसुरी नवीन/जुना** | **मागणी ८००० क्विंटल** | | | |
| ०१. | कमलेश ट्रेडींग कंपनी, नांदेड | नवा | २४०१/- | २४०१/- | २२५०/- |
| ०२. | कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | नवा | २२८१/- | २२८१/- | **२०७५/-** |
| | | जुना | २५८१/- | २५८१/- | **२२२५/-** |
| ०३. | साई राईस मिल्स, कर्नाटक | नवा | २८७५/- | २८७५/- | २७५०/- |
| | | जुना | ३५५०/- | ३५५०/- | ३३७५/- |
| ०४. | नृसिंह ट्रेडींग कंपनी, नांदेड | नवा | २३७५/- | २३७५/- | २३००/- |
| | | जुना | २५७५/- | २५७५/- | २४६५/- |
| ०५. | संदिप ट्रेडींग कंपनी नांदेड | नवा | २३३१/- | २३३१/- | २२३१/- |
| | | जुना | २६३१/- | २६३१/- | २४८१/- |
| ०६. | मयुरी ट्रेडींग कंपनी, नांदेड | नवा | २४४१/- | २४४१/- | २२५१/- |
| ०७. | श्रीजी कार्पोरेशन, जळगांव | नवा | | | २१५०/- |
| | | जुना | | | २३५०/- |
| **०२.** | **हरबरा दाळ - बिगर पॉलीश** | **मागणी ८००० क्विंटल** | | | |
| ०१. | पुखराज रामनिवास, जळगांव | A | ३३००/- | ३३००/- | ३२०१/- |
| ०२. | संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | १ | ३२५१/- | ३२५१/- | ३०८१/- |
| ०३. | कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड | | २८७५/- | २८७५/- | **२७७५/-** |
| ०४. | जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | A | ३६००/- | ३६००/- | ३०४५/- |
| ०५. | बाफना बाजार, नाशिक | C | ३१००/- | ३१००/- | ३२००/- |
| ०६. | डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | | ३०७५/- | ३०७५/- | ३०५१/- |
| | श्रीजी कार्पोरेशन, जळगांव | | | | ३३३०/- |
| **०३.** | **तुरदाळ - लातुर फटका** | **मागणी १६०० क्विंटल** | | | |
| ०१. | पुखराज रामनिवास, जळगांव | A | ६७००/- | ६७००/- | ७५००/- |
| | | B | ६६५०/- | ६६५०/- | ७३००/- |
| ०२. | संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | १ | ६८५१/- | ६८५१/- | ७४००/- |
| ०३. | कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ६५०१/- | ६५०१/- | **७२९०/-** |
| **०४.** | **मुगदाळ - बोल्ड** | **मागणी ३०० क्विंटल** | | | |
| ०१. | पुखराज रामनिवास, जळगांव | A | ८३००/- | ८३००/- | **८३००/-** |
| ०२. | संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | १ | ८१००/- | ८१००/- | ८५००/- |
| ०३. | जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | B | ८५५१/- | ८५५१/- | ९१००/- |
| ०४. | श्रीजी कार्पोरेशन, जळगांव | | ८३५०/- | ८३५०/- | ९९००/- |
| **०५.** | **उडीददाळ** | **मागणी २ क्विंटल** | | | |
| ०१. | मयुरी ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ६०००/- | ६०००/- | ६९७५/- |
| ०२. | कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ५९७५/- | ५९७५/- | **६२००/-** |
| ०३. | सुरेश पुनमचंद बागमार, पुणे | | ५६००/- | ५६००/- | ७०००/- |
| **०६.** | **वाटाणा - हिरवा, इंम्पोर्टेड** | **मागणी ६०० क्विंटल** | | | |
| ०१. | महालक्ष्मी महिला सह.ग्राहक संस्था लि.दहीवाडी, ता.कर्जत | | २७००/- | २७००/- | २६५५/- |
| ०२. | नारायण उदय वैश्य, नाशिक | | २५००/- | २५००/- | २४००/- |
| ०३. | रामनाथ जगन्नाथ आणि कं,ना.रोड | A-१ | २८०१/- | २८०१/- | २७५१/- |
| ०४. | पुखराज रामनिवास, जळगांव | | २५००/- | २५००/- | **२२५१/-** |
| **०७.** | **मुग - आख्खा** | **मागणी ८०० क्विंटल** | | | |
| ०१. | संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | १ | ६६५१/- | ६६५१/- | **६७००/-** |
| | | २ | ६५००/- | ६५००/- | ६७५१/- |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ७६००/- | ७६००/- | ७६००/- |
| ०३. | राहुल ट्रेडर्स, दोंडाईचा | | ६७५०/- | ६७५०/- | ८३७०/- |
| **०८.** | **मठ** | **मागणी ८०० क्विंटल** | | | |
| ०१. | राहुल ट्रेडर्स, दोंडाईचा | | ६७५०/- | ६७५०/- | ८१५०/- |
| ०२. | मयुरी ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ७२००/- | ७२००/- | ७१४५/- |
| ०३. | राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | | ७८०१/- | ७८०१/- | ९२०१/- |
| ०४. | पुखराज रामनिवास, जळगांव | A | ७०००/- | ७०००/- | **६८०१/-** |
| **०९.** | **रवा - मध्यम** | **मागणी ४५० क्विंटल** | | | |
| ०१. | डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | | १९५०/- | १९५०/- | १९२०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०२. | पुखराज रामनिवास, जळगांव | | १७५०/- | १७५०/- | **१६५०/-** |
| ०३. | नारायण उदय वैश्य, नाशिक | | १९७५/- | १९७५/- | १९७५/- |
| **१०.** | **मैदा मागणी ७०० क्विंटल** | | | | |
| ०१. | डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | | १८९०/- | १८९०/- | **१८७०/-** |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | २१००/- | २१००/- | **१८७०/-** |
| ०३. | राहुल ट्रेडर्स, दोंडाईचा | | १९८०/- | १९८०/- | २०२५/- |
| **११.** | **हिरा बेसन मागणी ३.५० क्विंटल** | | | | |
| ०१. | रामनाथ जगन्नाथ आणि कं,ना.रोड | | ३८००/- | ३८००/- | ३८००/- |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ४५००/- | ४५००/- | **३६००/-** |
| **१२.** | **गुळ- कोल्हापुरी, पिवळा मागणी २५० क्विंटल** | | | | |
| ०१. | डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | | ३०४०/- | ३०४०/- | २९७५/- |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ३९००/- | ३९००/- | ३२००/- |
| ०३. | संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | | ३१५०/- | ३१५०/- | **२७७५/-** |
| **१३.** | **शेंगदाणा- वाळलेला, बोल्ड मागणी ३७५ क्विंटल** | | | | |
| ०१. | संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | | ५०५१/- | ५०५१/- | **५३००/- + व्हॅट** |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ६२००/- | ६२००/- | ७०००/- + व्हॅट |
| ०३. | राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | | ५८०१/- | ५८०१/- | ७२००/- + व्हॅट |
| **१४.** | **साबुदाणा - डबलहत्ती, मिल्कव्हाईट मागणी २६० क्विंटल** | | | | |
| ०१ | सुरेश पुनमचंद बागमार, पुणे | | ६४००/- | ६४००/- | **५०५०/- व्हॅटसह** |
| ०२. | सोनदुर्ग सन्स, वाशी | | ५४००/- | ५४००/- | ५५६५/- |
| ०३. | संतोष ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ५००१/- | ५००१/- | ५१४५/- |
| **१५.** | **भगर मागणी ४ क्विंटल** | | | | |
| ०१. | रामनाथ जगन्नाथ आणि कं,ना.रोड | | ५०००/- | ५०००/- | ४९००/- |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ५८००/- | ५८००/- | ५३००/- |
| ०३. | सुरेश पुनमचंद बागमार, पुणे | | ६०००/- | ६०००/- | **४८००/- व्हॅटसह** |
| **१६.** | **खोबरेवाटी, राजापुरी, काळी पाठ, वाळलेली मागणी ९० क्विंटल** | | | | |
| ०१. | रामनाथ जगन्नाथ आणि कं,ना.रोड | | ५९००/- | ५९००/- | ५८०१/- + व्हॅट |
| ०२. | पुखराज रामनिवास, जळगांव | | ५६००/- | ५६००/- | ५४००/- + व्हॅट |
| ०३. | बाफना बाजार, नाशिक | | ७२००/- | ७२००/- | ६५००/- + व्हॅट |
| ०४. | संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | | ५७०१/- | ५७०१/- | **५३००/-+ व्हॅट** |
| **१७.** | **काजु पाकळी- २ पाकळी वाळलेली मागणी २०० क्विंटल** | | | | |
| ०१. | संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | | २७७५०/- | २७७५०/- | ३१५००/- + व्हॅट |
| ०२. | सुरेश पुनमचंद बागमार, पुणे | | ३५०००/- | ३५०००/- | ३१५००/- + व्हॅट |
| ०३. | गणेश ड्राय फ्रुट, पुणे | A | २८५००/- | २८५००/- | **३००००/- + व्हॅट** |
| | | B | ३००००/- | ३००००/- | ३१५००/- + व्हॅट |
| **१८.** | **खिसमिस (बेदाणा) मागणी २५० क्विंटल** | | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | - | - | - | - |
| ०२. | नारायण उदय वैश्य, नाशिक | - | - | - | - |
| **१९.** | **मगज बी मागणी ६ क्विंटल** | | | | |
| ०१. | सोनदुर्ग सन्स, वाशी | | २६०००/- | २६०००/- | **२६०००/- + व्हॅट** |
| ०२. | राजेश फुड प्रॉडक्टस, अहमदनगर | | २९०००/- | २९०००/- | ३००००/- |
| ०३. | सुरेश पुनमचंद बागमार, पुणे | | ३५०००/- | ३५०००/- | **२६०००/- + व्हॅट** |
| **२०.** | **बदाम बी - मोठी साईज मागणी ०.२५ क्विंटल** | | | | |
| ०१. | सुरेश पुनमचंद बागमार, पुणे | | ४५०००/- | ४५०००/- | **४१५००/- + व्हॅट** |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ४७०००/- | ४७०००/- | ५२५००/- + व्हॅट |
| **२१.** | **हळद - अखंड वाळलेली मागणी १०० क्विंटल** | | | | |
| ०१. | रामनाथ जगन्नाथ आणि कं,ना.रोड | | १२१००/- | १२१००/- | १४७००/- + व्हॅट |
| ०२. | डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | | १३०००/- | १३०००/- | **१४०००/- + व्हॅट** |
| ०३. | पुखराज रामनिवास, जळगांव | | १५०००/- | १५०००/- | १६०००/- + व्हॅट |
| **२२.** | **मिरची - गुटूंर, अखंड, लाल मागणी २६० क्विंटल** | | | | |
| ०१ | महालक्ष्मी महिला सह.ग्राहक संस्था लि.दहीवाडी, ता.कर्जत | | ५८५०/- | ५८५०/- | ५८५०/- |
| ०२. | राजेश फुड प्रॉडक्टस, अहमदनगर | | ६१००/- | ६१००/- | **५८००/-** |
| ०३. | सोनदुर्ग सन्स, वाशी | | ६५००/- | ६५००/- | ६४००/- |
| **२३.** | **धने - अखंड मागणी- १५० क्विंटल** | | | | |
| ०१. | देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | ४५००/- | ४५००/- | **४५००/-** |
| ०२. | डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | | ६१००/- | ६१००/- | ५९००/- |
| ०३. | नारायण उदय वैश्य, नाशिक | | ९३५०/- | ९३५०/- | ९०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **२४.** | **हिरवी विलायची - बोल्ड मागणी ५० क्विंटल** | | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | A | १३५०००/- | १३५०००/- | १३५०००/- |
| ०२. | डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | | १०४०००/- | १०४०००/- | **११७५००/- + व्हॅट** |
| ०३. | नारायण उदय वैश्य, नाशिक | | १३७५००/- | १३७५००/- | १३५०००/- |
| **२५.** | **जीरे - डायमंड कट मागणी ५० क्विंटल** | | | | |
| ०१. | देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | १४९००/- | १४९००/- | १४९००/- |
| ०२. | जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | A | १४२००/- | १४२००/- | १३४००/- |
| | | B | १३८००/- | १३८००/- | १३२००/- |
| ०३. | बाफना बाजार, नाशिक | | १६५००/- | १६५००/- | १५९००/- + व्हॅट |
| ०४. | डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | | १२५००/- | १२५००/- | **१२२००/- + व्हॅट** |
| **२६.** | **सुंठ - वाळलेली मागणी ३ क्विंटल** | | | | |
| ०१. | देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | १६५००/- | १६५००/- | **१८५००/- व्हॅटसह** |
| ०२. | सुरेश पुनमचंद बागमार, पुणे | | १९०००/- | १९०००/- | २१०००/- |
| ०३. | जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | | १६१००/- | १६१००/- | १९५००/- |
| **२७.** | **शहाजिरे मागणी १.५० क्विंटल** | | | | |
| ०१. | देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | ३५०००/- | ३५०००/- | ३५०००/-+ व्हॅट |
| ०२. | सोनदुर्ग सन्स, वाशी | | ३२०००/- | ३२०००/- | **३१०००/- + व्हॅट** |
| **२८.** | **मसाला विलायची मागणी १.५० क्विंटल** | | | | |
| ०१. | देविचंद पुनमचंद छाजेड, अहमदनगर | | ४९९००/- | ४९९००/- | ६५०००/- + व्हॅट |
| ०२. | सोनदुर्ग सन्स, वाशी | | ४४०००/- | ४४०००/- | **४४०००/- + व्हॅट** |
| ०३. | बाफना बाजार, नाशिक | | ५९०००/- | ५९०००/- | ५९०००/- + व्हॅट |
| **२९.** | **लवंग मागणी १ क्विंटल** | | | | |
| ०१. | देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | ३११००/- | ३११००/- | ३११००/- + व्हॅट |
| ०२. | सोनदुर्ग सन्स, वाशी | | ३००००/- | ३००००/- | **३००००/- + व्हॅट** |
| **३०.** | **दालचिनी मागणी १.५० क्विंटल** | | | | |
| ०१. | जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | | १३५००/- | १३५००/- | **११५००/- + व्हॅट** |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ३२०००/- | ३२०००/- | २९५००/- + व्हॅट |
| ०३. | देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | ११९००/- | ११९००/- | ११९००/- + व्हॅट |
| **३१.** | **खसखस मागणी २.५० क्विंटल** | | | | |
| ०१. | राजेश फुड प्रॉडक्टस, अहमदनगर | | ३८०००/- | ३८०००/- | ५८०००/- + व्हॅट |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ४२०००/- | ४२०००/- | **५६०००/- + व्हॅट** |
| **३२.** | **काळेमिरे मागणी १.५० क्विंटल** | | | | |
| ०१. | राजेश फुड प्रॉडक्टस, अहमदनगर | | २१०००/- | २१०००/- | **३०८००/- + व्हॅट** |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | २६०००/- | २६०००/- | ३१०००/- + व्हॅट |
| **३३.** | **नाकेश्वर मागणी १.५० क्विंटल** | | | | |
| ०१. | सोनदुर्ग सन्स, वाशी | | ४६०००/- | ४६०००/- | **४६०००/- + व्हॅट** |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ५२०००/- | ५२०००/- | ७२०००/- + व्हॅट |
| **३४.** | **तेजपान मागणी १.७५ क्विंटल** | | | | |
| ०१. | सोनदुर्ग सन्स, वाशी | | ६०००/- | ६०००/- | ६०००/- + व्हॅट |
| ०२. | देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | ४९००/- | ४९००/- | **४९००/- + व्हॅट** |
| ०३. | बाफना बाजार, नाशिक | | ७५००/- | ७५००/- | ६९००/- + व्हॅट |
| **३५.** | **दगडफुल मागणी १.५० क्विंटल** | | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | २९०००/- | २९०००/- | **२९०००/- + व्हॅट** |
| ०२. | देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | ३११००/- | ३११००/- | ३११००/- + व्हॅट |
| **३६.** | **चक्रीफुल मागणी १.५० क्विंटल** | | | | |
| ०१. | सोनदुर्ग सन्स, वाशी | | २८०००/- | २८०००/- | **२८०००/- + व्हॅट** |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ३७०००/- | ३७०००/- | ३७०००/- + व्हॅट |
| **३७.** | **जायफळ मागणी ०.५० क्विंटल** | | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | ५३०००/- | ५३०००/- | **६८०००/- + व्हॅट** |
| **३८.** | **जायपत्री मागणी १.५० क्विंटल** | | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | ९९०००/- | ९९०००/- | ९९०००/- + व्हॅट |
| ०२. | सोनदुर्ग सन्स, वाशी | | ८८०००/- | ८८०००/- | ८८०००/- + व्हॅट |
| ०३. | राजेश फुड प्रॉडक्टस, अहमदनगर | | ७५०००/- | ७५०००/- | **७५०००/- व्हॅटसह** |
| **३९.** | **बडीशेप - हिरवी बारीक मागणी ०.७५ क्विंटल** | | | | |
| ०१. | देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | १६५००/- | १६५००/- | १६५००/- + व्हॅट |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | १४५००/- | १४५००/- | **१४५००/- + व्हॅट** |
| **४०.** | **पापड - लिज्जत मागणी ६ क्विंटल** | | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | १३५००/- | १३५००/- | **१५२००/-** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **४१.** | **हिंग पावडर, नागछाप ॲगमार्क मागणी १२ क्विंटल** | | | | |
| ०१. | राजेश फुड प्रॉडक्टस, अहमदनगर | | १८०००/- | १८०००/- | **१७५००/- व्हॅटसह** |
| ०२. | जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | | १८५००/- | १८५००/- | १७२००/- + व्हॅट |
| ०३. | रामनाथ जगन्नाथ, नाशिक | | १८०००/- | १८०००/- | १८०००/- + व्हॅट |
| ०४. | बाफना बाजार, नाशिक | | ४५०००/- | ४५०००/- | १६९००/- + व्हॅट |
| **४२.** | **हिंग खडा, नागछाप ॲगमार्क मागणी २.५० क्विंटल** | | | | |
| ०१. | जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | | २०१००/- | २०१००/- | **१९२००/- + व्हॅट** |
| ०२. | राजेश फुड प्रॉडक्टस, अहमदनगर | | २१०००/- | २१०००/- | २१०००/- |
| ०३. | बाफना बाजार, नाशिक | | २७०००/- | २७०००/- | **१६७००/- + व्हॅट** |
| **४३.** | **मेथी मागणी २ क्विंटल** | | | | |
| ०१. | सोनदुर्ग ॲण्ड सन्स, वाशी | | ४०००/- | ४०००/- | **४०००/-** |
| ०२. | रामनाथ जगन्नाथ, नाशिक | | ४३००/- | ४३००/- | ४३००/- |
| ०३. | बाफना बाजार, नाशिक | | ६५००/- | ६५००/- | ५९००/- + व्हॅट |
| **४४.** | **मोहरी मागणी ३५ क्विंटल** | | | | |
| ०१. | पुखराज रामनिवास, जळगांव | | ३२००/- | ३२००/- | ३१०१/- + व्हॅट |
| ०२. | संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | | ३२५१/- | ३२५१/- | **३०९१/- + व्हॅट** |
| ०३. | हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड | | ३७०१/- | ३७०१/- | ३७०१/- |
| **४५.** | **कच्चे पोहे मागणी १२ क्विंटल** | | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | २५५०/- | २५५०/- | २५००/- |
| ०२. | डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | | १९५०/- | १९५०/- | **१९३०/-** |
| **४६.** | **भाजके पोहे मागणी २५ क्विंटल** | | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | ४४००/- | ४४००/- | ५६००/- |
| **४७.** | **डाळया मागणी ०५ क्विंटल** | | | | |
| ०१. | रामनाथ जगन्नाथ, नाशिक | | ४०००/- | ४०००/- | **४०००/- + व्हॅट** |
| **४८.** | **चिंच - फोडलेली मागणी १५ क्विंटल** | | | | |
| ०१. | सोनदुर्ग ॲण्ड सन्स, वाशी | | ४४००/- | ४४००/- | **४४००/-** |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ४९००/- | ४९००/- | ५७००/- |
| **४९.** | **आमसुल मागणी २० क्विंटल** | | | | |
| ०१. | सुरेश पुनमचंद बागमार, पुणे | | ३०००/- | ३०००/- | २४००/- + व्हॅट |
| ०२. | जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | | २१००/- | २१००/- | **१७११/- + व्हॅट** |
| ०३. | बाफना बाजार, नाशिक | | २९००/- | २९००/- | १७५०/- + व्हॅट |
| **५०.** | **जिलेबी रंग- मार्सन लेमन फुड कलर, आयएसआय मागणी ०५ क्विंटल** | | | | |
| ०१. | मार्सन इंडिया प्रा.लि.मुंबई | | ३१७००/- | ३१७००/- | **३१०००/- + व्हॅट** |
| **५१.** | **सुतळी - बारीक, थ्री प्लाय मागणी ०५ क्विंटल** | | | | |
| ०१. | दगडूराम पिरचंद, श्रीरामपुर | | ५७००/- | ५७००/- | **५५००/- + व्हॅट** |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ६२००/- | ६२००/- | ६२००/- + व्हॅट |
| **५२.** | **पत्रावळ-प्लेन मागणी ७,५०,००० नग** | | | | |
| ०१. | धरम एंटरप्रायझेस, नाशिक | | प्र.हजारी ३५०/- | प्र.हजारी ३५०/- | **प्र.हजारी ३५०/-** |
| **५३.** | **पत्रावळ कप्प्याची सिल्वर कोटेड मागणी ३०,००,००० नग** | | | | |
| ०१. | धरम एंटरप्रायझेस, नाशिक | | प्र.शे.८०/- | प्र.शे.८०/- | **प्र.शे.८०/-** |
| **५४.** | **खडे मीठ मागणी २० क्विंटल** | | | | |
| ०१. | रामनाथ जगन्नाथ, नाशिक | | ३२१/- | ३२१/- | **३२१/-** |
| **५५.** | **मसुर मागणी २०० क्विंटल** | | | | |
| ०१. | राहुल ट्रेडर्स, दोंडाईचा | | ४६८०/- | ४६८०/- | ५१३०/- |
| ०२. | संदिप ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ४१७५/- | ४१७५/- | **४८००/-** |
| ०३. | कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ४२००/- | ४२००/- | ५०००/- |
| ०४. | बाफना बाजार, नाशिक | | ५०००/- | ५०००/- | ५०००/- |
| **५६.** | **मठदाळ मागणी ६० क्विंटल** | | | | |
| ०१. | संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | | ८१००/- | ८१००/- | **८१००/-** |
| ०२. | कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | | १३०००/- | १३०००/- | १२०००/- |
| ०३. | पुखराज रामनिवास, जळगांव | | ८३००/- | ८३००/- | ८५००/- |
| ०४. | सोनदुर्ग सन्स, वाशी | | ८२००/- | ८२००/- | ८२००/- |
| **५७.** | **खाद्यतेल - मका, रिफाईंड, ॲगमार्क मागणी ३००० क्विंटल** | | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | अंबुजा | ७३८४/- | | ६४००/- |
| ०२. | राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | कार्नेलो | ७७१७.८४ | | ६४२१/- + व्हॅट |
| ०३. | जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | तिरुपती | ६५००/- | | ५७००/- + व्हॅट |
| **५८.** | **वनस्पती तुप - जेमिनी मागणी ३०० क्विंटल** | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | | ५८५०/- | ५८५०/- | ५१००/- + व्हॅट |
| ०२. | पुखराज रामनिवास, जळगांव | | ५५००/- | ५५००/- | ५१००/- + व्हॅट |
| ०३. | संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | | ५३००/- | ५३००/- | **४९००/- + व्हॅट** |
| ०४. | बाफना बाजार, नाशिक | | ५१००/- | ५१००/- | ५६००/- |
| **५९.** | **चहा पावडर - ब्रुकबॉण्ड/सपट/ओ चहा मागणी १३० क्विंटल** | | | | |
| ०१. | कुणाल टी सेंटर, शिर्डी | सपट डस्ट | १४०००/- | १४०००/- | १३४६२/- + व्हॅट |
| | | सह्याद्री कडक | १४७००/- | १४७००/- | **१४१३५/- + व्हॅट** |
| ०२. | मे.साकोरकर इं.प्रा.लि., पुणे | ओ चहा | १६७७३/- | १६७७३/- | १३०००/- + व्हॅट |
| ०३. | हायटेक वेडींग, नाशिक | केटरींग पॅक | १४५६०/- | १४५६०/- | १४५००/- + व्हॅट |
| **६०.** | **कॉफी फ्लिटर - ब्रुकबॉण्ड मागणी १२ क्विंटल** | | | | |
| ०१. | हायटेक वेडींग, नाशिक | | २४०००/- | २४०००/- | **२३५००/- + व्हॅट** |
| **६१.** | **बिस्कीटे - पारले/ब्रिटानीया/सनफिस्ट ग्लुकोज व इतर मागणी ७,८५,००० पुडे** | | | | |
| ०१. | अग्रवाल एजन्सी, साकुरी | पारले | | **कंपनी दरावर २%सुट + व्हॅट** | |
| ०२. | दगडूराम पिरचंद एजन्सी, श्रीरामपुर | ब्रिटानीया | | **कंपनी दरावर ३% सुट + व्हॅट** | |
| ०३. | कोठारी ब्रदर्स, कोपरगांव | सनफिस्ट | | **कंपनी दरावर ३% सुट + व्हॅट** | |
| ०४. | राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | ब्रिटानीया | | कंपनी दरावर २% सुट | |
| **६२.** | **पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर १ लिटर बाटली - आयएसआय, प्रमाणित मागणी - ३,००,००० बाटली** | | | | |
| ०१. | गुरुकृपा सेल्स, कोपरगांव | साईगंगा | प्र.बाटली ४.९० | प्र.बाटली ४.९० | **प्र.बाटली ५.०० व्हॅटसह** |
| ०२. | स्वामी समर्थ ड्रिस्टीब्युटर्स, तिसगांव | राजहंस | प्र.बाटली ५.६० | प्र.बाटली ५.६० | **प्र.बाटली ५.०० व्हॅटसह** |
| ०३. | संगमनेर ता.सह.दुध उत्पादक संघ प्रा.लि.संगमनेर | राजहंस | प्र.बाटली ५.२० | प्र.बाटली ५.२० | प्र.बाटली ५.५० |
| ०४. | राणी मिनरल वॉटर प्रा.लि.कात्रस | सुमेरु | प्र.बाटली ५.०० | प्र.बाटली ५.०० | प्र.बाटली ५.६२ |
| ०५. | मे.साई समर्थ एजन्सी, शिर्डी | ॲक्वा | प्र.बाटली ८.१५ | प्र.बाटली ८.१५ | प्र.बाटली ८.५० |
| **६३.** | **पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर ५०० मिली बाटली - आयएसआय, प्रमाणित मागणी - १,५०,००० बाटली** | | | | |
| ०१. | गुरुकृपा सेल्स, कोपरगांव | साईगंगा | प्र.बाटली ३.७० | प्र.बाटली ३.७० | **प्र.बाटली ४.०० व्हॅटसह** |
| ०२. | स्वामी समर्थ ड्रिस्टीब्युटर्स, तिसगांव | राजहंस | प्र.बाटली ४.२० | प्र.बाटली ४.२० | **प्र.बाटली ४.०० व्हॅटसह** |
| ०३. | संगमनेर ता.सह.दुध उत्पादक संघ प्रा.लि.संगमनेर | राजहंस | प्र.बाटली ३.६७ | प्र.बाटली ३.६७ | प्र.बाटली ४.१३ |
| ०४. | राणी मिनरल वॉटर प्रा.लि.कात्रस | सुमेरु | प्र.बाटली ३.७५ | प्र.बाटली ३.७५ | प्र.बाटली ४.२१ |
| ०५. | मे.साई समर्थ एजन्सी, शिर्डी | ॲक्वा | - | - | - |
| **६४.** | **पॉलीकप - व्हर्जीन फुड ग्रेड, १०० मिली, वजन २ ग्रॅम मागणी १,६०,००,००० नग** | | | | |
| ०१. | सिध्दार्थ कंटेनर्स, श्रीरामपुर | | प्र.हजारी २५०/- | प्र.हजारी २५०/- | **प्र.हजारी २१७.५० + व्हॅट** |
| ०२. | प्रणाम पॉलीप्फॅस, हैद्राबाद | | प्र.हजारी २२२/- | प्र.हजारी २२२/- | प्र.हजारी २२७.७६ + व्हॅट |
| **६५.** | **प्लॅस्टिक पिशवी ४x६ प्लेन व्हर्जीन फुड ग्रेड एलडी मागणी ३५ क्विंटल** | | | | |
| ०१. | सरस प्लॅस्टिक, अहमदनगर | | १००००/- | १००००/- | **९८००/- व्हॅटसह** |
| ०२. | बियाणी पालीपॅक्स, नांदेड | | १०७००/- | १०७००/- | १०५००/- |
| ०३. | सुपर प्लास्ट इंजिनिअर्स, सिन्नर | | १०७००/- | १०७००/- | १००००/- |
| ०४. | आर्युदेय प्लॅ.इं., कोल्हापुर | | १०२००/- | १०२००/- | ९८७५/- |
| **६६.** | **प्लॅस्टिक पिशवी ५x६.५ लाडूसाठी, ४ रंगात छपाई, २०० गेज पीपी मागणी ४२० क्विंटल** | | | | |
| ०१. | सरस प्लॅस्टिक, अहमदनगर | | १२०००/- | १२०००/- | **१०३००/- व्हॅटसह** |
| ०२. | बियाणी पालीपॅक्स, नांदेड | | १२९००/- | १२९००/- | १२७००/- |
| ०३. | सुपर प्लास्ट इंजिनिअर्स, सिन्नर | | १३०००/- | १३०००/- | १२५००/- |
| ०४. | आर्युदेय प्लॅ.इं., कोल्हापुर | | ११४००/- | ११४००/- | १०४००/- |
| **६७.** | **प्लॅस्टिक पिशवी ८x१० छपाईसह १ रंगात व्हर्जीन फुड ग्रेड, १०० गेज एलडी मागणी १५० क्विंटल** | | | | |
| ०१. | सरस प्लॅस्टिक, अहमदनगर | | ११०००/- | ११०००/- | **१०२००/- व्हॅटसह** |
| ०२. | बियाणी पालीपॅक्स, नांदेड | | ११५००/- | ११५००/- | ११२००/- |
| ०३. | सुपर प्लास्ट इंजिनिअर्स, सिन्नर | | ११५००/- | ११५००/- | १०७००/- |
| ०४. | आर्युदेय प्लॅ.इं., कोल्हापुर | | १०८००/- | १०८००/- | १०३००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **६८. गाय दुध होमीजीनाईज्ड व पाश्चराईज्ड, ५०० मिली पॅकिंग, ३.५ ते ३.८ फॅट, ८.५ एसएनएफ, दिवसातून दोन वेळेस पुरवठा मागणी अंदाजे दररोज २७०० लिटर** | | | | | |
| ०१. | गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पा. ता.सह.दुध उत्पादक संघ.लि. कोपरगांव | गोदावरी | प्रती लि. २०/- | प्रती लि. २०/- | प्रती लि. १८.८० |
| ०२. | संगमनेर ता.सह.दुध उत्पा.संघ मर्या.संगमनेर | राजहंस | प्रती लि. २०/- | प्रती लि. २०/- | प्रती लि. १९/- |
| ०३. | स्वामी समर्थ ड्रिस्टीब्युटर्स, तिसगांव | राजहंस | प्रती लि. २०/- | प्रती लि. २०/- | **प्रती लि. १८.८०** |
| **६९. गावरान तुप ३५ कि.ग्रॅ.कॅन लुज किंवा १५ कि.ग्रॅ.नवीन डबा पॅकिंग अॅगमार्क असलेला मागणी ४००० क्विंटल** | | | | | |
| ०१. | जयहिंद किराणा स्टोअर्स, ना.रोड | शगुन | २४९००/- | २४९००/- | २२६००/- + व्हॅट |
| ०२. | गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पा. ता.सह.दुध उत्पादक संघ.लि. कोपरगांव | गोदावरी | २६४४२/- | २६४४२/- | २७५००/- |
| ०३. | बाफना बाजार, नाशिक | अमुल | ३१०००/- | ३१०००/- | २९०००/- + व्हॅट |
| | | हटसन | ३०७००/- | ३०७००/- | २६५००/- + व्हॅट |
| | | कान्हा | २९०००/- | २९०००/- | २५५००/- + व्हॅट |
| | | महारतन | २८५००/- | २८५००/- | २६५००/-+ व्हॅट |

यावर सविस्तर चर्चा होऊन उपसमितीने केलेल्या खालीलप्रमाणे शिफारशी मान्य करण्यात आल्या.

**०१.** अधोरेखित व गडद केलेले न्युनतम दर स्विकारण्यात यावेत अशी शिफारस करण्यात आली.

**०२.** पुर्वीप्रमाणेच बिस्कीटे कंपनी दराने विक्री करण्यात यावीत.

**०३.** पॅकेज्ड ड्रिकिंग वॉटर १ लि.रु.८/- व ५०० मिली रु.५/- प्रती बाटली या दराने विक्री करण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली.

**०४.** जायफळ, पापड, भाजकेपोहे, डाळया, पत्रावळ, कॉफि, खडे मीठ इ. किराणा मालांचे नमुने हे एकाच पुरवठाधारकाचे आल्याने व ते योग्य असल्याने एकच दर असूनही स्विकारण्यात आलेले आहेत.

**०५. सह्याद्री कडक** चहा हा कुणाल टी सेंटर, शिर्डी यांचेकडून गेले २ वर्षापासून पुरवठा होत आहे. त्यांचे सदर चहा बाबत अद्यापपावेतो कोणतीही तक्रार नाही. त्यामुळे तुलनेने सदर चहाचे दर हे तृतीय न्युनतम असला तरी मान्य करण्यात आलेला आहे.

**०६.** शासन निर्णयानुसार व्हॅट रक्कम आदा करण्यात येईल.

**०७.** खाद्य तेल व गावरान तूप खरेदीकामी निवडण्यात आलेले नमूने प्रत्यक्ष वापरुन पाहून त्यातील खाण्यास योग्य व चविष्ट असलेल्या नमून्याबाबत खातरजमा करुन खरेदीस योग्य असलेल्या खाद्य तेल व गावरान तूपाचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीपूढे निर्णयार्थ सादर करावा अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**०८.**मा.उपसमितीचे सभेचे शिफारसीनुसार गावरान तूप खरेदी करण्यासाठी निवडण्यात आलेल्या महारतन, कान्हा,शगून, हटसन व अमूल या ब्रॅण्डचे गावरान तूपांना एकसारख्या पध्दतीने गोपनिय कोड नंबर देऊन प्रत्येक ब्रॅण्डचे तूपाचे प्रसादलाडू स्वतंत्रपणे तयार करण्यात आले. व संस्थानचे मा.सदस्य डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा. मा.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर तसेच कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी यांना पाठवून त्यांचेकडून दिलेल्या कोडनिहाय गुणवत्ता क्रम घेण्यात आले व त्याप्रमाणे प्राप्त झालेले गुणवत्ता क्रमांक आजचे सभेपूढे प्रसादलाडूचे सॅम्पलसह सादर करण्यात आले.

याबाबत चर्चा होऊन, गुणवत्ता क्रमानुसार "हटसन " ब्रॅण्डचे गावरान तूप कोड नंबर नुसार गुणवत्ता प्रतीत नं.०१ ला येत असल्याने सदर गावरान तूपाचे उत्पादक कंपनीस मा.विश्वस्तांनी समक्ष भेट घेऊन खरेदी बाबत निर्णय घ्यावा असे ठरले.

तसेच खाद्यतेल खरेदीसाठी निवडण्यात आलेले तिरुपती,कार्नेलो व अंबूज या ब्रॅण्डचे खाद्यतेलासाठी गोपनिय कोड नंबर देऊन प्रत्येक ब्रॅण्डचे खाद्यतेलापासून एकाच प्रकारची भाजी एकाच पध्दतीने स्वतंत्रपणे बनवून त्याचीही गुणवत्ता तपासण्यात आली. सदरचा गुणवत्ता अहवाल आजचे सभेत सादर करण्यात आला. गुणवत्ता क्रमानुसार "कर्निलो " या ब्रॅण्डचे खाद्यतेल गुणवत्ता प्रतित क्रमांक ०१ ला येत असल्याने मा.विश्वस्त डॉ.गोंदकर यांनी पुरवठादारास दुरध्वनीवरुन दराबाबत विचारले असता त्यांनी रु.६,३००/- (व्हॅटसह) असा दर कळविलेला आहे. त्यानुसार सदरचे दराने "कार्नेलो " या ब्रॅण्डचे खाद्यतेल खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे

**०९.** प्रसादालय व कॅन्टीनसाठी सन-२००९-१० मध्ये वार्षिक मंजूर दराने माल पुरवठा करणेकामी दिलेल्या पुरवठा आदेशाचा कालावधी दिनांक १६.०४.२००९ ते ३१.०३.२०१० असा होता. सन २०१०-११ करिता वार्षिक दर पद्धतीने माल खरेदीची प्रक्रिया पूर्ण होण्यास एप्रिल,२०१० अखेर कालावधी लागणार असल्याने दरम्यानचे काळात प्रसादालय व कॅन्टीनला भक्तांना सेवा देण्यास मालाची आवश्यकता लागल्यास,एप्रिल-२०१० अखेर सन २००९-१० चे वार्षिक मंजूर दराने आवश्यक इतका माल खरीदनेस, तसेच वार्षिक पुरवठादाराने पुरवठा कालावधी संपल्याने माल देण्याचे नाकारलेस, सदर माल स्थानिक बाजारपेठेतून बाजारभावाने खरेदी करण्यात यावा. (कार्यवाही-अधिक्षक खरेदी)

**(०२) नवीन कार्डीयाक ॲम्ब्यूलन्सकरीता मशिनरी /उपकरणे खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणे बाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता नविन अत्याधूनिक ॲम्बूलन्स खरेदी करणेबाबतची कार्यवाही संस्थानचे वाहन विभागामार्फत सुरु आहे. कार्डीयाक ॲम्बूलन्समध्ये आवश्यक असणाऱ्या सुविधा व आवश्यक त्या ॲक्सेसरीज उदा. फोल्डींग स्ट्रेचर, स्कुप स्ट्रेचर, स्पाईन बोर्ड इ. वाहन विभागाकडून ॲम्बूलन्स बरोबर उपलब्ध होणार आहेत, परंतु सदरचे ॲम्बूलन्समध्ये लागणाऱ्या मशिनरी / उपकरणे हॉस्पिटल मार्फत उपलब्ध करुन द्यावयाची आहे. त्यानुसार मशिनरी / उपकरणे खरेदीकामी अंदाजे रु.९,२५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर ॲम्बूलन्समध्ये लागणाऱ्या मशिनरी / उपकरणे खरेदीकामी अंदाजे रु.९,२५,०००/- असुन सदरची खरेदी ही विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवुन करता येईल असा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२७.०१.२०१० चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन निर्णय क्रमांक २०७ अन्वये याकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यात याव्यात असे ठरले आहे. त्यानुसार सदरचे खरेदीकामी इंडियन एक्सप्रेस, मुंबई, महाराष्ट्र टाईम्स, मुंबई या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. निविदा विक्री ही दि.२३.०२.२०१० ते १०.०३.२०१० पर्यंत तर निविदा स्विकारण्याची मुदत दि.१२.०३.२०१० अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन शिर्डी, मुंबई कार्यालय व वेबसाईटवरुन घेतलेले अशी सर्व मिळून ०५ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | M/s.Excel Corporation , Nashik | 02 | M/s.Global Medicare System, Nashik |
| 03 | M/s.Cyronics Instruments Pvt.Ltd, Pune | 04 | M/s.Excel Services, Mumbai |
| 05 | M/s.Wipro GE Healthcare, Mumbai | | |

सदर ॲम्बूलन्समध्ये लागणाऱ्या मशिनरी/ उपकरणे खरेदीकामी प्राप्त झालेल्या पाच सिलबंद निविदा आजच्या सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०३) <u>श्री साईबाबा रुग्णालयातील युरोलॉजी इन्स्ट्रूमेंट (PCNL Set)खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणे बाबत.</u>**

श्रीसाईबाबा रुग्णालयात सध्या दोन मानद युरोलॉजिस्ट डॉ. मुंदडा व डॉ. राजन पटणी हे अनुक्रमे गुरुवारी व शनिवारी भेट देऊन उपस्थित रुग्णांवर तपासण्या व शस्त्रक्रिया करत असतात. श्री साईबाबा रुग्णालयात युरोलॉजी विभाग हा नव्यानेच कार्यान्वित करणेत आलेला आहे त्यासाठी काही इन्स्टुमेंट यापूर्वी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१७.०५.२००९ चे मान्यतेने रु. २३,९८,२७५.३० ची घेऊन दिलेली होती.

सध्या PCNL चे शस्त्रक्रिया (टाक्याचे ऑपरेशन न करता स्कोपद्वारे किडनी स्टोन नष्ट करणे) यासाठी डॉ. मुंदडा व डॉ. पटणी यांनी सध्या असलेल्या इन्स्टुमेंट बरोबर काही अतिरिक्त इन्स्टुमेंटची मागणी केलेली आहे जेणेकरुन PCNL ही शस्त्रक्रिया अचूकपणे करता येऊ शकेल. सदरची मागणी जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२९/१०/२००९ चे मागणी पत्रकान्वये केलेली होती.

सदर युरोलॉजी इन्स्टुमेंट खरेदीकामी अंदाजे खर्च रु.६७८६७४/- येणार असुन सदरची खरेदी ही विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवुन करता येईल असा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२७.०१.२०१० चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन निर्णय क्र.२१८ अन्वये याकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यात याव्यात असे ठरले आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी इंडियन एक्सप्रेस,मुंबई, सकाळ -पुणे, लोकमत-औरंगाबाद या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. निविदा विक्री ही दि.२३.०२.२०१० ते १०.०३.२०१० पर्यंत तर निविदा स्विकारण्याची मुदत दि.१२.०३.२०१० अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन शिर्डी, मुंबई कार्यालय व वेबसाईटवरुन घेतलेले अशी सर्व मिळून ०४ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालील प्रमाणे..

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | M/s.Eagle Medical System Pvt.Ltd.,Delhi | 02 | M/s.Chimco Bio-Medical Eng.Mumbai |
| 03 | M/s.Biosciences Devices India Pvt .Ltd, Thane | 04 | M/s.Critical Care System,Pune |

सदर युरोलॉजी इन्स्टुमेंट खरेदीकामी प्राप्त चार सिलबंद निविदा आजच्या सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०४) <u>श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ऑपरेशन थिएटर विभागासाठी कार्डीयाक इन्स्ट्रूमेंट खरेदी कामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणे बाबत</u>**

श्री साईबाबा रुग्णालयात सन २००६ साली कार्डीयाक ऑपरेशन थिएटर हा विभाग कार्यान्वित करणेत आलेला आहे. त्यावेळेस सदर विभागात शस्त्रक्रियेसाठी लागणारे वेगवेगळ्या कंपनीचे इन्स्टुमेंट खरेदी करण्यात आलेली होती. तीच इन्स्टुमेंट सध्या वापरात आहेत. परंतु रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ झाल्याने सध्या असलेली इन्स्टुमेंट ही वापरुन खराब झालेली आहे, त्यामुळे सी. व्ही. टी. एस. ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२०/११/२००९ चे मागणी पत्रकान्वये लागणाऱ्या इन्स्टुमेंटची तातडीने मागणी केलेली आहे. तेंव्हा सी. व्ही. टी. एस. ऑपरेशन थिएटर विभागाने मागणी केलेली इन्स्टुमेंट हि खरेदी करणे गरजेचे आहे. गेली तीन वर्षाची शस्त्रक्रियेची आकडेवारी बघता शस्त्रक्रियेच्या संख्येत निश्चितच वाढ झालेली आहे.

सदर इन्स्टुमेंट खरेदीकामी अंदाजे रु. ८,९०,२३०/- येणार असुन सदरची खरेदी ही विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवुन करता येईल असा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा

दि.२७.०१.२०१० चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन निर्णय क्र.२१७ अन्वये याकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यात याव्यात असे ठरले होते. त्यानुसार सदरचे खरेदीकामी इंडियन एक्सप्रेस, मुंबई, महाराष्ट्र टाईम्स, मुंबई या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. निविदा विक्री ही दि.२३.०२.२०१० ते १०.०३.२०१० पर्यंत तर निविदा स्विकारण्याची मुदत दि.१२.०३.२०१० अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन शिर्डी, मुंबई कार्यालय व वेबसाईटवरुन घेतलेले अशी सर्व मिळून ०६ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालील प्रमाणे..

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | M/s.Critical Care System, Pune | 02 | M/s.Regency Life Sciences, Banglore |
| 03 | M/s.Kalelkar Surgical,Mumbai | 04 | M/s.B.L.Lifesciences Pvt.Ltd.Delhi |
| 05 | M/s.Hindustan Surgical, Mumbai | 06 | M/s.Imperial Surgical Co.Mumbai |

सदरचा इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी प्राप्त सहा सिलबंद निविदा आजच्या सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०५) श्री साईनाथ हॉस्पिटलमधील सी.टी. स्कॅन विभागासाठी १६० के.व्ही.ए. क्षमतेचे यु.पी.एस.खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणे बाबत**

श्री साईबाबा रुग्णालयातातील सी.टी.स्कॅन मशिनचा DMS खराब होऊन नये म्हणून एक १६० के.व्ही.ए. क्षमतेचा यु.पी.एस.ची तातडीने आवश्यकता आहे.

सदर यु.पी.एस. ची अंदाजे किंमत रु.२०,००,०००/- असुन सदरची खरेदी ही विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवुन करता येईल असा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२७.०१.२०१० चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन याकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यात याव्यात असे ठरले होते. त्यानुसार सदरचे खरेदीकामी इंडियन एक्सप्रेस,मुंबई, सकाळ -पुणे, लोकमत-औरंगाबाद या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. निविदा विक्री ही दि.२३.०२.२०१० ते १०.०३.२०१० पर्यंत तर निविदा स्विकारण्याची मुदत दि.१२.०३.२०१० अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात एकुण ०३ तर मुंबई कार्यालयात ११ निविदा विक्री झालेल्या असून वेबसाईटवरुन घेतलेले अशी सर्व मिळून १८ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालील प्रमाणे..

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | M/s.Hykon India Pvt.Ltd | 02 | M/s.Aplab Ltd.,Mumbai |
| 03 | M/s.Power One Micro System Pvt.Bangalore | 04 | .M/s.PCI Ltd.Delhi |
| 05 | M/s.Delta Power Solution India Pvt. Ltd.,Mumbai | 06 | M/s.Dubas Engi.Pvt. Mumbai |
| 07 | M/s.Bhawani Digital System Pvt.Ltd, Mumbai | 08 | M/s.Gurukrupa Enterprisases, Thane |
| 09 | M/s.Numeric Power System Ltd.,Mumbai | 10 | M./s.Consul Conslidated Pvtd., Mumbai |
| 11 | M/s.Rohara Computer Products, Mumbai | 12 | M/s.Swafe Business Process Mgt. Mum |
| 13 | M/s.Aar-em Electronics Pvt.Ltd.,Pune | 14 | M/s.Socomec UPS India Pvt.Ltd.,Pune |
| 15 | M/s.Unitek Power Solutions Ltd.,Kerala | 16 | M/s.Emerson Network Power, Pune |
| 17 | M/s.DB Power Electronics Pvt.Ltd.Pune | 18 | M/s.Swadarshan Electricals,Nashik |

सदर यु.पी.एस.ची तातडीने आवश्यकता असल्याने सदर सिलबंद निविदा आजच्या सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०६) श्री रामदास रुंजा काटकर व इतर ३ रा.शिर्डी यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.५४/३२ (सि.स.नं.८६७) पैकी क्षेत्र ०० हे १२ आर पैकी ०९ आर जमीन खरेदी बाबत**

**(अ) विषयाची पूर्वपीठीका :**

श्री.रामदास रुंजा काटकर, श्री. देविदास रुंजा काटकर, श्री. ज्ञानेश्वर रुंजा काटकर व श्रीमती शेवंताबाई रुंजा काटकर यांनी मौजे शिर्डी येथील त्यांचे मालकीची जमीन सर्व्हे नंबर ५४/१२ क्षेत्र ०० हे १२ आर पैकी ७ ते ८ आर जमीन रुपये ७ लाख मात्र प्रती आर हया भावाने खरेदी करावी, म्हणून दिनांक १६ जानेवारी, २००९ रोजी विनंती वजा प्रस्ताव दिलेला होता.

सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८ फेब्रुवारी, २००९ रोजीचे सभेत विचारार्थ सादर करणेत आला होता, त्यावर निर्णय क्रमांक ७५(३४) खालीलप्रमाणे झालेला आहे :

" .. सदरहू प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. रामदास रुंजा काटकर व इतर ३ यांची सर्व्हे नंबर ५४/३२ मधील १२ आर जमीन आरक्षणात येते किंवा कसे, आरक्षणात येत असल्यास, त्याचे क्षेत्र किती व ते कशासाठी आरक्षित आहे याबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून माहिती घेणेत येऊन, सदरहू जमीन खरेदीबाबत त्यांचे ना हरकत पत्र घेणेत यावे. जमीनमालक त्यांचे अर्जात नमुद केलेप्रमाणे फक्त ०८ आर जमीन देणार असतील तर त्याप्रमाणे खरेदीखत करता येईल किंवा कसे याबाबत तसेच सदरहू जमीन खरेदीसंबंधित उपरोक्त इतर बाबींबाबत संस्थान वकिलाचा अभिप्राय घेऊन, त्यांचेकडून सदरहू जमिनीचा सर्च रिपोर्ट, खरेदीखताचा मसुदा इत्यादी तयार करुन घेणेत यावे. श्री. रामदास रुंजा काटकर व इतर ३ यांची जमीन मौजे शिर्डी शिवारातील सर्व्हे नंबर ५४/३२ क्षेत्र ०० हे १२ आर जमीन प्रति आर रुपये ४,५०,०००/- मात्र (अक्षरी रुपये चार लाख पन्नास हजार मात्र) या दराने खरेदी करण्यात यावी. जमीनमालकांना संस्थानमार्फत करण्यात येणाऱ्या प्राथमिक मोजणीचे वेळेस ताब्यात मिळणाऱ्या जमिनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम खरेदीखत नोंदणीचे वेळेस आदा करणेत यावी, उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीची रितसर

सरकारी मोजणी झालेनंतर ताब्यात मिळणारे एकूण जमिनीच्या प्रमाणांत आदा करण्यांत यावी. तसेच सदरहू जमीन खरेदीसाठी खरेदीखताचा मसुदा तयार करणे, खरेदीखत नोंदविणेकामी आवश्यक असणारे मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, जमीन खरेदी केलेनंतर जमिनीची सरकारी मोजणी करणेकामी मोजणी शुल्क भरणे आदि अनुषंगिक बाबींसाठी तसेच जमीन खरेदीकामी आवश्यक असणाऱ्या सर्व कायदेशीर व इतर अनुषंगिक बाबींची पूर्तता करणेसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. "

**(ब) निर्णयानुसार करण्यात आलेली कार्यवाही :**

०१. उपरोक्त निर्णयात नमूद केलेनुसार, मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दनांक ३१ मार्च, २००९ रोजीचे पत्रानुसार, यापुर्वी जा.क्र. न.प./बांध/कावि-५/३०४/२००६, दिनांक ३० जून, २००६ अन्वये आरक्षण क्रमांक २३,२५ व त्यालगतचे १८ मीटर व १२ मीटर रुंदीचे रस्त्याखालील जमिनीचे क्षेत्र विकास योजनेच्या आरक्षणाप्रमाणे विकसित करण्याचा हेतु साध्य करण्याच्या अटीवर संस्थानला जमीन खरेदी करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. शिर्डी विकास योजनेत वरील आरक्षणात कोणताही फेरबदल अद्याप न झाल्याने सदर प्रमाणपत्र ग्राहय धरुन त्यानुसार कार्यवाही करणेत यावी, असे कळविले आहे.

०२. विषयांकित अर्जदार यांनी दिनांक १६ जानेवारी, २००९ रोजीचे अर्जात नमूद केलेप्रमाणे, ०८ आर जमिनीचे खरेदीखत नोंदणी करणेस मान्यता देणेबाबत मा. दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडेस इकडील दिनांक ०५ मे, २००९ रोजीचे पत्रानुसार विनंती करणेत आली होती.

त्यास अनुसरुन, मा. दुय्यम निबंधक, राहाता यांनी त्यांचेकडील जा.क्र. मु.शु./नो.फी/ शिर्डी/ स.नं.५४/ ३२/२४२/०९, दिनांक २० जुलै, २००९ नुसार, सदरचे क्षेत्र हे चारीमुळे विभाजन होत आहे, त्याकरीता नगरभूमापन कार्यालयाकडील नकाशाची प्रत (ज्यामध्ये सदरच्या क्षेत्रामधून चारी गेल्याचा उल्लेख आहे) तो दस्तासोबत जोडावा, असे कळविले आहे.

०३. मा.दुय्यम निबंधक, राहाता यांचे उपरोक्त दिनांक २० जुलै, २००९ रोजीचे अभिप्रायानुसार, विषयांकित अर्जदार श्री.रामदास रुंजा काटकर व इतर ३, राहणार शिर्डी यांना इकडील दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे पत्रान्वये ते संस्थानला खरेदी देऊ इच्छित असलेल्या जमिनीची शासकीय मोजणी करुन, मोजणी नकाशा इकडील कार्यालयास सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते.

त्यानुसार, विषयांकित अर्जदार श्री.रामदास रुंजा काटकर व इतर ३ यांनी त्यांचेकडील दिनांक १२ मार्च, २०१० रोजीचे विनंती अर्जासोबत मोजणी नकाशा इकडील कार्यालयास सादर केला आहे.

**(क) विषयाची सद्य:स्थिती :**

**(०१)** आता, उपरोक्त परिच्छेद ब मध्ये नमूद केलेल्या अ.क्र. ०३ चे बाबीस अनुसरुन, विषयांकित अर्जदार श्री. रामदास रुंजा काटकर व इतर ०३ यांनी दिनांक १२ मार्च, २०१० रोजी मोजणी नकाशा सादर करतेवेळेस विनंती अर्ज दिला असून, त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे :

१.भुमि अभिलेख, राहाता यांचेकडून मोजणी करुन घेण्याच्या कार्यवाहीस एक ते दीड वर्षाचा कालावधी लागला.

२. दरम्यानच्या कालावधीत जमिनीच्या दरामध्ये अतिशय मोठया प्रमाणात वाढ झाली.

३. श्री साईबाबा संस्थानला पूर्वी ठरल्याप्रमाणे चारीच्या पूर्व बाजूस ०९ आर क्षेत्र रुपये ९,००,०००/- मात्र प्रति आर / गुंठा दराने देणेस तयार आहे. समक्ष चर्चेस बोलविल्यास जमिनीच्या किंमतीबद्दल चर्चा करणेस तयार आहे.

४. सदर विनंती अर्जासोबत, ७/१२ उतारा तसेच सिटी सर्व्हे कार्यालय, शिर्डीचा दाखला जोडला असून, त्यामध्ये सिटी सर्व्हे नंबर ८६७ हा सर्व्हे नंबर ५४ पैकी हिस्सा नंबर २/क/२ चा झालेचे मुळ अभिलेखावरुन दिसून येत आहे, असे नमूद केलेले आहे.

**(०२)** मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता, मौजे शिर्डी येथील विषयांकित सर्व्हे नंबर ५४/३२ (जुना सर्व्हे क्रमांक ५४/२/क/२) या १२ आर क्षेत्र असलेल्या जमिनीचे पाटबंधारे खात्याच्या चारीमुळे नैसर्गिकरित्या दोन भाग झालेचे दिसून येत आहे, म्हणजेच सदरची जमीन संस्थानने खरेदी केल्यास तिचे मुद्दामहून तुकडे होत नाही. त्यामुळे मा. दुय्यम निबंधक, राहाता हे या जमिनीचे खरेदी खत नोंदविणेस तयार आहेत.

तसेच, यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीने दिनांक ०८ फेब्रुवारी, २००९ रोजीचे निर्णयाप्रमाणे, सदर जमिनीचा दर रुपये ४,५०,०००/- मात्र प्रति आर दर निश्चित केला होता, सन २०१० चे मुल्यांकन तक्त्यात, विषयाकिंत जमिनीचा म्हणजेच सर्व्हे नंबर ५४ चा दर रुपये ५,५०,०००/- मात्र प्रति आर दर्शविणेत आलेला आहे.

तरी उपरोक्त विवेचनास अनुसरुन, श्री. रामदास रुंजा काटकर व इतर ३ यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर ५४/३२ क्षेत्र ०० हे १२ आर जमिनीपैकी संस्थान मालकीच्या जमिनीचे लगत असलेली, चारीच्या पुर्व बाजूकडील ०९ आर जमीन खरेदी करणेस व अर्जदार यांनी मागणी केलेल्या रक्कम रुपये ९,००,०००/- मात्र प्रति आर या दराबाबत त्यांचेशी चर्चा-तथा-वाटाघाटी करुन जमीन खरेदीचा प्रति आर दर निश्चित करणेस तसेच जमीन खरेदी करणेचे ठरलेस, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८ फेब्रुवारी, २००९ रोजीचे निर्णयात नमुद केलेप्रमाणे विहीत पध्दतीने जमिनी खरेदीची कार्यवाही पूर्ण करणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

जमीनमालक श्री. रामदास रुंजा काटकर हे आजच्या सभेपुढे चर्चा-वाटाघाटीसाठी उपस्थित होते. श्री. काटकर यांनी जमिनीचा दर प्रति गुंठा / प्रति आर रुपये १५ लाख मात्र मिळावा, अशी विनंती केली. श्री. काटकर यांनी जमिनीचे दराबाबत सविस्तर चर्चेअंती रेडीरेकनरचे दरापेक्षा १०% अधिक इतका म्हणजेच रक्कम रुपये ६,०५,०००/- मात्र प्रति आर हा दर मान्य केला.

त्यास अनुसरुन, मा.उपसमितीने सभेने श्री रामदास रुंजा काटकर व इतर ३ यांची मौजे शिर्डी येथील स.नं. ५४/३२ मधील क्षेत्र ०० हे १२ आर पैकी ०० हेक्टर ०९ आर ही जमिन प्रति आर रक्कम रुपये ६,०५,०००/- (रुपये सहा लाख पाच हजार मात्र) या दराने सामाईक विहीरीसह खरेदी करणेस, जमीन खरेदीकामी विहीत पध्दतीने संस्थान वकिलांमार्फत जमिनीचा सर्च रिपोर्टसह अभिप्राय घेऊन, खरेदीखत नोंदणीचे वेळेस जमिनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम आदा करणेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीस संस्थानचे नांव लागलेनंतर संस्थानमार्फत रितसर शासकीय मोजणी करुन, ताब्यात मिळणारे जमिनीच्या प्रमाणात रक्कम आदा करणेस तसेच जमीनखरेदीकामी मुद्रांक व नोंदणी शुल्क, सरकारी मोजणी शुल्क, वकिल फी आदि अनुषंगिक योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**(०७) <u>श्री विठ्ठल तुकाराम पवार यांची मौजे कनकूरी येथील गट नं.११६ क्षेत्र ०० हे ४९ आर पैकी २१आर जमीन खरेदी बाबत</u>**

**(अ)** श्री. विठ्ठल तुकाराम पवार, राहणार कनकुरी, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर यांनी त्यांचे मालकीची मौजे कनकुरी, तालुका राहाता येथील गट नंबर ११६ मधील क्षेत्र ०० हे २१ आर जमीन संस्थानने खरेदी घ्यावी म्हणून दिनांक १२ मार्च, २०१० रोजीचे विनंती अर्जाने प्रस्ताव दिला आहे. सदर अर्जासोबत जोडलेल्या गट नंबर ११६ च्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे :

| अ.नं. | गावाचे नांव / गट नंबर | कब्जेदार सदरी असलेली नोंद | इतर हक्कातील नोंदी | पीकपहाणी |
|---|---|---|---|---|
| ०१ | कनकुरी / गट नंबर ११६ | **विठ्ठल तुकाराम पवार** क्षेत्र ००-४१ अधिक पोटखराबा १/२ आर = ४१.१/२ आर आ.१=८० गणेश भाऊसाहेब पवार क्षेत्र ००-४० अधिक पोटखराबा १/२ आर = ४०.१/२ आर आ.१=८० एकूण क्षेत्र ००-८२ आर | कोऱ्हाळे क्रेडीट सोसायटी इ.प.क. घे. कनकुरी वि.का. सोसायटी इ.प.क.घे. विठ्ठल / गणेश **विहीर** | गणेश भाऊसाो. सोयाबीन ०-४० दु उस न (ला) विठ्ठल तुकाराम सोयाबीन ०-४१ |

उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे, इतर हक्कात विहीर अशी नोंद आहे, परंतु सदरची विहीर कोणाची आहे याचा अर्जदाराने अर्जात उल्लेख केलेला नाही. सदर विहीरीतील अथवा इतर विहीरीतील पाणी पिकास मिळत नसल्यास, अर्जदार यांची जमीन जिरायत म्हणून धरण्यात येईल. जिरायत जमीन असल्यास अर्जदाराने संस्थानला विकत देऊ केलेले क्षेत्र ०० हे २१ आर संस्थानला तुकडे जोड तुकडे बंदी कायद्यामुळे खरेदी करता येणार नाही.

**(ब)** अर्जदाराचा गट नंबर ११६ हा संस्थान पाणीपुरवठा तळयालगत पश्चिमेस आहे. सदरचा गट नंबर पाणीपुरवठा तळयाच्या लगत असल्याने, संस्थानला विस्तारीत व वाढीव पाणीपुरवठा योजना प्रकल्प राबविणेसाठी उपयुक्त आहे.

मौजे कनकुरी येथील गट नंबर ११६ चे एकूण क्षेत्र ०० हे ८१ आर (पोटखराबासह) असून, त्यामध्ये दोन खातेदार आहेत. अर्जदार श्री. विठ्ठल तुकाराम पवार यांचा हिस्सा ०० हे ४१ आर अधिक पोटखराबा १/२ आर आहे. या क्षेत्रापैकी अर्जदार फक्त २१ आर क्षेत्र संस्थानला विकत देणेस तयार आहे आणि या क्षेत्रात विहीरीचा समावेश होतो किंवा नाही, हे अर्जदार याने अर्जात नमुद केलेले नसल्याने, भविष्यात संस्थानने विकत घेतलेल्या क्षेत्रात पाणीपुरवठा तळयाचे विस्तारीकरण केल्यास अर्जदाराच्या उर्वरित क्षेत्रात असलेल्या विहिरीस पाझरणाऱ्या पाण्याचा फायदा होणार आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत फक्त २१ आर जमीन खरेदी करणे उचित होणार नाही. तसेच या क्षेत्रात पाण्याची विहीर आहे असे माहित असूनसुध्दा विहीरीशिवाय जमीन खरेदी केल्यास पाणी उपलब्धतेच्या दृष्टीने होणारे नुकसान मोठे असणार आहे.

तसेच, अर्जदार श्री. विठ्ठल तुकाराम पवार यांचे संपूर्ण क्षेत्र ४१.१/२ आर किंवा त्यांनी विकत देऊ केलेले क्षेत्र २१ आर खरेदी केलेतरी सदर गट नंबरमध्ये असलेले दुसरे खातेदार श्री. गणेश भाऊसाहेब पवार यांनी संस्थान खरेदी घेतलेल्या जमिनीच्या मोजणीस संमती दिली नाहीतर मोजणी करता येणार नाही. त्यासाठी सक्षम दिवाणी न्यायालयात दावा दाखल करुन जमिनीची मोजणी करुन घ्यावी लागेल व त्यासाठी संस्थानमार्फत संपुर्ण गटाची मोजणी करणेसाठी मोजणी शुल्क भरावे लागेल.

या सर्व बाबींचा विचार करता, अर्जदार श्री. विठ्ठल तुकाराम पवार यांची गट नंबर ११६ मधील क्षेत्र ०० हे ४१ आर अधिक पोटखराबा ०० हे १/२ आर असे एकूण क्षेत्र ४१.१/२ आर विकत घेणे उचित राहील.

**(क)** अर्जदार यांनी दिनांक १२ मार्च, २०१० रोजी दिलेल्या विनंती अर्जात, जमिनीचा दर रक्कम रुपये २,५०,०००/- मात्र (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार मात्र) प्रति आर / गुंठा मिळावा म्हणून विनंती केलेली आहे.

सन २०१० च्या मुल्यांकन तक्त्यानुसार, सदर जमिनीचा (गट नंबर ११६) चा दर रुपये जिरायत जमीन या शीर्षाखाली रुपये १० लाख मात्र प्रति हेक्टर असा दर्शविला असून, प्रति आर रुपये १०,०००/- मात्र प्रति आर इतका येत आहे.

यापुर्वी कनकुरी शिवारातील श्री.बाबासाहेब रामभाऊ डांगे यांची गट नंबर १२१ पैकी क्षेत्र ०१ हे ५० आर जमीन माहे मार्च, २००८ मध्ये रक्कम रुपये १ लाख मात्र प्रति आर या दराने, तर श्री.अण्णासाहेब रामभाऊ डांगे यांची गट नंबर १२१ पैकी मधील ७९ आर जमीन माहे मार्च, २००९ मध्ये रक्कम रुपये १,७१,०००/- मात्र प्रति आर या दराने खरेदी करणेत आलेली आहे. या व्यतिरिक्त मा. व्यवस्थापन समितीने माहे फेब्रुवारी, २००९ रोजीचे सभेत श्री. देवराम बंडू पवार, कनकुरी यांची गट नंबर १३५ पैकी मधील क्षेत्र ८० आर रक्कम रुपये १,८१,०००/- मात्र प्रति आर या दराने खरेदी करणेबाबत निर्णय घेतलेला असून, त्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

**(ड)** उपरोक्त प्रस्तावांस अनुसरुन, खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती आहे :

०१. श्री. विठ्ठल तुकाराम पवार यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर ११६ पैकी मधील त्यांचे मालकीचे असलेले क्षेत्र ०० हे ४१.१/२ आर (पोटखराब्यासह) पूर्ण खरेदी करणेबाबत अथवा अर्जदाराने प्रस्तावित केल्याप्रमाणे त्यांचे मालकीचे क्षेत्रापैकी २१ आर खरेदी करणेबाबत निर्णय घेणे.

०२. सदरहू जमीन खरेदी करण्याचे ठरल्यास, जमिनीचे दराबाबत अर्जदार यांचेशी चर्चा-तथा-वाटाघाटी करुन निर्णय घेणे.

०३. उपरोक्त जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, जमीनमालकांस जो दर मान्य होईल, त्या दरानुसार एकूण जमिनीच्या किंमतीच्या ८० टक्के रक्कम खरेदीखत नोंदणीचे वेळेस आदा करणे व उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीस संस्थानचे नांव लागलेनंतर, संस्थानमार्फत जमिनीची सरकारी मोजणी झालेनंतर प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे जमिनीच्या प्रमाणात आदा करणेस मान्यता देणे.

०४. जमीन खरेदी करणेपुर्वी संस्थान वकिलांमार्फत सर्च रिपोर्ट घेणे, अभिप्राय घेणे, त्या अनुषंगाने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करणे, खरेदीखत नोंदविणेसाठी मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, वकील फी आदा करणे आदि व इतर अनुषंगिक कामांसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

जमीनमालक श्री विठ्ठल तूकाराम पवार, कनकुरी हे आजच्या सभेपुढे चर्चा-वाटाघाटीसाठी उपस्थित होते. श्री. पवार यांनी जमिनीचा दर प्रति गुंठा / प्रति आर रुपये २.५० लाख मात्र मिळावा, अशी विनंती केली. श्री. पवार यांनी जमिनीचे दराबाबत सविस्तर चर्चेअंती रक्कम रुपये १,७५,०००/- मात्र प्रति आर हा दर मान्य केला.

त्यास अनुसरुन, मा.उपसमितीने सभेने श्री विठ्ठल तुकाराम पवार यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर ११६ मधील क्षेत्र ०० हे ४१.१/२ आर पैकी जमीन बागायत असल्यास कमीत कमी ०० हेक्टर २१ आर ही जमिन प्रति आर रक्कम रुपये १,७५,०००/- (रुपये एक लाख पंच्याहत्तर हजार मात्र) या दराने खरेदी करणेस, जमीन खरेदीकामी विहीत पध्दतीने संस्थान वकिलांमार्फत जमिनीचा सर्च रिपोर्टसह अभिप्राय घेऊन, खरेदीखत नोंदणीचे वेळेस जमिनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम आदा करणेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीस संस्थानचे नांव लागलेनंतर संस्थानमार्फत रितसर शासकीय मोजणी करुन, ताब्यात मिळणारे जमिनीच्या प्रमाणात रक्कम आदा करणेस तसेच जमीनखरेदीकामी मुद्रांक व नोंदणी शुल्क, सरकारी मोजणी शुल्क, वकिल फी आदि अनुषंगिक योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत यावी. तथापी, जमीन जिरायत असल्यास श्री.पवार हे त्यांचे संपूर्ण क्षेत्र म्हणजेच ४१ १/२ आर (पोट खराब्यासह) खरेदी देत असल्यास खरेदी करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**(०८) श्री चांगदेव बापू काटकर, रा.शिर्डी यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. ५४/३१ क्षेत्र ०० हे १३ आर पैकी ०९ आर जमीन खरेदी करणे बाबत**

**(अ)** श्री. चांगदेव बापू काटकर, शिर्डी यांनी मौजे शिर्डी येथील त्यांचे मालकीची जमीन सर्व्हे नंबर ५४/३१ (जुना सर्व्हे नंबर ५४/२ क१) क्षेत्र ०० हे १३ आर पैकी ०९आर जमीन व विहीर सामायिक रक्कम रुपये १५लाख मात्र प्रती आर हया भावाने खरेदी करावी, म्हणून दिनांक १७ मार्च, २०१० रोजी विनंती वजा प्रस्ताव दिलेला आहे.

सदरहू अर्जासोबत, जोडलेल्या ७/१२ च्या उताऱ्याचे अवलोकन केले असता, कब्जेदार सदरी अर्जदार श्री. चांगदेव बापू काटकर यांचे नांव असून, पीक पहाणीस स्वतः अशी नोंद आहे. इतर हक्कात शिर्डी विविध कार्यकारी सोसायटी यांचा बोजा आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत दिलेल्या शासकीय मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता, संस्थानने यापूर्वी खरेदी केलेले क्षेत्र हे अर्जदाराच्या जमिनीच्या दक्षिण बाजूस आहे. यापुर्वी संस्थानने खाली नमुद केलेल्या खातेदारांच्या सर्व्हे नंबर ५४ मधील जमिनी खरेदी केलेल्या आहेत

| अ.नं. | पूर्वीच्या जमीनमालकाचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| ०१ | सौ.कमल गोपीनाथ म्हस्के | ५४/३४ | ०० हे २३आर ०० चौमी |
| ०२ | सौ.कमल गोपीनाथ म्हस्के | ५४/५६ | ०० हे ०६ आर ०० चौमी |
| ०३ | श्री. भाऊसाहेब म्हाळू काटकर | ५४/३५ | ०० हे ०४ आर ५० चौमी |

उपरोक्त संस्थान मालकीच्या जमिनीच्या उत्तरेस श्री. रामदास रुंजा काटकर व इतर ३ यांची मालकीची १२ आर जमीन असून, त्यापैकी ०९ आर जमीन खरेदी घेणेचे प्रस्तावित असून, त्याबाबत कार्यवाही सुरु असून, त्याबाबतचा प्रस्ताव अलाहिदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत आलेला आहे.

अर्जदार श्री. चांगदेव बापू काटकर यांचे नांवावर ०० हे १३ आर जमीन आहे, त्यापैकी ते फक्त ०९आर जमीन सामायिक विहिरीसह खरेदी द्यावयास तयार आहेत. ७/१२ उतारा पाहिला असता, जमीन खरेदीस

कोणतीही अडचण नाही. अर्जदार यांचे मालकीचे १३ आर जमिनीपैकी फक्त ०९ आर जमीन खरेदी केल्यामुळे तुकडे जोड तुकडे बंदी कायद्याचा जरी भंग होत आहे असे कागदोपत्री दिसत असले तरी, शासकीय मोजणी नकाशात नमूद केलेप्रमाणे व दर्शविलेप्रमाणे अर्जदारच्या क्षेत्रातून पाटबंधारे (सिंचन) खात्याची चारी जात असल्याने नैसर्गिक रित्या दोन भाग झालेले आहेत. त्यामुळे चारीच्या पुर्वेकडील ०० हे ०९ आर जमीन संस्थानला खरेदी करता येईल. तसेच सदर जमीन खरेदीमुळे संस्थानने पुर्वी खरेदी केलेल्या सर्व्हे नंबर ५४ मधील जमिनींचा तसेच त्यालगत असलेली जमीन खरेदी करण्याचे प्रस्तावित असल्याने, या सर्व जमिनी मिळून एक सलग जमिनीचे क्षेत्र तयार होणार आहे.

तसेच अर्जदार श्री. चांगदेव बापू काटकर यांनी त्यांनी संस्थानला विकत देऊ केलेल्या जमिनींमध्ये सामायिक विहीर आहे असे अर्जात नमूद केलेले आहे, तथापि ७/१२ उताऱ्यात इतर हक्कांत नोंद नाही, पीकपहाणी सदरी मात्र विहीरीची नोंद आहे. याबाबत अर्जदार यांना कामगार तलाठी, शिर्डी यांचेशी संपर्क साधून विहीरीची नोंद करणेबाबत कार्यवाही करणेस सांगणेत आलेले आहे.

**(ब)** अर्जदार श्री. चांगदेव बापू काटकर यांनी दिनांक १७ मार्च, २०१० रोजीचे विनंती प्रस्तावानुसार, जमिनीची किंमत रक्कम रुपये १५ लाख मात्र प्रति आर / गुंठा मिळावी अशी मागणी केलेली आहे तथापि ती अवास्तव आहे.

यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८ फेब्रुवारी, २००९ रोजीचे सभेतील निर्णयानुसार, विषयांकित जमिनीचे लगत असलेली श्री. रामदास रुंजा काटकर व इतर ३ यांची जमीन रुपये ४,५०,०००/- मात्र प्रति आर या दराने खरेदी करणेबाबत निर्णय घेतलेला होता. परंतु मा. दुय्यम निबंधक, राहाता यांनी श्री. रामदास काटकर यांचे जमिनीचे पाटबंधारे खात्याचे चारीमुळे नैसर्गिकरित्या विभाजन झालेले आहे असा वस्तुस्थिती दर्शविणारा भूमि अभिलेख खात्याचा मोजणी नकाशा खरेदी खताचे दस्ताबरोबर जोडावा, असे लेखी कळविले होते. त्याप्रमाणे अर्जदार श्री. रामदास रुंजा काटकर यांना संस्थानमार्फत कळविणेत आले होते. त्यांनी शासकीय मोजणी शुल्क भरुन जमिनीचा मोजणी नकाशा तयार करुन संस्थानकडे नुकताच म्हणजे दिनांक १२ मार्च, २०१० रोजी सादर केलेला असून, त्या मोजणी नकाशासोबत जोडलेल्या विनंती अर्जात प्रति गुंठा रक्कम रुपये ९ लाख अशी जमिनीची किंमत मिळावी म्हणून विनंती केलेली आहे. त्यामुळे सदरचा प्रस्ताव सद्यःस्थितीसह पुनःश्च मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अलाहिदा सादर करणेत आलेला आहे. सन २०१० चे मुल्यांकन तक्त्यात, विषयाकिंत जमिनीचा म्हणजेच सर्व्हे नंबर ५४ चा दर रुपये ५,५०,०००/- मात्र प्रति आर दर्शविणेत आलेला आहे. त्यामुळे विषयांकित जमिनीची किंमत वाटाघाटीने निश्चित होणे उचित राहील.

तसेच, विषयांकित जमिनीमध्ये जी सामाईक विहीर आहे त्यामध्ये श्री. रामदास रुंजा काटकर यांचा पाण्याचा निम्मा (१/२) हिस्सा आहे. त्यामुळे फक्त विहीरीची किंमत वेगळी ठरविणे आवश्यक राहील. विहीरीची किंमत वेगळी निश्चित केलेनंतर, सदर रक्कम सम प्रमाणांत दोन्ही खातेदारांना वाटप करणे व त्याची नोंद खरेदीखतात करणे सोयीचे होईल.

तसेच, सदर जमीन आरक्षणात असल्याने मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दिनांक ३१ मार्च, २००९ रोजीचे पत्रानुसार, यापुर्वी जा.क्र. न.प./बांध/कावि-५/३०४/२००६, दिनांक ३० जून, २००६ अन्वये आरक्षण क्रमांक २३,२५ व त्यालगतचे १८ मीटर व १२ मीटर रुंदीचे रस्त्याखालील जमिनीचे क्षेत्र विकास योजनेच्या आरक्षणाप्रमाणे विकसित करण्याचा हेतु साध्य करण्याच्या अटीवर संस्थानला जमीन खरेदी करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. शिर्डी विकास योजनेत वरील आरक्षणात कोणताही फेरबदल अद्याप न झाल्याने सदर प्रमाणपत्र ग्राहय धरुन त्यानुसार कार्यवाही करणेत यावी, असे कळविले आहे. त्यामुळे सदर जमीन खरेदी करण्याचा निर्णय झाल्यास, संस्थान वकिलांचा अभिप्राय घेऊन कायदेशीर बाबींची पूर्तता करणेकामी कार्यवाही करता येईल.

तरी खालील बाबतीत निर्णय होणेस विनंती आहे :

०१. श्री. चांगदेव बापू काटकर यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर ५४/३१ मधील ०० हे १३ आर पैकी ०९ आर जमीन करणेकामी जमिनीचा प्रती आर दर अर्जदार यांचेशी चर्चा-तथा-वाटाघाटीने ठरविणे.

०२. सामाईक विहिरीची किंमत स्वतंत्ररित्या ठरविणे व ती समप्रमाणांत दोनही खातेदारामध्ये वाटप करुन त्याबाबत खरेदीखतात नोंद करणेस मान्यता असावी.

०३.जमीन खरेदीकामी सर्च रिपोर्ट घेणे, खरेदीखतासाठी आवश्यक मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, शासकीय मोजणी शुल्क भरणे, वकील फी आदा करणे आदि जमीन खरेदीकामी आवश्यक असणाऱ्या सर्व कायदेशीर व इतर अनुषंगिक बाबींची पूर्तता करणेसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

जमीनमालक श्री चांगदेव बापू काटकर हे आजच्या सभेपुढे चर्चा-वाटाघाटीसाठी उपस्थित होते. श्री. काटकर यांनी जमिनीचा दर प्रति गुंठा / प्रति आर रुपये १५ लाख मात्र मिळावा, अशी विनंती केली. श्री. काटकर यांनी जमिनीचे दराबाबत सविस्तर चर्चेअंती रेडीरेकनरचे दरापेक्षा १०% अधिक म्हणजेच रक्कम रुपये ६,०५,०००/- मात्र प्रति आर हा दर मान्य केला.

त्यास अनुसरुन, मा.उपसमितीने सभेने श्री चांगदेव बापू काटकर यांची मौजे शिर्डी येथील स.नं. ५४/३१ मधील क्षेत्र ०० हे १३ आर पैकी ०० हेक्टर ०९ ही जमिन प्रति आर रक्कम रुपये ६,०५,०००/- (रुपये सहा लाख पाच हजार मात्र) या दराने सामाईक विहीरीसह खरेदी करणेस, जमीन खरेदीकामी विहीत पध्दतीने संस्थान वकिलांमार्फत

जमिनीचा सर्च रिपोर्टसह अभिप्राय घेऊन, खरेदीखत नोंदणीचे वेळेस जमिनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम आदा करणेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीस संस्थानचे नांव लागलेनंतर संस्थानमार्फत रितसर शासकीय मोजणी करुन, ताब्यात मिळणारे जमिनीच्या प्रमाणात रक्कम आदा करणेस तसेच जमीनखरेदीकामी मुद्रांक व नोंदणी शुल्क, सरकारी मोजणी शुल्क, वकिल फी आदि अनुषंगिक योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**(०९) श्री रामनवमी उत्सवानिमित्ताने कुस्त्यांसाठी पोयटा व लालमाती खरेदी करणेकामी आलेल्या खर्चास मान्यता मिळणे बाबत**

श्रीरामनवमी -२०१० हा उत्सव दि.२३/०३/२०१० ते दि.२५/०३/२०१० या कालावधीत संस्थान तर्फे साजरा करण्यात करण्यात आले आहे. या निमित्ताने सालाबाद प्रमाणे कुस्त्यांचा हंगामा साजरा करण्यात आला आहे.

या वर्षी मौजे निमगाव हद्दीत गट नं ८७,८८ मध्ये कुस्त्यांसाठी ग्राऊंड तयार करण्यात आले होते. ग्राउंडसाठी लाल माती व पोयटा खरेदी खरेदी करणेकामी दरपत्रक मागवुन न्युनत्तम दरधारक यांचे कडुन पोयटा व लालमाती खरेदी करण्यात आली.

मागविण्यात आलेल्या दर पत्रकातील दर (प्रति ब्रास) बाबतचा तपशिल खालील प्रमाणे

| क्र | पार्टीचे नाव | आवक नं / दिनांक | दर पोयटा | दर लालमाती |
|---|---|---|---|---|
| ०१ | बाबासाहेब रामनाथ तुरकणे, पिंपळवाडी | ७६७५/१९-३-१० | **रु.६७५/-** | रु.२३००/- |
| ०२ | युवराज नानासाहेब तुरकणे, पिंपळवाडी | ७६७७/ १९-३-१० | रु.७००/- | रु.२५००/- |
| ०३ | सुनिल एकनाथ थेटे, कनकुरी | ७६७८/१९-३-१० | रु.८५०/- | रु.२५००/- |
| ०४ | साई ब्रीक्स ,नाशिक | ७७४१ / २२-३-१० | --- | **रु.१८००/-** |

श्री बाबासाहेब रामनाथ तुरकणे, पिंपळवाडी यांचे पोयटामाती दर (रु.६७५/- प्रति ब्रास) असल्याने त्यांचे कडुन १६ ब्रास पोयटा खरेदी करण्यात आली याकामी रु.१०,८००/- मात्र खर्च आलेला आहे.

साई ब्रीक्स, नाशिक यांचे लालमातीचे दर (रु.१८००/- प्रति ब्रास) असल्याने त्यांचे कडुन १८.४२ ब्रास लालमाती खरेदी करण्यात आली आहे.याकामी रु.३३,१५६/- मात्र खर्च आलेला आहे.

कुस्त्यांच्या ग्राउंडसाठी पोयटामाती व लालमाती खरेदी करणेकामी एकुण रु.४३,९५६/- ( रु.त्रेचाळीस हजार नऊशे छपन्न ) मात्र खर्च आलेला असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**(१०) श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर व साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागासाठी Cautry cable व इतर साहित्य खरेदी बाबत**

श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभाग व श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाने दैनंदिन शस्त्रक्रिया करणेसाठी लागणारे Cautry Cable व इतर साहित्याची मागणी केलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate Per | App.Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Dispo. Bipolar Cautry Cable | 100 | 150.00 | 15000.00 |
| 2 | Reuseble Bipolar Cautry Cable | 40 | 350.00 | 14000.00 |
| 3 | Monopolar Handle with Cable | 50 | 350.00 | 17500.00 |
| 4 | Patient Plate | 20 | 100.00 | 2000.00 |
| 5 | Foot Swich with 4 Core Cable | 06 | 800.00 | 4800.00 |
| | | | **Total Amt. in Rs.-** | **53300.00** |

वरीलप्रमाणे Cautry Cable व इतर साहित्याच्या खरेदीकामी अंदाजे रु.५३,३००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त साहित्य खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.५३,३००/- चे खर्चास तसेच विहित पध्दतीने कोटेशन मागविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(११) Kidney Stone शिबीरास प्रत्यक्षात आलेल्या खर्चास मंजूरी मिळणे बाबत**

श्री साईनाथ रुग्णालयाकडील दि.१२.०२.२०१० मंजुर टिपणी अन्वये दि.२६-२७-२८ फेब्रुवारी व ०१ मार्च २०१० अखेर किडणी स्टोन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात एकूण ५९ रुग्णांची निवड करणेत आली होती. त्यापैकी ४६ रुग्णांवर उपचार करणेत आले. त्यातील ०३ रुग्णांवर ESWL + PCNL अशा दोन्हीही पध्दतीने उपचार करणेत आलेले आहे. याप्रमाणे शिबीरात १९ रुग्णांवर Sound waves च्या साहयाने (Lithotrypsy) व ३० रुग्णांवर स्कोपीने शस्त्रक्रिया (PCNL+URS+ Cystoscopy EVA etc.) करणेत आलेले आहे.

अशा प्रकारचे शिबीर डॉ.केतन शुक्ला, अहमदाबाद येथील लेसर किरण तज्ञ व त्यांचे सहकारी यांचेमार्फत श्री साईनाथ रुग्णालयात पाच वेळेस अयोजन करणेत आले होते.

परंतू यावेळी डॉ.केतन शुक्ला यांनी असे कळविले आहे की, (Percutaneous Nephrolithotomy) (P.C.N.L.) मोठे स्टोन असलेल्या रुग्णांवर स्कोपीने शस्त्रक्रिया आम्ही पूर्वी प्रमाणेच मोफत करणेस तयार आहोत परंतू छोटया १ ते १ १/२ c.m. साईजच्या स्टोनवर Sound waves च्या (Lithotrypsy) साहयाने केले जाणारे उपचार याकरिता प्रत्येक Lithotrypsy साठी रु.९०००/- इतका आकार ते रुग्णांना लावतात. सदर Lithotrypsy करीता बेसीक खर्च हा रु.५०००/- पर्यत येतो. यापुर्वी Sound waves च्या सहाय्याने केल्या जाणाऱ्या उपचारासाठी फार्मासेटीकल कंपन्यांकडून सहाय्य केले जात असत, परंतू आता सरकारने सदर कंपन्यांवर बंदी आणल्याने यापुढे सदर कंपन्या अशा प्रकारची मदत करणेस तयार नाहीत. त्या करीता संस्थानने येणाऱ्या बेसीक खर्चाच्या निम्मा भार उचलावा अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त खर्चाचे निम्मा खर्च संस्थानला करावयाचा झाल्यास प्रत्येक Lithotrypsy रुग्णांमागे रु.२५००/- इतका बेसीक (प्राथमिक) खर्च येईल. या शिबीरात Lithotrypsy चे १९ रुग्णांवर उपचार करणेत आलेले आहेत. याप्रमाणे रु.२५०० x १९ = ४९ रुग्णांकरिता संस्थानला अंदाजे रु.२,४५,०००/- इतका अप्रत्यक्ष खर्च आलेला आहे. संस्थान मार्फत सदर शिबीरातील लाभार्थी रुग्णांना सर्व उपचार मोफत केले जातात.

डॉ. केतन शुक्ला यांनी बीलापोटी रोखीने अदा करावयाचा प्रत्यक्ष खर्च रु.४७,५००/- व संस्थानला आलेला अप्रत्यक्ष खर्च रु.२,४५,०००/- असे एकूण अंदाजे रु.२,९२,५००/- इतका प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्च आलेला आहे.

शिबीर कामी दि.१२.०२.२०१० चे टिपणीन्वये रु.३,००,०००/- चे खर्चास प्राथमिक मंजूरी घेण्यात आलेली आहे. त्यापैकी रु.२,९२,५००/- इतका प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्च आलेला आहे.

शिबीर कामी लागणारे आवश्यक ते मेडिसीन व साहीत्य संस्थान मेडिकल स्टोअरमार्फत पुरविणेत आली. याशिवाय शिबीर कालावधीत डॉ. शुक्ला व सहकारी यांची निवास व जेवनाची व्यवस्था संस्थान मार्फत मोफत करणेत आली होती.

तरी उपरोक्त प्रमाणे डॉ. केतन शुक्ला यांना देय होत असलेले एकूण बील रु. ४७,५००/- रोखीने आदा करणेस तसेच या शिबीरकामी संस्थानला आलेला एकूण प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अंदाजे रु.२,९२,५००/- चे झालेल्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षक)

**(१२) सन २००९-१० या वार्षिक निविदेतील मंजूर दराने Dynaplast ४" खरेदी बाबत**

श्री साईबाबा रुग्णालयाचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर व वार्डात दैनंदिन वापराकरीता लागणारे Dynaplast 4" करीता सन २००९-२०१० या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने मे. साई एन्टरप्राईजेस, अहमदनगर यांना इकडील पत्र क्र. ५४१० दि. ०५.०५.२००९ अन्वये DMP कंपनीच्या प्रती नग रु.१५०.८० प्रमाणे २५०० नगांचा पुरवठा आदेश देण्यात आला होता.

मे. साई एन्टरप्राईजेस, अहमदनगर यांनी वरील पुरवठा आदेशापैकी १५०० नगांचा पुरवठा केलेला आहे. परंतु त्यांनी दिलेल्या DMP कंपनीचे Dynaplast चांगल्या दर्जाचे नसल्यामुळे दि.२७/११/२००९ चे मंजूर टिप्पणीन्वये मे. साई एन्टरप्राईजेस, अहमदनगर यांचा १००० नगांचा पुरवठा आदेश रद्द करुन तो मे. महेश सर्जिकल, पुणे यांना Dr. Sabarwal या कंपनीकरीता प्रती नग रु.१५८.५५ या दराने पुरवठा आदेश देण्यात आला होता,

त्यानुसार M/s.Mahesh Surgical, Pune यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे उपरोक्त Dynaplast चा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सध्या सदरचे Dynaplast 4" औषध भांडारात शिल्लक नसून ते कार्डीयाकच्या दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी अत्यंत आवश्यक असते.

रुग्णांच्या सतत वाढणाऱ्या संख्येमुळे उपरोक्त Dynaplast 4" चा दरमहा खप ३५० इतका वाढलेला आहे. त्यामुळे तुर्तास अंदाजे ३ महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Make | Packing | Qty. | Rate Per | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Dynaplast 4" | Sabarwal | 1 Pcs | 1000 | 158.5584 | 1,58,558.40 |
| | | | | | Total Amt. in Rs. | 1,58,558.40 |

वरीलप्रमाणे M/s.Mahesh Surgical, Pune यांचे वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु.१,५८,५५८/- इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ निर्णय क्रमांक ३५४ Clause No.८ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

तरी M/s.Mahesh Surgical, Pune यांचेकडून वरीलप्रमाणे उपरोक्त Dynaplast 4" मागील मंजुर दराने खरेदी करण्यात आलेले असून सदरचे खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१३) Pressure Monitoring Kit Double खरेदीबाबत**

श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागात शस्त्रक्रिया करण्याकरीता उपरोक्त किटची आवश्यकता असते. त्यानुसार सन २००९-१० या वार्षिक वर्षामध्ये २०० किटची मागणी केलेली होती. याकामी एकूण आठ निविदाधारकांचे दर प्राप्त झाले होते ते खालील प्रमाणे -

| Sr. No. | Name of Suppliers | Make | Qty. | Rate Per in Rs. | Rate After Discount | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Spandan Enterprises, Nashik | B.D. | 200 | 738.4000 | 723.6320 | 144726.40 |
| 2 | Kanchan Drugs Pvt. Ltd., Pune | B.D. | 200 | 900.0100 | 900.0100 | 180002.00 |
| 3 | Yoga Enterprises, Pune | B.D. | 200 | 1144.0000 | 1144.0000 | 228800.00 |
| 4 | B.L. Lifesciences Pvt. Ltd., New Delhi | BL INDIA | 200 | 1144.0000 | 1144.0000 | 228800.00 |
| 5 | Life Care Devices Pvt. Ltd., Mumbai | B.D. - SINGAPORE | 200 | 1300.0000 | 1300.0000 | 260000.00 |
| 6 | Sai Enterprises, Ahmednagar | MEDEX | 200 | 1350.0000 | 1350.0000 | 270000.00 |
| 7 | Hansraj Nayyar Medical India, Mumbai | SMITHS MEDICAL INTERNATIONAL LTD. | 200 | 1434.0000 | 1434.0000 | 286800.00 |
| 8 | Kanchan Drugs Pvt. Ltd., Pune | EDWARDS | 200 | 1479.3800 | 1479.3800 | 295876.00 |

उपरोक्त तुलनात्मक दरांच्या तक्त्यातील निम्नतम दरानुसार मे. स्पंदन एंटरप्राईजेस, नाशिक यांना इकडील पत्र क्र. ५४२७ दि. ०५.०५.२००९ अन्वये २०० नगांचा प्रती नग ७२३.६३२० या प्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आला होता.

मे. स्पंदन एंटरप्राईजेस, नाशिक यांना मालाचा पुरवठा करणेस सांगितले असता त्यांनी मालाचा पुरवठा केला नाही वेळोवेळी तगादा केल्यानंतर दि.१०/०३/२०१० चे पत्रान्वये त्यांनी आमचे टेंडरमध्ये चुकून Single Pressure Monitoring Kit चे दर दिलेले आहे असे कळविलेले आहे तर Double Pressure Monitoring Kit करीता त्यांचे दर प्रती नग रु.९३०/- असे आहे.

त्यामुळे तुलनात्मक दराचे तक्त्यातील BD कंपनीचे क्रमांक दोनचे पुरवठाधारक मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांचे निविदेतील मंजूर दर प्रती नग रु.९००/- आहेत व ते या दराने प्रमाणे पुरवठा करणेस तयार होते.

सदरचे Pressure Monitoring Kit हे दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे व त्याकामी रु.३५२७३.६० (९००.०० - ७२३.६३२० = १७६.३६८ x २०० = ३५२७३.६०) इतका जास्तीचा खर्च आलेला आहे.

मे. स्पंदन एंटरप्राईजेस, नाशिक यांचा सदर किटचा पुरवठा आदेश रद्द करुन ती मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांचेकडून खरेदी करण्यात आली असून सदर Pressure Monitoring Kit खरेदीच्या व खर्चाची नोंद घेण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१४) Pronova XR ३.५ x १३mm (Pronova XR Drug Eluting Stent) चे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक शस्त्रक्रिया विभागातील कार्डीओलॉजीस्ट डॉ. गौरव वर्मा यांनी श्री. मतकर बाबाराजे आण्णासाहेब (आय. पी. नं. ३०९७३) या रुग्णावर दि.०१/१२/२००९ रोजी Left Anterior Descending artery at the ostium ॲन्जीओप्लास्टीची शस्त्रक्रिया केलेली आहे. सदरचे शस्त्रक्रियेकरीता त्यांनी Pronova XR ३.५ x १३mm (Pronova XR Drug Eluting Stent) हा विशिष्ट प्रकारचा १ स्टेन्ट वापरलेला आहे.

उपरोक्त शस्त्रक्रियेसाठी रु.१,३६,९५५/- इतका खर्च आलेला असून त्यांना रु.१,२१,३५५/- त्यांनी रुग्णालयाचे वित्त विभागात पावती नं.२१०२२२१३ दि.१५.०१.२०१० अन्वये रोखीने जमा केली आहे, तर उर्वरीत रक्कम रु.१५,६००/- त्यांना रुग्णालयाकडून सुट मंजुर केलेली आहे.

उपरोक्त विशिष्ट प्रकारचा स्टेन्ट करीता वार्षिक खरेदीमध्ये पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. परंतू सदर प्रकारच्या स्टेन्टची रुग्णास आवश्यकता होती. अशा प्रकारच्या स्टेन्टसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित कार्डीयाक सर्जन यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे असे ठरले आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०९.२००८ निर्णय क्र.६३५ अन्वये कार्डीओलॉजीस्ट व कार्डीयाक सर्जन यांनी एखाद्या विशिष्ट आयटमची मागणी केलेस व टेंडरमध्ये त्याचे दर प्राप्त झालेले असेल तर ती त्यांना तेवढ्यापुरतीच टेंडरमधील दराने खरेदी करुन देण्यात यावी असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार उपरोक्त स्टेन्ट M/s. JMG Corporation Ltd., Mumbai यांचेकडून बील नं.२४६२ दि.३०.११.२००९ अन्वये एक नग रु.९०,०००/- प्रमाणे खरेदी करण्यात आलेला असून तो पेशंटला बसविण्यात आलेला आहेत. सदर स्टेन्ट २००९-१० या वर्षातील तुलनात्मक दर रु.९००००/- आहे.

तरी M/s. JMG Corporation Ltd., Mumbai यांचेकडून उपरोक्त स्टेन्ट खरेदीस व याकामी आलेल्या रु.९०,०००/- M/s. JMG Corporation Ltd., Mumbai यांना अदा करण्यात आलेली सदरचे खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१५) ENT Microdebrider मशिनचे दुरुस्तीबाबत**

श्री साईनाथ रुग्णालयाचे कान, नाक व घसा शस्त्रक्रिया विभागाकरीता इकडील पुरवठा आदेश क्र.४०४०/२००६दि.२४/०३/२००६ अन्वये मे. कार्ल स्टोअर्ज, जर्मनी यांचे भारतातील अधिकृत विक्रते मे. चिमको बायोमेडीकल इंजिनीअरींग कंपनी, मुंबई यांचेकडुन एक मायक्रो-डीब्रायडर युनीट एकुण रु. ५,४०,४८८.२५/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर युनीट श्री साईनाथ रुग्णालयात दि. १४/०७/२००६ रोजी कार्यान्वीत करण्यात आले असुन कंपनीने सदर युनीटकरीता दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. १३/०७/२००७ रोजी संपला आहे. सध्या सदर युनीटची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागाकडुन येथेच केली जाते आहे. परंतु दुरुस्तीकरीता काही स्पेअर पार्टची आवश्यकता असल्यास मशिन कंपनीकडे पाठवुन दुरुस्त करुन घेतले जाते.

सदर मायक्रो-डीब्रायडर युनीट आतापर्यंत व्यवस्थीत काम देत होते. परंतु सध्या सदर युनीट व्यवस्थित काम देत नसल्यामुळे ऑपरेशन थिएटर विभागाने त्यांचे पत्र क्र.५७१ दि. २५/०१/२०१० अन्वये दुरूस्तीसाठी कळविले होते. सदर मशिनचे मॉनिटरवर Error येत असल्यामुळे कंपनीकडे दुरूस्तीसाठी पाठविणे गरजेचे आहे असे ज्यु.बायोमेडीकल इंजिनीअर यानी कळविले आहे. त्यामुळे सदर युनिट मे. चिमको बायोमेडीकल इंजिनीअरींग कं. मुंबई यांचेकडे पत्र क्र.२३३/१० दि.२७/०१/१० रोजी दुरुस्तीकरीता पाठविण्यात आले आहे. कंपनीने मशीनची तपासणी करून त्यांचे पत्र क्र.६१२७ दि.०२/०३/१० चे अन्वये सदर मशिनचे दुरुस्तीकरीता सर्व करांसहीत एकुण रु. १,२०,०१५/- (अक्षरी रु.एक लाख वीस हजार पंधरा मात्र) इतक्या रक्कमेचे कोटेशन पाठविले आहे.

सदर रकमेची कंपनीने आगाउ मागणी केली आहे. सदर मायक्रो-डीब्रायडर युनीटचे पुरवठाधारक मे. चिमको बायोमेडीकल इंजिनीअरींग कं. मुंबई हे मे. कार्ल स्टोअर्ज जर्मनी यांचे या विभागाचे अधिकृत डीलर आहेत व सदर मशीनचे दुरुस्तीकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट हे मे. कार्ल स्टोअर्ज नवी दिल्ली व त्यांचे अधिकृत डीलर यांचेकडेच मिळतात.

तरी मायक्रो-डीब्रायडर युनीट मे. चिमको बायोमेडीकल इंजिनीअरींग कं. मुंबई यांचेमार्फत मे. कार्ल स्टोअर्ज नवी दिल्ली यांचेकडुन दुरुस्त करुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. १,२०,०१५/- चे खर्चास व सदर रक्कम कंपनीस आगाऊ अदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१६) Pacemaker चे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात डॉ.गौरव वर्मा हे पुर्ण वेळ कार्डीओलॉजिस्ट आहेत. त्यांनी सौ.तारगे भामाबाई विठोबा या पेशंटला दि.१२.०९.२००९ रोजी पेसमेकर बसविला आहे.

सदरचे Process करीता त्यांनी St.Jude Medical Co.चा Pacemaker BVI DDDRV Set हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग वापरलेला आहे. सदर पेसमेकर करीता वार्षीक खरेदीमध्ये पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित कार्डीयाक सर्जन यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे असे ठरले आहे.

त्यानुसार कॅथलॅब विभागाने डी.पी.क्र.७१८९ दि.१०.०९.२००९ अन्वये उपरोक्त पेसमेकरची मागणी केली होती. M/s.Sinocare Surgical, Mumbai यांच्याकडून बील क्र.१५७५ दि.१४.०९.२००९ अन्वये एक नग रु.३,००,०००/- खरेदी करुन रुग्णास दि.१२/०९/२००९ रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे.

सौ.तारगे भामाबाई विठोबा ह्या पेशंटला उपरोक्त पेसमेकर बसविण्यासाठी एकुण रु.३,२६,३३०/- इतका खर्च आलेला असून हॉस्पिटलच्या बिलींग विभागाकडे पावती क्र.२१०१९९९ दि.०२.०२.२०१० अन्वये रु.१,७१,९३०/- जमा केले असून महाराष्ट्र शासनाचे जीवनदायी योजने अंतर्गत रु.१,५०,०००/- इतकी रक्कम मंजुर आहे. तर रु.४४००/- इतकी त्यांना बीलात सवलत देण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे M/s.Sinocare Surgical, Mumbai यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या उपरोक्त पेसमेकरचे बीलाची रक्कम रु.३,००,०००/- M/s.Sinocare Surgical, Mumbai यांना अदा करण्यात आलेली असून सदर पेसमेकर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१७) श्रीसाईनाथ हॉस्पिटलमध्ये नवीन ऑपरेशन थिएटर व ICCU कक्षाचे वायरिंग काम करणेबाबत**

श्री साईनाथ हॉस्पीटलकडील धर्मशाळा इमारत क्र.०१ पहिला मजला याठिकाणी श्री साईनाथ हॉस्पीटलमार्फत नाक, कान, घसा तसेच डोळयांचे ऑपरेशनकरीता नविन वाढीव ऑपरेशन थिएटर (शल्स चिकित्सा विभाग) व

धर्मशाळा क्र.०२ पहिला मजला याठिकाणी नविन I.C.C.U. कक्षाची निर्मिती करण्यात आलेली आहे. नविन निर्माण केलेले ऑपरेशन थिएटर व I.C.C.U. कक्ष लवकरच कार्यान्वित करावयाचे आहेत. सदरील ऑपरेशन थिएटर व I.C.C.U. कक्षामध्ये मशिनरींना वीजपुरवठा जोडून देणेकरीता नव्याने वायरींग काम करुन घ्यावे लागणार आहेत.

नविन कराव्या लागणा-या वायरींग कामाची माहिती तसेच येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr.No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 1-8-1 | Supplying and erecting modular type switch 6A / 10A | 130 Nos. | 0,090.30 | 0,11,739.00 |
| 02) | 1-8-7 | Supplying and erecting modular type switch one way 16/ 20A | 150 Nos. | 0,140.70 | 0,21,105.00 |
| 03) | 1-8-13 | Supplying and erecting modular type 3 pin 6A socket | 050 Nos. | 0,107.10 | 0,05,355.00 |
| 04) | 1-8-14 | Supplying and erecting modular type 3 pin 16A socket | 150 Nos. | 0,165.90 | 0,24,885.00 |
| 05) | 1-8-27 | Supplying and erecting modular type electronic step regulator two module | 050 Nos. | 0,397.95 | 0,19,879.50 |
| 06) | 1-8-40 | Supplying and erecting unbreakable concealed type 2 modular switch box with double mounting plate | 120 Nos. | 0,147.00 | 0,17,640.00 |
| 07) | 1-8-41 | Supplying and erecting unbreakable concealed type 3 modular switch box with double mounting plate. | 020 Nos. | 0,147.00 | 0,02,940.00 |
| 08) | 1-8-43 | Supplying and erecting unbreakable concealed type 6 modular switch box with double mounting plate. | 020 Nos. | 0,179.55 | 0,03,591.00 |
| 09) | 1-8-44 | Supplying and erecting unbreakable concealed type 8 modular switch box with double mounting plate. | 020 Nos. | 0,316.05 | 0,06,321.00 |
| 10) | 1-8-45 | Supplying and erecting unbreakable concealed type 12 modular switch box with double mounting plate. | 023 Nos. | 0,316.05 | 0,07,269.15 |
| 11) | 1-8-47 | Supplying and erecting unbreakable concealed type 18 modular switch box with double mounting plate. | 006 Nos. | 0,431.55 | 0,02,589.30 |
| 12) | 5-4-10 | Supplying and erecting 4 ways, triple pole and neutral distribution board (TPNDB) with door. | 005 Nos. | 4,814.25 | 0,24,071.25 |
| 13) | 5-3-2 | Supplying, erecting & marking SPMCB 6A to 32A, | 060 Nos. | 0,171.15 | 0,10,269.00 |
| 14) | 5-6-7 | Providing, erecting & commissioning 80A 4pole RCCB | 005 Nos. | 4,442.55 | 0,22,212.75 |
| 15) | 1-8-22 | Supplying and erecting modular type bell indicator. | 015 Nos. | 0,177.45 | 0,02,661.75 |
| 16) | 2-6-3 | Supplying and erecting Ceiling fan of 1200mm. sweep. | 050 Nos. | 1,323.00 | 0,66,150.00 |
| 17) | 1-3-1 | Supplying and erecting mains with 2x1.5sq.mm.F.R.solid copper PVC insulated wire. | 200 Mtr. | 0,025.20 | 0,05,040.00 |
| 18) | 1-3-3 | Supplying and erecting mains with 2x2.5sq.mm.F.R. Stranded / solid copper PVC insulated wire. | 500 Mtr. | 0,039.90 | 0,19,950.00 |
| 19) | 1-3-5 | Supplying and erecting mains with 2x4sq.mm.F.R. stranded/solid copper PVC insulated wire. | 1500 Mtr. | 0,056.70 | 0,85,050.00 |
| 20) | 1-3-3 NoteNo.4 Page.N.3 | Supplying and erecting earth wire with mains 1x2.5sq.mm.F.R.stranded copper PVC insulated wire. | 2000 Mtr. | 0,019.95 | 0,39,900.00 |
| 21) | NON CSR | Point wiring for light / fan / bell point. | 080 Nos. | 0,522.00 | 0,41,760.00 |
| 22) | 1-2-12 | Supplying and laying PVC trunking (PVC casing-n-caping) of size 32mm. | 600 mtr. | 0,042.10 | 0,25,260.00 |
| | | | | Total. | 4,65,656.70 |
| | | | | + Contigency 5% | 0,23,282.84 |
| | | | | **Total Amount :-** | **4,88,939.54** |
| | | | | **Round up :-** | **4,88,940.00** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ हॉस्पीटलकडील ऑपरेशन थिएटर व I.C.C.U. विभागामध्ये कराव्या लागणा-या वायरींगचे काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ४,८८,९४०.०० इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख )

**(१८) <u>श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय शिर्डी येथील विद्यार्थ्यांना सायकल पार्किंगसाठी सायकल स्टॅण्ड तयार करणे बाबत</u>**

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सायकल पार्कींगसाठी सायकल स्टँड नसल्याने अस्ताव्यस्त सायकल लावाव्या लागतात. तरी विद्युत विभागामार्फत विद्यालयाच्या परीसरात उपलब्ध जागेची समक्ष पाहणी करुन सायकल स्टँड तयार करुन मिळणेकामी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी दिनांक १९-०१-२०१० चे टिपणीनुसार कळविले आहे.

त्यानुसार प्रत्यक्ष पाहणी केली असता श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी येथे ४०० सायकल्स असल्याचे मा.प्राचार्य यांचे म्हणणे आहे. परंतू सध्या प्रायोजिक तत्त्वावर १०० नग सायकल्स लावणेसाठी सायकल स्टँड बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर(अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | जी.आय.पाईप, `ए ` क्लास, साईज :- २`` | २१३ फूट | रु. १३०.०० (प्रति फूट) | रु. २७,६९०.०० |
| ०२) | एम.एस.सॉलीड बार, साईज :- १० एम.एम. | ५० किलो. | रु. ०५०.०० (प्रति किलो) | रु. ०२,५००.०० |
| | | | एकुण :- | रु. ३०,१९०.०० |
| | | | वॅट १२.५% | रु. ०३,७७४.०० |
| | | | रक्कम :- | रु. ३३,९६४.०० |
| | | | लेबर + ट्रान्सपोर्ट चार्जेस ४०% मजुरी | रु. १३,५८६.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ४७,५५०.००** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सायकल पार्कीगसाठी सायकल स्टँड बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ४७,५५०.०० इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख )

**(१९) <u>नगर-मनमाड रोडवरील हायमास्ट पोल शिफ्ट करणे बाबत</u>**

शिर्डी हद्दीत नगर-मनमाड रस्त्यावर संस्थानमार्फत अनुदान स्वरुपात पथसिग्नल उभारणीचे प्रगतीपथावर आहे. नांदुर्खी रस्ता चौकात सिग्नल उभारणीचे काम पुर्ण झालेले आहे. चौकातील दुभाजक नगरपंचायत मार्फत हटविण्यात आलेले आहे. तथापि या दुभाजकात हायमास्ट पोल असून सदर पोल वाहतुकीच्या नियोजनाच्या दृष्टीने अडचणी होत आहे. तरी सदर पोल चौकाच्या मध्यभागात स्थलांतर करुन त्यास ३.०० मी व्यासाचा सर्कल तयार करुन तसेच चौकाला जोडणारा नांदुर्खी रस्ता व पिंपळवाडी रस्त्यास कर्व्ह देऊन दुभाजकाचे सुशोभिकरण करणे असल्याचे शिर्डी नगरपंचायतीने लेखी कळविले आहे.

त्यानुसार नगर-मनमाड महामार्गावरील वहातूक विनाअपघाती, विना अडथळा, सुरळीतपणे चालावी व शिर्डीमध्ये येणा-या साईभक्तांना वहातूकीचा अडथळा जाणवू नये. म्हणून चौकातील रस्ते समोरासमोर करावे लागणार असल्यामुळे त्याठिकाणी अडथळा निर्माण करणारे तेथील हायमास्ट लॅम्प पोल काढून नव्या जागी बसवावे लागणार आहेत. यासाठी शिर्डी नगरपंचायतीने लेखी कळविले आहे.

याकरीता नांदुर्खी पिंपळवाडी महामार्ग क्रॉसिंग चौक याठिकाणचा एक हायमास्ट पोल व बस स्टॅण्ड स्वागतकक्ष क्रॉसिंग चौक याठिकाणचा एक हायमास्ट पोल असे दोन नग हायमास्ट पोल खोलून चौकाचे मध्यभागी उभे करावे लागणार आहेत. नगर-मनमाड रोडवरील हायमास्ट पोल शिफ्टींगचे काम स्थानिक विद्युत ठेकेदारांकडून करुन घेणेकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| SR.NO. | Description | Qty. | Rate | AMOUNT |
|---|---|---|---|---|
| 01) | Dismantling the existing 12.5 meter High Mast Pole with bracket, clamps from the cement concrete foundation and making the site clear by refilling the pits with excavated materials and bringing it to the ground level. And erecting the same above High Mast pole on provided foundation. Foundation specification:- Designing & costing M-20 Cement concrete foundation suitable for 12.5 m capacity at site as 10/sq m. at 2 meter depth including excavation foundation nut bolts etc in an approved manner. | 2 Nos. | 50,000.00 | 1,00,000.00 |
| | | **Total Amount Rs.** | | **1,00,000.00** |

उपरोक्तप्रमाणे हायमास्ट पोल खोलून शिफ्ट करणेचे काम स्थानिक विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व स्थानिक विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख )

**(२०) समाधी मंदिराचे दक्षिण बाजूस स्टेनलेस स्टिलचे रेलींग करणे बाबत**

समाधी मंदिरात असलेल्या मंदिर कार्यालयाचे बाजूने दक्षिण दिशेला सध्या लोखंडी बॅरीकेट ठेवण्यात आलेले आहे. सदरचे लोखंडी बॅरीकेट बदलून त्याजागी स्टेनलेस स्टीलचे ६।। फूट उंचीचे रेलींग ग्रील बसवावे.

ज्याप्रमाणे मंदिराचे उत्तरबाजूचे रेलींग संरक्षण ऑफीसपासून ते गुरुस्थान मंदिरापर्यंत लावलेले आहे. समाधी मंदिर पालखी दक्षिणगेट पासून ते गुरुस्थान पर्यंत बसवून मिळणेबाबत मंदिर विभागाने दिनांक ०३-०३-२०१० चे टिपणीन्वये मागणी केली आहे. रेलिंगची लांबी ४३० फूट असून ६ फूट उंचीचे रेलींगसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| SR.NO | MATERIAL DETAILS | QTY. | RATE | COST |
|---|---|---|---|---|
| 01. | STAINLESS STEEL SS304 ROUND PIPE – 50MM DIA. X 16 SWG THK. | 2600 ft. | 170/- per ft | 442000=00 |
| 02 | STAINLESS STEEL SS304 ROUND PIPE 25 MM DIA X 16 SWG THK. | 5000 ft. | 90/- per ft | 450000=00 |
| 02. | STAINLESS STEEL JALI 1" X1" X 2MM THK. | 600 SQ.FT. | 150/- per ft. | 90000=00 |
| 03. | STAINLESS STEEL PUTTY 25 X 5MM THK. | 720 KG. | RS.180/ | 129600=00 |
| 04. | STAINLESS STEEL 304 90 DEG. BEND – 50MM DIA. | 72 nos. | 200/- per no. | 14400=00 |
| 05. | STAINLESS STEEL 304 CANOPY | 144 nos. | 200/- per no. | 28800=00 |
| 06. | STAINLESS STEEL 304 FLANGE. | 144nos. | 120/- per no. | 17280=00 |
| 07. | STAINLESS STEEL 304 GROUTING PIPE BRACKET WITH HARDWARE SIZE 60MM DIA X 10 " | 140nos. | 500/- per no. | 70000=00 |
| 08 | WELDING ROD | 30.0 KG. | 2500/-per kg. | 75000=00 |
| 09 | SLIDING GATE ARRANGEMENTS WITH GUIDE, ROLLER, WHEELS AND LOCKING . | 5 NOS. | 10000/- PER GATE | 50000=00 |
| 09 | LABOR COST. INCLUDING FITTING AT SITE WITH CIVIL WORK . | | ------- | 600000=00 |
| | | | **Total.** | **1967080=00** |
| | Vat 12.5 % | | | 245885=00 |
| | Total cost of Railings | | | 2212965=00 |

समाधी मंदिराचे दक्षिण बाजूस स्टेनलेस स्टिलचे रेलींग तयार करून बसविण्याकरीता रुपये २२,१२,९६५.०० इतका खर्च अपेक्षित आहे. वरील काम स्टेनलेस स्टीलचे असल्याने बाहेरील वर्कशॉपधारकांकडून रेलींग तयार करुन बसवून घ्यावे लागेल. प्रस्तावावर विचार होऊन उपरोक्त कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख )

**(२१) <u>श्रीसाई प्रसादालयासमोरील परिसरात साईभक्तांचे सोयीसाठी स्टेनलेस स्टीलचे सरंक्षक रेलींग तयार करुन बसविणेबाबत.</u>**

श्री साई प्रसादालयामध्ये गर्दीचे प्रमाणानुसार २५००० ते ६५००० हजारापर्यंत साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात. मात्र एवढया मोठया गर्दीचे वेळी भोजनासाठी जातांना व भोजन झाल्यानंतर बाहेर पडतांना भक्त एकत्रच रेंगाळत राहतात. त्यामध्ये लहान मुले, वृद्ध भक्तांना त्रास होतो. याशिवाय प्रसादालय परीसर सुशोभित दिसावा याकरीता शोभेची झाडे लावलेली आहेत. त्याची नासाडी होते असे होऊ नये म्हणून भोजनासाठी येणारे भक्त एका गेटमधून (नं.३) आत येणे व भोजन झाल्यानंतर दुस-या गेट नं.(२) बाहेर जाणेसाठी पूर्वी गार्डनचे कडेने लावलेल्या स्टेनलेस स्टीलचे सरंक्षक रेलींगसारखे रेलींग तयार करुन लावणे सोईस्कर होईल.

तसेच भोजन झाल्यानंतर बरेच भक्त श्री साई प्रसादालय परीसरातच बसून रहात, रेंगाळतात वेळप्रसंगी झोपतात त्याचा त्रास इतर भक्तांना होतो. अशा भक्तांचा भोजन घेण्यासाठी येणा-या भक्तांना त्रास होऊ नये म्हणून श्री साई प्रसादालय कार्यालयाचे समोर, श्री साईबाबांचे हंडीचे उत्तरेस व सार्वजनिक बाथरुमचे समोर स्टेनलेस स्टील संरक्षक रेलींग लावणेही गरजेचे आहे.

दि.२९-०९-२००९ रोजी मा.कार्यकारी अधिकारी व उप कार्यकारी अधिकारी साहेब यांनी प्रसादालयाकडे राऊंड घेतला असता उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करावी असे सुचविलेले आहे. पूर्वीचे स्टेनलेस स्टील रेलींगचे काम विद्युत विभागामार्फत झालेले असून उपरोक्तप्रमाणे स्टेनलेस स्टील रेलींगचे काम करुन मिळणेकामी श्री साई प्रसादालय विभाग यांनी दि.०१-१०-२००९ चे टिपणीन्वये कळविले आहे.

त्यानुसार साई प्रसादालय कार्यालयाचे समोर, श्री साईबाबांचे हंडीचे उत्तरेस व सार्वजनिक बाथरुमचे समोर स्टेनलेस स्टील संरक्षक रेलींगचे काम काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून करुन घेणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर(अंदाजे) रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील राऊंड पाईप,<br>साईज :- ५० एम.एम. x १६ गेज (जाड) | २०० फूट | १८०.००<br>(प्रति फूट) | ३६,०००.०० |
| ०२) | स्टेनलेस स्टील राऊंड पाईप,<br>साईज :- २५ एम.एम. x १६ गेज (जाड) | २००० फूट | १०५.००<br>(प्रति फूट) | २,१०,०००.०० |
| ०३) | स्टेनलेस स्टील हाफ राऊंड बेन्ड,<br>साईज :- २५ एम.एम. | ९० नग. | २९०.००<br>(प्रति नग) | २६,१००.०० |
| ०४) | स्टेनलेस स्टील एल बो, काटकोन बेन्ड,<br>साईज :- ५० स्क्वेअर एम.एम. | ५० नग. | २६०.००<br>(प्रति नग) | १३,०००.०० |
| ०५) | स्टेनलेस स्टील कॅनोपी | ५० नग. | १९०.०० (प्रति नग) | ९,५००.०० |
| ०६) | स्टेनलेस स्टील फ्लँज | ५० नग. | १४५.०० (प्रति नग) | ७,२५०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०७) | स्टेनलेस स्टील गाऊटींग पाईप ब्रॅकेट + हार्डवेअर, साईज :- ६० एम.एम. x १०`` | ५० नग. | ५६०.०० (प्रति नग) | २८,०००.०० |
| ०८) | स्टेनलेस स्टील, वेल्डींग रॉड | ७ किलो. | २,६६०.०० (प्रति नग) | १८,६२०.०० |
| | | | एकुण :- | ३,४८,४७०.०० |
| | | | वॅट १२.५% | ४३,५५९.०० |
| | | | रक्कम :- | ३,९२,०२९.०० |
| | | | लेबर + ट्रान्सपोर्ट चार्जेस २५% मजुरी | ९८,००७.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **४,९०,०३६.००** |

उपरोक्तप्रमाणे साई प्रसादालय कार्यालयाचे समोर, श्री साईबाबांचे हंडीचे उत्तरेस व सार्वजनिक बाथरुमचे समोर स्टेनलेस स्टील संरक्षक रेलींगचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ४,९०,०३६/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख )

**(२२) <u>गुरुस्थान मंदिर दक्षिण बाजूस वाढीव स्टेनलेस स्टिल रेलिंग तयार करुन बसविणेबाबत</u>**

श्री साईबाबा समाधी मंदिर बाहेर पडण्याचे गेट बाहेरील वाढीव रेलींगचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून तयार करुन घेणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर(अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील ३०४ राऊंड पाईप, साईज :- ५०mm x १६ swg जाडी. | ६७० फूट | १८०.०० (प्रति फूट) | १,२०,६००.०० |
| ०२) | स्टेनलेस स्टील ३०४ राऊंड पाईप, साईज :- २५mm x १६ swg जाडी. | १४०० फूट | १००.०० (प्रति फूट) | १,४०,०००.०० |
| ०३) | स्टेनलेस स्टील ३०४ हाय राऊंड बेंड, साईज :- २५mm x १६ swg जाडी. | १०० नग. | २९०.०० (प्रति नग) | २९,०००.०० |
| ०४) | स्टेनलेस स्टील ३०४, ९० डिग्री बेंड, साईज :- ५०mm व्यास. | ०३० नग. | २६०.०० (प्रति नग) | ७,८००.०० |
| ०५) | स्टेनलेस स्टील ३०४ कॅनोपी | ०३० नग. | १९०.०० (प्रति नग) | ५,७००.०० |
| ०६) | स्टेनलेस स्टील ३०४ फ्लॅंज | ०६० नग. | १४५.००(प्रति नग) | ८,७००.०० |
| ०७) | स्टेनलेस स्टील ३०४ ग्राऊंटीग पाईप ब्रॅकेट + हार्डवेअर साईज :- ६० एम.एम.,व्यास-१०`` लांब | ०३० नग. | ५६०.०० (प्रति नग) | १६,८००.०० |
| ०८) | स्टेनलेस स्टील वेल्डींग रॉड | १० किलो. | २,६६०.००(प्रति नग) | २६,६००.०० |
| | | | एकुण :- | ३,५५,२००.०० |
| | | | वॅट १२.५% | ४४,४००.०० |
| | | | रक्कम :- | ३,९९,६००.०० |
| | | | लेबर+ट्रान्सपोर्ट चार्जेस २५% मजुरी | ९९,९००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **४,९९,५००.००** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा समाधी मंदिर बाहेर पडण्याचे गेट बाहेरील वाढीव रेलींगचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ४,९९,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख )

**(२३) <u>श्री एम.ई लोहकरे, कंत्राटी पध्दतीने ऑफीसर ऑन स्पेशल ड्युटी, मुंबई कार्यालय यांचा मुदतवाढ मिळणेबाबतचा अर्ज</u>**

श्री. एम.ई. लोहोकरे, कंत्राटी पध्दतीने ऑफिसर ऑन स्पेशल डयुटी तथा प्र. प्रमुख मुंबई कार्यालय यांनी दि.०९/०२/२०१० रोजी मुदतवाढ मिळणेबाबत अर्ज केला असू त्यात " मी दि.०१ ऑगष्ट २००७ पासून मुंबई कार्यालयात कंत्राटी पध्दतीने ऑफिसर ऑन स्पेशल डयुटी या पदावर कार्यरत आहे. सदर पदावर कार्यरत असतांना मी संस्थान संबंधी अनेक महत्वाची कामे केलेली आहेत. त्यात मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री व मा.सचिव यांच्याकडील सभेस उपस्थिती तसेच महत्वाच्या शासकिय सभांना उपस्थित राहीलेलो आहे. माझ्याकडे असलेले प्रत्येक काम मी गुणात्मक , परिणामकारक करीत्या, अत्यंत कमी वेळेत समन्वय साधुन पूर्ण केले आहे.मी सुमारे तीन वर्षे संस्थानची उत्तम सेवा करीत आहे. महाराष्ट्र शासनाने ६ व्या वेतन आयोगानुसार सेवानिवृत्त वेतनधारकांना ४०% सेवानिवृत्ती वेतनवाढ दिलेली आहे. या धर्तीवर मला संस्थान देत असलेल्या वेतनावर ४०% वाढ मंजूर करावी.

तसेच केलेल्या एकूण सेवा कालावधीमधील कामांचा एकत्रित विचार करुन एक वर्ष मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे. "

**श्री. लोहकरे यांचे नेमणूकीचा / मुदतवाढीचा तपशील खालील प्रमाणे आहे.**

| नेमणूक /मुदतवाढ तपशील | मानधन |
|---|---|
| ०१/०८/२००७ ते ३०/०६/२००८ (११ महिने ) | रु. १५,०००/- |
| ०१/०७/२००८ ते ३१/०५/२००९ ( ११ महिने ) | रु. १५,०००/- |
| ०१/०६/२००९ ते ३१/०५/२०१० ( एक वर्ष ) | रु. १५,०००/- |

श्री.एम ई. लोहोकरे यांची उपरोक्त प्रमाणे दि.३१/०५/२०१० अखेर संपुष्ठात येत आहे.

श्री. लोहोकरे यांचे मार्फत शासकिय पत्रव्यवहार, शासनाकडे पाठविलेले प्रस्ताव प्रकरणे याबाबत पाठपुरावा करणेत येतो. तसेच मा. अध्यक्ष साहेब, मा.ना. विखे पाटील साो. तसेच मा.कार्यकारी अधिकारी यांचे मंत्रालय भेटीचे वेळी आवश्यकत्या कागदपत्रासह/ माहितीसह श्री. लोहोकरे हे हजर असतात.

श्री. लोहोकरे हे शासकिय सेवेत होते सेवेत असतांना त्यांनी अधिक्षक पदापासून ते प्रशासकिय अधिकारी या पदावर कामे केलेली असून सेवानिवृत्तीचे विहीत वयोमान पूर्ण झाल्यामुळे शासकिय सेवेतून सेवानिवृत्त झालेले असून त्यांना शासकिय नियमाप्रमाणे पेन्शन मिळत आहे.

सध्या त्यांना नेमणूॅकीपासून उपरोक्त प्रमाणे रु.१५,०००/- एकत्रित मानधन देण्यात येत आहे. आता श्री. लोहोकरे यांनी त्यांना संस्थानकडून मिळणा-या मानधनाच्या ४०% वाढ (रु.६०००/-) मिळणेबाबत विनंती केली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे श्री. लोहोकरे हे करत असलेल्या कामाचा विचार करता त्यांना दि.०१/०६/२०१० पासून पुढे एक वर्ष मुदतवाढ व मानधनात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.एम.ई. लोहोकरे, कंत्राटी पध्दतीने ऑफिसर ऑन स्पेशल डयुटी तथा प्र. प्रमुख मुंबई कार्यालय यांना पूर्वीचेच अटी/शर्ती व एकत्रित मानधनावर दिनांक ०१.०६.२०१० पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**(२४) <u>डॉ.सी.एस.बोबडे, वैद्यकीय संचालक यांचे मुदतवाढीबाबत</u>**

ब्रिगे.(सेवानिवृत्त)डॉ.सी.एस.बोबडे,यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/४३३८/२००८ दिनांक २४/०३/२००८ अन्वये संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वैद्यकिय संचालक या पदावर रु.७०,०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार ते दि.०७/०४/२००८ रोजी कामावर हजर झाले होते. त्याचे एक वर्षाच्या नेमणूकीचा कालावधी सपल्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/०४/२००९ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार त्यांना दि.०६/०४/२००९ पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली असून सदरची मुदतवाढ दि.०५/०४/२०१० अखेर संपत आहे.

डॉ.बोबडे, वैद्यकिय संचालक व डॉ.म्हस्के, उपवैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी त्यांना मानधन वाढवून मिळणेबाबत केलेला अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० रोजीच्या सभेपूढे विचारार्थ सादर केला होता त्यावर पुढील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

**<u>निर्णय :-</u>सदर प्रस्तावाबाबत मा. अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रित चर्चा करुन अतिम निर्णय घ्यावा असे ठरले.**

आता, डॉ. बोबडे, वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दि.29/03/2010 रोजी अर्ज सादर करुन त्यात - " I am working as a Medical Director since 07/04/2009 . I was given extension for one year period from 06/04/2009 to 05/04/2010 . I would like to bring to your notice that my extension period ends on 05/04/2010. I will not be abale to continue my services further because of my health related paoblems and advice by my physician.

I am thankful to shri Saibaba Sansthan Trust, Shirdi for giving me an opportunity to work at this place. " असे नमूद केले आहे.

तरी डॉ. बोबडे, वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे अर्जासंदर्भात निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, ब्रिगे.(सेवानिवृत्त)डॉ.सी.एस.बोबडे, वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना दिनांक ०५.०४.२०१० पासुन सेवामुक्त करण्यात यावा. वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल या पदावर नियुक्ती होणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत अशी या उपसमितीची शिफारसमान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं.०३ दिनांक ०३.०४.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.३५८** व्यवस्थापन समितीचे दि.०३.०४.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**(२५) सशुल्क दर्शन/आरती पासेस सुविधेतून गुरुवार वगळण्याबाबत.**

शिर्डीत येणा-या भाविकांच्या गर्दीचे योग्य नियोजन व्हावे व सर्व सामान्य दर्शन रांगेतील जास्तीत जास्त भक्तांना बाबांच्या दर्शनाचा लाभ मिळावा याउद्देशाने गुरुवार, शनिवार, रविवार व सलग सुटयांच्या कालावधीत व्हिआयपींसाठी देण्यात येणारे दर्शन/आरती पासेस सशुल्क करण्याचा निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७.०१.२०१० रोजीचे सभेत घेण्यात आलेला आहे. तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०६.०३.२०१० रोजीच्या सभेत सशुल्क दर्शन/आरती पास देण्याची कार्यवाही दिनांक १३.०३.२०१० पासून सुरु करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानूसार दिनांक १३.०३.२०१० पासून सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

दिनांक ०१.०४.२०१० रोजी मा.अध्यक्ष साो. यांनी सशुल्क दर्शन/आरती पासेसच्या सुविधेतून गुरुवार वगळण्यात यावा. ही सुविधा फक्त शनिवार, रविवार व सलग सुटयांच्या कालावधीत देण्यात यावी. गुरुवारी सशुल्क दर्शन/आरती पासेस देवू नये असे निर्देश दिले असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी )

**(२६) भव्य राज्यस्तरीय डे-नाईट टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेसाठी संस्थानचे आर्थिक तसेच इतर सहकार्य मिळणेबाबत.**

श्री दिपक सोपानराव वारुळे, अध्यक्ष श्री साईसमर्थ कला-क्रिडा-सांस्कृतिक मंडळ, शिर्डी यांचा दि.२६/०३/२०१० चे अर्जानुसार दि.२२/०४/२०१० ते दि. ०१/०५/२०१० अखेर होणा-या टेनिस बॉल क्रिकेट (डे-नाईट) स्पर्धेसाठी त्यांनी संस्थानमार्फत खालीलप्रमाणे सहकार्य मिळणेबाबत विनंती केलेली आहे. या पुर्वीच्या पत्रावर मा.अध्यक्षमहोदय यांनी श्री.मोरे/मानेसाो. विनंतीप्रमाणे मैदानाची, लाईट व पाण्याची व्यवस्था करावी, असे निर्देश दिलेले आहेत.

| अ.नं. | अर्जदाराची मागणी | कार्यालयीन अभिप्राय | सन २००५-०६ साठी झालेला प्रत्यक्ष खर्च | सन २००६-०७ साठी झालेला प्रत्यक्ष खर्च | सन २०१० साठी होणारा अंदाजित खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | विद्युत व्यवस्था-<br>(अ) हॅलोजनचे दिवे लावणेसाठी आठ ठिकाणी मनोरे (टॉवर्स) उभारणे.<br>(ब) १००० वॅटस्चे ११० हॅलोजन जोडणी करणे.<br>(क) संस्थानमार्फत किंवा स्वतंत्र विद्यूत जनित्राच्या (जनरेटर सेट)सहाय्याने विद्यूत पुरवठा करणे. | संस्थानमार्फत बक्षीस-<br>दि.१८/१२/२००५ रोजीचे मा.व्य.स. चे सभेतील आ.वे. विषय क्र.३७, निर्णय क्र. ८१२ अन्वये संस्थानने खर्च केला होता.<br>सन २००७ मध्ये संस्थानमार्फत विनामोबदला व्यवस्था करण्यात आली होती.<br>स्वतंत्र मिटर बसवून संबंधीतांकडून मीटरनुसार बिलाची रक्कम घेता येईल. किंवा संस्थानमार्फत त्यांचे मागणीनुसार विद्युत व्यवस्था केलेस रकाना नं. ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे खर्च येईल. | रु. ५१,०००/-<br>रु. ३५,०००/- | --- | रु. ५५,०००/-<br>रु.१,३०,०००/- |
| ०२. | मंडप व्यवस्था- सामना समालोचन, खेळाडू तसेच व्ही.आय.पी. साठी मंडप व्यवस्था करणे. | सन २००६ व २००७ मध्ये संस्थानमार्फत खर्च करण्यात आलेला आहे. संस्थानमार्फत खर्च केलेस रकाना नं.६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे खर्च येईल. | रु. ९,०००/- | रु.१५,०००/-<br>- | रु. ३५,०००/- |
| ०३. | ध्वनीक्षेपण व्यवस्था- स्पधेच्या समालोचना साठी ध्वनीक्षेपण व्यवस्था करणे. | यापूर्वी संस्थानमार्फत व्यवस्था करण्यात आली होती. संस्थानमार्फत व्यवस्था करता येईल. | --- | --- | --- |
| ०४. | स्पर्धेसाठी मैदान लेव्हल करुन देणे. | साईनगर मैदानच्या लेव्हलींगचे काम वाहन विभागामार्फत व बगिचा विभागामार्फत मैदानाच्या कडेला वाढलेले गवत काढून घेता येईल. | --- | --- | --- |
| | **संस्थानमार्फत करावयाचा एकूण खर्च** | | **९५,०००/-** | **१५,०००/-** | **२,२०,०००/-** |

उपरोक्त दर्शविलेली संस्था साईनगर मैदानामध्ये राज्यस्तरीय डे-नाईट क्रिकेट स्पर्धा सन २००५ सालापासून आयोजित करीत असून, सन २००५-०६ सालामध्ये मा.व्य.स.चे मान्यतेने रु. ९५,०००/-(बक्षीस, विद्युत व मंडप व्यवस्था), सन २००६-२००७ मध्ये मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने रु. १५,०००/- (मंडप व्यवस्था) इतका खर्च संस्थानमार्फत करण्यात आला होता. तसेच त्यांची निवास, भोजन व चहा पाण्याची व्यवस्था सशुल्क व पिण्याचे पाणी, ध्वनीक्षेपण व इतर व्यवस्था संस्थानमार्फत करण्यात आली होती. चालूवर्षी

त्यांनी विद्युत, मंडप व इतर व्यवस्थेसाठी एकूण रु. २,२०,०००/- मात्रच्या येणारा खर्च संस्थानमार्फत करण्यात यावा, अशी विनंती संबंधीतांनी केलेली आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे प्रमाणे येणारे खर्चास तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,. त्यास मान्यता देण्यात यावी. तसेच येथूनपूढे अशा प्रकारचे कार्यक्रम संस्थानचे साईनगर परिसरात न घेता संस्थानने खरेदी केलेल्या लोढा यांचे जमिनीत घेण्यात यावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**(२७) <u>श्री. दिगंबर निवृत्ती जगताप व इतर ०३, राहणार शिर्डी, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर १३४ मधील क्षेत्र ८४ आर खरेदी घेणेबाबत.</u>**

**अ)** श्री. दिगंबर निवृत्ती जगताप, श्री. नवनाथ निवृत्ती जगताप, सौ. हिराबाई रायभान गुंजाळ, श्रीमती यमुनाबाई निवृत्ती जगताप सर्व राहणार शिर्डी, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर यांनी, त्यांची मौजे कनकुरी, तालुका राहाता येथील गट नंबर १३४ क्षेत्र ०० हे ८४ आर जमीन संस्थानने विकत घ्यावी, म्हणून दिनांक २५ मे, २००९ रोजी विनंती अर्ज दिलेला आहे.

श्री. दिगंबर निवृत्ती जगताप व इतर ०३ यांनी सादर केलेल्या उपरोक्त अर्जासोबत जमिनीचे ७/१२ उतारा व इतर फेरफार जोडलेले आहेत. सदरहू जमिनीच्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, खालीलप्रमाणे वस्तुस्थिती दिसून येत आहे :

| अ.नं. | गाव व गट नंबर | क्षेत्र | कब्जेदार सदरी असलेली नोंद | इतर हक्कातील नोंदी |
|---|---|---|---|---|
| ०१ | मौजे कनकुरी<br>**गट नंबर १३४** | ०० हे ७५ आर<br>०० हे ०९ आर पोख<br>**०० हे ८४ आर** | दिगंबर निवृत्ती जगताप<br>नवनाथ निवृत्ती जगताप<br>हिराबाई रायभान गुंजाळ<br>यमुनाबाई निवृत्ती जगताप | ०१. कनकुरी वि.का.सोसा. इ.प.क.घे.<br>०२. शिर्डी वि.का.सोसा. इ.प.क.घे.<br>०३. श्री साई नागरी सह.पतसंस्था मर्या., शिर्डी ग.ख.क.घे.<br>०४. विहीर सामायिक |

सदरहू प्रस्तावाबाबत, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७ नोव्हेंबर, २००९ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ८४१ खालीलप्रमाणे घेणेत आलेला होता :

".. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. दिगंबर निवृत्ती जगताप व इतर ०३ रा. शिर्डी ता.राहाता जि.अहमदनगर यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर १३४ मधील क्षेत्र ८४ आर जमीनीची मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी पहाणी करुन आपला अहवाल व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करावा असे ठरले. "

त्यानुसार, दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१० रोजी विश्वस्त मा.श्री. सुरेशराव गोरक्षनाथ वाबळे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा. श्री. अशोकराव भिमाशंकर खांबेकर, कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी यांचेसह वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी जमिनीची पहाणी करुन संस्थानच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या प्रकल्पासाठी अथवा इतर विकास प्रकल्प राबविणेसाठी सदरहू जमीन उपयुक्त असल्याने जमीनमालक श्री.जगताप यांना मा. व्यवस्थापन समितीपुढे जमीन विक्रीसंदर्भात चर्चा-वाटाघाटी करणेसाठी बोलविण्यांत यावे, असे ठरले.

**(ब)** जमीनमालक श्री. दिगंबर निवृत्ती जगताप हे आजच्या सभेपुढे चर्चा-वाटाघाटीसाठी उपस्थित होते. श्री. जगताप यांनी जमिनीचा दर प्रति गुंठा / प्रति आर रुपये २.५० लाख मात्र मिळावा, अशी विनंती केली. श्री. जगताप यांनी जमिनीचे दराबाबत सविस्तर चर्चेअंती रक्कम रुपये १,८५,०००/- मात्र प्रति आर हा दर मान्य केला.

त्यास अनुसरुन, मा.उपसमिती सभेने श्री. दिगंबर निवृत्ती जगताप व इतर ३ यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर १३४ मधील क्षेत्र ०० हे ८४ आर (पोटखराबासह) प्रति आर रक्कम रुपये १,८५,०००/- (रुपये एक लाख पंच्याऐंशी हजार मात्र) या दराने खरेदी करणेस, जमीन खरेदीकामी विहीत पध्दतीने संस्थान वकिलांमार्फत जमिनीचा सर्च रिपोर्टसह अभिप्राय घेऊन, खरेदीखत नोंदणीचे वेळेस जमिनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम आदा करणेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीस संस्थानचे नाव लागलेनंतर संस्थानमार्फत रितसर शासकीय मोजणी करुन, ताब्यात मिळणारे जमिनीच्या प्रमाणात रक्कम आदा करणेस तसेच जमीनखरेदीकामी मुद्रांक व नोंदणी शुल्क, सरकारी मोजणी शुल्क, वकिल फी आदि अनुषंगिक योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**(२८) <u>संस्थानचे वाहन विभागासाठी शिर्डी स.नं.१०९ मधील गोवरी शेडचे पूर्वेकडील जागेत पार्किंग शेड उभारणेबाबत.</u>**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम प्रकल्पाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पाचे मंजूर रेखांकनानुसार ओव्हर हेड व भुमीगत आर.सी.सी. पाण्याच्या टाक्या वाहन विभागाचे जागेत प्रस्तावीत आहेत. सदर प्रकल्पाचे परिसर विकासाचे काम ठेकेदार मे. शापुरजी पालोनजी ॲण्ड कंपनी लि, नाशिक यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे. सदरचे जागेत येणारे वाहन विभाग हलविलेनंतरच ओव्हर हेड टँक व भुमिगत पाण्याचे टाक्यांचे काम व डी.जी. रुमचे काम हाती घेता येईल. त्यामुळे वाहन विभाग गौरी शेडचे पूर्वेकडील नविन जागेत स्थलांतरीत करणे गरजेचे आहे. त्यानुसार

सदरचे वाहन विभाग नविन जागेत स्थलांतरीत करणेकामी येणारे एकूण रुपये ७,५६,१९८/- मात्रचे खर्चास व काम ठेकेदार शापुरजी पालोनजी ॲण्ड कंपनी लि., नाशिक यांचेकडून अंदाजपत्रकातील दराने करुन घेणेस दि. ११/०३/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचे वाहन विभागाचे काम हाती घेण्यात आले आहे. सदरचे काम हे आहे त्या मटेरीअलमधून करण्याचे ठरलेले आहे व त्यानुसार काम प्रगतीपथावर आहे. दि. ३०/०३/२०१० रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांनी वाहन तळाचे साईटवर भेट दिली असता त्यांनी छताचे पत्रे अधिक खराब झालेले असलेकारणाने छतासाठी नविन पत्रे बसविण्यात यावे अशी सूचना दिली आहे. वाहन विभागाचे जुन्या पत्र्यांची अंदाजे क्वांटीटी ही ९६०.०० चौ.मी. इतकी आहे. त्यामधून काही पत्रे चांगले स्थितीत असले कारणाने ते वापरता येतील व उर्वरीत नविन पत्रे घ्यावे लागतील. तरी सदरचे वाहन विभागासाठी खालीलप्रमाणे नविन पत्रे व खर्च अपेक्षीत आहे.

| अ.क्र. | तपशिल | परिमाण | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | जी.आय.पत्रे ०.४५ mm जाडीचे | ६७५.०० चौ.मी. | २६५/-प्रती चौ.मी. (बाजार भाव) | १,७८,८७५/- |

त्यासाठी उपरोक्त अंदाजपत्रकानुसार रुपये १,७८,८७५/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

सदरकामी आवश्यक असणारे पत्रे दरपत्रके मागवून खात्यामार्फत खरेदी करुन, ठेकेदार शापुरजी पालोनजी ॲण्ड कं.लि., नाशिक यांचेकडून मजुरी दरात बसवून घेता येतील.

तरी याकामी येणारे रक्कम रुपये १,७८,८७५/- मात्रचे खर्चास व ठेकेदार शापुरजी पालोनजी ॲण्ड कं.लि., नाशिक यांचेकडून मजुरी काम करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**(२९) <u>संयुक्त घनकचरा प्रकल्पाबाबत.</u>**

अ) शिर्डी येथे साईभक्तांच्या गर्दीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे शिर्डी व राहाता शहर परिसरात निवासस्थाने, लॉजींग, बोर्डींग तसेच रहिवाशी क्षेत्रात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. राहाता व शिर्डी परिसरातील निघणाऱ्या व जमा होणाऱ्या घनकचाऱ्याची विल्हेवाट लावणेकामी संयुक्त घनकचरा प्रकल्प राबविण्यात येत आहे. साईटेक सायंटीफीक सिस्टिम्,पुणे यांचेमार्फत घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०३/२००९ रोजीचे सभेत मान्यता मिळाली आहे.

त्यानुसार फॅक्टरी शेड, काँक्रीट प्लॅटफॉर्म, कलेक्शन चेंबर संस्थान मार्फत करणेस व याकामी येणारे रक्कम रुपये ३१,७५,०००.०० मात्रचे खर्चास मान्यता मिळाली आहे. सदरचे काम करुन घेणेसाठी संस्थानचे मा. व्यवस्थापन समितीचे दि. १७/०५/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३८७ अन्वये ठेकेदार महेंद्र आर ताटीया, श्रीरामपूर यांना कार्यादेश देणेत आला आहे. ठेकेदार यांनी मूदतीत दि.१५/१२/२००९ अखेर किरकोळ स्वरुपाचे कामे वगळता पूर्ण केले आहे.

ब) कार्यकारी अधिकारी श्री. मोरे सो.,उप कार्यकारी अधिकारी श्री. माने सो., शिर्डी नगरपंचायत मुख्याधिकारी श्री. खोसे सो. व शाखा अभियंता श्री. जोरी सा तसेच साईटेक सायंटिफीक सिस्टीमचे श्री बंधन गुप्ता यांनी सदर प्रकल्पाच्या कामाची दि.२३/०२/२०१० रोजी पहाणी केली. त्यावेळी सदर प्रकल्प चालू झालेनंतर त्या ठिकाणी काम करणे व कचऱ्याची हाताळणी करणे सुलभ व्हावे यासाठी सदर ठिकाणी करण्यात आलेल्या काँक्रीट प्लॅटफॉर्मचे मधिल मोकळ्या जागेत व कन्व्हेयर बेल्टच्या आजुबाजूस शेडचे भिंतीपर्यंत सोलींग व पी.सी.सी. करण्यात यावे. तसेच पेव्हींग ब्लॉक हे कॉक्रीट प्लॅटफॉर्मपर्यंतचे वाढीव भागात बसविण्यात यावेत अशी सूचना मा. कार्यकारी अधिकारी यांनी केलेली आहे. सदरहूकामांसाठी रुक्कम रुपये १,६०,०००/- मात्र मंजूर निविदा रक्कमेपेक्षा वाढीव खर्च अपेक्षीत असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**(३०) <u>संस्थानचे पांढूर्ली व सिन्नर औद्योगिक वसाहत येथील पालखी थांब्याचे मुख्य शेडचे तीन बाजूस जी.आय. पन्हाळी पत्रा बसविणेबाबत.</u>**

संस्थानचे मौजे पांढुर्ली व सिन्नर औद्योगीक वसाहत येथे पदयात्री साईभक्तांचे निवासाकरिता पालखी थांबे उभारण्यात आलेले आहेत. सदरहु पालखी थांब्यामध्ये विश्रांतीकरिता अनुक्रमे ४०मी x१६मी व ४०मी x २० मी या साईजमध्ये पत्रा शेड उभारण्यात आले आहे. तसेच स्वयपाक करणेकरिता किचन शेड, स्टोअर रुम व १० संडास व १० बाथरुम अशाप्रकारची सुविधा करण्यात आलेली आहे.

साईभक्तांचे विश्रांती करीता उभारण्यात आलेल्या मुख्य शेडची उंची जास्त असल्याने वादळी पावसात पावसाचे पाणी शेडमध्ये येऊन भक्तांची धावपळ व गैरसोय होते. करीता सदरहु दोन्ही ठिकाणी असलेल्या शेडला लांबीचे दोन बाजूस छतापासून खाली ८ फुटापर्यंत आणि शेडचे पाठीमागिल रुंदीचे बाजूस सात फुट उंचीपर्यंत विट बांधकाम करुन उर्वरीत भागात जी.आय.पन्हाळी पत्रे लावणे आवश्यक आहे. याप्रमाणे दोन्ही शेडचे कामासाठी अंदाजे रु.६,४३,२३४/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तरी सदरहू खर्चास व याकामासाठी स्थानिक ठेकेदारांकडून कोटेशन्स मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,

त्यास मान्यता देण्यात यावी. तसेच, स्त्रीयांसाठी स्वतंत्र व्यवस्था अथवा पार्टीशन करणे, शेडच्या परीसरात झाडे लावून, लँडस्केपींग, फ्लोरींग करुन सुशोभित करणेकामी योग्य त्या खर्चास मान्यता देणेत यावी तसेच, या चर्चेचे वेळेस, सिन्नर व पांढूर्ली येथील पालखी थांबे स्थानिक रहिवाशांना, पालखी सोहळे ज्या कालावधीत कमी असतील त्यावेळेस लग्नकार्य, सामाजिक, धार्मिक कार्यासाठी रु.५,०००/- मात्र प्रति दिवस (२४ तासांसाठी) भाडे आकारुन उपलब्ध करुन देणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**(३१) संस्थानचे कलकत्ता येथील माहिती केंद्रासाठी कर्मचारी नेमणूकीबाबत.**

मा.विश्वस्त श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी त्यांचे दिनांक २६.०३.२०१० चे पत्रान्वये कलकत्ता येथे दिनांक १५ मार्च,२००९ रोजी श्री साईबाबा पादूका दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी कलकत्ता येथे श्री साईबाबा माहितीकेंद्र सुरु करणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी घोषणा केली होती.

कलकत्ता येथे मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या सुसज्ज अलिशान इमारतीमध्ये श्री साईबाबा माहितीकेंद्रासाठी कक्ष तसेच त्यासाठी लागणारे सर्व फर्निचर, संगणक, दुरध्वनी, इंटरनेट इत्यादी सुविधा श्री अशोक जैस्वाल हे साईभक्त करुन देण्यास तयार आहे तसेच त्यावरील देखभाल खर्च ते स्वतः करणार असून त्यासाठी कोणतीही रक्कम ते आकारणार नाही. सदर माहितीकेंद्रासाठी दोन कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी अशी विनंती केलेली आहे. श्री अशोक जैस्वाल यांना परवानगी दिल्यास ते दिनांक ११ एप्रिल, २०१० पासून माहितीकेंद्र सुरु करण्यास तयार आहे असे कळविले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, कलकत्ता येथे संस्थानचे माहितीकेंद्र सुरु करण्यात येऊन त्याकामी आवश्यक असणारे कर्मचारी ठेकेदारी पध्दतीने नेमणेत यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.०४ दिनांक १०.०४.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.३५९** व्यवस्थापन समितीचे दि. १०.०४.२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**(०१) दर्शन रांगेत थंड व आल्हाददायक वातावरण निर्मितीसाठी शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीमध्ये कृत्रिम धुके निर्माण करणारी यंत्रणा (Fogging System) बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणेबाबत.**

**(अ)** श्रीं चे दर्शनरांगेची व्यवस्था शांती निवास व भक्त निवास या दोन इमारतींचे तळमजला व पहिल्या मजल्यावर करण्यात आली आहे.या दोन इमारतीमधून जाणाऱ्या दर्शनरांगेतील वातावरण आल्हाददायक असण्याचे दृष्टीने या इमारतीत वायुविजन व्यवस्थित होण्यासाठी मोठया आकाराच्या खिडक्या व मोकळया जागा ठेवण्यात आलेल्या आहेत.उन्हाळयाचे दिवसात सदर ठिकाणी शीतकरण यंत्रणा वापरण्यास मर्यादा येतात तसेच त्यासाठी विजेचा खर्चही मोठया प्रमाणात करावा लागतो. यावर वेगवेगळया पर्यायांची चाचपणी करण्यात आली.

दरम्यान दिनांक १३ फेब्रुवारी, २०१० रोजी नी.डी.ली.एंटरप्राईजेस, मुंबई यांच्या प्रतिनिधींनी शिर्डी येथे बगीचामध्ये धुके निर्माण करणारी यंत्रणा बसविणेबाबत समक्ष पहाणी करुन चर्चा केली. त्यावेळेस साईभक्तांच्या गर्दीच्या वेळेस दर्शन रांगेत निर्माण होणाऱ्या उष्णतेवर, घुसमटीवर काही पर्याय उपलब्ध आहे काय याबाबत चर्चा करणेत आली. त्यावेळेस कंपनीच्या प्रतिनिधींनी, फॉगिंग सिस्टिमव्दारे गर्दीच्या ठिकाणचे उष्णतेचे प्रमाणात काहीशी घट होऊ शकते, अशा प्रकारच्या फॉगिंग सिस्टिम्स उपाहारगृह, सार्वजनिक ठिकाणी अनेक ठिकाणी वापरत आहेत, असे सांगितले. याबाबत मा. अध्यक्षसो. यांनी कंपनीचे प्रतिनिधींना सदर यंत्रणेची प्रायोगिक तत्वावर प्रात्यक्षिक देणेस सांगितले. त्यानुसार कंपनीने दि.२५/०२/२०१० रोजी भक्तनिवास इमारतीचे तळमजल्यावर प्रायोगिक तत्वावर कृत्रिम धुके निर्माण करणारी यंत्रणा (Fogging System) बसविणेत आली होती.

**(ब)** मे. नी डी ली एंटरप्राईजेस, मुंबई यांनी दिनांक ०२ मार्च, २०१० रोजीचे ई-मेल पत्राव्दारे दर्शन रांगेमध्ये फॉगिंग सिस्टिम्स उभारणेबाबत अंदाजित खर्चाचा प्रस्ताव सादर केला होता. सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन उप समितीचे दिनांक ०६ मार्च, २०१० रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| कृत्रीम धुके निर्माण करणारी यंत्रणा | मोटर / पंप |
|---|---|
| २०० नोझलची यंत्रणा | २ अश्वशक्ती /४.५ जी पी एम |
| १५० नोझलची यंत्रणा | १.५ अश्वशक्ती /३.२५ जी पी एम |
| १०० नोझलची यंत्रणा | १.५अश्वशक्ती /२.२ जी पी एम |

मोटर ४४०व्होल्ट ए.सी., ५० सायकल्स, थ्री फेज , ब्रास -नोझल्स,टी, उच्चदाबाचे टयुबिंग संस्थानने करावयाच्या बाबी - प्लंबिंगसह १/२" पाण्याची लाईन ,मोटर स्टार्टरसह विद्यूत कनेक्शन, नोझल मॅनिफोल्डसाठी सपोर्टलाईन इत्यादि. सदर यंत्रणेसाठी खालीलप्रमाणे तपशीलवार खर्च अपेक्षित आहे.

**शांती निवास इमारत -**

| अ. नं. | कृत्रीम धुके निर्माण करणाऱ्या लाईनची निश्चित जागा | कृत्रीम धुके निर्माण करणाऱ्या यंत्रणेचा तपशील | एकूण किंमत * |
|---|---|---|---|
| ०१ | तळमजल्यावर छताचे बाजूस | २०० नोझलची यंत्रणा | रु.९,००,०००/- |
| ०२ | पहिल्या मजल्यावर खिडकीचे बाजूस | २०० नोझलची यंत्रणा | रु.९,००,०००/- |
| ०३ | तिसऱ्या मजल्यावर छतावर | २०० नोझलची यंत्रणा | रु.९,००,०००/- |
| **एकूण शांती निवास इमारत -** | | **६०० नोझलची यंत्रणा** | **रु.२७,००,०००/-** |

**भक्तनिवास इमारत -**

| अ.नं | कृत्रीम धुके निर्माण करणाऱ्या लाईनची निश्चित जागा | कृत्रीम धुके निर्माण करणाऱ्या यंत्रणेचा तपशील | एकूण किंमत * |
|---|---|---|---|
| | तळमजल्यावर खिडकीचे बाजूस | १५० नोझलची यंत्रणा | ७,५०,०००/- |
| ०२ | पहिल्या मजल्यावर खिडकीचे बाजूस | १५० नोझलची यंत्रणा | ७,५०,०००/- |
| | **एकूण भक्तनिवास इमारत -** | **३०० नोझलची यंत्रणा** | **१५,००,०००/-** |

याव्यतिरिक्त १०० नोझलची यंत्रणा दोन्ही इमारतींसाठी केली जाणार आहे.

| अ. नं. | कृत्रीम धुके निर्माण करणाऱ्या लाईनची निश्चित जागा | कृत्रीम धुके निर्माण करणाऱ्या यंत्रणेचा तपशील | एकूण किंमत * |
|---|---|---|---|
| ०१ | दोन्ही इमारतींचे तळमजल्यावर खिडकीचे बाजूस | १०० नोझलची यंत्रणा | रु.६,००,०००/- |
| **एकूण दोन्ही इमारत -** | | **१०० नोझलची यंत्रणा** | **रु.६,००,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे दोन्ही इमारतींसाठी एकूण **रु.४८,००,०००/-** (अधिक इंस्टॉलेशन चार्जेस+लागू असणारे कर + वाहतुक भाडे + संस्थानने करावयाच्या बाबी इत्यादि) खर्च अपेक्षित आहे.

**(क)** तरी उपरोक्त परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे, तुर्त दर्शन रांगेतील एका हॉलसाठी उपरोक्तप्रमाणे कृत्रीम धुके निर्माण करणारी यंत्रणा (Fogging System) बसविणेसाठी अशा प्रकारची यंत्रणा उभारणाऱ्या कंपन्यांकडून दरपत्रके मागवून यंत्रणा कार्यान्वीत करणेकामी येणारे योग्य त्या खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने करुन घेणेस मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ मार्च, २०१० रोजीचे सभेत मान्यता देणेत आली आहे.

उपरोक्त प्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत झालेले निर्णयानूसार कृत्रीम धुके निर्माण करणारी यंत्रणा (Fogging System) बसविणेसाठी संकेत स्थळावर व वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन दि. ०९.०४.२०१० अखेर पर्यंत दरपत्रके मागविणेत आली होती. त्यानूसार विहीत मुदतीत खालील दोन कंपन्यानी आपले प्रस्ताव सादर केले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

01. Nee Dee Lee enterprises, Mumbai
02. Shresth Import Export, New Delhi

तरी वरिल प्रमाणे प्राप्त झालेली ०२ दरपत्रके मा. व्यवस्थापन उपसमितीचे सभेपुढे उघडून त्यावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन वरिल प्रमाणे प्राप्त झालेली ०२ दरपत्रके मा. व्यवस्थापन उप समितीचे सभेपुढे उघडणेत आली असून, त्यातील तपशील व तुलनात्मक दरांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr.No. | Description | Unit /Quantity | Nee Dee Lee enterprises, Mumbai Cost (Rs) | Shresth Import Export, Yamuna nagar (Haryana) Cost (Rs) |
|---|---|---|---|---|
| 01 | Supply & installation of 200 nozzle -Fog Cool System for Cooling the Darshan Queue hall for Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. | | | |
| | **Technical Specifications-** i) Reciprocating Triplex plunger pump, brass body,1500 PSI, 4.5 GPM, (2x2.25 GPM) | 2 Nos. | 2,90,000.00 | 2,40,000.00 |
| | ii)Motor 220V AC,50 cycle, Single phase, 4 HP (2x2HP) | 2 Nos. | 35,000.00 | 16,000.00 |
| | iii) Brass Nozzles with S.S. insert having 0.006” orifice. | 200 Nos. | 3,00,000.00 | 1,37,000.00 |
| | iv) High pressure Nozzle Tees (brass body)-quick make & break type. | 200 Nos. | 2,50,000.00 | 8000.00 |
| | v) High pressure brass connectors, Tees & Bends. | 20 Nos. | 25,000.00 | 80,000.00 |
| | vi) High pressure polyflex Nylon (U V resistant) tubing 5 micron inline water filter. | 300Rmt. +1water filter | 82,000.00 | 72,000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Including Complete electric fittings inside and outside the hall for systems as per requirement and four exhausts with electric fittings and connection. | | 1,50,000.00 | -- |
| | | Total Amount.. | 11,32,000.00 | 5,53,000.00 |

उपरोक्तप्रमाणे दरपत्रक सादरकर्त्यांनी दिलेले दराबाबत त्यांचेशी चर्चा तथा वाटाघाटी करणेसाठी दूरध्वनीवरुन सभेस हजर रहाणेबाबत कळविणेत आलेले होते. त्याप्रमाणे दोन्ही दरपत्रक सादरकर्त्यांचे प्रतिनिधी हजर होते. उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे निम्नतम दर सादरकर्ते Shresth Import Export, Yamuna nagar (Haryana) यांचे प्रतिनिधीनी सभेच्या ठिकाणी येऊन उपस्थिती पत्रकावर स्वाक्षरी केली. तथापि प्रत्यक्ष चर्चेसाठी सभेपुढे बोलविले असता, ते चर्चेस उपस्थित राहिले नाहीत, थोडक्यात त्यांना सदर काम करण्याची इच्छा नसल्याचे दिसून आले.

त्यानंतर, शिर्डी व्दितीय दरपत्रक सादरकर्ते Nee Dee Lee enterprises, Mumbai यांच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी बोलविणेत आले. त्यांचेशी चर्चा करतांना, एक्झॉस्ट फॅनची किंमत जास्त असल्याचे दिसून आले. त्यामुळे सदर एक्झॉस्ट फॅनची सुविधा संस्थानमार्फत करण्यात यावी, असे ठरले. उर्वरित सर्व यंत्रणा व त्यासाठी आवश्यक फिटींग्ज वगैरे Nee Dee Lee यांचेकडून सुधारीत किंमत घेतांना यंत्रणेची "एक वर्षाऐवजी दोन वर्षे देखभाल दुरुस्तीसाठी" अशी अट घालणेत आली. त्यानुसार Nee Dee Lee यांनी त्यांनी नमूद केलेली एक्झॉस फॅनची किंमत रुपये १.५० लाख किंमत कमी करुन, उर्वरित यंत्रणेसाठी खालीलप्रमाणे किंमत देऊ केली :

| | |
|---|---|
| निवीदेतील रक्कम रुपये.. | ११,३२,०००.०० |
| वजा ०४ एक्झॉस्ट फॅन ची रक्कम | १,५०,०००.०० |
| एकुण रक्कम.. | ९,८२,०००.०० |
| एकुण रक्कमेवर २०.८७ टक्के सुट | २,०४,९४३.०० |
| एकुण रुपये.. | **७,७७,०५७/-** |

वरिल प्रमाणे Nee Dee Lee enterprises, Mumbai यांनी देऊ केलेली यंत्रणा व दराबाबत सविस्तर चर्चा केली असता असे लक्षांत आले की, अशा प्रकारचे फॉगिंग सिस्टिम बसविणेचे काम करणाऱ्या अत्यंत मोजक्या संस्था आहेत, वृत्तपत्रात जाहिरात देऊनसुध्दा दोनच निविदा प्राप्त झाल्या. तसेच ज्या दोन दरपत्रक सादरकर्त्यांनी दर सादर केले त्यापैकी, एक महाराष्ट्र राज्याबाहेरील आहे, त्यांने अशा प्रकारची कोणती कामे केली आहेत त्याचा तपशील दरपत्रक निविदेसोबत दिलेला नाही. दुसरी संस्था मुंबई स्थित असून, त्यांना अशा प्रकारच्या तांत्रिक कामाचा मोठया प्रमाणावर अनुभव आहे तसेच ते दोन वर्ष देखभाल दुरुस्ती करणेस तयार असून, त्यासाठी सुरक्षा अनामत रक्कम (५ टक्के ) व परफॉर्मन्स बँक गरँटी (५ टक्के) रक्कमेची दोन वर्षे संस्थानकडे ठेवणेस तयार आहेत. तसेच Nee Dee Lee यांनी सभेपुढे ते यंत्रणा उभारणीसाठी वापरणार असलेले साहित्याचे नमुने समक्ष सादर केले. या सर्व बाबींचा विचार करुन, फॉगिंग सिस्टिम उभारणे हे एक विशेष प्रकारचे तांत्रिक काम असल्याने, Nee Dee Lee यांना या प्रकारच्या कामाचा दिर्घ अनुभव असल्याने, जरी सदर कामासाठी दोनच निविदा प्राप्त झालेल्या असल्यातरी, एक विशेष बाब म्हणून तूर्त पूर्वी ठरल्याप्रमाणे / निर्णयाप्रमाणे भक्तनिवास इमारतीचे तळमजल्यावर फॉगिंग सिस्टिम त्यांचेकडून बसवून घेण्यात यावी. यासाठी त्यांनी देऊ केलेले सर्वसमावेशक दर रुपये ७,७७,०५७/- मात्र मान्य करणेस व त्याप्रमाणे कार्यादेश देणेस, तसेच आवश्यकता भासल्यास एक्झॉस्ट फॅनची सुविधा संस्थानचे विदयुत विभागामार्फत करुन घेणेस येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**(०२) <u>संस्थानचे वाहन विभागासाठी नविन पार्किंग शेड उभारणेसाठी पत्रे खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून निर्णय घेणेबाबत.</u>**

संस्थानचे वाहन विभागासाठी नविन पार्किंग शेड उभारणेसाठी पत्रे खरेदीकामी उपसमितीचे दि.३.०४.२०१० चे सभेत मान्यता देण्यातआलेली होती. त्यानुसार दिनांक ७.०४.२०१० चे पत्रान्वये दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यासअनुसरुन प्राप्त झालेली दरपत्रके आजचे सभेत उघडण्यात आली असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| अ.नं. | दरपत्रक सादरकर्त्याचे नाव | टाटा शक्ती जी.आय.शिट १२x३ फुट (०.४५ एम.एम.) | जिंदाल जी.आय.शिट १२x३ फुट (०.४५ एम.एम.) |
|---|---|---|---|
| | | मागणी-२१० नग | |
| ०१. | सुंधा स्टिल,कोपरगाव | -- | ६९०/- |
| ०२ | यशोदा ट्रेडर्स,राहाता | ८६५/- | --- |
| ०३ | श्रीसंगमनेर टिंबर मार्ट,संगमनेर | ८७४/- | --- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०४ | श्रीकृष्णा ट्रेडर्स,राहाता | ८७४.०० | ६७५/- |
| ०५ | ओम ट्रेडिंग कंपनी,संगमनेर | ८६०/- | ७२० /- |
| ०६ | गोदावरी ट्रेडर्स,कोपरगाव | ८४५/- | -- |
| ०७ | सिद्धेश्वर सेल्स कार्पोरेशन,कोल्हार | ८४०/- | ७३०/- |
| ०८ | जी.पी.एन्टरप्राईजेस,संगमनेर | ८६०/- | --- |
| ०९ | महेश्वरी स्टील ट्रेडर्स,बाभळेश्वर | ८५०/- | --- |
| १० | के.जे.स्टील,कोपरगाव | .७३८. /- | -- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीकृष्णा ट्रेडर्स,राहाता यांचे जिंदाल कंपनीचे पत्र्याचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०५ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमा खर्च तक्ता माहे फेब्रुवारी- २०१०**

**(ब) माहे फेब्रुवारी २०१०मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे फेब्रुवारी-मार्च २०१० मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे फेब्रुवारी-मार्च २०१०मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(A) माहे फेब्रुवारी,२०१० मधील जमा रु. १९,३२,११,७५५/- आणि खर्च रुपये १०,१५,४२,४७४/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील फेब्रुवारी,२०१० रुपये ३,३३,२३४/- चा तक्ता, दिनांक ३१.०३.२०१० अखेर संस्थानची गुंतवणूक रुपये ४२७,१७,०२,९२९/- चा तक्ता, माहे फेब्रुवारी-मार्च ,२०१० या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या अनुक्रमे एकूण रुपये ७,५६,१४,६१२/- व रुपये ९,११,६६,४४/- देणगीचा तक्ता, माहे फेब्रुवारी-मार्च,२०१० मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा अनुक्रमे रुपये १,६५,२३९/- व रुपये २,२१,८७५/-चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.३६० नोंद घेण्यात आली.**

---

**०२. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये फेब्रुवारी-मार्च २०१० या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

B) श्री साईबाबा रुग्णालयात माहे फेब्रुवारी-मार्च,२००९ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये अनुक्रमे रुपये २०,१७,४८२/-व रुपये २४,५८,१५९/- देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.३६० नोंद घेण्यात आली.**

---

**०३. श्री साईनाथ रुग्णालयात माहे फेब्रुवारी-मार्च २०१० या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

(C) श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे फेब्रुवारी-मार्च,२०१० मध्ये अनुक्रमे रुपये ३४,५०,९००/-व रुपये ४९,३०,९९५/- देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.३६० नोंद घेण्यात आली.**

---

**०४. श्री साईनाथ रुग्णालयात माहे फेब्रुवारी २०१० मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(D) साईनाथ रुग्णालयात माहे फेब्रुवारी,२०१० मध्ये रुग्णांना अंतररुग्ण रुपये १,५१,२६५/- बाह्य रुग्ण रुपये ६८,४८८/- थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ४७,३००/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.३६० नोंद घेण्यात आली.**

---

**०५. माहे माहे फेब्रुवारी २०१० मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(E) माहे फेब्रुवारी-मार्च,२००९ संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या अनुक्रमे ४०,१६० व ४४,७६१ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.३६० नोंद घेण्यात आली.**

---

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(F) बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.३६० नोंद घेण्यात येऊन तक्ता "ब" मधील खालीलप्रमाणे बांधकामाची अंतिम बिले आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(०१) श्रीसाईप्रसादालय येथील व्हिआयपी डायनिंग हॉलमध्ये स्वतंत्र किचन काऊंटर तयार करणेकामी मे.माय किचन सिस्टम,नाशिक यांचे अंतिम बिल रुपये २,५६,४५१/-**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**०७. पाणी तपासणी अहवाल**

(G) माहे फेब्रुवारी-मार्च,२०१० मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.३६० नोंद घेण्यात आली.**

---

**विषय न.०६ सन २०१०-११ साठी कार्यालयीन जनरल व संगणक छपाईकामी निविदा उघडून सूट, दरपत्रके घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०.०१.२०१० मधील निर्णयानुसार संस्थानचे विविध विभागांसाठी सन २०१०-११ मध्ये आवश्यक असणारी कार्यालयीन जनरल व संगणक छपाईकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रु.६५,४६,०००/- चे खर्चास तत्वत: मान्यता मिळालेली आहे. त्या अनुषंगाने दि.०१.०३.२०१० चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०१.०३.२०१० ते दि.१०.०३.२०१० अखेर निविदा विक्री ठेवणेत आलेली होती. तसेच भरलेल्या निविदा स्विकारणे मुदत दि.१३.०३.२०१० अशी ठेवणेत आलेली होती याबाबत दोन लिफाफा पद्धतीने निविदा मागविणेत आलेल्या होत्या. पैकी क्र.१ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्र.२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डी.डी अथवा रोखीची पावती तसेच इतर कागदपत्राची मागणी करणेत आलेली आहे.

मुदतीअंती प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील सोबतच्या परिशिष्टात सादर करणेत येत आहे. तसेच सर्व निविदाधारकांना आजचे सभेपुढे आमंत्रित करणेत आलेले आहे. निविदा उघडल्यानंतर निविदाधारकांनी बयाणा रक्कम, मागणीप्रमाणे कागदांचे नमुने व संबंधित कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्यास अशाच निविदाधारकांचाच विचार करणेत येईल.

याकामी प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्स सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१. | अविराज पॅकवेल, कोपरगांव |
| ०२. | विनायका कन्टीन्युअस स्टेशनरी प्रा.लि.पुणे |
| ०३. | नॅशनल पेपर इंडस्ट्रीज, कोल्हापुर |
| ०४. | साईराकेश पेपर टेक, नाशिक |
| ०५. | राज प्रिंटर्स, पुणे |
| ०६. | मॉडर्न ऑफसेट, मालेगांव |
| ०७. | सावता प्रिंटर्स, राहाता |
| ०८. | सनविरा डेटा फॉर्म्स, औरंगाबाद |
| ०९. | संप्रती ऑफसेट प्रिंटर्स, सोलापुर |
| १०. | सी.एम.वाय.के.प्रेस, जळगांव |
| ११. | रोहन प्रिंटर्स अॅण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद |
| १२. | श्री ग्राफी, पुणे |
| १३. | समर्थ ऑफसेट, साकुरी |
| १४. | मे.कॅप्रिक्रॉर्न प्रिंटर्स, पुणे |
| १५. | मे.साईप्रेस प्रिंट अॅण्ड फॉर्म्स प्रा.लि.पुणे |

| | |
|---|---|
| १६. | मे.श्री.गजानन ऑफसेट, कोपरगांव |
| १७. | मे.ओम सेल्स कार्पोरेशन, मालेगांव |
| १८. | मे.बालाजी ऑफसेट, अहमदनगर |
| १९. | मे.अजिंक्य सहकारी मुद्रणालय लि.सातारा |
| २०. | सुपरकॉटस कार्बनलेस पेपर मिल्स प्रा.लि. |
| २१. | वर्क सेंटर ऑफसेट प्रिंटर्स, मुंबई |
| २२. | सम्राट कॉम्प्युपिंटर्स प्रा.लि.मुंबई |

**निर्णय क्र.३६१** **उपरोक्त उपस्थित सर्व कोटेशनसादरकर्त्यांना सभेपुढे समक्ष बोलविण्यात येऊन,देऊ केलेल्या दरात आणखी किती सूट देणार याबाबत त्यांना लेखी बंद पाकिटात देणेबाबत सांगण्यात आले.**

**त्यांनी देऊ केलेल्या सूटीचे दराचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन, निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.०७** **शिर्डी येथील स.नं.१७१/१८ पै.मधील विद्यमान बसस्थानकाचे जागेवर संस्थान निधीतुन अद्यावत बसस्थानकाचे बांधकाम करणेकामी प्राप्त झालेल्या निविदामधील लिफाफा क्र.०२ उघडून त्यावर निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे प्रस्तावानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे माध्यमातून व आर्थिक सहाय्यातून श्री क्षेत्र शिर्डी येथील सर्व्हे क्र.१७१/१२ पैकी मधील विद्यमान बसस्थानकाचे जागेमध्ये अद्ययावत सोयीसुविधायुक्त असे नवीन बसस्थानकाचे बांधकाम करणेस व त्यासाठी येणारे अंदाजीत रक्कम रु.७.६६ कोटी मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेत नि.क्र.५७६ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. सदरहू प्रस्तावास मा. विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.सांसवि-२००६/६०७/८७ का.सोळा दि.१३/०१/२००९ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी, नाशिक यांनी तयार केलेल्या बांधकाम आराखड्यांना मा. संचालक, नगररचना,पुणे यांचे मान्यतेने शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी मंजुरी दिलेली आहे. मंजूर बांधकाम आराखड्यानुसार आर्किटेक्ट काबरे चौधरी,नाशिक यांनी रु.६,९१,५०,७००.०० मात्र रकमेचे फक्त सिव्हील कामाचे सविस्तर अंदाजपत्रकानुसार कोरे निविदा फॉर्म तयार केले होते.

त्यानुसार वर्तमान पत्रात व संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन कोरे निविदा फॉर्म विक्री दि.०१/०२/२०१० ते दि.१५/०२/२०१० अखेर व ठेकेदार यांची निविदा पूर्व बैठक दि.१८.०२.२०१० रोजी आयोजीत करण्यात आली होती. सिलबंद निविदा सादर करणेची मूदत दि.०२.०३.२०१० अखेर होती. निविदापूर्व बैठकीत ठेकेदार यांनी जुने बसस्थानक इमारतीचे तोडफोड कामाबाबत विचारलेल्या मुद्यांबाबत चर्चा करणेत आली. निविदा क्लॉज नं.४२ व ५० नुसार ठेकेदार यांनी तोडफोड करुन त्यातून निघणारे मटेरीअल स्वतः घेवून त्याबदल्यात संस्थानकडे रक्कम जमा करावी अशी अट होती. दि.०२/०२/२०१० रोजीचे मा. विभाग नियंत्रक, राज्य परिवहन मंडळ, अहमदनगर यांचेकडील पत्रान्वये सध्याच्या अस्तित्वात असलेल्या बसस्थानकाच्या तोडफोडीतून प्राप्त होणाऱ्या साहित्याची यादी आर्किटेक्ट यांचेमार्फत तयार करावी व तोडफोड करणेपुर्वी त्यांचे कार्यालयाचे अधिकृत प्रतिनिधीकडून सदर साहित्याची खातरजमा झालेशिवाय तोडफोड करण्यास सुरुवात करु नये तसेच तोडफोडीनंतर सर्व साहित्य, श्रीरामपूर येथील विभागीय भांडारात जमा करणेबाबत कळविले आहे.

याबाबत प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री. ए.आर. काबरे यांनी मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचेशी चर्चा केली. त्यानुसार ठेकेदार यांनी तोडफोड करुन मटेरीअल घेऊन जावे व त्याबदल्यात संस्थानकडे रक्कम जमा करावी असा निर्णय घेणेत आला. तसेच निविदेतील डबल पॉलिश्ड ग्रेनाईट पार्टीशनचे बाबीचे दरामधील त्रुटीमुळे अंदाजित खर्चाचे रकमेमध्ये रु.८५,०५०.०० ने वाढ झाली. त्यानुसार सुधारित अंदाजित खर्चाची रक्कम रु.६,९२,३५,७५०.०० मात्र इतकी आलेली आहे. तसेच याव्यतिरिक्त रॉयल्टीपोटी ठेकेदार यांचेमार्फत जी रक्कम शासनाकडे भरणा करण्यात येईल, त्याची भरपाई संस्थानतर्फे करण्यात येईल अशा शर्तीचा समावेश आहे. रॉयल्टीचे प्रचलित दराने ही रक्कम अंदाजे रु.४,९४,२६५.०० मात्र इतकी होते. त्याप्रमाणे केलेले बदल ठेकेदार यांना जा.नं.३९२३/२०१० दि.०१/०३/२०१० रोजीचे पत्राव्दारे कळविण्यात आले व सिलबंद निविदा सादर करणेची मूदत दि.०५/०३/२०१० अखेर वाढविणेत आली. कोऱ्या निविदांची विक्री व विहीत मूदतीत प्राप्त झालेल्या सिलबंद निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**अ) विहीत मूदतीत खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.**

१. मे. पाटील कन्स्ट्रक्शन, गोळीबार मैदान चौक, कॅम्प, पुणे

२. शापुरजी पालोनजी ॲण्ड कं.लि., नाशिक
३. आय.व्ही.आर.सी.एल. इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड प्रोजेक्टस लि., कोरेगांव पार्क,पुणे
४. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, इंजिनिअर्स ॲण्ड गर्व्ह. कॉन्ट्रॅक्टर्स, उल्हासनगर
५. व्ही.एम. मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स पिंप्री,पुणे

**ब) विहीत मूदतीत खालील निविदाधारकांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.**

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | आवक नं. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | शापूरजी पालोनजी ॲण्ड कं. लि., नाशिक | ६३५९ | ०५.०३.२०१० |
| ०२ | मे. ईगल कन्स्ट्रक्शन क. उल्हासनगर | ६३६० | ०५.०३.२०१० |
| ०३ | व्ही.एम. मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे | ६३६१ | ०५.०३.२०१० |
| ०४ | मे. पाटील कन्स्ट्रक्शन, पुणे | ६३६२ | ०५.०३.२०१० |

विहीत मूदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त सिलबंद निविदांचे तांत्रिक माहितीचा लिफाफा क्र. ०१ मा. व्यवस्थापन उपसमितीचे दि.११/०३/२०१० रोजीचे सभेपुढे उघडणेत आले सदरहू उघडण्यात आलेल्या लिफाफा क्र.०१ मधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या तांत्रिक माहितीबाबत व पूर्वपात्रतेबाबतची माहिती आर्किटेक्ट यांनी छाननी करुन निविदांमध्ये दिलेल्या माहितीनुसार व पुर्वपात्रता अटी व शर्तीनुसार ठेकेदारांचे पात्रतेबाबतचा अहवाल दि.२५/०३/२०१० रोजीचे पत्राव्दारे सादर केला आहे. आर्किटेक्ट यांनी दिलेल्या अहवालानुसार उपरोक्त निविदाधारकांपैकी मे. पाटील कन्स्ट्रक्शन, पुणे यांनी सादर केलेल्या माहितीमध्ये अपूर्णता असून त्यांनी अशाप्रकारची कामे केलेली नसल्याने त्यांना अपात्र म्हणून शिफारस केली आहे.

मे. पाटील कन्स्ट्रक्शन, पुणे यांनी तांत्रिक निविदेसोबत सादर केलेल्या कागदपत्रात BSUP Project construction of २५८० tenements at warge unoler JNNURM या एकुण रु.७०.४६ कोटी मात्र खर्चाच्या प्रकल्पाचे रु.२४.२० कोटी मात्र रकमेचे काम पूर्ण केलेबाबतचे प्रमाणपत्राची प्रत सादर केली होती. परंतु सदर प्रकल्प अद्याप पूर्ण केलेला नसल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आले होते. याबाबत ठेकेदार यांचे कार्यालयाशी दूरध्वनीवर चर्चा केली असता, औरंगाबाद येथील रु.१०२.४५ कोटी मात्र खर्चाचा गृहप्रकल्प मागिल तीन वर्षात पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र त्यांनी सभेच्या आदल्या दिवशी सादर केल्याने त्यांना पात्र धरण्यात आले आहे.

त्यानुसार वरीलप्रमाणे अ.नं. ०१ ते ०४ निविदासादरकर्त्यांचे निविदेतील लिफाफा क्र. २ आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांशी समक्ष चर्चा/वाटाघाटी केल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

(कामाची अंदाजे किंमत ०६,९२,३५,७५०.००)

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटी अंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 01 | शापूरजी पालोनजी ॲण्ड कं. लि., नाशिक | Civil | 51% अधिक | 42% अधिक |
| | | Dismanting work | -- | -- |
| 02 | मे. ईगल कन्स्ट्रक्शन क. उल्हासनगर | Civil | 27% अधिक | 17% अधिक |
| | | Dismanting work | 3,00,000/- | 3,00,000/- |
| 03 | व्ही.एम. मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे | Civil | 31% अधिक | 27% अधिक |
| | | Dismanting work | 66,000/- | 1,01,000/- |
| 04 | मे. पाटील कन्स्ट्रक्शन, पुणे | Civil | 9.90% अधिक | निविदेतील दराप्रमाणे |
| | | Dismanting work | 1,00,000/- | |

**निर्णय क्र.३६२ यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.पाटील कन्स्ट्रक्शन,पुणे यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०८ साईटेक (आय.टी.) प्रकल्पासाठी श्रीसाईप्रसादालयाकडील उत्तरेकडील पहिल्या माळयावरील हॉलमध्ये डाटा सेंटर बनविणेकामी मागविण्यात आलेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/३/२०१० रोजीचे सभेतील निर्णयान्वये साईटेक प्रकल्पासाठी श्री साई प्रसादालयाचे उत्तरे कडील पहिल्या माळयावरील हॉलमध्ये डाटा सेंटर व इतर अनुषंगीक सुविधा करणेकामी येणारे रु.३२.०० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळाली आहे. त्यापैकी सिव्हील वर्कची रक्कम रु.६,७०,२१०/- मात्रची कामे करणेकामी इकडील विभागामार्फत सिंलबंद निविदा मागविण्यात आल्या आहेत. संस्थानचा आय.टी. विभाग व Cognizant Technology Solution, Pune यांचेशी चर्चा व विचारविनिमय करुन, तसेच त्यांच्या गरजा विचारात घेवुन सदर निविदा तयार करण्यात आल्या आहेत. यामध्ये Light Weight Brick मध्ये बांधकाम करणे, भिंतींना जिप्सम प्लास्टर करणे, स्ट्रक्चरल सिव्हील वर्क सिलींग व आर्मस्ट्रॉंग फॉल्स सिलींग करणे, रंगकाम इ. कामांचा समावेश करणेत आला आहे.

डाटा सेंटरचे सिव्हील वर्क करणेकामी दि.१३/०४/२०१० अखेर स्थानिक ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या, परंतु सदरहू मुदतीत एकही निविदा जमा झालेली नाही. त्यामुळे निविदा सादर करणेसाठी ठेकेदारांना दि.१७/०४/२०१० अखेर मुदतवाढ दिलेली आहे.

त्यानुसार वाढीव मुदतीत प्राप्त झालेल्या दोन निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन निविदा सादरकर्त्यांशी समक्ष चर्चा/ वाटाघाटी केल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नाव** | **निविदेतील दर** | **चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर** |
|---|---|---|---|
| **०१** | **मे.मिलींद एस. पाचोरकर, निफाड** | **१२,०९,१७८.८५** | **निविदेतील दराप्रमाणे** |
| **०२** | **मे.योगेश सुरेश पाटील, कोपरगाव** | **१४,३६,४२८.००** | **अनुपस्थित** |

**निर्णय क्र.३६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील निविदेतील दर हे जास्त स्वरुपाचे असल्याने सदरहू निविदा रद्द करयात आल्या. उपरोक्त कामांपैकी Light Weight bricks मध्ये भिंत बांधकामासाठी बांधकाम विभागामार्फत मटेरीअल खरेदी करुन मजुरी ठेकेदारामार्फत काम करुन घ्यावे. तसेच, फॉल्स सिलिंग, जिप्सम प्लास्टर, दरवाजे, पेंटींग, इंटेरीअर कामांसाठी मटेरीअलसह कोटेशन्स मागवून काम करण्यात यावे, असे ठरले. त्यासाठी येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.०९** **रथ पालखी मिरवणूकीकरीता (Accoustic (Noiseless) type Generator खरेदी करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव-** रथ-पालखी मिरवणुकीकरीता Accoustic (Noiseless) type Generator ची खरेदी कोटेशन मागवून करुन घेणेकामी व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ४,००,०००.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१९-०९-२००९ च्या सभेतील विषय क्र.२३ निर्णय क्र.७५२ अन्वये मान्य करण्यात येऊन या कामासाठी कोटेशन मागवावेत असा निर्णय झाला होता. त्यानुसार कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | पार्टीचे नांव | आ.क्र. व दिनांक |
|---|---|---|
| ०१) | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ७५२५ / १८-०३-२०१० |
| ०२) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ७५२६ / १८-०३-२०१० |
| ०३) | मे. पिनाकेश्वर इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ७५२७ / १८-०३-२०१० |

उपरोक्तप्रमाणे रथ-पालखी मिरवणुकीकरीता Accoustic (Noiseless) type Generator खरेदी करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

( कामाची अंदाजे किंमत रुपये-४,००,०००.००)

| अ.क्र. | पार्टीचे नांव | कोटेशनमधील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१) | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ५,५८,८२३.०० | ५,०२,९४०.०० |
| ०२) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ४,९३,५७२.०० | ४,६८,८९३.०० |
| ०३) | मे. पिनाकेश्वर इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ६,२२,१२५.०० | अनुपस्थित |

**निर्णय क्र.३६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त तक्त्यातील मे.आदिती इलेक्ट्रीकल्स,नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.१०** **श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता जनसेट, ट्रान्सफॉर्मर व पॅनेल खरेदी करणेकामी प्राप्त झालेली टेंडर उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता जनसेट, ट्रान्सफॉर्मर व पॅनेल खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०७-११-२००९ चे सभेतील विषय क्र.४९ निर्णय क्र.८४७ अन्वये वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस व येणा-या अंदाजे रक्कम रुपये १,४२,७३,२७४.०० मात्र खर्चास मान्यता मिळाली आहे.

या कामांसाठी टेंडर मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. टेंडर सादर करण्याची मुदत दिनांक २९-०३-२०१० अखेर अशी होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या टेंडरसचा तपशील खालीलप्रमाणे :-

| **अ.क्र.** | **पार्टीचे नांव** |
|---|---|
| ०१) | मे.केलव्होल्ट (इंडिया) प्रा.लि., मुंबई |
| ०२) | मे.विनोद इंजिनिअरींग कंपनी, मुंबई |
| ०३) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता जनसेट, ट्रान्सफॉर्मर व पॅनेल खरेदी करणेकामी प्राप्त झालेले टेंडर आजचे सभेत उघडण्यात येऊन, टेंडरसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्र. | पार्टीचे नांव | टेंडरमधील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१) | मे.केलव्होल्ट (इंडिया) प्रा.लि., मुंबई | ३७.५ % अधिक | ३७.५ % अधिक |
| ०२) | मे.विनोद इंजिनिअरींग कंपनी, मुंबई | ३९.३ % अधिक | ३८.३ % अधिक |
| ०३) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ३६ % अधिक | ३२ % अधिक |

**निर्णय क्र.३६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे वापरासाठी कमिन्स कंपनीचा १०१० के.व्ही.ए.जनसेट खरेदीकामी कंपनीशी थेट संपर्क साधून खरेदी करण्यात यावा.**

**तसेच ट्रान्सफॉर्मर-सबस्टेशनसाठी वेगळे टेंडर आणि पॅनेल व इतर अनुषंगिक कामासाठी वेगळे टेंडर असे दोन वेगवेगळे स्वतंत्र टेंडर्स मागविण्यात यावेत. तसेच यापूढे भविष्यात संस्थानसाठी जनसेट खरेदी करावयाचे असल्यास त्यासाठी कमिन्स कंपनीशी थेट संपर्क साधून जनसेट खरेदी करण्याची पध्दत ठेवावी असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.११** **श्रीसाईनाथ व श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदीकामी कोटेशन्सधारकाशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** श्रीसाईनाथ व श्रीसाईबाबा रुग्णालाकरता लागणारा ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदीकामी दि.१०/०१/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.३९ अन्वये ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस मान्यता मिळालेली होती. ि

त्यानुसार इकडील पत्र क्र. २४३८ ते २४४७ दि.०६/०२/२०१० अन्वये एकुण ११ अधिकृत विक्रेते/पुरवठा धारकांकडून दि.२६/०२/२०१० अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन नऊ कोटेशन प्राप्त झालेले होते.

सदरचे प्राप्त कोटेशनपैकी मे.नायट्रॉक्सी मेडीकेम,लोणी व मे.लक्ष्मी गॅसेस,सिन्नर यांनी कोटेशन मागणी पत्र नसतांनी देखील कोटेशन पाठविलेले आहे ते देखील विचारात घ्यावे असे मत नम्र आहे.

सदरचे बंद कोटेशन हे दि.०६.०३.२०१० चे मा.व्यवस्थापन समिती सभे समक्ष उघडण्यात आले असून त्यांचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे.

सदरचे कोटेशनधारकांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| Sr. No. | Name of supplier | Oxygen Gas | | Nitrous Oxide Gas | |
|---|---|---|---|---|---|
| | | Rate in Rs. Per Cm3 Per Lit. | Rate after Negotiation | Rate in Rs. Per Lit. | Rate after Negotiation |
| 1 | Nikhil Medico Gases, Nashik | 15.00 | Absent | 0.2352 | Absent |
| 2 | Ahmednagar Indu. Gases, A'Nagar | 19.28 | 16.28 | 0.2500 | 0.2190 |
| 3 | Laxmi Gases, Sinnar | 18.72 | 17.00 | 0.2529 | 0.2529 |
| 4 | Balaji Trading Com.Sangamner | 20.80 | 17.00 | 0.2411 | 0.2350 |
| 5 | Rahul Gases, Shrirampur | 17.85 | 17.85 | 0.2400 | 0.2400 |
| 6 | Pankaj Gases, Shrirampur | 20.71 | 20.71 | 0.2500 | 0.2500 |
| 7 | Nitroxy Medichem , Loni | 23.00 | 23.00 | 0.2350 | 0.2350 |
| 8 | P.Pahade Agencies, Yeola | 23.02 | 23.02 | 0.2584 | 0.2584 |
| 9 | Shraddha Agencies, Shrirampur | 25.71 | 23.71 | 0.2694 | 0.2194 |

**निर्णय क्र.३६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन सदरचे खरेदीकामी निम्नतम दर असलेले मे. निखिल मेडीको गॅसेस, नाशिक हे वितरक आहे तसेच त्यांनी त्यांचे कोटेशन सोबत सि.सि.ई. सर्टिफिकेट दिलेले नाही त्यामुळे त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली. तदूनंतरचे निम्नतम दर असलेले अहमदनगर ईडस्ट्रीयल गॅसेस, अहमदनगर हे उत्पादक कंपनी आहे. त्यांनी सभेपुढे सि.सि.ई. सर्टिफिकेट सादर करण्याचे मान्य केले त्यानुसार त्यांचेकडून सदरचे सर्टिफिकेट प्राप्त करुन घेऊन, त्यांचेकडून ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदी करण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

**विषय नं.१२** **श्री साईबाबा रुग्णालयाकरीता ऑफीस चेअर खरेदीकामी चर्चा /वाटाघाटी करुन निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात सन २००६ साली सर्व कार्यालयीन व वार्डमध्ये वार्ड इनचार्ज व कन्सलटंट यांचे कॅबीनमध्ये दोन प्रकारच्या रीव्हालव्हींग चेअर खरेदी करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये मध्यम प्रकारच्या (निळया रंगाच्या) एकूण १०० नग तर चांगल्या प्रतीच्या (भगव्या रंगाच्या) एकूण १५ नग खरेदी करण्यात आल्या होत्या. यापैकी निळया रंगाच्या चेअर ह्या सर्व डॉक्टरांचे कॅबीनमध्ये कन्सलटंट तर सर्व कार्यालयामध्ये कायम कर्मचाऱ्यांना, वार्डात इनचार्ज सिस्टर, आर.एम.ओ. यांना बसण्यासाठी

देण्यात आलेल्या आहेत. तर चांगल्या प्रतीच्या (भगव्या रंगाच्या) चेअर ह्या वैद्यकिय संचालक, उपवैद्यकिय संचालक व सर्व मॅनेजर्स यांना बसण्यासाठी देण्यात आलेल्या आहे.

निळ्या रंगाच्या चेअर पैकी काही चेअर वापरुन खराब झालेल्या आहेत. त्यामुळे सध्या डॉक्टरांचे कॅबीनमध्ये व आर.एम.ओ. यांना देण्यास चेअर कमी पडतात. तेंव्हा सर्व कार्यालयात, विभागात अथवा वार्डात कायम कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या निळ्या रंगाच्या चेअर काढून त्या आर.एम.ओ., कन्सलटंट, पर्यवेक्षक किंवा वरीष्ठ अधिकाऱ्यांना वापरण्यास देण्यात येतील.

तर सर्व कार्यालयीन, पॅरामेडीकल व क्लेरीकल कर्मचाऱ्यांना साध्या चेअर (Non revolving) ५० नग खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे, ज्या सर्व कायम कर्मचाऱ्यांसाठी वापरता येऊ शकतील. सदरच्या एका चेअरसाठी अंदाजे रु.३,०००/- इतका खर्च अपेक्षित असून ५० नगांसाठी एकूण रु.१,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरच्या चेअर खरेदी कामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०.०१.२०१० चे सभेत विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. १,५०,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार १४ कोटेशनधारकांकडून इकडील पत्र क्र.१८४४ ते १८५७ दि.२८.०१.२०१० अन्वये दि.१३.०२.२०१० अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन तीन सिलबंद कोटेशन प्राप्त झाले होते.

तसेच मे.रॉयल स्टील प्रॉडक्ट,मुंबई हे समक्ष आले असता त्यांनी त्यांचे माहितीपत्रक व फॅक्स व्दारे दरपत्रक पाठविलेले आहे ते देखील विचारात घ्यावेत असे मत आहे.

सदरचे तीन बंद कोटेशन हे दि.११.०३.२०१० चे मा.उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आले असून त्यांचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे.

सदरचे कोटेशनधारकांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी वाटाघाटीअंती खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| Jalaram Steel Furnitur, Surat | | | Sai Enterprises, Shrirampur | | | Royal Steel Products, Mumbai | | K.B. Electronics, Mumbai | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Make / Model | Rate Per in Rs. | Total Amt. In Rs. | Make / Model | Rate Per in Rs. | Total Amt. In Rs. | Rate Per in Rs. | Total Amt. In Rs. | Model | Rate Per in Rs. | Total Amt. In Rs. |
| Model No. JOC 42 1(A) | 2300.00 | 115000.00 | Dura Com Make DC-21A or 22A | 2325.00 | 116250.00 | 2700.00 | 135000.00 | KB-523 | 3937.50 | 196875.00 |
| Rate after Negotiation | | | | | | | | | | |
| Absent | | | | 2300.00 | 115000.00 | 2600.00 | 130000.00 | Not as per our Specifications | | |

**निर्णय क्र.३६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त खुर्चीचा नमुना समक्ष व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेऊन निर्णय घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

**विषय नं.१३ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे वार्षिक छपाईकामी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी लागणाऱ्या आवश्यक जनरल व संगणक कार्यालयीन छपाई साहित्याबाबत मा.व्यवस्थापन समिती सभा दि. १०.०१.२०१० रोजीचे मंजूर टिपणी अन्वये निविदा मागविणेस मान्यता मिळाली होती.

त्यानुसार सदरचे छपाईकामी लोकमत- मुंबई, गांवकरी- नाशिक, सामना- पुणे या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील जाहिरात टाकण्यात आली होती. त्यानुसार संस्थानचे शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात दि.११.०२.२०१० ते २३.०२.२०१० पर्यंत निविदा विक्री ठेवण्यात आली होती तर निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख २५.०२.२०१० ठेवण्यात आली होती.

संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात एकूण १० निविदांची विक्री झाली होती व त्यापैकी ७ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. तर मुंबई येथील कार्यालयात एकच निविदा विक्री झाली असून एकच निविदा प्राप्त झालेली आहे. अशा दोन्ही ठिकाणी मिळून ८ निविदा प्राप्त झालेल्या असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

१) प्रवरा ऑफसेट, लोणी (२ बंद निविदा प्राप्त दि.२५.०२.२०१०)
२) मयुर ऑफसेट, श्रीरामपूर (२ बंद निविदा प्राप्त दि.२२.०२.२०१०)
३) अविराज पॅकवेल, कोपरगांव (२ बंद निविदा प्राप्त दि.२२.०२.२०१०)
४) गणेश ग्राफीक्स ॲण्ड डीटीपी सेंटर, कोपरगांव (बंद निविदा प्राप्त दि.२५.०२.२०१०)

५) रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद (२ बंद निविदा प्राप्त दि.२५.०२.२०१०)
६) क्वालिटी प्रिंटर्स, नाशिक (बंद निविदा प्राप्त दि.२५.०२.२०१०)
७) कृष्णा एंटरप्रायजेस, अहमदाबाद (बंद निविदा प्राप्त दि.२४.०२.२०१०)
८) गणेश प्रिंटर्स, मुंबई (बंद निविदा प्राप्त दि.२५.०२.२०१०)

उपरोक्त प्रमाणे ८ बंद निविदा हया मा. उपसमिती सभा दि. ११.०३.२०१० रोजीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या होत्या . सदर निविदांचा मुळ तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असून तो आजचे सभेत सादर करण्यात आला आहे.

सदरहू निविदा धारकांना आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी समक्ष बोलावण्यात आलेले असून सदर निविदाधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३६८ **उपरोक्त उपस्थित सर्व कोटेशनसादरकर्त्यांना सभेपुढे समक्ष बोलविण्यात येऊन, त्यांनी देऊ केलेल्या दरात ते आणखी किती सूट देणार याबाबत त्यांना लेखी बंद पाकिटात दर देणेबाबत सांगण्यात आले.**

**त्यांनी देऊ केलेल्या सूटीचे दराचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन, निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१४ गुंतवणूकीबाबत निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** माहे एप्रिल,२०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ९/०४/२०१० | १०,९०,९४,६८३.०० |
| ०२. | बँक ऑफ बरोडा, नासिक | १०/०४/२०१० | ३,०१,५१,२३३.०० |
| ०३. | आंध्र बँक, शिर्डी | १३/०४/२०१० | ६,५६,०६,३२६.०० |
| ०४. | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | १५/०४/२०१० | ४,३४,४६,०४७.०० |
| ०५. | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | २०/०४/२०१० | १,२५,००,०००.०० |
| ०६. | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | २१/०४/२०१० | ७५,००,०००.०० |
| ०७. | बँक ऑफ बरोडा, नासिक | २२/०४/२०१० | ५,३०,३०,६०७.०० |
| ०८. | बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २३/०४/२०१० | १,००,५०,४११.०० |
| ०९. | विजया बँक, शिर्डी | ३०/०४/२०१० | ३,०१,७०,१३७.०० |
| १०. | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | ३०/०४/२०१० | २,५०,००,०००.०० |
| ११. | दैनंदिन खर्च वजा जाता माहे एप्रिल २०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ७,००,००,०००.०० |
| | | एकूण रक्कम - | ४५,६५,४९,४४४०० |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. ४५.६५ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

०१) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी ०२) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०३) आंध्र बँक, शिर्डी ०४) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०५) बँक ऑफ बरोडा, कोपरगांव ०६) बँक ऑफ बरोडा, नासिक
०७) बॅक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी ०८) विजया बँक, शिर्डी
०९) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी १०) बँक ऑफ इंडीया, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते १० या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.४५.६५ कोटींची टप्प्या-टप्याने गुंतवणूक करण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.३६९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, बाहय वळण रस्त्यासाठी रकक्म दयावी लागणार असल्याने ती रक्कम त्वरीत उपलब्ध व्हावी म्हणून ४६ दिवसांसाठी गुंतवणूक करण्यात येत होती. तथापी, बाहय वळण रस्त्यासाठी दयाव्या लागणाऱ्या रकमेस अद्याप शासनाकडून मान्यता प्राप्त झालेली नाही, भविष्यात मान्यता प्राप्त झाल्यास दर महिण्यास उपलब्ध होणाऱ्या रकमेतून त्याची आदायगी करता येईल. सबब यापुढे गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम जादा व्याजदर मिळत असल्यामुळे दिर्घ मुदतीसाठी गुंतविण्यात यावी. त्यामुळे उपरोक्त उपलब्ध होणारी रक्कम**

**नेहमीप्रमाणे सेवा देणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकाकडून व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकांकडे टप्प्या-टप्प्याने गुंतविण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१५ आयकर अधिनियम ३५ एसी अंतर्गत प्रस्ताव सादर करणे बाबत.**

**प्रस्ताव-** अभय शास्त्री ॲण्ड असोशिएटस्, चार्टर्ड अकौटंन्ट, पुणे यांनी संस्थानला आयकर अधिनियम ३५एसी अंतर्गत देणगीदारांना आयकरामधून १०० टक्के सुट मिळण्यासाठी विविध प्रस्ताव केद्र शासनाला सादर करुन ते मान्य करुन घेता येईल, असे नमूद केले आहे. त्यांनी सूचविलेले प्रस्ताव खालीलप्रमाणे आहेत

(१) शाळा/महाविद्यालय (School/College)
(२) रुग्णालय (Hospital)
(३) व्यावसायीक मार्गदर्शन केद्र (Vocational Guidance Center)
(४) रस्ते (Roads)
(५) जनतेस चांगली सेवा सुविधा (Public Amenities)

वरील प्रस्ताव बांधकाम अथवा असलेल्या बांधकामामध्ये वाढीव सुविधा मंजूर होणेसाठी मा. नॅशनल कमिटी, दिल्ली यांचेसमोर सादर करुन आयकर अधिनियम ३५एसी अंतर्गत त्यास १०० टक्के आयकर सवलतीसाठी मान्यता घ्यावी लागेल.

सदर प्रस्ताव अभय शास्त्री ॲण्ड असोशिएटस्, पुणे हे तयार करुन ते केद्र सरकारला सादर करुन त्यास मान्यता मिळवून आणणार आहेत. त्यासाठी त्यांनी या कामाची एकंदरीत संपूर्ण फी रुपये ३,५०,०००/- ची मागणी केलेली आहे. सदर फी त्यांनी पुढीलप्रमाणे हप्त्यात मागीतली आहे.

(१) कामाचा आदेश स्विकारतांना रुपये ५०,०००/-
(२) प्रस्ताव पूर्ण करुन तो मा. नॅशनल कमिटीला सादर केल्यानंतर रुपये ५०,०००/-
(३) प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर रुपये २,५०,०००/-

अभय शास्त्री ॲण्ड असोशिएटस्, पुणे यांना सदर प्रस्ताव बनवून तो नॅशनल कमिटी, दिल्ली यांचेकडून मंजूर करुन आणून, त्या संबंधीचे पूढील संपूर्ण कार्यवाही उदा. वार्षिक विवरण पत्रे तयार करुन ते सादर करणे, प्रस्तावाचा पाठपुरावा करणे, देणगी संदर्भातील अडचणींचे निराकरण करणे, त्यासंबंधात आलेले विशेष लेखापरिक्षण नियमाप्रमाणे करुन घेणे इत्यादी कामाचाही उपरोक्त फीमध्ये सामाविष्ट राहील.

वरील प्रस्ताव अभय शास्त्री ॲण्ड असोशिएटस्, पुणे यांना बनविण्यासाठी बांधकाम विभाग संपूर्ण मदत करेल. प्रस्ताव सादर केल्यानंतर ते नॅशनल कमिटीला सादर करण्याचे काम अभय शास्त्री ॲण्ड असोशिएटस्, पुणे हे करतील. प्रस्ताव मंजूर करुन आणल्यानंतर त्या अंतर्गत देणगी स्विकारणेचे काम लेखाशाखे अंतर्गत करण्यात येईल. स्विकारलेली देणगी व त्यावरील खर्च यांचे वार्षिक विवरण पत्र तयार करुन मुदतीत नॅशनल कमिटी, दिल्ली यांना सादर करण्याचे काम अभय शास्त्री ॲण्ड असोशिएटस्, पुणे हे करतील.

तरी उपरोक्त प्रस्तावाबाबत श्री अभय शास्त्री, पुणे यांना मा. व्यवस्थापन समितीसमोर समक्ष चर्चेसाठी बोलावून योग्य ते निर्णय घेण्यास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.३७० सदरहू विषयावर चर्चा हाऊन, प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१६ दिनांक ०१ जानेवारी २००९ रोजी झालेल्या प्रमाणित हिरे जवाहरांच्या लिलावाबाबत.**

**निर्णय क्र.३७१ विषयावर चर्चा होऊन, सदरहू प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१७ भक्ताचे निवासी खोल्यांसाठी सुरु करण्यात आलेल्या विशेष स्वरुपाच्या देणगी योजनेबाबत.**

**प्रस्ताव-** भक्ताचे निवासी खोल्यांसाठी विशेष स्वरुपाची देणगी योजना सुरु करण्यात आली होती. या योजनेसाठी देणगी स्वीकारतांना एका भक्ताकडून रु.४ लाख अथवा प्रत्येक भक्तांकडून प्रत्येकी १ लाखाचे पटीत भक्तनिवासस्थान इमारतीचे (व्दारावती) बांधकामासाठी देणगी स्विकारण्यात यावी, असे ठरले होते.

या योजनेअंतर्गत देणगी देणाऱ्या साईभक्तांच्या नावांच्या नेमप्लेटस् (Name Plate) खोल्यांना लावण्यात येतील, व अशा देणगीदार भक्तांना वर्षातून ०२ वेळेस, प्रत्येक वेळेस ०३ दिवस विनामूल्य निवासाची सोय संस्थानमार्फत उपलब्ध करुन दिली जाईल असा निर्णय झालेला आहे.

त्याअनुषंगाने, उपरोक्त भक्तनिवास इमारतीचे काम पूर्ण झाले असून, देणगीदार भक्तांच्या नावाच्या नेमप्लेटस् खोल्यांना लावण्याऐवजी भक्ताच्या नावांची यादी बांधकाम विभागामार्फत व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये लावण्यात आलेली असून, संबंधीत देणगीदार भक्तांना याबाबत कळविणे व ठरल्याप्रमाणे त्यांना सुविधा सुरुकरणे गरजेचे आहे.

तथापि, सदर योजनेअंतर्गत देणगी देतांना भक्तांनी सारखी रक्कम दिलेली नसून रु१ लाख ते रु४ लाख अशी वेगवेगळी दिलेली आहे. मा.अध्यक्ष साहेब यांनी निवासाबाबत सर्व देणगीदार भक्तांना सारखीच सुविधा न देता त्यांच्या देणगी रकमेनुसार सुविधा देण्यात यावी, असे सुचित केलेले आहे.

देणगी रकमेनुसार निवासाबाबत द्यावयाच्या सुविधांचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | देणगी रक्कम | निवास व्यवस्था सुविधा (एका वेळेस कमीत कमी ०१ दिवस व जास्तीत जास्त ०३ दिवस) |
|---|---|---|
| ०१ | रु.१,००,०००/- पर्यत | ०६ दिवस |
| ०२ | रु.१,००,००१/- ते रु.२,००,०००/- पर्यत | ०७ दिवस |
| ०३ | रु.२,००,००१/- ते रु.३,००,०००/- पर्यत | ०८ दिवस |
| ०४ | रु.३,००,००१/- ते रु.४,००,०००/- पर्यत | ०९ दिवस |
| ०५ | रु.४,००,००१/- व त्या पुढील | १० दिवस |

तसेच विनामूल्य निवासाची सोय देणेबाबतचा कालावधी हा तहयात न ठेवता तो मर्यादित (साधारणतः १५ वर्षापर्यंत मर्यादित) असावा. या योजनेअंतर्गत देणगी देणाऱ्या भक्तांना ठरलेप्रमाणे सुविधा देणे सहज सोईस्कर होणेसाठी, यादीतील देणगीदार सर्व भक्तांना भक्तनिवास प्रोजेक्ट कार्ड (Bhaktaniwas Project Card) देणे योग्य होईल, असे नम्र मत आहे. भक्त निवास प्रोजेक्ट कार्डचा नमुना सोबत अवलोकनार्थ ठेवण्यात आला आहे.

तरी उपरोक्त योजनेअंतर्गत देणगी देणाऱ्या भक्तांना, देण्यात येणारी विनामूल्य निवासाची सोय ही सर्वाना सारखी असावी कि रकमेनुसार असावी, सदर सुविधेचा कालावधी हा किती वर्षापर्यत मर्यादित असावा, तसेच भक्तनिवास प्रोजेक्ट कार्ड देणेबाबत सविस्तर निर्णय होणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.३७२ यावर सविस्तर चर्चा होऊन, निवासी खोल्यांसाठी विशेष स्वरुपाच्या देणगी देणाऱ्या भक्तांना देण्यात येणाऱ्या विनामूल्य निवासाची प्रति आर्थिक वर्षात सुविधा (एप्रिल ते मार्च अखेर) खालीलप्रमाणे असावी असे ठरले.**

| **अ.नं.** | **देणगी रक्कम** | **निवास व्यवस्था सुविधा (एका वेळेस कमीत कमी ०१ दिवस व जास्तीत जास्त ०३ दिवस)** |
|---|---|---|
| **०१** | **रु.१,००,०००/- पर्यत** | **१० दिवस** |
| **०२** | **रु.१,००,००१/- ते रु.२,००,०००/- पर्यत** | **१५ दिवस** |
| **०३** | **रु.२,००,००१/- ते रु.३,००,०००/- पर्यत** | **२० दिवस** |
| **०४** | **रु.३,००,००१/- ते रु.४,००,०००/- पर्यत** | **२५ दिवस** |
| **०५** | **रु.४,००,००१/- व त्या पुढील** | **३० दिवस** |

**तसेच मा.अध्यक्ष व मा.विश्वस्तांकडून नियमावली मंजूर करुन घेऊन पुढील कार्यवाही करावी, असें ठरलें.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी/बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१८ संस्थानचे श्री साईप्रसादालय येथील विविध कामे करणे,दुरुस्ती व इतर अनुषंगिक बदल करणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. कार्यकारी अधिकारी सोा., यांनी दि. २०/१२/२००९ रोजीचे श्री साईप्रसादालय येथे पाहणी करुन विविध कामे तसेच अनुषंगीक बदल करणेकामी दिलेल्या सूचनेनुसार अधिक्षक प्रसादालय विभाग यांनी दि. २४/१२/२००९ रोजीचे पत्रान्वये विविध कामे करुन मिळणेबाबत कळविले आहे. पैकी

०१. प्रसादालय इमारतीचे कंम्पाउंड भिंतीची उंची वाढविणे

०२. रिकामे तेल व तुपाचे डबे, बारदान पुठ्ठा इत्यादी मटेरीअल साठविणेकामी शेड तयार करणे.

०३. पाण्याचे टाकीजवळील रिकाम्या जागेवर ब्लॉक बसविणे

**०१)** श्री साई प्रसादालय इमारतीचे भोवताली असलेल्या कम्पाऊंड भिंतींची उंची कमी असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने कंम्पाऊंड भिंतीची उंची वाढविणे आवश्यक असल्याचे कळविले.

श्री साईप्रसादलय इमारतीचे लगतचे प्लॉट मातीचा भरावामुळे जमिनीची उंची वाढलेली असल्याने सध्याची भिंतीची उंची कमी पडत आहे. याकरीता चेनलींक फेन्सीग मध्ये भिंतीचे कमी उंची असलेल्या भागात एकूण ५१० मी लांबीचे कम्पाउंड भिंतीचे उंची वाढविणेकामी अंदाजे रुपये ४,११,३००/-मात्र खर्च अपेक्षीत आहे.

**०२)** प्रसादालय येथील रिकामे तेल तुपाचे डबे, बारदान इत्यादी मटेरीअल साठविणेकामी शेड तयार करणे-

प्रसादालयाचे तेल व तुपाचे रिकामे डब्बेपासून दरमहा रुपये १,२५,०००/- पर्यंत रक्कम जमा होते. त्यानुसार वार्षीक रुपये १५ लक्ष रुपये रिकामे डब्यापासून जमा होतात. करीता रिकामे डबे व बारदान इत्यादी वस्तु साठविणेकामी ५०x४० या साईजमध्ये पत्रा शेड (जमिनीपासून ७ फुटाचे बांधकाम व वरील बाजूस ग्रील अशा प्रकारे ) उभारुन मिळणेबाबत कळविले आहे.

याबाबत प्रसादालयाचे मेन्टेनन्स ब्लॉक व पार्किंग शेडचे मधील मोकळ्या जागेत १८mx७.५m या साईजमध्ये शेड उभारण्यात येईल. सदर शेडचे बांधकामासाठी कॉलम फुटींग, ग्राउंड बिम, प्लींथ लेव्हलपर्यंत कॉलम व प्लींथ लेव्हलपासून ७ फुट उंचीचे बांधकाम करुन स्ट्रक्चॅर स्टील व टाटा ब्लु स्कोपचे पत्र्याचे शेड उभारता येईल. याकामी अंदाजे रुपये ४,७१,०२२/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

**०३)** श्री साईप्रसादालय इमारतीचे पूर्व बाजुकडील भूमीगत पाण्याचे टाकीजवळील अंतर्गत रस्ता व कम्पांउड भिंतीचे रिकामी जागा असून त्याठिकाणी माती असल्यामुळे पावसाळ्यात गवत उगवते त्यामुळे स्वच्छता राखता येत नाही. करीता सदर ठिकाणी व जनरेटर रुमचे पूर्व बाजूकडील मोकळ्या जागेत कॉंक्रीट ब्लॉक बसवून मिळणेबाबत कळविले आहे.

याबाबत सदरचे मोकळ्या जागेतील काळी माती खोदून मुरुम भराई, सोलींग पी.सी.सी. करुन M-१० ग्रेडचे ६० एम एम जाडीचे कॉंक्रीट ब्लॉक बसविता येईल याकामी अंदाजे रुपये ३,२४,२८४/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्त तीन कामाकरीता येणारे एकूण रुपये १२,०६,५७०/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून काम पूर्ण करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३७३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त तीन कामाकरीता येणारे एकूण रुपये १२,०६,५७०/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून काम पूर्ण करुन घेणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९ राहाता ते नांदुर्खी रस्ता (प्रजिमा-५) कि.मी.-३८/००० ते ४२/४०० चे रुंदीकरणासह मजबुतीकरण व डांबरीकरण करणे,पुलाचे बांधकाम व विद्युतीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अ) मा.ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री, परिवहन व बंदरे आणि अतिरिक्त कार्यभार विधी व न्याय, महाराष्ट्र शासन (कॅम्प लोणी बुद्रुक, तालुका राहाता) यांनी मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना अग्रेषित केलेल्या त्यांचेकडील पत्र क्रमांक प.व बं./वि.न्या./ मंत्री/ टिप्पणी/ व्ही.आय.पी./७८६ दि. १८/०२/२०१० अन्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

"...... नांदुर्खी ता. राहाता या गावाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना ४२ एकर जागा उपलब्ध करुन देण्याचा ठराव ग्रामपंचायतने करुन दिलेला आहे. त्या ठिकाणी संस्थानमार्फत अद्यावत हॉस्पिटल, तालुका क्रिडा संकुल इ. सुविधा उपलब्ध करुन देणार आहेत. यामुळे राहाता व शिर्डी येथून नागरीकांची वर्दळ वाढणार असून सध्या असलेला रस्ता अत्यंत अरुंद आहे.

तरी राहाता - नांदुर्खी रस्त्यांची रुंदी वाढविणे, साकुरी पाटावर पुल बांधणे तसेच सदर रस्त्याला विद्युतीकरण करणे अत्यंत गरजेचे असून तशा प्रकारचा प्रस्ताव आपणामार्फत त्वरीत सादर करावा".

ब) उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेप्रमाणे, राहाता तालुक्यातील राहाता ते नांदुर्खी या रस्त्याचे रुंदीकरणांसह मजबुतीकरण व डांबरीकरण करणेसाठी तसेच या रस्त्यास आवश्यक त्याठिकाणी पुलांचे बांधकाम करणे, रस्त्याचे विद्युतीकरण करणे यासाठी अंदाजित किती खर्च येईल याबाबत बांधकाम अंदाजपत्रक व रस्त्याचे बांधकामाचे प्राथमिक आराखडे इकडील विभागास मिळणेकामी मा. कार्यकारी अभियंता, यांना इकडील जा.नं. एसएसएस/बांधकाम/४३६३/२०१० अन्वये त्यांचेकडून मिळणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी सदर कामांचे अंदाजपत्रक सादर केले आहे. त्याचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं. | कामाचे नांव | कामाचा प्रस्तावित वाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | राहाता ते नांदुर्खी रस्ता (प्रजिमा-५) कि.मी. ३८/००० ते ४२/४०० चे रुंदीकरणासह मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, पुलांचे बांधकाम व विद्युतीकरण करणे ता. राहाता जि. अहमदनगर | -४-४० किमी लांबीचे ३.७५ मी. चे ७.०० मी साठी रुंदीकरण व डांबरीकरण करणे<br>- किमी ३९/३०० मध्ये साकुरी पाटावर लहान पुल बांधणे.<br>-रस्त्याचे कडेने पथदिवे बसविणे | रु. २७२.४० लक्ष |

वरिल तपशिलाप्रमाणे सदरहू रस्ता व त्या अनुषंगीक इतर सुविधा करणेसाठी रक्कम रुपये २७२.४० लक्ष मात्र खर्च येईल. संस्थानचे अधिनियमातील तरतुदी नुसार सदरहू खर्चाचे मान्यतेसाठी शासनाकडे मा. व्यवस्थापन समितीचे तत्वतः मान्यतेनंतर प्रस्ताव सादर करता येईल. तसेच शासनाचे मान्यतेनंतर सदरहू निधी सार्वजनीक बांधकाम विभाग यांचेकडे कामाचे प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने वर्ग करता येईल.

**निर्णय क्र.३७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, राहाता ते नांदुर्खी रस्ता (प्रजिमा-५) कि.मी.-३८/००० ते ४२/४०० चे रुंदीकरणासह मजबुतीकरण व डांबरीकरण करणे,पुलाचे बांधकाम व विद्युतीकरण इत्यादी कामे विमान प्राधीकरण करणार असेल तर सदरहू कामे संस्थानमार्फत करण्यात येऊ नयेत. याकामी संबंधिताशी चर्चा करावी असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२० भक्तनिवास, जुने साईप्रसाद, साईनगर, गट.नं.८७/८८ मधील पर्किंग, हेलिपॅड परिसरातील पार्किंग व अंतर्गत रस्त्याचे पृष्ठभागाचे डांबरीकरण करणे तसेच साईप्रसादालयाकडे जाणारे रस्त्याचे डांबरीकरणे करणे.**

**प्रस्ताव-** संस्थानचे नविन भक्तनिवास, साईनगर व जुनेप्रसादालय येथील परिसरात साईभक्तांचे वाहन उभे करणेकरीता वाहनतळ उभारण्यात आलेले आहे. तसेच सदर वाहनतळास जोडणारे रस्ते व अंतर्गत रस्ते डांबरीकरणात तयार करण्यात आलेले आहे. श्री साई प्रसादालयात प्रसाद भोजन घेणेसाठी येणारा भक्त हा बहुतेक वाहनातुन अथवा संस्थान वाहनातून येणारा आहे. श्री साईप्रसादालय येथे येणारे वाहनासाठी संस्थान मालकीचे नजीकचे गट नं. ८७,८८ मध्ये एक हेक्टर क्षेत्रात वाहन तळाचे खडीकरण करण्यात आलेले आहे. सदरहू भागातील रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम करणे आवश्यक आहे.

नगर-मनमाड रस्ता ते प्रसादालयाकडे जाणारा गट नं. ८७,८८ मधील विज उपकेंद्रपर्यंतचा ४०० मी लांबीच्या शिव रस्त्यापैकी ३०० मी. लांबीच्या व ६ मी. रुंदीच्या रस्त्याचे डांबरीकरण यापूर्वी करण्यात आलेले आहे. सदर रस्त्याचे लगत दक्षिणबाजुकडे खाजगी वाहनतळ सुरु असल्याने सदरचे एकमेव रस्त्यावर वाहनाची गर्दी होते व साईभक्तांना प्रसाद भोजन घेणेकरीता वर्दळ वाढल्यामुळे ये-जा करणेस अडचणी येतात म्हणून सदर रस्त्याचे रुंदीकरण करावे लागणार आहे. याकरीता सदर रस्त्यांची रुंदी १० मी अशी करावी लागणार आहे. याकामी परिसरानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ. नं. | कामाचे ठिकाण | रस्त्याची लांबी | रस्त्याची रुंदी | कामाचा प्रकार | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईनगर परिसर<br>०१. रस्ता | १३५ मिटर | १०.०० मिटर | मुरुम फिलींग, जी. एस. बी., बी. बी. एम., व एस. डी. सी. डांबरीकरणाचे एक थराचे काम | २१,४२,६०५.०० |
| | ०२. पार्किंग शेडमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणे | २५ मिटर<br>७० मिटर | ५ मिटर<br>५ मिटर | सोलिंग, पी. सी. सी. व ८० एम. एम. जाडीचे पेव्हिंग ब्लॉक | |
| ०२ | साईबाबा भक्तनिवासस्थान<br>१. दक्षिणेकडील पार्किंग | १४६ मिटर | १६.८० मिटर | एस. डी. बी. सी. २५ एम.एम. जाडीचे डांबरीकरणांचा एक थर करणे. | २२,६२,४४९.०० |
| | २. पश्चिमेकडील पार्किंग | ६६ मिटर | २४.५० मिटर | | |
| | ३. नगर-मनमाड रोड पासून ते नगरपंचायत इ. एस. आर. पर्यंतचा | ५०२ मिटर | ७.०० मिटर | | |
| | ४. अंतर्गत रस्ते | ५०० मिटर | ५.५० मिटर | | |
| ०३ | जुने प्रसादालय<br>१. पार्किंग परिसर | ५५२२ चौ. मी. | | एस. डी. बी. सी. २५ एम.एम. जाडीचे डांबरीकरणांचा एक थर करणे. | ११,५०,९५७.०० |
| ०४ | हेलीपॅड<br>१. हेलिपॅडकडे जाणारा रस्ता | ५० मिटर | ३५ मिटर | एस. डी. बी. सी. २५ एम.एम. जाडीचे डांबरीकरणांचा एक थर करणे. | ५,०९,८४१.०० |
| | २. हेलिपॅड | १०१.५०<br>१५.७० | ५.५०<br>९.०० | | |
| ०५ | श्री साईप्रसादालयाकडे जाणारा रस्ता व पार्किंग<br>१. नगर-मनमाड रस्त्यापासून ते विज उपकेंद्रापर्यंत जाणारा रस्ता (शिव रस्ता) | ४०० मिटर | ०६ मिटर रस्ता व दोन्ही बाजूने २ मी. फुटपाथ | सध्याचे रुंदीत SDBC-२५ व वाढीव रुंदीत m-३५ Paving Block ८०mm thick | २८,३६,७७४.०० |
| | २. विज उपकेंद्र ते सैनिक आरामगृह पर्यंतचा रस्ता | ५१० मिटर | ६.०० मिटर | मजबुतीकरणांसह डांबरीकरण-BBM ७५ m, SDBC-२५mm | १०,५५,५९९.०० |
| | | | | एकुण अपेक्षित खर्च रुपये.. | **९९,५८,२२५.००** |

उपरोक्तप्रमाणे संस्थानचे विविध ठिकाणच्या पार्किंगचे व रस्त्याचे डांबरीकरण करणेकामी अंदाजे रु.९९,५८,२२५.००मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी सदरचे डांबरीकरण करणेकामी येणारे रु.९९,५८,२२५.०० मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस व याकामी आर्किटेक्ट पॅनलवरील आर्किटेक्ट यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन निविदा मागविणेस मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३७५ यावर सविस्तर चर्चा हाऊन, वरीलपैकी साईनगर येथील पार्किंग शेडमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेऐवजी तेथील ए टाईप अधिकारी निवासस्थानालगत पेव्हींग ब्लॉक बसविणेत यावेत.**

**यासह वरीलप्रमाणे पार्किंग व रस्त्यांची कामे करणेसाठी येणारे सर्वसमावेशक खर्चास तसेच याकामी युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि.,पुणे यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन निविदा मागविणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१ शिरडी शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेतील ६ रस्ते संस्थानमार्फत विकसित करणे कामाचे सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट, प्रा.लि.,पुणे यांची फी ठरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०/०१/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६अन्वये. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडून प्रथम प्राधान्य गटातील त्वरीत उपलब्ध होणारे व त्यांनी निविदा सूचना प्रसिद्ध केलेले ०५ रस्ते विकसीत करुन घेणेत यावेत, याकामी तूर्त त्यांचेकडेस रक्कम रु. १० ोटी मात्र दोन-तीन टप्प्यात वर्ग करण्यात यावेत. तसेच उर्वरित ०६ रस्ते थेट संस्थानमार्फत विकसित करणेकामी येथोचित कार्यवाही करणेत यावी असे ठरले आहे. याकामी शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पासाठी म.रा.र. वि. महामंडळामार्फत नेमणेत आलेले प्रकल्प व तांत्रिक सल्लागार मे. युनिसन प्रोजेक्टस् ॲण्ड कन्सल्टंटस् , पुणे यांनाच संस्थानमार्फत प्रकल्प सल्लागार म्हणून नेमून त्यांचेकडून संस्थानमार्फत थेट विकसीत करावयाच्या रस्त्यांचे आराखडे व अंदाजपत्रक अद्ययावत करुन घेता येईल. तद्नंतर विहीत पद्धतीने निविदा मागवून कार्यवाही करता येईल, असे प्रस्तावित करण्यात आले होते. याप्रमाणे थेट संस्थानतर्फे विकसीत करावयाचे सहा रस्ते खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | रस्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | नांदुर्खी रस्ता (२०० रुम ते नांदुर्खी शिव रस्ता) रुंदीकरण व डांबरीकरण करणे. |
| ०२ | विकास योजनेतील १८ मी. रुंदीचा रस्ता (आरक्षण क्रं.३१ चा दक्षिण-पश्चिम कोपरा ते नाला क्रं. ३४ पर्यंत) यांना जोडणारा १३८० मी. लांबीचा रस्ता (या रिंग रस्त्याची एकत्रीत वाढीव लांबी १.९० कि.मी. या प्राधान्य गटात समाविष्ठ करण्यात आलेली आहे.) |
| ०३ | विकास योजनेतील १५ मी. रुंदीचा (नविन पिंपळवाडी रस्ता ते १८ मी. रिंग रस्त्यापर्यंत आरक्षण क्रं. ३१ पोहोच) ६०० मी. लांबीचा रस्ता. |
| ०४ | विकास योजनेतील २४ मी. वळणरस्ता (नगर-मनमाड रस्ता ते साईश्रद्धा हौसिंग सोसायटीचा रस्ता) यांना जोडणारा ४५० मी. लांबीचा रस्ता. |
| ०५ | विकास योजनेतील १८ मी. रुंदीचा हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील दक्षिणोत्तर ( पिंपळवाडी रस्ता-निमगांव शिव रस्ता) ४५० मी. लांबीचा रस्ता. |
| ०६ | विकास योजनेतील १८ मी. रुंदीचा रस्ता (नगर मनमाड रस्ता ते १८ मी. रिंग रस्ता पर्यंत) ८०० मी. लांबीचा पुर्व-पश्चिम रस्ता. |

याबाबत युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे यांचेशी चर्चा करुन रस्त्यांची सद्यस्थितीत पहाणी करणेबाबत व त्यानुसार अंदाजपत्रके व नकाशे अद्ययावत करणेबाबत त्यांना विनंती करण्यात आली. त्यानुसार मे. युनिसन यांचेकडील श्री. एम.एस. किरनाली, डायरेक्टर-प्रोजेक्टस् यांनी दि.१८/०३/२०१० रोजी संस्थानमार्फत विकसीत करावयाच्या सहा रस्त्यांची पहाणी केली आहे व त्यांचेकडील दि.३०/०३/२०१० व दि.०१/०४/२०१० चे पत्रांव्दारे सदरहू प्रकल्पासाठी Pre- tender आणि Post- tender भागाकरीता सेवा पुरविणेकरिता SCOPE, PROFESSIONL FEES, TERMS OF PAYMENT इ. बाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. त्याचा संक्षिप्त तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Description | Fees |
|---|---|---|
| I | Pre Tender activities : | |
| 1 | Review of detailing covered under IRDP shirdi package-1, Section-A & B excluding roads tanken up by MSRDC for implementation i.e. Road nos.1,2,4,10 and 11. Road nos. as defined in IRDP Shirdi Map | 0.60% of cost put to tender + service tax at prevailing rate |
| 2 | Updating cost estimates to current Schedule of Rates available. | |
| 3 | Preparation of bid document comprising<br>• IFB/ITB/Qualification of bidders<br>• General conditions of contract/ Special conditions of Contract<br>• Specifications / bid drawings<br>• Furnishing 10 sets of hard copies of bid document + A Soft copy on CD<br>• Any other details for completeness of bid doucment | |
| 4 | Evaluation of bids: Analysis and evaluation bids received, recommendation for acceptance of bid. | |
| 5 | Assistance in placing work order on selected bidder | |
| II | Post tender services | 2.5% of cost of work put to tender + service tax at prevailing rate |
| 1 | Site Supervision | |
| 2 | Quality Control | |
| 3 | Bill Checking & recommandation for R.A. Bill payment | |

तरी उपरोक्त ०६ रस्ते थेट संस्थानतर्फे विकसीत करणेसाठी युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेबाबत व त्यांचेशी चर्चा / वाटाघाटी करुन फी निश्चित करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३७६** **आजचे सभेपुढे युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे हे उपस्थित होते. त्यांचेशी चर्चा/वाटाघाटी केल्या असता त्यांनी २.५% फी मान्य केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे यांना उपरोक्त ०६ रस्ते थेट संस्थानतर्फे विकसित करणेकामी सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात येऊन त्यांना याकामी २.५% फी अधिक प्रचलित दराने सर्व्हीस टॅक्स देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२२** **शिरडी विकास योजना आरक्षण क्र.१० करिता असलेल्या दुकान केंद्र व त्यामधिल १२ मीटर रुंद विकास योजना रस्ता, समुचित प्राधिकरण शिरडी नगरपंचायत, या विद्यमान तरतूदीमध्ये फेरबदल करण्याचे प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी शहराची विकास योजना संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश क्रमांक डिपी/ शिर्डी/ टिपीव्ही-४/७३३४, दिनांक १५/१२/१९९२ अन्वये मंजूर झाली असून दि.२५/०२/१९९३ पासून अंमलात आली आहे. सदर योजनेच्या प्रस्तावानुसार आ.क्र.९ व १० "बगीचा" साठी प्रस्तावीत करण्यात आलेले होते. तसेच आ.क्र.९ व १० मधून उत्तर दक्षिण १२.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणेत आलेला होता.

तद्नंतर महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, अधिसुचना क्रमांक टिपीएस-१६०१/१९२०/प्र.क्र.१२७/२००३/नवि-९, दिनांक २४ ऑगस्ट २००४ अन्वये आ.क्र.१० बगीचा हे आरक्षण व त्यालगतचा १२.०० मी. रुंद रस्ता वगळून सदर आरक्षणाच्या मध्ये १२.०० मी. रुंद रस्ता दर्शवून या रस्त्याच्या दोन्ही बाजूस पट्टीच्या स्वरुपात टपरी दुकानदारांचे पुनर्वसनाकरीता आ.क्र.१० "दुकान केंद्र" हे नविन आरक्षण दर्शवून या आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण शिर्डी नगरपंचायत दर्शविण्यात आले आहे. तसेच प्रस्तुतचे अधिसुचनेअन्वये आ.क्र.९ बगीचा हे आरक्षण वगळूनन त्या खालिल क्षेत्रावर दुकानकेंद्र, ऑडीटोरिअम, दर्शन रांग व काही क्षेत्रावर बगीचा असा वापर प्रस्तावित करुन यासाठी समुचित प्राधिकरण शिर्डी नगरपंचायत दर्शविणेत आले आहे.

शिर्डी नगरपंचयत सर्वसाधारण सभा दि.२१/०६/२००६ मधिल ठराव क्र.२१ नुसार आ.क्र.१० मधिल १६ आर जागा (१२.०० मीटर दक्षिणोत्तर विकास योजना रस्त्याचे क्षेत्र धरुन) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कंपाउडलगत देण्याचे ठरले होते. त्यासाठी शिर्डी नगरपंचायत यांचेकडून खालिल अटी व शर्ती घालणेत आल्या होत्या.

१. श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांना १६ आर जागेत दुकान केंद्राचे बांधकाम करु नये.

२. श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांनी सदर जागेचा वापर सार्वजनीक वापरासाठी करावा.

३. श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांनी विकास योजनेतील पालखी रस्ता ते मंदीर गेट पर्यंतचा १२ मीटर रुंदीचा वहीवाटीचा रस्ता १२ मीटर रुंदीचाच ठेवणेत यावा. भविष्यात सदर रस्ता कमी करणे अथवा वगळणेबाबत कार्यवाही करु नये.

४. श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी दर्शन रांगेचा वापर हा कायमस्वरुपी नगरपंचायतीच्या आ.क्र.९ मधून करणेत यावा. तसेच यासाठी दर्शन रांगेची व्यवस्था व भक्तांचे सुरक्षिततेकरीता उपाययोजना करावी.

५. श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी आ.क्र.१० च्या पुर्व बाजुच्या हद्दीवरुन पिंपळवाडी रस्ता ते विकास योजनेच्या १२ मीटर रुंदीच्या पूर्व-पश्चिम रस्त्यापर्यंत ४.०० मीटर रुंदीचा रस्ता सार्वजनीक वापरासाठी ठेवणेत यावा. तसेच नगरपंचायतीने त्यालगत आरक्षण क्र.९ करीता सामासीक अंतर नियमानुसार कायमस्वरुपी खुले ठेवावे व त्याचा वापर सार्वजनीक रस्त्याकरीता करण्यात यावा. जेणेकरुन आ.क्र. ९ व १० च्या हद्दीवरुन श्री साईबाबा संस्थान शिर्डी व नगरपंचायत याचा एकूण ९ मीटर रस्ता नागरीकांसाठी व भक्तांसाठी उपलब्ध होऊ शकेल.

६. आरक्षण क्रमांक १० च्या पुर्व बाजुच्या हद्दीवरुन पिंपळवाडी रस्ता ते विकास योजनेच्या १२ मीटर रुंदीच्या रस्त्यापर्यंत ४.५० मीटर रुंदीचा रस्ता श्री साईबाबा संस्थान यांनी ठेवल्यास आरक्षण क्रमांक १० मधील १२ मीटर रुंदीचा (पिंपळवाडी रस्ता ते मंदीरासमोरुन जाणारा विकास योजनेतील १२ मीटर रुंदीच्या रस्त्यापर्यत) रस्ता श्री साईबाबा संस्थान यांना आवश्यक्ता नसल्यास तसा फेरबदल नगरपंचायतीस करुन द्यावा लागेल. तसेच श्री साईबाबा संस्थान यांना देण्यात येणाऱ्या जागेचा वापर श्री साईबाबा संस्थान यांच्या प्रस्तावाप्रमाणे करण्यासाठी फेरबदल नगरपंचायतीस करुन द्यावा लागेल. त्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास मंजूरी द्यावी लागेल.

७. श्री साईबाबा संस्थान जिल्हापरिषदेस आरक्षण क्रमांक ८ येथे शाळा बांधकाम करुन जागेसह हस्तांतर करुन देणार आहे. त्याबदल्यास जिल्हापरिषदेने आरक्षण क्रमांक ९ व १० येथे सध्याच्या शाळेचा ताबा जागेसह मालकी हक्क सोडणे आवश्यक राहील. जिल्हापरिषदेच्या नावावर असणारे ७/१२ चे उतारे नगरपंचायतीच्या नावाने करुन देणे आवश्यक राहील.

दि.१६/०९/२००६ रोजी झालेल्या संस्थानचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.७८१ अन्वये शिर्डी नगरपंचायत यांनी वरीलप्रमाणे देऊ केलेली १६ आर जागा स्विकारणेत यावी असे ठरले. त्यानुसार सदर जागेचा ताबा संस्थानने घेतलेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फे शिर्डी येथिल सर्व्हे क्र.६ मधिल आ.क्र.८ खाली आरक्षित असलेले एकूण ५७.६५ आर क्षेत्र खरेदी / संपादीत करुन त्यावर अद्ययावत शाळा इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. याकामी जमीन खरेदी, भूसंपादन, शाळा इमारत बांधकाम आणि इतर अनुषंगिक सुविधांसाठी श्री साईबाबा संस्थानतर्फे एकूण रु.२,८२,१५,४९६/- मात्र इतका निधी खर्च करण्यात आलेला आहे. श्री साईबाबा संस्थान यांनी सदरहू नवीन शाळा इमारतीचा जागेसह कब्जा दि.२८/०८/२००६ रोजी जिल्हा परिषद, अहमदनगर यांना दिलेला असून तेव्हापासून तेथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुरु झालेली आहे.

शिर्डी विकास योजना आरक्षण क्र.९ मधिल जागेवर शिर्डी नगरपंचायत यांनी दुकान केंद्र, ऑडीटोरीअम, दर्शन रांगा व बगीचाचे बांधकाम "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर केलेले आहे. शिर्डी नगरपंचायत यांनी आरक्षण क्र.९ मधिल दुकान केंद्र इमारतीतील तळमजल्यावर १६ दुकानगाळे पॅसेजसह क्षेत्र ८४.४६ चौ.मी. दुसऱ्या मजल्यावरील ऑडीटोरीयम क्षेत्र ५६७.१८ चौ.मी. याप्रमाणे बांधकाम कायमस्वरुपी संस्थानला हस्तांतरण करण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव दि.१६/०६/२००९ रोजी संस्थानकडे सादर केला होता. त्याबाबत दि.२१/०६/२००९ रोजी झालेल्या संस्थानचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.५३० अन्वये त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू बांधकाम स्विकारण्यात यावे, असे ठरले आहे. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमयुएन ११०८/५२९/प्र.क्र.९९/नवि-१७, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक ०१ ऑगस्ट २००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी आरक्षण क्रमांक ८ येथे जिल्हा परिषद शाळेचे बांधकाम करुन दिल्यामुळे श्री साईबाबा संस्थान यांना आरक्षण क्र.९ येथिल बांधकामापैकी तळमजल्यावर १६ दुकानगाळे पॅसेजसह (बांधकाम क्षेत्र ८४.७६ चौ.मी.) व दुसऱ्या मजल्यावर ऑडीटोरीअम (बांधकाम क्षेत्र ५६७.१८ चौ.मी.) बांधकाम तसेच श्री साईबाबा मंदिराचे पूर्व बाजूस असलेली नगरपंचायतीच्या मालकीची ५ आर जागा रुपये १/- या नाममात्र वार्षिक भाड्याने कायम स्वरुपी भाडेतत्वार देण्यास व दुसऱ्या मजल्यावरील दर्शन रांगेचा कायमस्वरुपी निःशुल्क वापर करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था आणि जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेदरम्यान दि.२४ सप्टेंबर २००९ रोजी अदलाबदलीचा लेख झालेला असून त्याअन्वये श्री साईबाबा संस्थान यांचेकडील शिर्डी सर्व्हे क्र.६ पैकी मधिल ५७.६५ आर क्षेत्र त्यावरील शाळा इमारतीचे बांधकामासह जिल्हा परिषद, अहमदनगर यांना हस्तांतरीत करण्यात आले आहे. तसेच जिल्हा परिषद , अहमदनगर यांचे शिर्डी सर्व्हे नं.१/६, १/१७ व गावठाण पैकी मिळून एकूण २४.३२६ आर क्षेत्र श्री साईबाबा संस्थानकडे हस्तांतरीत झालेले आहे. सदरहू अदलाबदलीचे लेखान्वये शिर्डी सर्व्हे क्र.६ पैकी मधिल ५७.६५ आर क्षेत्रास जिल्हा परिषद, अहमदनगर यांचे ७/१२ उताऱ्यावर कब्जेदार सदरी नांव लागलेले आहे. तसेच शिर्डी सर्व्हे नं.१/६, १/१७ व गांवठाण पैकी मिळून एकुण २४.३२६ आर क्षेत्रास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे ७/१२ उतात्यार कब्जेदार सदरी नांव लागलेले आहे.

अशाप्रकारे श्री साईबाबा मंदिर परिसराचे पूर्वेकडील हद्दीलगत असलेले क्षेत्र हे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे मालकीचे झालेले आहे. या क्षेत्रापैकी सुमारे १६ आर क्षेत्र हे आरक्षण क्र.१० आणि त्यामधिल दक्षिणोत्तर १२ मी. रुंद रस्त्याखाली येत आहे. संस्थानतर्फे या क्षेत्राचा वापर गर्दीचे काळात दर्शनेच्छुक साईभक्तांच्या गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी होत आहे. तसेच पालखीव्दारे व गटाने येणाऱ्या साईभक्तांना या जागेतूनच दर्शन रांगेत प्रवेश देण्यात येतो. दर्शनरांगेतील साईभक्तांना आपत्कालीन परिस्थितीत तातडीने बाहेर पडता यावे यासाठी सदर ठिकाणी मंदिर परिसराचे पूर्व बाजुचे हद्दीवरील कम्पाऊंडमध्ये व दर्शन रांग हॉलला आपत्कालीन दरवाजे ठेवण्यात आलेले आहेत.

वर नमूद केलेप्रमाणे आ.क्र.१० साठी करण्यात आलेला फेरबदल हा सन २००४ मध्ये करण्यात आलेला आहे. परंतू त्यानंतर आजतागायत सहा वर्षांचे कालावधीमध्ये श्री साईबाबांचे सामधीचे दर्शनार्थ येणाऱ्या साईभक्तांचे संख्येमध्ये फार फोठ्या संख्येने वाढ झालेली आहे. याप्रमाणे झालेली वाढ अनपेक्षितरित्या मोठ्या स्वरुपाची असल्याने त्याचे पुर्वानुमान नियोजन प्राधिकरणास करणे शक्य झालेले नाही. त्यामुळे आता विद्यमान परिस्थितीत सदर आ.क्र.१० साठी असलेल्या १२ मी. रुंद रस्ता व या रस्त्याचे दोन्ही बाजूस पट्टीच्या स्वरुपात टपरी दुकानदारांचे पुनर्वसनाकरीता "दुकान केंद्र" या तरतुदीचा तातडीने फेरविचार करणे गरजेचे झाले आहे. त्यासाठी प्रामुख्याने खालिल मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे.

१) श्री साईबाबांचे दर्शनार्थ येणाऱ्या साईभक्तांचे संख्येमध्ये अलीकडच्या कालावधीमध्ये सातत्याने मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे.

२) उत्सव काळात, तसेच सलग सुट्ट्यांचे दिवशी मंदिर परिसर व लगतचे भागात मोठ्या प्रमाणावर साईभक्तांची गर्दी होते. त्यावेळी दर्शन रांगेचे हॉल्स आणि जुन्या पिंपळवाडी रस्त्याचा दक्षिणेकडील मंदिर परिसरालगतचा निम्मा भाग पूर्ण क्षमतेने भरतो. काही प्रसंगी दर्शन रांग त्याचे बाहेर जाते.

३) सातत्याने वाढत्या गर्दीचा विचार करता नजिकच्या भविष्यात मंदिर व आजुबाजुच्या परिसरात साईभक्तांच्या दर्शन व्यवस्थेचे नियोजन करणे जिकीरीचे होणार आहे. ही बाब विचारात घेऊन संस्थानतर्फे मंदिर परिसराचे पुनर्नियोजन करण्याचा निर्णय घेणेत आला आहे. त्यासाठी संस्थानतर्फे मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं.८०, ८५ पैकी मधिल जागेत नवीन प्रसादालयाचे बांधकाम करुन तेथे प्रसादालयाचे स्थलांतर करण्यात आले आहे. जुन्या प्रसादालयाचा परिसर दर्शन रांग सुविधेसाठी मंदिर परिसराला संलग्न करण्याचे प्रस्तावित आहे.

४) श्री साईबाबा समाधी मंदिराचे पश्चिम बाजूस नगर-मनमाड रस्ता, उत्तर बाजूस पिंपळवाडी रस्ता आणि दक्षिण बाजूस पालखी रस्ता व गांवठाण असल्याने सदरचे तिनही बाजूस विस्तारीकरण करणेस वाव नाही. परंतू वर नमूद केलेप्रमाणे मंदिर परिसराचे पूर्व बाजुचे हद्दीलगत असलेले क्षेत्र हे संस्थानच्या मालकीचे झालेले असल्याने या बाजूस मंदिर परिसराचे विस्तारीकरणास वाव उपलब्ध आहे. त्यामुळे सदर क्षेत्र हे मंदिर परिसर पुनर्नियोजनात समाविष्ट करणे आवश्यक आहे.

५) गेल्या पाच ते सहा वर्षात भारतातील काही देवस्थानचे ठिकाणी भक्तांचे गर्दीत चेंगराचेंगरी होऊन भक्त जखमी होणे तसेच प्राणहाणी होण्याच्या घटना घडलेल्या आहेत. दि.२५/०१/२००९ रोजी महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील मांढरदेवी येथे काळुबाई यात्रेत झालेल्या भीषण चेंबराचेंगरीत सुमारे ४०० भाविक मरण पावले होते. अगदी अलीकडे म्हणजेच दि.०४/०३/२०१० रोजी उत्तर प्रदेशमधील प्रतापगड जिल्ह्यातील कृपालू महराजांचे आश्रमात चेंगराचेंगरी होऊन सुमारे ६५ भाविक मरण पावले.

मांढरदेवी येथिल घटना झाल्यानंतर महाराष्ट्रातील प्रमुख धार्मिक स्थळांचे ठिकाणी भविकांचे सुरक्षिततेविषयी विविध उपाययोजना करणेसंबंधी उहापोह करण्यात आला. शिर्डी शहरामध्ये भाविकांना रस्त्यावरुन चालतांना अडथळा न येता विनासायास चालता यावे, यासाठी मा.जिल्हा दंडाधिकारी, अहमदनगर यांनी No.DC/off-९B/९१५/२००५, दि.२६-१०-२००५ अन्वये नगर- मनमाड रस्ता, जुना पिंपळवाडी रस्ता नवीन पिंपळवाडी रस्ता, शिर्डी गांवठाण क्षेत्र, रथ पालखी रस्ता आणि मारुती मंदिरा समोरील चावडी ते जुना पिंपळवाडी रस्ता या ठिकाणी "NO HAWKERS ZONE AND NO PARKING ZONE" करणेबाबत अधिसुचना काढलेली आहे.

वरील परिच्छेदांमध्ये नमूद केलेल्या बाबी, तसेच साईभक्त आणि सामान्य जतनेच्या सुरक्षिततेचा आणि व्यापक हिताचा विचार करुन शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्र.१० व त्यामधील १२ मी. रुंद रस्त्याचे विद्यमान तरतुदीमध्ये सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविलेनुसार खालिलप्रमाणे फेरबदल करणे अत्यावश्यक आहे.

शिर्डी विकास योजना आरक्षण क्र.१० मध्ये दर्शविण्यात आलेला १२ मी. रुंद विकास योजना रस्ता व या रस्त्याचे दुतर्फा टपरी दुकानदारांचे पुनर्वसनाकरीता "दुकान केंद्र" हे पट्टीच्या स्वरुपात दर्शविण्यात आलेले आरक्षण वगळून त्याखालिल क्षेत्रामध्ये पूर्वेकडील हद्दीलगत ४.५० मी. रुंद दक्षिणोत्तर सार्वजनिक रस्ता आणि सदर रस्त्याचे पश्चिम बाजूस मंदिर परिसराचे हद्दीपर्यंत उर्वरित क्षेत्रावर "मंदिर परिसर विस्तारीकरण" असा वापर प्रस्तावित करुन यासाठी समुचित प्राधिकरण श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी दर्शविणे.

तरी वरीलप्रमाणे फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत शिर्डी नगरपंचायत यांचेकडे प्रस्ताव सादर करणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३७७ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२३ इंग्लिश मिडीयम स्कूल मधील के.जी. चे वर्ग सकाळी भरविणे बाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१०-११ मध्ये श्री साईबाबा इंग्लिश मि.स्कुलकडे खालील प्रमाणे वर्ग तुकडया प्रस्तावित आहेत.

| | |
|---|---|
| इयत्ता १ ली | - ४ तुकडया |
| इयत्ता २ री | - ३ तुकडया |
| ३ री ते ८ वी | -१२ तुकडया ( प्रत्येकी २ तुकडया) |
| ९ वी ते १० | -०२ तुकडया(प्रत्येकी १ तुकडी) |
| **एकूण-** | **२१ तुकडया** |
| सिनिअर के.जी | - ३ तुकडया |
| ज्यु.के.जी | - आवश्यकतेनुसार |

इ.मि.स्कुलकडे असलेल्या ३१ वर्ग खोल्यांचा वापर खालील प्रमाणे करण्यात येतो.

| | |
|---|---|
| कार्यालय- | - ०१ |
| लिंग्वॉफोन लॅब | - ०१ (सध्या संगणक लॅब) |

संगणक लॅब - ०१( सध्या स्पोर्ट हॉल)
स्टाफ रुम-(कॉमन) - ०१
प्रयोग शाळा - ०१
वर्ग खोल्या - २६

**एकूण - ३१**

सि.केजी ते इ. १० वी पर्यंत २४ वर्ग खोल्या व ज्यु.केजी प्रवेशा धोरणानुसार वर्ग/खोल्या लागणार आहेत. वरीलप्रमाणे ज्यु केजी ते १० वी पर्यंत वर्गासाठी फक्त २६ खोल्या उपलब्ध होत असल्याने ज्यु केजी च्या जादा वर्ग/तुकडयांना प्रवेश द्यावयाचे झाल्यास खोल्या अपु-या पडणार आहेत. जवळच्या कन्या मंदिर कडेही जादा खोल्या उपलब्ध नसल्याने त्यांचेकडून खोल्या मिळू शकणार नाहीत. सबब ज्य. केजी व सि.केजी व इ. १ ली ते ४ थी पर्यंतचे वर्ग सकाळी ७.३० ते ११.३० या सत्रात व इ. ५ वी ते १० वी पर्यंतचे वर्ग दुपारच्या ११.४५ ते ५.४५ या सत्रात दुबार पध्दतीने भरवावेत. त्यामुळे तुर्त वर्ग/खोल्यांची अडचण दूर होईल असे मत आहे.

सन २००९-१० चालू वर्षा मध्ये ज्यु.केजी च्या ३ तुकडया व सि.केजीच्या ५ तुकडया अशा एकूण ८ तूकडया असून ४ कायम शिक्षक व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मुलाखतीव्दारे ११ महीने कालावधीसाठी नेमलेले ४ असे ८ शिक्षक केजी वर्गांना शिकवतात. सबब सन २०१०-११ मध्ये ज्यु केजीच्या ५पर्यंत सि.केजीच्या ३तुकडया अशा ८ तूकडया झाल्यास वरीलप्रमाणे शिक्षकांची व्यवस्था होऊ शकेल. गेल्या वर्षी नेमलेल्या ४ शिक्षकांना सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षासाठी पुन्हा तात्पुरत्या नेमणूका देता येईल.ज्यु.केजीच्या ५ पेक्षा जास्त तुकडया झाल्यास जाहिरात देवून मुलाखतीव्दारे शिक्षकांना तात्पुरत्या नेमणूका दयाव्या लागतील.

तसेच सध्या उपलब्ध असलेल्या ९ बसेस सकाळी ७.०० वाजता जाऊन केजीच्या मुलांना आणतील . त्यानंतर पुन्हा ९.३० वाजता जाऊन इ. १ ली ते १० वी च्या मुलांना आणतील. व लगेच केजीच्या मुलांना सोडायला जातील व संध्याकाळी १ली ते १० वीच्या मुलांना सोडायला जातील. यामुळे यापुर्वीपेक्षा बसची १ फेरी वाढणार आहे.

सबब सन २०१०-११ शैक्षणिक वर्षात तुर्त ज्यु.केजी व सि. केजी चे वर्ग सकाळच्या सत्रात भरवावेत. त्यानंतर इ.१ ली ते ४ थी चे वर्ग गरजेनुसार पुढील भविष्यात सकाळच्या सत्रात भरविता येतील. व सध्या १ली ते १० पर्यंतचे सर्व वर्ग सध्याप्रमाणे दुपारच्या सत्रात भरविता येतील.

मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षात तुर्त ज्यु.केजी,सि.केजी चे वर्ग सकाळच्या सत्रात व इ.१ ली ते ४ थी चे वर्ग गरजेनुसार पुढील भविष्यात सकाळच्या सत्रात भरविण्यात यावेत. सध्या १ली ते १० पर्यंतचे सर्व वर्ग सध्याप्रमाणे दुपारच्या सत्रात भरविण्यात यावेत.**

**त्याचप्रमाणे के.जी.चे वर्गाकरिता सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेशासाठी आलेल्या अर्जातील ३।। ते ५ या वयोगटातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा,असें ठरलें.**

(कार्यवाही-प्राचार्या,इं.मि.स्कुल)

---

**विषय नं.२४** **कन्या विद्या मंदिराकडे शिक्षक व शिक्षकेतर पदे भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या माध्यमिक विभागाकडे खालीलप्रमाणे शिल्लक नेमणूका केलेल्या आहेत.

माध्यमिक विभाग इ.८वी ते इ.१०वी गटासाठी माध्यमिक शाळा संहितेनुसार १.५ प्रमाणे सहा वर्ग तकडयांसाठी एकूण ०९ पदे मान्य होतात. यामध्ये खालीलप्रमाणे शिक्षक कार्यरत आहेत.

| अ.नं. | शिक्षकाचे नाव | पदनाम | कायम कर्मचारी | जात संवर्ग |
|---|---|---|---|---|
| ०१ | सौ.एन.बी. चव्हाणके | प्राचार्या | ०१ | ओपन |
| ०२ | श्री.बी.के. वाणी | सहा. शिक्षक | ०१ | ओपन |
| ०३ | श्री.जी.व्ही. वरघुडे | सहा. शिक्षक | ०१ | ओपन |
| ०४ | श्रीमती मिरजकर | सहा. शिक्षका | ०१ | ओपन |
| ०५ | श्री.व्ही.के. वाणी | सहा. शिक्षक | ०१ | ओपन |
| ०६ | श्री.एस.ए. बाबर | सहा. शिक्षक | ०१ | ओपन |
| ०७ | श्री.एस.एन. खैरनार | सहा. शिक्षक | ०१ | ओ.बी.सी. |

एकूण ०९ पदांपैकी ०७ पदांवर कायम शिक्षक कर्मचारी कार्यरत असून-

| अ.नं. | शिक्षकाचे नाव | पदनाम | संख्या | जात संवर्ग |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती स्वाती रामदास माने | शिक्षणसेवक (माध्यमिक) | ०१ | अनुसुचित जाती (एस. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | गणित | | सी.) |
| ०२ | श्री. विजयकुमार पांडुरंग देशमुख | शिक्षणसेवक (माध्यमिक) इंग्रजी | ०१ | भटक्या जमाती (एन.टी.) |

श्रीमती माने शिक्षणसेवक म्हणून जा.क्र.एसएसएस/ वशी-०१/ १३०१०/ २००८ दि.०४.०९.२००८ नुसार दि.३०.०४.२०११ या तीन शैक्षणिक वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक केलेली आहे.

श्री.विजयकुमार पांडुरंग देशमुख शिक्षणसेवक म्हणून जा.क्र.एसएसएस/ वशी-०१/ ९७३६/ २००९ दि.०३.०८.२००९ नुसार दि.३०.०४.२०१२ या तीन शैक्षणिक वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक केलेली आहे.

उपरोक्त इ.८वी ते इ.१०वी पर्यंतच्या शिक्षक पदांच्या नेमणूका नियमानुसार पुर्ण झालेल्या आहेत.

प्राथमिक विभाग इ.५वी ते इ.७वी गट- श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या विभागाकडे इ.५वी ते इ.७ वीच्या एकूण ०६ वर्ग तुकडया असून प्रत्येक वर्ग तुकडीस१.३ प्रमाणे एकूण ७.८ म्हणजेच पूर्णांकित ८ पदे मंजूर होतात.

| अ.नं. | शिक्षकाचे नाव | पदनाम | कायम कर्मचारी | जात संवर्ग |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.एन.एम. गाडेकर | सहा. शिक्षक | ०१ | ओपन |
| ०२ | श्री.आर.एस. पुंड | सहा. शिक्षक | ०१ | ओ.बी.सी. |
| ०३ | श्रीमती एस.आर. दुरुगकर | सहा. शिक्षका | ०१ | ओपन |
| ०४ | श्रीमती ए.ए. पवार | सहा. शिक्षका | ०१ | ओपन |
| ०५ | श्रीमती एम.सी. पांढरे | सहा. शिक्षका | ०१ | ओ.बी.सी. |
| ०६ | श्री.ए.आर. गायकवाड | सहा. शिक्षक | ०१ | अनु. जाती |

एकूण ०८ पदांपैकी कायम शिक्षक कर्मचारी कार्यरत आहेत. उर्वरित ०२ पदांपैकी ०१ पदावर श्री.ताराचंद मुकिंदा चिंधे, शिक्षणसेवक (प्राथमिक) (विषय- माहिती तंत्रज्ञान) या पदावर एक शैक्षणिक वर्ष २००९-१० करीता दि.३०.०४.२०१० अखेर नेमणूक करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | शिक्षकाचे नाव | पदनाम | संख्या | जात संवर्ग |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. चिंधे ताराचंद मुकिंदा | शिक्षणसेवक | ०१ | भटक्या जमाती (NT) |

उपरोक्त नियमानुसार ०८ पदे आवश्यक असून ०६ पदेभरलेली आहेत व ०२ पदे रिक्त आहे. सदर रिक्त पदे भरणेबाबत जात संवर्ग तपशील खालीलप्रमाणे आहे. एकूण १६ पदांचा (१६ + ०१ प्राचार्या- एकांकी पद) = १७.

| जात संवर्ग | अनु. जाती (S.C.) | अनु. जमाती (S.T.) | विमुक्त व भटक्या जमाती (VJ/ NT) | इतर मागासवर्ग (O.B.C.) | विशेष मागासवर्ग (S.B.C.) | बिगर मागास (OPEN) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आरक्षण | १३% | ०७% | ११% | १९% | ०२% | ४८% | १००% |
| पदे | २.०८ | १.१२ | १.७६ | ३.०४ | ०.३२ | ७.६८ | --- |
| पुर्णांकित पदे | ०२ | ०१ | ०२ | ०३ | ०० | ०८ | १६ |
| भरलेली पदे | ०२ | ०० | ०१ | ०३ | --- | ०८ | १४ |
| रिक्तपदे अनुशेष | --- | १ | १ | --- | -- | --- | ०२ |

उपरोक्त जात संवर्ग तक्त्यानुसार अनुसुचित जमाती (ST) (VJ/ NT) या जात संवर्गातील अनुशेष शिल्लक आहे.

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयासाठी खालील शिक्षक व शिक्षकेतर पदांसाठी पदांसाठी नेमणूक करणे आवश्यक आहे.

**(अ) शिक्षणसेवक (विषय- माहिती-तंत्रज्ञान)-** गेल्या वर्षी सन २००८-०९ मध्ये अनुसुचित जमाती आरक्षित पदांसाठी योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्याने श्री.ताराचंद मुकिंदा चिंधे (एन.टी.प्रवर्ग) यांची एक शैक्षणिक वर्षासाठी नेमणूक करण्यात आली होती व त्यानंतर२००९-१० मध्ये श्री.चिंधे यांना पुन्हा मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने एक शैक्षणिक वर्षासाठी नेमणूक देण्यात आलेली आहे. दरम्यानचे काळात श्री.घोडके ए.बी. (सहा.शिक्षक) कन्या विद्या मंदिर यांची कनिष्ठ महाविद्यालयाकडे नेमणूक झाल्याने एन.टी. प्रवर्गातील सहा.शिक्षक पद रिक्त झालेले आहे. श्री.चिंधे हे एन.टी.प्रवर्गातील असून त्यांची जाहिरातीद्वारे मुलाखतीने नेमणूक झालेली असल्याने एन.टी. प्रवर्गातील रिक्त जागेवर त्यांची नेमणूक करुन समायोजन करता येईल अन्यथा सदर जागेसाठी पुन्हा जाहिरात द्यावी लागेल.

**(ब) प्राथमिक विभाग (शिक्षणसेवक)-** रु.३०००/- एच.एस.सी. (विज्ञान) डीएड् ०१ पद- जात संवर्ग अनुसूचित जमाती (एस.टी.) साठी आरक्षित आहे. या पदासाठी गेल्या वर्षी वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती. परंतु मुलाखतीसाठी हजर असलेल्या उमेद्वारांपैकी एकही उमेद्वार पात्र नाही असे मा.विश्वस्त व एक्सपर्ट यांनी मत दिल्याने या पदावर कंत्राटी पध्दतीने काम करुन घेण्यात येत असून पद रिक्त आहे. आता सदर पद रिक्त असल्याने या पदासाठी जाहिरात द्यावी लागेल.

**(क) विज्ञान व माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा सहाय्यक-** बी.सी.एस./ बी.एस्सी., कॉम्प्युटर सायन्स/ एम.सी.एम. रु.३२००-४९०० एक पद नेमणूक करता येईल. (सदरचे पद एकल आहे.) या पदासाठी जाहिरात द्यावी लागेल.

नियम क्रमांक- माध्यमिक शाळा संहिता पान क्र. ५५, ,५६ नियम क्र.५७.५ नुसार ५०० ते १५०० विद्यार्थी संख्येस ०१ याप्रमाणे प्रयोगशाळा सहाय्यकाचे पद निर्माण होते. श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयामध्ये इ.५वी ते १०वी सध्या ६०० विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत.

**संदर्भ-** ०१) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- बीसीसी- १०९३/ ३१८७/ प्र.क्र. १७१/ ९३/ १६- ब, मंत्रालय, दि.१२ जुलै, १९९६.
०२) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक- बीसीसी- १०९७/ प्र.क्र.२०/ ९७/ १६- ब, दि.२१ सप्टेंबर १९९८, निर्णय क्रमांक अन्वये सदर पद एकल असल्याने त्याला आरक्षण लागू नाही.

तरी वरीलप्रमाणे-
अ) श्री.चिंधे यांची नेमणूक एन.टी. प्रवर्गातील रिक्त जागेवर करावी किंवा जाहिरात द्यावी,
ब, क) जाहिरातीद्वारे नेमणूक करणेसाठी,
निर्णयार्थ व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, कन्या विद्या मंदिराकडे शिक्षक व शिक्षकेतर पदे भरणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात यावेत,असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक-आस्थापना/मुख्याध्यापिका कन्या वि.मंदीर)

---

**विषय नं.२५ इंग्लिश मिडीयम स्कूलकडे शिक्षण सेवक नेमणूकीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल हे सन १९९० साली सुरु झालेले असून शाळेत ज्यु.केजी ते इ. १० वी पर्यंतचे वर्ग आहेत. शाळेत पुर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक असे विभाग आहेत. दिवसेंदिवस शाळेत विद्यार्थ्यांचे संख्येत वाढ होत असून नैसर्गिक वाढीने व विद्यार्थी संख्येतील वाढीमुळे जादा तुकडया तयार होत आहेत. त्यासाठी वरील विभागाचे आवश्यकतेनुसार वर्ग/तुकडीसाठी शिक्षकांची नेमणूक करावी लागणार आहे. चालू शैक्षणिक वर्षातील वर्ग/ खोल्या, शिक्षकासंबंधीत माहिती व त्यांना नेमून दिलेले वर्गाची माहिती संबंधीचे तक्ते सोबत जोडले आहेत.

**अ) सध्या शाळेकडे उपलब्ध असलेल्या वर्ग/खोल्या बाबतची माहिती तक्ता.**
**ब ) शैक्षणिक वर्ष (२००९-१०) मध्ये शिक्षकांना नेमून दिलेले वर्ग/तुकडी व विद्यार्थी संख्या दर्शक तक्ता.**
**क) शिक्षकांसंबंधीची माहिती तक्ता.**

तक्त्यात नमूद केलेप्रमाणे पुर्व प्राथमिक विभागासाठी दोन, प्राथमिक विभागासाठी (इ.१ ली ते ७ वी) सात शिक्षण सेवकांची नेमणूक करणे आवश्यक आहे. श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलकडील विद्यार्थी व शिक्षकांची सद्यस्थितीदर्शक माहिती सोबत परिशिष्ट A मधील रकाना क्र ३ ते ०६ मध्ये तर पुढील वर्ष २०१०-११ मध्ये लागणा-या जादा शिक्षक व वर्ग/ खोल्याबाबतची माहीती रकाना क्र.०७ ते १२ मध्ये दर्शविली आहे. पुढील वर्षाकरीता शिक्षक नेमणूककामी खालील बाबींचा विचार करावा लागणार आहे.

०१. चालू वर्षी ज्यु केजीच्या ३ तुकडया आहेत. पुढील वर्षीही (२०१०-११)ज्यु.केजी या वर्गाचे प्रवेशाने तीन तुकडया केल्यास व सध्याच्या सि.केजीच्या तीन तुकडया अशा एकूण ०६ तुकडया तयार होतील.आपल्याकडे केजी विभागासाठी ०४ कायम कर्मचारी शिक्षक उपलब्ध आहेत. आणखी दोन शिक्षण सेवक नेमावे लागतील. केजी विभागाकडील बदलते वर्ग/तुकडी व विद्यार्थी संख्या पाहता या विभागासाठी ११ महिन्याकरीता शिक्षण सेवक नेमावेत असे मत आहे.

०२. प्राथमिक विभाग इ. १ ली ते ४ थी साठी एक वर्ग एक शिक्षक हा नियम आहे, पुढील वर्षी इ. १ ली या वर्गाच्या चार तुकडया, इ. २ री या वर्गाच्या तीन तुकडया तर ३ री ते ४ थी या वर्गाच्या प्रत्यकी २ तुकडया अशा एकूण ११ तुकडया होणार असून ०८ तुकडयासाठी कायम कर्मचारी उपलब्ध असून आणखी तीन शिक्षक सेवक नेमावे लागतील. प्राथमिक विभागाकडेही वर्ग/तुकडी संख्या बदलती राहणार आहे. त्यासाठी प्राथमिक विभागाकडे ११ महिन्याकरीता शिक्षण सेवक नेमावेत असे मत आहे.

०३. शैक्षणिक वर्षे २०१० -२०११ साठी इ.५ वी ते ७ वी चे प्रत्येकी दोन तुकडया या प्रमाणे एकूण ०६ तुकडयासाठी प्रत्येकी ५० विद्यार्थ्यामागे एक शिक्षक या प्रमाणे ०६ शिक्षक तर प्रत्येकी १०० विद्यार्थ्यामागे एक पदवीधर शिक्षक या प्रमाणे २५८ विद्यार्थ्यांसाठी ०२ पदवीधर शिक्षक असे एकूण ०८ शिक्षक लागतील, पैकी ०४ शिक्षक कायम कर्मचारी आपल्याकडे उपलब्ध आहेत. इ. ५ वी ते ०७ वी साठी आणखी चार शिक्षक आवश्यक आहेत. पैकी २ शिक्षकांचा कार्यभार माध्यमिक विभागाकडील कार्यरत शिक्षकांना देता येईल व प्रत्यक्षात दोन शिक्षण सेवक नव्याने नेमाणे आवश्यक आहे.

०४ शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये इ.८ वी ते १० वी प्रत्येकी १ तुकडी प्रमाणे व १.५ x ३ = ४.५ पुर्णांकीत ५ माध्यमिक शिक्षक आवश्यक होते व ०८ शिक्षक कार्यरत होते. पैकी काही शिक्षकांना इ.५ ते ७ वी मध्ये कार्यभार देण्यात आला होता.

शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये इ.८ वी च्या नैसर्गिक वाढीने दोन तुकडया व इ. ९ वी, १० वी ची प्रत्येकी १ तुकडी एकुण २+२=४ तुकडयांसाठी ४ x १.५ = ६.०० शिक्षक आवश्यक असुन प्रत्यक्षात ८ शिक्षक कार्यरत आहेत. पैंकी श्री लोहोकरे कृष्णदास गोपीनाथ यांच्याकडे इं.मि.स्कूलकडील हिंदी + संस्कृत विषयांचा कार्यभार राहील व दरवर्षी प्रमाणे कन्या विद्या मंदिर विभागाकडे इ. ८ वी ते १० वी प्रत्येकी २ तुकडया एकूण ६ x२ = १२ तासिकांचा (२५ टक्के कार्यभार) कार्यभार राहील. उर्वरित माध्यमिक विभागाकडील अतिरिक्त १.७५ शिक्षकांचा कार्यभार उच्च प्राथमिक (इ.५ वी ते इ.७ वी) कडे देता येईल.

०५ संगणक प्रशिक्षणकामी प्राथमिक विभागासाठी( इ.१ ली ते ४ थी) एक शिक्षण सेवक व माध्यमिक (इ.५ वी ते १० वी) विभागासाठी एक शिक्षण सेवक आहे. हे दोन्हीही शिक्षक टेक्नीकल विशेष शिक्षक आहेत. त्यामुळे त्यांना स्कूलकोडनुसार एकूण शिक्षक संख्येत धरता येणार नाही. संगणक शिक्षकाची नेमणूक इ. १ ली ते ४ थी व इ. ५ वी १० वी साठी विशेष शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण देणेकामी करण्यात आली आहे. संगणक शिक्षकांच्या तासिका वेळापत्रका- व्यतिरिक्त देण्यात येत आहेत. सदर शिक्षकांच्या तासिका बसविणेसाठी सोमवार ते शुक्रवार रोज ९ तासिका ऐवजी १० तासिकांचे वेळापत्रक आहे. शनिवारी ०६ तासिका आहेत.

वरील प्रमाणे केजी विभागासाठी पदवीधर/एचएससी मॉन्टेसरी पात्रता असलेले दोन शिक्षक, इ.१ ली ते ४थी पर्यंतचे वर्गासाठी पदवीधर/ एचएससी /डी एड् शैक्षणिक पात्रता असलेले तीन तर इ.५ वी ते ७ वी वर्गांसाठी पदवीधर/ एचएससी /डी एड् शैक्षणिक पात्रता असलेले दोन असे एकूण सात शिक्षण सेवकांची नेमणूक करावी लागेल. सोबतचे परिशिष्ट B मध्ये दर्शविलेप्रमाणे आपल्याकडे एकूण ३१ खोल्या असून पैकी २६ वर्ग/खोल्या चालू वर्षी वर्गांसाठी वापरात आहेत. पुढील वर्षी (२०१०-११) करीता एकूण २८ वर्ग/ खोल्यांची आवश्यकता लागणार आहे.

तरी वरील सर्व बार्बीचा विचार होवून शिक्षण सेवकांची केजी तसेच प्राथमिक विभागात शाळा संहिता व आपलेकडील प्रचलीत पध्दतीस अनुसरुन नेमणूक होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेत ठेवणेस मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.३८० उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.२६ ४६ व्या विभागीय कौशल्य स्पर्धेमधील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या यशाबाबत.**

**प्रस्ताव-** औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षण हे केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाअंतर्गत डायरेक्टोरेट जनरल ऑफ एम्लॉयमेंट ॲण्ड ट्रेनिंग (D.G.E.&T.) यांचे व्दारा राज्य शासनाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे नियंत्रणाखाली चालते. यामध्ये निरनिराळया १०० हून अधिक अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यात येते. त्यापैकी फक्त १४ व्यवसायांची राष्ट्रीय पातळीवर कौशल्य स्पर्धा घेण्यात येते. त्या-त्या व्यवसायातून देशात प्रथम येणा-या विद्यार्थ्याला त्या वर्षाचा उत्कृष्ट कारागीर (Best Craftsman Of The Year) घोषित करण्यात येते. त्यास प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह व रोख रु.१००००/- पारितोषिक केंद्र शासनाकडून देण्यात येते. या स्पर्धेसाठी प्रत्येक राज्यातुन प्रत्येक ट्रेडसाठी फक्त एक सर्वोत्तम विद्यार्थी पाठविण्यात येतो. महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी विद्यार्थी निवडण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे दोन टप्प्यात होते.

टप्पा १- विभागीयस्तर कौशल्य स्पर्धा :- राज्याच्या सहा महसुली विभागातुन विभागीयस्तर कौशल्य स्पर्धा घेण्यात येते. प्रत्येक परिक्षा केंद्रावरील वार्षिक अखिल भारतीय व्यवसाय परिक्षेमधील त्या-त्या ट्रेड मधिल प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाचे प्रशिक्षणार्थी त्यात सहभागी होतात.

टप्पा २- राज्यस्तर कौशल्य स्पर्धा :- विभागीय स्तरावरुन प्रत्येक विभागातून फक्त प्रथम व व्दितीय क्रमांक प्राप्त केलेले प्रशिक्षणार्थी राज्यस्तर स्पर्धेसाठी पात्र ठरतात.

चालू वर्षी नाशिक विभागासाठी विभागीस्तर कौशल्य स्पर्धा ऑक्टोंबर २००९ मध्ये शासकीय औ.प्र.संस्था, नाशिक येथे झाली. त्याचा निकाल घोषित झाला असून नाशिक विभागातील ०५ जिल्हयामधील सर्व औ.प्र.संस्था/ केंद्रमधून ०६ ट्रेडसाठी १२ विद्यार्थी राज्यस्तर स्पर्धेसाठी पात्र झाले आहेत. यामध्ये आपल्या औ.प्र.केंद्रातील खालील १० विद्यार्थी असून २३ नोहेंबर २००९ पासून होणा-या ४६ व्या राज्यस्तर कौशल्य स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे.

| अ.क्र. | नांव | व्यवसाय | नाशिक विभागातून | राज्यस्तर परिक्षा केंद्र असलेली शासकीय औ.प्र. संस्था |
|---|---|---|---|---|
| ०१ | ढमाले नानासाहेब लुखाजी | जोडारी | प्रथम | औरंगाबाद |
| ०२ | लोखंडे सागर निवृत्ती | जोडारी | व्दितीय | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | बो-हाडे योगेश दत्तात्रय | टर्नर | प्रथम | |
| ०४ | शिंदे पांडूरंग बाबासाहेब | टर्नर | व्दितीय | |
| ०५ | मार्कडे प्रशांत मधुकर | वेल्डर | प्रथम | कोल्हापूर |
| ०६ | लोहाट उत्तम संपतराव | वेल्डर | व्दितीय | |
| ०७ | बारहाते निखिल भाऊसाहेब | विजतंत्री | प्रथम | नागपूर |
| ०८ | कु. यादव माधुरी संजय | कोपा | प्रथम | ठाणे |
| ०९ | देसाई संतोष अशोक | मोटर मेकॅ. | प्रथम | नाशिक |
| १० | थोरात भाऊसाहेब चांगदेव | मोटर मेकॅ. | व्दितीय | |

उर्वरीत ०२ विद्यार्थी हे शासकीय औ.प्र.संस्था, नाशिक व एन.डी.व्ही.पी. औ.प्र.केंद्र, नाशिक यांचे प्रत्येकी एक या प्रमाणे पात्र झाले आहेत.

सदर कार्यक्रम प्रभावीपणे पार पाडणेसाठी घ्कौशल्य स्पर्धा पूर्व तयारी समितीङ स्थापित करण्याचे नियोजन व महत्व विषद करुन समितीच्या माध्यमातून सदरचे काम उत्स्फुर्तपणे करु इच्छिणा-या कर्मचा-यांनी या समितीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य यांचेकडून करण्यात आले. संस्थेतील सर्व शिक्षक कर्मचा-यांना कर्मचारी बैठकीमध्ये करण्यात आले. यानुसार जानेवारी २००९ मध्ये प्राचार्यांचे अध्यक्षतेखाली स्वतंत्र घ्कौशल्य स्पर्धा पूर्व तयारी समितीङची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये सर्वश्री ए.एस. दुनाखे, बी.के.मुठे, जी.व्ही. राणे, पी.व्ही. सोनवणे, पी.व्ही. शिवशरण, जे.के.घाडगे व एल.एम.सुर्यवंशी यांनी सहभाग घेतला. ४६ व्या विभागीय कौशल्य स्पर्धा परीक्षेसाठी बसलेल्या संस्थेच्या १८ प्रशिक्षणार्थ्यांसाठी परीक्षेपूर्वी ०८ दिवसांचे दि.२८/०९/२००९ ते दि.०५/१०/२००९ कालावधीत निवासी मार्गदर्शन शिबीर संस्थेमध्ये आयोजित केले होते.

परिणामस्वरुप मागील वर्षी ४५ व्या विभागीय कौशल्य स्पर्धेत आपल्या केंद्राने १२ पैकी ८ प्रशिक्षणार्थी राज्यस्तरावर पोहचविण्याचा राज्यात केलेला उच्चांक चालू वर्षी १० विद्यार्थी पोहचवून आपणच मागे टाकला आहे. घ्कौशल्य स्पर्धा पूर्व तयारी समितीङ सह काही अपवाद वगळता संस्थेतील सर्व कर्मचा-यांचे सांघिक कार्यातून हे यश प्राप्त झाले आहे. यासाठी वेळोवेळी संस्थान प्रशासन व व्यवस्थापनाचे मोलाचे मार्गदर्शन व मदत झाली आहे असे प्राचार्य यांनी कळविले आहे.

वरिल राज्यस्तर परीक्षा केंद्रातून प्रत्येक ट्रेडमधून फक्त प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणारा प्रशिक्षणार्थी राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे त्या-त्या ट्रेडचे प्रतिनिधीत्व करण्यास पात्र ठरणार असल्याने राज्यस्तर कौशल्य स्पर्धा परीक्षा पूर्व तयारीसाठी वरील १० पात्र प्रशिक्षणार्थ्यांसाठी दि. १३/११/२००९ ते दि. २२/११/२००९ कालावधीत १० दिवसांचे निवासी मार्गदर्शन शिबीर आपल्या औ.प्र. केंद्रामध्ये आयोजित केले.

औ.प्र.केंद्राचे वरिल यश अभिनंदनीय असून मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये अभिनंदनाचा ठराव पारित करता येईल. अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.३८१ उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

---

**विषय नं.२७ ४६ व्या राज्य स्तरीय कौशल्य स्पर्धेमधील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या यशाबाबत.**

**प्रस्ताव-** औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षण हे केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाअंतर्गत डायरेक्टोरेट जनरल ऑफ एम्लॉयमेंट ॲण्ड ट्रेनिंग (D.G.E.&T.) यांचे व्दारा राज्य शासनाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे नियंत्रणाखाली चालते. यामध्ये निरनिराळया १०० हून अधिक अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यात येते. त्यापैकी फक्त १४ व्यवसायांची राष्ट्रीय पातळीवर कौशल्य स्पर्धा घेण्यात येते. त्या-त्या व्यवसायातून देशात प्रथम येणा-या विद्यार्थ्याला त्या वर्षाचा उत्कृष्ट कारागीर (Best Craftsman Of The Year) घोषित करण्यात येते. त्यास प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह व रोख रु.१००००/- पारितोषिक केंद्र शासनाकडून देण्यात येते. या स्पर्धेसाठी प्रत्येक राज्यातुन प्रत्येक ट्रेडसाठी फक्त एक सर्वोत्तम विद्यार्थी पाठविण्यात येतो. महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी विद्यार्थी निवडण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे दोन टप्प्यात होते.

**टप्पा १- विभागीयस्तर कौशल्य स्पर्धा:-** महाराष्ट्र राज्याच्या सहा महसुली विभागातुन विभागीयस्तर कौशल्य स्पर्धा घेण्यात येते. प्रत्येक परिक्षा केंद्रावरील वार्षिक अखिल भारतीय व्यवसाय परिक्षेमधील त्या-त्या ट्रेड मधिल प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाचे प्रशिक्षणार्थी त्यात सहभागी होतात.

यानुसार नाशिक येथे पार पडलेल्या ४६ व्या विभागीयस्तर कौशल्य स्पर्धा परिक्षेमध्ये आपल्या संस्थेचे ०६ ट्रेडचे १८ प्रशिक्षणार्थी बसले. नाशिक विभागातून राज्यस्तर कौशल्य स्पर्धेसाठी ०६ ट्रेड मधुन जास्तीत जास्त १२ प्रशिक्षणार्थी पात्र ठरु शकतात. पैकी आपल्या संस्थेचे १० प्रशिक्षणार्थी पात्र ठरले.

**टप्पा २- राज्यस्तर कौशल्य स्पर्धा :-** विभागीय स्तरावरुन प्रत्येक विभागातून फक्त प्रथम व व्दितीय क्रमांक प्राप्त केलेले प्रशिक्षणार्थी राज्यस्तर स्पर्धेसाठी पात्र ठरतात.

यानुसार नागपूर, कोल्हापूर, औरंगाबाद,ठाणे व नाशिक येथे झालेल्या ४६ व्या राज्यस्तर कौशल्य स्पर्धेसाठी आपल्या संस्थेचे ४ प्रशिक्षणार्थी राज्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन ४६ व्या राष्ट्रीय

कौशल्य स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. आपल्या संस्थेने राज्यस्तरावर केलेला एक विक्रम आहे. सदर परिक्षा दि. ०५/०१/२०१० ते ०९/०१/२०१० या कालावधीत खालील परिक्षा केंद्रांवर झाल्या असून राज्यात प्रथम आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांसोबत शासनानी संरक्षक (Escort) अधिकारी नियुक्त केलेले आहे. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. नं. | प्रशिक्षणार्थ्याचे नांव | व्यवसाय | राज्य शासनाने नियुक्त केलेले संरक्षक अधिकारी | ४६ व्या राष्ट्रीय कौशल्य स्पर्धा परिक्षेचे केंद्र असलेली केंद्र शासनाची संस्था. |
|---|---|---|---|---|
| ०१ | बारहाते निखिल भाऊसाहेब | इलेक्ट्रीशियन | श्री गोबिंदसिंग पाटनूरकर, प्राचार्य, शासकीय औ.प्र.संस्था, मुदखेड, जि.नांदेड | ॲडव्हान्स ट्रेनिंग इन्स्टिटयुट, कोलकाता |
| ०२ | लोहट उत्तम संपतराव | वेल्डर | श्री सी.बी. कुलकर्णी, प्राचार्य, सरला औ.प्र.केंद्र,जोगेश्वरी, मुंबई | ॲडव्हान्स ट्रेनिंग इन्स्टिटयुट, मुंबई |
| ०३ | ढमाले नानासाहेब लुखाजी | फिटर | श्री पटणे एस.बी., प्राचार्य श्री साईबाबा औ.प्र.केंद्र., शिर्डी. | ॲडव्हान्स ट्रेनिंग इन्स्टिटयुट, कानपुर |
| ०४ | बो-हाडे योगेश दत्तात्रय | टर्नर | | |

सदर कार्यक्रम प्रभावीपणे पार पाडणेसाठी जानेवारी २००९ मध्ये प्राचार्यांचे अध्यक्षतेखाली स्वतंत्र 'कौशल्य स्पर्धा पूर्वतयारी समिती-लौकीक समिती' ची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये सर्वश्री ए.एस.दुनाखे,बी.के.मुठे,जी.व्ही.राणे,पी.व्ही.सोनवणे,पी.व्ही.शिवशरण,जे.के.घाडगे व एल.एम.सुर्यवंशी या निदेशकांनी सहभाग घेतला. समितीने विभागीय व राज्यस्तर स्पर्धेपूर्वी संस्थेमध्ये निवासी मार्गदर्शन शिबीर आयोजित करुन प्रशिक्षणार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केल्यामुळेच वरिल यश प्राप्त झाले आहे.

ज्या राज्याचे सर्वाधिक प्रशिक्षणार्थी राष्ट्रीय कौशल्य स्पर्धेत प्रथम येतील ते राज्य सर्वोत्कृष्ट राज्य हा बहुमान जिंकू शकते. तसेच ज्या संस्थेचा प्रशिक्षणार्थी देशात सर्वप्रथम येतो ती संस्था सर्वोत्कृष्ट संस्था हा बहुमान जिंकू शकते. आपल्या औ.प्र.केंद्राने हा पुरस्कार यापुर्वी एकवेळ (२००७ मध्ये) जिंकलेला आहे.

औ.प्र.केंद्राचे वरिल यश अभिनंदनीय असून हे यश मिळवुन देणे, संस्थेचे व श्री साईबाबा संस्थानचे लौकीकात भर टाकणेसाठी परिश्रम घेतलेल्या कौशल्य स्पर्धा पूर्वतयारी समिती-लौकीक समितीचे प्राचार्य-निदेशक यांचे अभिनंदन करुन त्यांचे मनोबल वाढविणे व त्यांनी पुढेही असेच प्रसंशनिय कामे करावीत म्हणून त्यांना प्रोत्साहनपर श्री साईंचे एक चांदीचे पदक (नाणी) व प्रशस्तीपत्रक सार्वजनिक कार्यक्रमात देता येईल. या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३८२ यावर सविस्तर चर्चा होऊन, ४६ व्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस यश मिळविणेकामी परिश्रम घेतलेल्या कौशल्य स्पर्धा पूर्वतयारी समिती- लौकीक समितीचे प्राचार्य-निदेशक यांचे अभिनंदन करुन त्यांचे मनोबल वाढविणे व त्यांनी पुढेही असेच प्रशंसनिय कामे करावीत या हेतूने त्यांना प्रोत्साहनपर श्रीसाईबाबाचे एक चांदीचे पदक (नाणे) व प्रशस्तीपत्रक सार्वजनिक कार्यक्रमात देण्यात यावे,असें ठरलें.** (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय.)

---

**विषय नं.२८ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी फर्निचर खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा औ.प्र.संस्थेची १९८४ मध्ये स्थापना झाली स्थापने पासून १९९६ पर्यंत २० तुकडया व मागील ३ वर्षात ३ तुकडया याप्रमाणे १२ व्यवसायांच्या एकूण २३ तुकडयांचे प्रशिक्षण सध्या सुरु आहे. सर्व व्यवसायांच्या प्रशिक्षणार्थ्यांना कार्यशाळेमध्ये प्रात्यक्षिक ट्रेनिंगसाठी लागणारे टूल्स, इक्वीपमेन्ट इ. साहीत्य दररोज वापरावे लागतात. सदरचे साहीत्य प्रशिक्षणार्थ्यांचे नावावर दिलेले असते. तसेच काही एकत्रित (कॉमन) वापरावयाचे जास्तीचे टुल्स, इक्वीपमेन्ट इ. साहित्य निदेशकांचे ताब्यात असतात प्रात्यक्षिकानुसार व आवश्यकतेनुसार ते प्रशिक्षणार्थ्यांना देऊन परत घेत असतात. सदरील प्रशिक्षणार्थी व निदेशक यांचेकडील साहित्य प्रात्यक्षिक झाले नंतर व्यवस्थित ठेवणेकामी लॉकर्स व स्टोअरवेल कपाटे, आवश्यक असतात. बहुतांशी निदेशक व प्रशिक्षणार्थी यांचेकडील लॉकर्स, कपाटे, टेबल व खुर्च्या १९८४ ते १९९३ दरम्यान घेतलेली असल्यामुळे खराब झालेले आहेत. सत्र २००७-०८ मध्ये सुरु करणेत आलेले नविन व्यवसायातील प्रशिक्षणार्थी, निदेशक यांनाही लॉकर्स व कपाटे खुर्ची व टेबलची अद्याप खरेदी बाकी आहे. त्यामुळे लॉकर्स, स्टोअरवेल कपाटे निदेशक खुर्ची व टेबल खरेदी करणे आवश्यक झाले आहे.

संदर्भ क्र.१ चे टिपणी वरील आदेशानुसार खराब झालेल्या वस्तूचा माहिती तक्ता तयार करुन अंतर्गत लेखापरिक्षण यांचेकडून तपासून घेऊन सदर वस्तू रेकॉर्ड विभागामार्फत विक्री करण्यात आलेल्या आहे. त्यामुळे खालील फर्निचर तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **साईज** | **वर्णन** | **कंपनी** | **संख्या** | **फर्निचरची** |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | आवश्यकता कशासाठी याचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | कॉम्पॅक्ट टेबल स्क्वेअर टॅब्युलर अंडस्ट्रक्चर ३ ड्राव्हर | १२००W X ५९० D X ७५० H MM | मॉडेल नं. टि १०१ | गोदरेज | १० | १८ ते २५ वर्षापासून वापरात असल्याने खराब झालेले असल्यामुळे |
| ०२ | गोदरेज स्टोरफ्लेक्स केडी कपाट प्लेन ॲडजेस्टेबल सेल्फ माउंटींग ४ नग फुल ॲडजेस्टेबल सेल्फ | ९००mm (W) X ४५०mm (D) X १८३०mm (H) | KSTC २२ (COMBI) | गोदरेज | ३० | --"-- |
| ०३ | गोदरेज स्टोरफ्लेक्स केडी एसटीएम | ९००mm X ४५०mm X ११६७mm (H) | केडी एसटी एम (मायनर) | गोदरेज | ०६ | --"-- |
| ०४ | पर्सोनल लॉकर्स गोदरेज ६ डोअर मॉडेल प्रिंन्स ग्रे कलर्स विदाऊट लॉक | १८३०० X ४५७ X ३८० mm | प्रिंन्स ग्रे कलर्स | गोदरेज | २० | --"-- |
| ०५ | पर्सोनल लॉकर्स १५ डोअर फुल १८ गेज | ७८ X ३६ X १९ Inch. | प्रिंन्स ग्रे कलर्स | गोदरेज/ बेस्ट क्वालिटी | २३ | --"-- |
| ०६ | गोदरेज चेअर मॉडेल CH १००७ अपहोल्स्टर्ड सीटस ॲण्ड बॅक्स | --- | CH १००७ | गोदरेज | ३२ | --"-- |
| ०७ | गोदरेज टास्क चेअर पीसीएच-४१०३ | --- | पीसीएच-४१०३ | गोदरेज | ३२ | --"-- |
| ०८ | गोदरेज चेअर मॉडेल पीसीएच ५००२ टी. | | पीसीएच ५००२ टी. | गोदरेज | ०२ | --"-- |
| ०९ | गोदरेज मल्टीसिटर चेअर मॉडेल एल-४३ ट्रिपल सिटर | | एल-४३ ट्रिपल सिटर | गोदरेज | ०१ | --"-- |
| १० | स्टुल निलकमल मॉडेल एसटीएल ०९ ड्रॉईंग (हॉलसाठी) | | एसटी एल ०९ | निलकमल | ४२ | --"-- |
| ११ | क्लासरुम स्टुडंट ड्राईंग टेबल मॉडेल विनर | W ६०० mm x D ४०० mm x H ७४० mm | मॉडेल विनर कलर मेटॅलिक सिल्व्हर ग्रे. बेव्हॅरीयन बीच टॉप | गोदरेज | ४२ | --"-- |

वरिलप्रमाणे फर्निचर खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु.८७९३६०/- व १२.५% व्हॅट इतका खर्च अपेक्षित आहे. सदरील फर्नीचर खरेदी प्रचलित पध्दतीने निवीदा मागवुन खरेदीस व खर्चास / किंवा साईभक्त देणगीदारांकडून देणगी रुपाने उपलब्ध होत असल्यास घेणेस तसेच सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीमध्ये निर्णय होणेकामी सादर.

**निर्णय क्र.३८३** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे फर्निचर प्रचलित पध्दतीने निवीदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.८७९३६०/- व १२.५% व्हॅट खर्चास किंवा साईभक्त देणगीदारांकडून देणगी रुपाने उपलब्ध होत असल्यास ती घेणेस मान्यता देण्यात आली. फर्निचर घेणेपूर्वी सदरहू फर्निचरचा नमूना मा.व्यवस्थापन समिती सदस्यांकडून मान्य करुन घेणेत यावा,असें ठरले.** (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय.)

---

**विषय नं.२९** **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑगष्ट-२०१० सत्रामध्ये प्रशिक्षणार्थी प्रवेशाबाबत.**

**प्रस्ताव-** औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये ऑगस्ट २०१० चे सत्रापासून सुरु होणारे शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया माहे जुन २०१० पासून सुरु करावी लागणार आहे. त्याची पुर्वतयारी करण्यासाठी प्रवेश प्रणालीच्या धोरणात्मक बाबींवर आवश्यक तो निर्णय मा. व्यवस्थापन समिती यांचेकडून होणे आवश्यक आहे.

मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीने दि. १७/०५/२००९ रोजी झालेल्या सभेत विषय नं. ५२ निर्णय क्र. ४३० अन्वये उमेदवारांच्या प्रवेश प्रक्रिये बाबत निर्णय घेण्यात आला.

सन १९९६ पासून शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि.मी. त्रिज्येत येणा-या खालील गावातील उमेदवारांना प्रवेशासाठी उपलब्ध जागांच्या ८० % जागा राखीव ठेवून उर्वरीत २०% जागा सर्व उमेदवारांना खुल्या ठेवण्यात येतात. शिर्डीसह शिर्डी पासून १५ कि.मी. परिसरात कायम वास्तव्य असणारा उमेदवार हा त्या गांवातील मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतच इयत्ता ८ वी, ९ वी, १० वी शिक्षण घेऊन व वार्षिक परिक्षेत बसून उत्तीर्ण झालेला असावा. याशिवाय क्वचीत प्रसंगी अर्जदारांचे बहुतांश शिक्षण १५ कि.मी. मधिल गांवात झालेले असते, पैकी १० वी, १२ वी किंवा एखाद-दुसरे वर्ष

परिसरा बाहेर शिक्षण झालेले असेल त्यांचा अर्ज १५ कि.मी. साठीच्या जागांवर घेण्याचा प्रकरणपरत्वे निर्णय घेणेचे अधिकार प्राचार्य यांना असावेत.

शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि.मी.त्रिज्येत येणा-या गावांची नांवे खालीलप्रमाणे (तक्ता क्र.१)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | राहाता | २५ | बहादराबाद | ४९ | रांजणगांव-देशमुख |
| २ | साकुरी | २६ | शहापुर | ५० | अंजनापूर |
| ३ | दहिगांव-को-हाळे | २७ | पोहेगांव खु | ५१ | बहादरपुर |
| ४ | पिंपळस | २८ | पोहेगांव बु | ५२ | मढी बु |
| ५ | को-हाळे | २९ | चांदेकसारे | ५३ | मढी खु |
| ६ | नांदुर्खी बु | ३० | घारी | ५४ | देर्डे-को-हाळे |
| ७ | नांदुखी खु | ३१ | डाऊच खु | ५५ | देर्डे-चांदवड |
| ८ | डो-हाळे | ३२ | रास्तापुर | ५६ | चांदगव्हाण |
| ९ | कनकुरी | ३३ | नाथुपाटलांची वाडी | ५७ | डाऊच बु |
| १० | निमगांव-को-हाळे | ३४ | एकरूखे | ५८ | हिंगणी |
| ११ | निघोज | ३५ | गणेशनगर | ५९ | मुर्शतपुर |
| १२ | सावळीविहीर खु | ३६ | रांजणगांव | ६० | कोपरगांव |
| १३ | सावळीविहीर बु | ३७ | अस्तगांव | ६१ | धारणगांव |
| १४ | सोनेवाडी | ३८ | कालेवाडी | ६२ | जेऊर पाटोदा |
| १५ | पिंपळवाडी | ३९ | संवत्सर | ६३ | जेऊर कुंभारी |
| १६ | रूई | ४० | कोकमठाण | ६४ | शिंगणापूर |
| १७ | केलवड | ४१ | लक्ष्मणवाडी | ६५ | रामपूर |
| १८ | खडके-वाके | ४२ | कान्हेगांव | ६६ | आदमाने वस्ती |
| १९ | काकडी | ४३ | वारी | ६७ | आडगांव |
| २० | डांगेवाडी | ४४ | देवगांव | ६८ | पिंपरी - निर्मळ |
| २१ | डांगेवाडी-कोपरगांव | ४५ | पुणतांबा | ६९ | धनगरवाडी |
| २२ | सोयेगांव | ४६ | रामपुरवाडी | ७० | शिंगवे |
| २३ | वेस | ४७ | वाकडी | ७१ | सडे |
| २४ | जवळके | ४८ | मनेगांव | ७२ | शिर्डी |

संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यासाठी विशेषबाब म्हणून विहीत केलेल्या परिक्षेत त्याना मिळालेल्या एकूण गुणात २ % वाढ करून गुणवत्ता यादी तयार करण्यात येते मात्र ही सवलत मुलगा किंवा मुलगी यांचेसाठी, एखाद्या कर्मचा-यास त्याच्या सेवाकाळात एकदाच मिळते.

शासनाने विहीत केलेल्या आरक्षण पध्दती प्रमाणेही मागासवर्गीयांसाठीचे जागांचे आरक्षण ठेवण्यात येते. ते पुढीलप्रमाणे

**अ - मागासवर्गीयासाठी राखीव जागा (तक्ता क्र. २)**

| | | |
|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती व बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्ती | १३ % |
| २ | अनुसचित जमाती (विशिष्ट भागा बाहेरील जमाती धरून) | ७% |
| ३ | विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती ) | ३% |
| ४ | भटक्या जमाती (एन टी-१)( जुलै-१९९० पुर्वीच्या २८ व तत्सम ) | २.५ % |
| ५ | भटक्या जमाती (एनटी-२ ) ( धनगर व तत्सम जमाती ) | ३.५ % |
| ६ | भटक्य जमाती ( एनटी-३ ) (वंजारी व तत्सम जमाती ) | २ % |
| ७ | इतर मागास वर्गीयांकरीता | १९ % |

एकूण- ५० %

**ब.** अपंग उमेदवारांसाठी ३ % आरक्षण.

**क.** महिलांसाठी व्यवसाय निहाय २५ % आरक्षण.

**ड.** तांत्रिक विषयासह परीक्षा पास उमेदवारांना व्यवसाय निहाय २५ % आरक्षण

**इ.** संरक्षण सेवेतील व्यक्तीसाठी १ % जागा राखीव.

**फ.** सर्टिफाईड ( बोल्स्टर ) स्कुलमधील व्यक्ती १% जागा राखीव.

महिलांसाठी असलेल्या व्यवसाय निहाय २५% आरक्षणामध्ये बदल होऊन ते ३०% झालेले आहे. श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये २००९ च्या सत्रामध्ये प्रवेशासाठी व्यवसाय, तसेच क्षेत्र निहाय जागांची विभागणी खालीलप्रमाणे केली होती. ऑगस्ट २०१० साठीही त्याप्रमाणे प्रवेश देता येतील.

(तक्ता क्र. ३)

| अ. नं. | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रवेश क्षमता | सुपर | एकूण जागांची प्रवेशासाठी क्षेत्र निहाय विभागणी |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | न्युमररी जागा ३० % | शिर्डी व शिर्डी पासून १५ कि.मी. परीसरात कायम वास्तव्य असणारे उमेदवार | उर्वरीत सर्व उमेदवार |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | टूल अँड डाय मेकर (जिग्ज ॲण्ड फिक्चर) | इ. १० वी उत्तीर्ण | ०३ वर्षे | १६ | ०५ | १७ | ०४ |
| २ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०४ | १३ | ०३ |
| ३ | मशिनष्ट ग्राईण्डर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०४ | १३ | ०३ |
| ४ | फिटर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | १७ | ०४ |
| ५ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | १७ | ०४ |
| ६ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | १७ | ०४ |
| ७ | रेफ्रिजरेशन, ॲण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | १७ | ०४ |
| ८ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | १७ | ०४ |
| ९ | वेल्डर (गॅस ॲण्ड इलेक्ट्रीक) | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | २४ | ०७ | २५ | ०६ |
| १० | ट्रॅक्टर मकॅनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ३२ | १० | ३४ | ०८ |
| ११ | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामर ॲसिस्टंट (कोपा) | इ. १२ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ४० | १२ | ४२ | १० |
| १२ | क्राफ्टस्मन फुड प्रॉडक्शन (व्हेज) | इ. १० वी उत्तीर्ण् | १ वर्ष | १६ | ०५ | १७ | ०४ |
| | | | | २३२ | ७२ | २४६ | ५८ |

वरिलपैकी अनुक्रम नं. १ ते १२ च्या सर्व व्यवसायांना व तुकडयांना केंद्र शासनाची कायमची मान्यता (संलग्नता) पुर्वीच मिळालेली आहे.

टूल अँड डाय मेकर हा व्यवसाय तीन वर्षे कालावधीचा असून केंद्र दोन सत्रांमध्ये चालत असल्याने ऑगस्ट २०१० पासूनच्या सत्रामध्ये या व्यवसायात प्रवेश द्यावा लागेल. मागील वर्षी वर दर्शविलेल्या रकाना क्र. ६ मध्ये एकूण मंजूर जागांच्या २०% सुपरन्युमररी (जादा) भरावयाच्या होत्या. तथापी या जादा जागा २०% ऐवजी ३०% भरण्यास शासनानी मान्यता दिल्यामुळे ३०% प्रमाणे भरल्या आहेत. या पुढेही जादा जागा शासनाकडून मान्यता मिळेल त्याप्रमाणे भरता येतील.

तक्ता क्र. ३ मध्ये दर्शविलेल्या सुपरन्युमररीच्या अतिरीक्त जागा भरणेसाठी मागील दोन वर्षात प्रशिक्षण सोडून गेलेल्या उमेदवारांचे प्रमाणास अनुसरून शासनाकडे विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर करावा लागतो. शासनाकडून मंजूरी मिळाले नंतर या अतिरीक्त जागा भरणेबाबत कार्यवाही करण्यात येते. या जागा भरण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळेलच असे नाही. तसा बदल झाल्यास संबंधीत प्रवर्गामध्ये त्याची विभागणी करुन त्यावर प्रवेश देता येईल. मागील दोन वर्षा पासून सुपरन्युमररी जागेवर शासनाच्या मान्यतेनंतर मा. व्यवस्थापन समितीच्या निर्देशनानुसार प्रवेश देण्याचे ठरले. त्याबाबतची माहिती माहिती पुस्तकात देण्यात आली.त्या जागांना गुणानुक्रम व आरक्षण यांचे बंधन पाळता येत नाही. त्यामुळे आता या जागांसाठी गुणानुक्रम व आरक्षण याचे बंधन असणार नाही असे माहीती पूस्तकात नमुद केले आहे. तसे या पुढेही करता येईल.

उमेदवारांना निवडपत्र व संधीपत्र पाठविणात येणार नाहीत, त्याऐवजी अर्ज स्विकतीचे वेळी प्रवेश प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक देण्यात येते. त्यानुसार त्या त्या प्रवेश फेरीनुसार प्रवेश देण्यात येतात.

उमेदवाराने अर्जात व्यवसायाचे नांव लिहू नये, आलेल्या अर्जांची शैक्षणिक अर्हतेनुसार गुणवत्ता यादी तयार करून, या यादीस अनुसरून व आरक्षण पध्दतीची अमंलबजावणी करून उमेदवारांच्या पसंतीनुसार व्यवसायास प्रवेश देवून प्रवेश प्रक्रिया पुर्ण करण्यात येते.

शैक्षणिक शुल्क व अनामत रक्कम :-

ऑगष्ट २००८ च्या सत्रा पासून शैक्षणिक शुल्क तक्ता क्र. ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे व अनामत रक्कम रु. ५०००/- मात्र ऐवढी आकारण्यात येत असे तसेच दि. ०७/०७/२००८ च्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय नं. ०२ निर्णय क्र. ५६० नुसार, संस्थेच्या दर्जानुसार व व्यवसायाच्या (ट्रेडच्या) प्रकार गटानुसार वेगवेगळी प्रशिक्षण शुल्क निश्चित करण्यात आलेली आहे.

आपले औ.प्र. केंद्राला शासनाचा च्अछ दर्जा प्राप्त झालेला आहे. त्यानुसार आपल्या संस्थेतील व्यवसायांना खालीलप्रमाणे प्रशिक्षण शुल्क प्रतिविद्यार्थी प्रति वर्षी घेण्यात येते.

तक्ता क्र. ४

| अ. नं. | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रवेश क्षमता | सुपर न्युमररी जागा | एकूण जागा | प्रति वर्ष प्रती प्रशिक्षणार्थी सुधारीत प्रशिक्षण शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | टूल अँड डाय मेकर | इ. १० वी उत्तीर्ण | ०३ वर्षे | १६ | ०५ | २१ | रु. १२,०००/- |
| २ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०४ | १६ | रु. १२,०००/- |
| ३ | मशिनष्ट ग्राईंण्डर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०४ | १६ | रु. १२,०००/- |
| ४ | फिटर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | २१ | रु. ०८,४००/- |
| ५ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | २१ | रु. ०८,४००/- |
| ६ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | २१ | रु. ०८,४००/- |
| ७ | रेफ्रिजरेशन, अॅण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | २१ | रु. ०८,४००/- |
| ८ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०५ | २१ | रु. ०८,४००/- |
| ९ | वेल्डर | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | २४ | ०७ | ३१ | रु. ०८,४००/- |
| १० | ट्रॅक्टर मर्कॅनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ३२ | १० | ४२ | रु. ०८,४००/- |
| ११ | कॉम्प्युटर ऑपरेटर अॅण्ड प्रोग्रामर अॅसिस्टंट (कोपा) | इ. १२ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ४० | १२ | ५२ | रु. ०८,४००/- |
| १२ | क्राफ्टस्मन फुड प्रॉडक्शन (व्हेज) | इ. १० वी उत्तीर्ण् | १ वर्ष | १६ | ०५ | २१ | रु. ०६,०००/- |
| | | | | २३२ | ७२ | ३०४ | |

औ.प्र.संस्थेची प्रवेश प्रक्रिया मा. व्यवस्थापन समितीने संमत केलेल्या निर्णयानुसार तसेच शासनाने जारी केलेल्या प्रवेश नियमावलीनुसार पुर्ण करण्यात येते. शासनाने प्रवेश पध्दतीत काही बदल केल्यास त्यानुसार माहिती पुस्तिकेत बदल करण्यात येतो. तसेच संस्थेमध्ये नियमित अभ्यासक्रमांबरोबरच MS-CIT, City & Guild, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ यांचेही अभ्यासक्रम चालतात. तसेच केंद्र शासनाच्या मॉडयुलर एम्प्लॉएबल स्किम (MES) या योजनेतील अभ्यासक्रमही चालविणे प्रस्तावित आहे. यांची तसेच संस्थानच्या निरनिराळया कार्यक्रमात औ.प्र.संस्थेचा सहभाग असतो. त्या दृष्टीने व शिस्तीच्या दृष्टीने प्राचार्य यांना आवश्यक वाटतील त्या विदयार्थी व पालक यांच्यासाठीच्या सूचना माहिती पुस्तकात समाविष्ठ करता येतील. चालू वर्षी पासून प्रवेशाबाबत होणा-या निर्णयानंतर त्यानूसारचे आवश्यक तेवढे फेरबदल माहिती पुस्तीकेमध्ये नमुद करता येतील.

तरी वरिलप्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र-ऑगस्ट २०१० चे प्रशिक्षणार्थी प्रवेश देणेकामी मा. व्यवस्थापन समितीमध्ये निर्णय होणेकामी सविनय सादर.

**निर्णय क्र.३८४ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय.)

---

**विषय नं.३० औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी ऑगष्ट-२०१० पासून सुरु होणाऱ्या सत्रासाठी (अ) कच्चामाल (ब) प्रशिक्षणार्थी स्टेशनरी (क) कार्यशाळा गणवेश (ड) माहिती पुस्तीका व प्रवेश अर्ज छपाई (इ) प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने त्यांना गणवेश व शूज खरेदी (ई) स्टाफ युनिफॉर्म खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे नविन शैक्षणिक वर्ष ऑगष्ट २०१० पासून सुरु होत आहे, त्यासाठी प्रात्यक्षिक कच्चा माल,प्रशिक्षणार्थी स्टेशनरी, कर्मचारी नियमीत गणवेष,प्रशिक्षणार्थ्यांसाठी गणवेष व कार्यशाळा गणवेष व माहिती पुस्तिका छपाई करावे लागणार आहेत. संस्थेमार्फत प्रशिक्षणार्थ्यांना स्टेशनरी व कार्यशाळा गणवेष पुरविला जातो. प्रात्यक्षिकासाठी कच्चा माल द्यावा लागतो. संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांचे नियमीत गणवेष व शुज सॉक्स हे विद्यार्थ्यांच्या खर्चाने देण्यात येतात.

संस्थेतील व्यवसाय तुकडया एकुण प्रशिक्षणार्थी संख्या यांची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

| अ.क्र. | व्यवसायाचे नांव | युनीट | प्रथम वर्ष व्यवसाय तुकडया | व्दितीय वर्ष व्यवसाय तुकडया | एकूण प्रशिक्षणार्थ्या संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | टुल अॅण्ड डायमेकर | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०२ | इलेक्ट्रीशियन | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०३ | मोटर मेकॅनीक (व्हेईकल) | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०४ | फिटर | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०५ | मेकॅनीक आर.ए.सी. | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०६ | मशिनीष्ट ग्राइंडर | ०२ | १६ | १६ | ३२ |
| ०७ | टर्नर | ०२ | १६ | १६ | ३२ |
| ०८ | आय.टी.अॅण्ड ई.एस.एम. | ०२ | २१ | २१ | ४२ |
| ०९ | कॅम्पुटर ऑपरेटर अॅण्ड प्रोग्रामींग अॅसिस्टंट | ०२ | ५२ | ... | ५२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | वेल्डर | ०२ | ३१ | ... | ३१ |
| ११ | ट्रॅक्टर मेकॅनीक | ०२ | ४२ | ... | ४२ |
| १२ | क्राप्टसमन फुड प्रॉडक्शन | ०१ | २१ | ... | २१ |
| | | | ३०४ | १५८ | एकुण -४६२ |

यामध्ये प्रशिक्षणार्थीनीची संख्या १५ ते ५० पर्यंत होउ शकेल.

अ) प्रात्यक्षिक कच्चा माल खरेदी :-

या शैक्षणिक वर्षासाठी लागणारा प्रात्यक्षिक कच्चा माल व भांडारमध्ये शिल्लक असलेला कच्चा माल यांची पडताळणी करुन खरेदीकरीता आवश्यक असलेल्या कच्या मालाचे खरेदीकामी रु. ४,७५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

ब) प्रशिक्षणार्थी स्टेशनरी खरेदी:-

| अ. क्र. | स्टेशनरी तपशिल | आवश्यक | उपलब्ध | खरेदी आवश्यक | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | जॉबशिट वही १५० पानी मॅपलिथो कागद ८० जीएसएम दोन्ही बाजुंनी पुठ्ठा बायडींग ३४x२१ से.मि. (छपाई नमुन्या प्रमाणे) | ५०० नग | २५ नग | ४७५ नग | ८५/- | ४०३७५.०० |
| ०२ | जॉबशिट वही ५० पानी मॅपलिथो कागद ८० जीएसएम दोन्ही बाजुंनी पुठ्ठा बायडींग ३४x२१ से.मि. (छपाई नमुन्या प्रमाणे) | २०० नग | १२ नग | १९० नग | ४०/- | ७६००.०० |
| ०३ | थेअरी पेपर्स (१०० नगाचा ०१ पॅड) मॅपलिथो कागद ८० जीएसएम,३४x२१ से.मि. (नमुन्या प्रमाणे) | १२५० नग | ३६० नग | ८९० पॅड | ५०/- | ४४५०० |
| ०४ | स्केच पेपर्स (१०० नगाचा ०१ पॅड) मॅपलिथो कागद ८० जीएसएम,३४x२१ से.मि. लेदर बायडींग (नमुन्या प्रमाणे) | ६०० नग | ५५१ नग | ५० नग | ५०/- | २५००.०० |
| ०५ | दैनंदिनी छापील ७० पेजेस (नमुन्या प्रमाणे) जे.के.बॉण्ड पेपर | ५०० नग | ०३ नग | ५०० नग | ५०/- | २५०००.०० |
| ०६ | ड्रॉईंग शिट हाफ इंम्पेरीयल २५ नगाचा एक सेट सनशाईन कागद | १०० सेट | ५० सेट | ५० सेट | ६०/- | ३०००.०० |
| ०७ | २ क्वायर रजिष्टर ३४x२१ से.मि. (नमुन्या प्रमाणे) | ५०० नग | ५२ नग | ४५० नग | ४०/- | १८०००.०० |
| ०८ | ड्रॉईंग १/४ इंपेरीयल रजिष्टर ५० शिटचे एक रजिष्टर सन शाईन कागद ५६x३६ से.मि. (कागद व छपाई नमुन्या प्रमाणे ) | ५०० नग | ६१ नग | ४४० नग | ७०/- | ३०८००.०० |
| ०९ | CFP प्रॅक्टीकल जर्नल १०० पानी लेजर पेपर ७० जीएसएम,साईज ३४ x २१ से.मि. | १०० नग | ०२ नग | १०० नग | ६०/- | ६०००.०० |
| १० | सेट स्क्वेअर ओमेगा कंपनी ४५ व ६० अंश | ५०० नग | ४०२ नग | १०० नग | ३०/- | ३०००.०० |
| | | | | | एकुण... | १८०७७५.०० |

क) गणवेष :- संस्थान मार्फत खरेदी :-

| अ.क. | तपशिल | संख्या | आवश्यक नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | शिक्षक कर्मचारी नियमीत गणवेष व दोन टाय | ३३ | ६६ | १२५०/- | ८२५००.०० |
| ०२ | प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष (डांगरी) | ३०५ | ३०५ | ५५०/- | १६७७५०.०० |
| ०३ | CFP प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष | २१ | २१ | ६००/- | १२६००.०० |
| ०४ | COPA प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष | ५२ | ५२ | २००/- | १०४००.०० |
| ०५ | मुलींसाठी ॲप्रान | ५० | ५० | २००/- | १००००.०० |
| | | | | एकुण... | २८३२५०.०० |

यामध्ये मुलींची सख्या कमी-जास्त होउ शकते त्यामुळे वरील मुलांच्या संख्येमधुन आवश्यकतेनुसार कमी-जास्त करता येईल.

ड) माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज छपाई बाबत. :-

श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची सत्र ऑगष्ट २००९ मधील प्रवेश प्रक्रिया एस.एस.सी.चा निकाल घोषीत झालेच्या दुस-या दिवसापासुन सुरु होत असते. प्रवेशाबाबतची माहिती उमेदवारांना देणेकामी संस्थेची माहिती पुस्तिका छपाई करुन घ्यावी लागते. त्यामध्ये संस्थेमध्ये चालविले जाणारे व्यवसाय, प्रवेश पध्दती, संस्थेची नियमावली व इतर माहिती उमेदवारांना माहिती पुस्तिकेतुन दिली जाते.

महाराष्ट्र शासनाकडून आपले संस्थेला मागील आठ वर्षा पासून सतत च अ च दर्जा प्राप्त झालेला आहे. एकवेळ राज्यात व्दितीय तर तिन वेळा महाराष्ट्रात प्रथम क्रमांकही पटकविलेला आहे. तसेच संस्थेने केंद्र शासनाचा उत्कृष्ट संस्था पुरस्कारही जिंकला आहे. संस्थेमध्ये प्रशिक्षण कार्यक्रमासोबतच इतरही उपक्रम राबवीले जातात. यामध्ये वार्षिक स्नेहसंमेलन, वार्षिक क्रिडा स्पर्धा, विभागीय,राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय पातळीवरील कौशल्य स्पर्धा परीक्षा कार्यशाळा, विविध नामांकित कंपन्यामार्फत नोकरी व शिकाउ उमेदवारीसाठी संस्थेमध्ये कॅम्पस मुलाखतीचे आयोजन केले जाते, श्री गणेशोत्सव, खंडेनवमी उत्सव, प्रशिक्षणार्थीसाठी व्यवसाय मार्गदर्शन, Aids या विषयावर व्याख्यान इत्यादी तसेच सामाजीक कार्यामध्येही कायम सहभाग असतो. अशा प्रकारे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून समाजासाठी हा अत्यंत उपयुक्त उपक्रम अत्यंत प्रभावीपणे राबवीला जातो. या दृष्टीने या सर्व उपक्रमांची माहिती माहिती पुस्तिकेतुन उमेदवार व समाजापर्यंत प्रतिवर्षी प्रमाणे पोहचविणे आवश्यक वाटते.

याकरीता यावर्षीच्या माहिती पुस्तिकेमध्ये वरील सर्व उपक्रमांची माहिती तसेच वेळोवेळी संकलीत केलेले फोटोग्राफ्स समाविष्ठ करुन माहिती पुस्तिका छपाई करुन घ्यावी असे मत आहे.

मागील वर्षी ४००० माहिती पुस्तिका, प्रवेश अर्ज व प्रवेश कार्यक्रम पत्रिका हे रु.९.०० प्रती नग या दराने छपाई करुन रु.१०/- या दराने वितरीत केली. यावर्षी चांगल्या दर्जाची माहिती पुस्तिका छपाई करुन घेतलेस अंदाजे रु.१०/- ते १५/- खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार रु.१५/- या दराने ती वितरीत करता येईल. या प्रमाणे माहिती पुस्तिका व नियमावली मागील वर्षीपेक्षा वाढीव व दर्जेदार पानांसह ५००० नग पर्यंत छपाईसाठी रु.७५०००/- खर्च अपेक्षित आहे.

इ) गणवेष व शुज विद्यार्थ्यांच्या खर्चाने खरेदी :-

| अ.क्र. | तपशिल | संख्या | आवश्यक नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रशिक्षणार्थी नियमीत गणवेष (६१० अधिक १५४) | ७६४ | ७६४ | ५००/- | ३८२०००.०० |
| ०२ | मुलींसाठी सलवार कुर्ता (१०० अधिक ०३) | १०३ | १०३ | ४००/- | ४१२००.०० |
| ०३ | प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षणार्थीनी शुज | ३०५ | ३०५ | ५००/- | १५२५००.०० |
| | | | | एकुण... | ५७५७००.०० |

यामध्ये मुलींची सख्या कमी-जास्त होउ शकते त्यामुळे वरील मुलांच्या संख्येमधुन आवश्यकतेनुसार कमी-जास्त करता येईल.

अशी वरील अ, ब, क व ड नुसार एकुण रु.१०,१४,०२५/-ची खरेदी ही न्युनतम दर असलेल्या पुरवठादाराकडून करता येईल. तसेच वरील (इ) चे प्रशिक्षणार्थ्यासाठीचे नियमीत गणवेष व शुज प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने सध्या प्रथम वर्षात शिकत असलेले परंतु ऑगष्ट २०१० पासून व्दितीय वर्षात जाणा-या तसेच ऑगष्ट २०१० पासून नव्याने प्रवेश घेणा-या प्रशिक्षणार्थ्यांनाही द्यावे लागणार असुन त्यांचेकडून त्यासाठी लागणारी रक्कम अनामत जमा घेउन ती एकत्रीतपणे प्रशिक्षणार्थी युनीफॉर्म,शुज अनामत या शिर्षाखाली संस्थानच्या लेखाशाखेत जमा ठेवता येईल.होणारा खर्च वजा जाता उर्वरित रक्कम संबधीतांना परत करता येईल.

**निर्णय क्र.३८५ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय.)

---

**विषय नं.३१ युनिक ट्रेडर्स, मुंबई यांचे विरुद्ध न्यायालयीन निकालानंतर साहित्य वापराबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये सन १९९३ मध्ये मेकॅ.रेफ्रिजरेशन ॲण्ड एअर कंडीशनींग, मेकॅ.रेडिओ ॲण्ड टी.व्ही. व मशिनीष्ट ग्राईंडर हे तीन व्यवसाय सुरु करण्यात आले. त्याकरीता आवश्यक असलेले टुल्स इक्वीपमेंटस् साहित्य पुरविणेकामी मे.युनिक टेडर्स, मुंबई यांना पत्र क्र.११७११८ दि.०२/११/१९९३ अन्वये रक्कम रु.१२६३७२/- चा पुरवठा आदेश देण्यात आला. बील क्र.युटी/११०/१७१/९३ दि.१०/११/१९९३ नुसार पुरवठादाराने रक्कम रु.८५४५०/- नुसार मटेरीयल पुरविले, त्यातील बहुतःश मटेरीयल हे योग्य दर्जाचे व कंपनीचे नसल्याने ते स्विकारण्यास नकार देउन योग्य दर्जाचे साहित्य पाठविण्याचे कळविण्यात आले आहे. त्या बाबत पुरवठादाराने कुठलीही कार्यवाही न केल्यामुळे श्री साईबाबा संस्थान कडून मे.दिवाणी न्यायालय, वरिष्ठस्तर, कोपरगांव येथे अपील Spl.C.S.No. १८१/९६ दावा दाखल करण्यात आला.

त्यानंतर मुंबई कार्यालयात झालेल्या मा व्यवस्थापन मंडळाचे दि.२३/०३/१९९७ रोजीचे सभेसमोर मे.युनिक ट्रेडर्स,मुंबई यांचे प्रतीनीधी प्रत्यक्ष हजर राहुन तडजोड झली. पुरवठादाराने रिजेक्टेड माल परत घेउन संस्थानला रक्कम रु.९००००/- वसुलीपोटी (तीन समान हप्त्यामध्ये) देण्याचे ठरले ते त्यांनी तडजाडी नूसार कबुल केले. परंतु त्यानंतर मे.युनिक ट्रेडर्स, मुंबई यांनी वसुलीपोटी रक्कम रु.९००००/- संस्थानला परत केलेच नाही. तसेच रिजेक्ट माल देखील घेउन गेले नाही. त्याच प्रमाणे मा.कोर्टातही त्यांचे प्रतीनीधी हजर राहिले नाहीत.

दरम्यान उपरोक्त प्रकरणी मा.सिव्हील जज्ज (सिनीयर डिव्हीजन) कोपरगांव न्यायालय यांचे समोर संस्थान तर्फे दाखल केलेल्या दाव्याचा दि.२१/०२/२००२ रोजी खालील प्रमाणे संस्थानच्या बाजुने निकाल होउन संस्थानला रक्कम आदा करणेचा हुकुम झालेला आहे.

ORDER

1. Suit is decreed with cost against def.No. 1 & 2
2. Defendants 1 & 2 are directed to pay the suit claim alongwith future interest @ 15 % from the date of suit till realisation of the suit claim.
3. Decree be drawn up accordingly.

Date : 21.02.2002 (J.S.KAPRE)
Civil Judge S.D.Kopargaon.

तद्नंतर पुरवठादाराच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पत्र :-क्र. एसएसएस/आयटीआय/ स्टोअर/ ७३१/ २०४७/०७ दि.०९/०३/२००७, ८५२/५५०७/०७ दि.०४/०४/२००७, ११६४४/०८ दि.०८/०८/२००८ व ७११/६४४३/०८ दि.११/११/२००८ नुसार रजिष्टर पोष्टाने मे. न्यायालयाचे निकालपत्रा प्रतीसह पत्र पाठविले असता ती परत आली आहेत. तसेच संस्थानचे मुंबई कार्यालयाचे अधिक्षक श्री माणिक हेही चार-पाच वेळेस प्रत्यक्ष मे.युनिक ट्रेडर्स चे दिलेल्या पत्यावर समक्ष जाउनही प्रतिनीधीची भेट झाली नाही. आजू बाजूला चौकशी केली असता उपरोक्त नावाची कंपनी संबधीत पत्त्यावर नसल्याचे कळले. असे मुंबई कार्यालयाचे पत्र क्र.एसएसएस/वशी-मुं./२९००/२००८ दि.२ डिसेंबर, २००८ नूसार कळविले आहे. न्यायालयाचा निकाल संस्थानच्या बाजुने लागल्यानंतर मे.युनिक ट्रेडर्स,मुबंई यांनी त्याची कुठल्याही प्रकारची दखल घेतलेली दिसत नाही.

पुरवठादार त्याच्या पत्त्यावर शोध घेउनही सापडत नसल्याने त्याच्याकडून नुकसान भरपाई घेण्याच्या न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याने त्याचे औ.प्र.संस्थेत असलेले साहित्य प्रशिक्षणात वापरुन होणारे नुकसान काही प्रमाणात टाळता येईल. तरी साहित्य वापरास मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३८६ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

---

**विषय नं.३२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सन १९८४ ते १९९२ मध्ये सुरु केलेल्या ट्रेडचे नुतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची माहे ऑगस्ट १९८४ साली स्थापना झालेली आहे. सुरुवातीला संस्थेमध्ये इलेक्ट्रशियन, मोटार मेकॅनिक व्हेईकल व ट्रॅक्टर मेकॅनिक व सन १९९१ मध्ये फिटर व वेल्डर हे व्यवसाय, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालणालय,मुंबई व डीजीईटी नवी दिल्ली यांचे मान्यतेने सुरु करण्यात आले. व्यवसाय सुरु करण्यासाठी डीजीईटी नवी दिल्ली यांनी ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमातील मानकानुसार प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी ट्रेनि टुल किट , इक्वीमेंटस् व मशिनरींची आवश्यकता असते.

वरील ०५ व्यवसायांचे प्रात्याक्षिक प्रशिक्षणाकरीता सन १९८४व १९९१ मध्ये घेण्यात आलेले साहीत्य व मशिनरी प्रात्याक्षिकात वापरुन वापरुन खराब झालेले आहेत.ते बदलने आवश्यक आहे. तसेच डीजीईटी नवी दिल्ली यांनी अभ्यासक्रम पुस्तीकेत केलेल्या बदलानुसार काही साहीत्य मशिनरी नविन खरेदी करणे आवश्यक आहे.

इलेक्ट्रशियन,मोटार मेकॅनिक व्हेईकल, ट्रॅक्टर मेकॅनिक, फिटर व वेल्डर या व्यवसायांचे नुतनीकरण करण्यासाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | व्यवसायाचे नांव | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| ०१ | इलेक्ट्रशियन | ३०६९२०.०० |
| ०२ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | १८६७७००.०० |
| ०३ | ट्रॅक्टर मेकॅनिक | ११६८७७०.०० |
| ०४ | फिटर | ४८४३१०.०० |
| ०५ | वेल्डर | ४५८४६०.०० |
| | एकुण अंदाजे रु. | ४२८६१६०.०० |

वरील प्रमाणे ०५ व्यवसायाचे नुतणीकरण करणेकामी अंदाजे रु. ४२८६१६०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

मोटार मेकॅनिक व्हेईकल व ट्रॅक्टर मेकॅनिक या व्यवसायांचे प्रात्याक्षिकासाठी आवश्यक असलेले इंजिन्स हे निवीदाधारकांनी जर त्यांचे निवीदा मध्ये दर नमूद न केलेस प्रत्यक्ष मार्केट मधुन चालू स्थितीत असलेले चांगले इंजिन्स खरेदी करावे लागतील यानुसार साहित्य प्रचलित पध्दतीने खरेदी करता येईल किंवा देणगीदार भक्तांकडून देणगी मिळत असल्यास घेता येईल.

तरी वरील प्रमाणे व्यवसायांचे नुतणीकरण करणेकामी येणाऱ्या रक्कम रु. ४२८६१६० खर्चास मान्यता मिळणेस किंवा देणगीदार भक्तांकडून देणगी स्वरुपात स्विकारणेस मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळावी.

**निर्णय क्र.३८७ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे व्यवसायांचे नुतणीकरण करणेकामी येणाऱ्या रक्कम रु.४२,८६,१६०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू खर्च साईभक्त देणगीदारांकडून देणगी रुपाने उपलब्ध होत असल्यास सदर देणगी स्विकारणेत यावी, असें ठरलें.**

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय.)

---

**विषय नं.३३ श्रीसाईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागासाठी इन्स्ट्रूमेंट व ओ. टी. लाईट खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात सन २००६ साली आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर हा विभाग कार्यान्वित करणेत आलेला आहे. त्यावेळेस सदर विभागात शस्त्रक्रियेसाठी लागणारे वेगवेगळ्या कंपनीचे इन्स्ट्रुमेंट खरेदी करण्यात आलेली होती. तीच इन्स्ट्रुमेंट सध्या वापरात आहेत. परंतु रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ झाल्याने सध्या असलेली काही इन्स्ट्रुमेंट ही वापरुन खराब झालेली आहे, तर काही विशिष्ट प्रकारच्या शस्त्रक्रियेसाठी विशिष्ट इन्स्ट्रुमेंटची आवश्यकता आहे. त्यामुळे आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाने दि.०८/१२/२००९ चे पत्रान्वये त्यांना लागणाऱ्या इन्स्ट्रुमेंटची तातडीने मागणी केलेली आहे.

सदरचे इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी इकडील दि.१४/१२/२००९ पत्रान्वये अंदाजे खर्चासाठी दर पत्रक मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन इन्स्ट्रुमेंट खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

यादीप्रमाणे इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी अंदाजे रु. १६,३९,२११.३७ इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी इन्स्ट्रुमेंट खरेदीस व याकामी येणाऱ्या रु. १६,३९,२११/- चे खर्चास व विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदी मान्यता असावी.

**निर्णय क्र.३८८ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे इन्स्ट्रुमेंट विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु. १६,३९,२११/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक )

---

**विषय न.३४ सन २००९-२०१० या वर्षातील मंजूर दराने औषधे व सर्जिकल साहित्य खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे व सर्जिकल साहित्याकरीता सन २००९-२०१० या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

त्यानुसार पुरवठाधारकांनी पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सध्या सोबतच्या यादीतील औषधे व सर्जिकल साहित्याचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही रुग्णालयात पेशंटच्या सततच्या वाढणाऱ्या संख्येमुळे औषधे व सर्जिकल साहित्याचा वापर देखील वाढलेला आहे. तसेच कार्डीयाक ऑपरेशन थिएटर मधील ऑपरेशनच्या संख्येत वाढ झालेली आहे.

सन २०१०-११ या वर्षाकरीता औषध खरेदीकामी जाहिरात देऊन दि.१५.०२.२०१० अखेर निविदा मागवण्यात आल्या होता. परंतू सध्या सदरची प्रक्रिया तुर्त स्थगित ठेवण्यात आली आहे. पुढील औषधे उपलब्ध होई पर्यंत औषधांचा तुटवडा भासु नये व रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता तुर्तास तीन महिने पुरु शकेल इतका औषधे खरेदी करावी लागणार आहे. त्याचा तपशिल सोबत सादर केला आहे.

सदरचे औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी पुरवठाधारकांचे वार्षिक मंजुर दरानुसार रु.९८,७८,३१३.४३ इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ निर्णय क्रमांक ३५४ Clause No.८ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे

तरी औषधे व सर्जिकल साहित्य वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.९८,७८,३१३.०० चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३८९ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे औषधे व सर्जिकल साहित्य वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.९८,७८,३१३/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३५ श्री साईनाथ रुग्णालयातील नवीन ई.एन.टी. व ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर व पेडीयाट्रीक आय.सी.सी.यू करीता किरकोळ साहित्य खेरदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयात सध्या होत असलेल्या जागेच्या अडचणीमुळे व रुग्णांचे गैरसोयीमुळे धर्मशाळा इमारत नं. २ व्यतिरीक्त अजुन एक धर्मशाळा इमारत नं. १ वापरण्यास देण्यात आलेली आहे.

त्यानुसार दोन्हीही इमारतीत सध्या असलेल्या विविध वॉर्ड, ऑपरेशन थिएटर इत्यादीचे नियोजन करण्यात आलेले असून नविन नियोजनानुसार धर्मशाळा इमारत नं. २ या इमारतीत दुसऱ्या मजल्यावर काही विभाग/वार्ड इमारत नं १ मध्ये स्थलांतरीत करुन तेथे नविन १० बेडचे आय.सी.सी.यु. करावयाचे असून ई.एन.टी. व ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर हे दोन शस्त्रक्रिया विभाग इमारत नं. १ मध्ये तयार करण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच धर्मशाळा इमारत नं. २ मधील सध्याच्या आय.सी.सी.यु. मध्ये ४ बेडचे पेडीयाट्रीक आय.सी.सी.यु. सुरु करावयाचे आहे. तर सध्याच्या ऑपरेशन थिएटर मध्ये जनरल, गायनिक व आर्थोपेडीक शस्त्रक्रिया कार्यान्वित असणार आहेत.

त्यानुसार मोठ्या मशिनरी उपकरणे इत्यादी खरेदीकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला आहे व त्यानुसार सदर खरेदीकामीची कार्यवाही स्वंतत्रपणे चालु आहे. तर दोन्ही ओ.टी. कार्यान्वीत करण्यासाठी काही किरकोळ साहित्याची आवश्यकता होती. त्यासाठी अंदाजे रु.२५,०००/- चे खर्चास दि.१७/०२/२०१० चे टिपणीन्वये मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांची मंजुरी मिळालेली होती.

सदर किरकोळ साहित्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| Sr. No. | Description | E.N.T./ Opthal | ICCU | Pead. ICCU | Total Qty. | App. Rate Per | App.Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| A | **Furniture** | | | | | | |
| 1 | Plastic Stool | | 10 | | 10 | 300.00 | 3000.00 |
| B | **Instrument** | | | | | | |
| 2 | Paed. Laryngoscope with blade | 1 | | | 1 | 1500.00 | 1500.00 |
| 3 | Magglis Forcep | 3 | | | 3 | 100.00 | 300.00 |
| 4 | Laryngoscope Adult with 3 Blade | 3 | 1 | | 4 | 1200.00 | 4800.00 |
| 5 | Laryngoscope Adult with 4 Blade | 3 | 1 | | 4 | 2000.00 | 8000.00 |
| C | **Miscellaneous** | | | | | | |
| 6 | Ambu bag Silicon Adult | 1 | 2 | | 3 | 500.00 | 1500.00 |
| 7 | Ambu bag silicon ped. | 1 | 1 | | 2 | 500.00 | 1000.00 |
| 8 | Banz Circuit | 2 | | | 2 | 700.00 | 1400.00 |
| 9 | Urine Pot (Aluminium / Steel) | | 10 | | 10 | 100.00 | 1000.00 |
| 10 | Bed Pan (Aluminium / Steel) | | 10 | | 10 | 200.00 | 2000.00 |
| 11 | Gindi S/S. | | 10 | | 10 | 50.00 | 500.00 |
| | | **Total Amount in Rs. -** | | | **25000/-** | | |

त्यानुसार सदरचे खरेदीकामी कोपरगाव, श्रीरामपुर येथुन समक्ष बंद कोटेशन आणले होते. सदरचे कोटेशन दि.१३.०३.२०१० रोजी वैद्यकीय संचालक यांचे समक्ष उघडण्यात आले असून त्यांचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. त्यामध्ये सोबतच्या तक्त्यातील अ.नं.२ व ३ ही निम्नतम दर न पहाता नामांकित कंपन्यांचे तर अ.नं.१, ४, ५, ६, ७ व ८ यामध्ये निम्नतम दरांची शिफारस करण्यात आलेली आहे. अ.नं.९, १० व ११ करीता एकच कोटेशनधारकाने दर दिलेले असल्यामुळे तेथे ते घेण्याची शिफारस केलेली आहे. सदरचे शिफारसीनुसार खरेदी करण्यात आली असून सदर खरेदीकामी एकुण रु.३५,९०१/- खर्च आलेला आहे. सदर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.३९० उपरोक्त खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३६ मे.सिमेन्स कंपनीचे ५०० एम.ए.एक्स-रे मशिनचे दुरुस्तीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रूग्णालयातील रेडीओलॉजी विभागात रुग्णांचे एक्स-रे काढण्यासाठी मे. सिमेन्स ली. मुंबई या कंपनीचे ५०० mA एक्स-रे मशीन (Model: HD / KLH) खरेदी करण्यात आले आहे. सदर मशीन करीता कंपनीने दिलेला स्पेअरपार्टसह एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि.१७/१०/२००९ रोजी संपला आहे. खरेदी आदेशातील अट क्र. ११ नुसार पुढील एक वर्षाच्या कालावधीकरीता म्हणजेच दि. १७/१०/२०१० पर्यत कंपनी मोफत AMC सर्व्हिस देत आहे. सदर AMC कालावधीत दुरुस्तीसाठी लागणा-या स्पेअर पार्टची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या दि. २२/०१/१० रोजी एक्स-रे मशीन व्यवस्थीत काम देत नसल्यामुळे मे. सिमेन्स ली. मुंबई यांचे इंजिनीअर त्यांचे तातडीच्या भेटीकरीता श्री साईनाथ रुग्णालयात आले होते. त्यांनी मशिनची तपासणी करून मशीनचा एक्स-रे टयुब हा पार्ट खराब झाला असल्यामुळे तो बदलणेकामी सर्व करांसहीत एकुण रु. १,३५,०००/- (अक्षरी रु. एक लाख पस्तीस हजार मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले असुन सदर रकमेची कंपनीने आगाऊ मागणी केलेली आहे. सदर एक्स रे मशिनवर एकुण एक्स रे रूग्ण तपासणी संख्या २७१५५ (कालावधी दि. १८/१०/०८ ते २०/०१/१०) झालेले आहेत.

सदरचे एक्स रे टयुबचा वारंटी कालावधी वरीलप्रमाणे एक्स-रे मशीन इतकाच म्हणजेच दि.१७/१०/२००९ पर्यत होता. परंतु एक्स-रे टयुब हा पार्ट प्रोप्रायटरी ॲटम या प्रकारचा नसुन तो अशा प्रकारच्या एक्स-रे मशीनचा पुरवठा करणाऱ्या तसेच एक्स-रे टयुब बनविणाऱ्या विविध कंपन्याकडे देखील उपलब्ध असतो. त्यामुळे सदरचा एक्स-रे टयुब (THX१) हा पार्ट विविध कंपन्याकडुन कोटेशन मागणी करून विहित पध्दतीने खरेदी करता येईल.

सदर विषयावर मा. व्य. उपसमितीतील दि. २५/०२/१० चे सभेत चर्चा करण्यात आली असता सदर एक्स- रे टयुब वॉरंटी संपल्यानंतर दोन महिन्यात कशी खराब झाली अशी विचारणा करण्यात आली त्याकरीता मे. सिमेन्स ली. मुंबई यांचेकडून स्पष्टीकरण मागविले असता त्यांनी त्यांचे पत्र क्र. BO/MED/PRA दि. ०२/०३/२०१० अन्वये असे कळविले आहे की, एक्स-रे टयुब हा इलेक्ट्रो मॅकेनिकल व्हॅक्युम पार्ट आहे. अशा पार्टचे खराब होण्याचे ठराविक कारण देता येत नाही आणि असा पार्ट दुरूस्त ही होत नाही. एक्स-रे टयुबची कार्यक्षमता ही त्याचा उपयोग, वापर, एक्सपोझ करतांना योग्य विदयुत (इलेक्ट्रीक) डयुटी सायकल आणि योग्य व स्थिर विदयुत प्रवाह अशा प्रकारच्या घटकांवर अवलंबुन असते.

तरी मे. सिमेन्स लि. मुंबई यांचे एक्स-रे मशीनची टयुब विविध कंपन्याकडुन कोटेशन मागणी करून निम्नतम दराने बदलुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रु. १,३५,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३९१ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मे. सिमेन्स लि. मुंबई यांचे एक्स-रे मशीनची टयुब विविध कंपन्याकडुन कोटेशन मागणी करून निम्नतम दराने बदलुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रु. १,३५,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३७ श्री साईबाबा रुग्णालयातील फिमेल जनरल वॉर्डकरीता Pulse oximeter खरेदीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील फिमेल जनरल वार्ड विभागाने दि.०९.०३.२०१० चे पत्रकान्वये एक नग Pulse Oximeter ची नविन मागणी केलेली आहे. कारण सध्या त्यांचेकडे अशा प्रकारचे पल्स ऑक्सीमीटर नाही. सदर Pulse Oximeter हे अत्यव्यस्थ रुग्णांचे ऑक्सीजनचे प्रमाण, ब्लड प्रेशर, ह्दयाचे ठोके हे व्यवस्थीत कार्यरत आहे किंवा नाही हे दर्शविण्यासाठी वापर केला जात असल्याने फिमेल जनरल वार्ड विभागाला एक Pulse Oximeter ची आवश्यकता आहे.

सदरचे Pulse Oximeter खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर Pulse Oximeter खरेदीकामी विहित पध्दतीन अधिकृत विक्रेते/ उत्पादक कंपन्या यांचेकडून सिलबंद कोटेशन मागवुन खरेदी करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३९२ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे Pulse Oximeter खरेदीकामी विहित पध्दतीन अधिकृत विक्रेते/ उत्पादक कंपन्या यांचेकडून सिलबंद कोटेशन मागवुन खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३८ Pacemaker VVIR चे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात डॉ.गौरव वर्मा हे पुर्ण वेळ कार्डीओलॉजिस्ट आहेत. त्यांनी श्री.कदम लक्ष्मण महादु (आय. पी. नं. ३२७१२) या पेशंटवर दि.२१.०१.२०१० रोजी रोजी Pacemaker Implantation ही ह्दय शस्त्रक्रिया केलेली आहे

सदरचे Process करीता त्यांनी St.Jude Medical Co. चा Pacemaker SJM VVIR हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग वापरलेला आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०९.२००८ निर्णय क्र.६३५ अन्वये कार्डीओलॉजीस्ट व कार्डीयाक सर्जन यांनी एखाद्या विशिष्ट आयटमची मागणी केलेस व टेंडरमध्ये त्याचे दर प्राप्त झालेले असेल तर ती त्यांना तेवढ्यापुरतीच टेंडरमधील दराने खरेदी करुन देण्यात यावी असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार कॅथलॅब विभागाने डी.पी.क्र.३२११ दि.२०.०१.२०१० अन्वये उपरोक्त पेसमेकरची मागणी केली होती. M/s.Sinocare Surgical, Mumbai यांच्याकडून बील क्र.२९५५ दि.३०.०१.२०१० अन्वये एक नग रु.७५,०००/- खरेदी करुन देण्यात आलेला आहे.

श्री.कदम लक्ष्मण मधु ह्या पेशंटला उपरोक्त पेसमेकर बसविण्यासाठी एकुण रु.१,१९,५१३/- इतका खर्च आलेला असून त्यांनी हॉस्पिटलच्या बिलींग विभागाकडे पावती क्र.२१०२३९४५ दि.२६.०२.२०१० अन्वये रु.४५,३१३/- जमा केले असून महाराष्ट्र शासनाचे जीवनदायी योजने अंतर्गत रु.६५,०००/- इतकी रक्कम मंजुर आहे. तर रु.९,२००/- इतकी त्यांना बीलात सवलत देण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे M/s.Sinocare Surgical, Mumbai यांना रक्कम रु.७५,०००/- इतकी अदा करण्यात आलेली असून सदर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.३९३ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे Pacemaker VVIR चे खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय सचालक)

---

**विषय नं.३९ संस्थान कर्मचारी जादा वैद्यकीय बीलाबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्यमा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे.

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.निलेश बाळकृष्ण रावस | वडील | Pain in Abdomin | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | ३०८०.०० | ३०८०.०० |
| २ | श्री.प्रदिप भालचंद्र धर्माधिकारी | मुलगी | Psychological Disorder | डॉ.सहस्त्रबुध्दे, श्रीरामपुर | २१५८.०० | १७२६.०० |
| ३ | श्री.प्रदिप विश्वनाथ त्रिभुवन | आई | Diabetis & Blood Presure | श्री साईनाथ हॉस्पिटल,शिर्डी | ४५५५.०० | ४५५५.०० |
| ४ | श्री.एम.के.थोरात | मुलगी | C.R.F. | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | ५९९६.०० | ५९९६.०० |
| ५ | श्री.मधुकर भिवाजी डोखे | मुलगी | Idiopathic Isosexual Central Precocious Puberty | के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई | २७७३४.०० | २७७३४.०० |
| ६ | डॉ.सौ.प्रणोती जडगे | स्वत: व आई | Lab Test & High Risk Pregnancy & Arthitis | श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटल,शिर्डी | ८७००.०० | ८०४५.०० |
| ७ | सौ.कल्पना रघुनाथ मुसमाडे | आई | C.R.F. | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १९२२०.०० | १९२२०.०० |
| ८ | श्री.दिलीप बाळकृष्ण औदिच्य | आई | Long Spiral Fracture Shaft Femour Right | बॉम्बे हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर,इंदोर | ४७७६२.०० | ३८२१०.०० |
| ९ | सौ.ॲग्नेस जॉर्ज देठे | मुलगा | Hydro Cephalaus with Spine Bifides with Maningomyclocele | आनंदऋषीजी हॉस्पिटल, अहमदनगर | ५२०७८.०० | ५१८७८.०० |
| १० | सौ.संगिता प्रकाश नरोडे | पती | Laser with endoscopis varicose veins | सह्याद्री हॉस्पिटल, नाशिक | ३६७५९.०० | ३५१६९.०० |
| ११ | श्री.संजय बाबुराव कुलकर्णी | वडील | Carcinoma of Prostate | नामको हॉस्पिटल, नाशिक | १०७८४.०० | १०७८४.०० |
| | | | | **एकूण रक्कम रु** | **२१८८२६.००** | **२०६३९७.००** |

**निर्णय क्र.३९४ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४० श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे विविध मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये विविध मेडिकल इन्स्ट्रुमेंट व मशिनरी खरेदी करण्यात आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी काही मशिन्सचे अंदाजे २४ कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता मा. व्य. समितीच्या विविध निर्णयांन्वये दरवर्षी संबंधीत कंपन्यांकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात येत आहे. सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन सध्या व्यवस्थित काम देत आहेत.

सध्या काही मशीन्सचे वॉरंटी कालावधी संपलेले असुन माहे मार्च २०१० अखेर काही मशीन्सचे कॉन्ट्रॅक्ट कालावधी संपत आहेत.

वार्षिक सर्व्हिस कॉट्रॅक्टबाबत मा. व्य. समितीच्या दि. २०/०५/२००७ च्या सभेतील विषय क्र. ३३ निर्णय क्र. ३८६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलरला देण्यात यावे असे ठरले."

सोबतच्या तक्त्यामध्ये दिलेल्या अ. क्र. १ ते ३५ अन्वये एकुण २४ कंपन्यांच्या ११७ नग मशीन्सचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी मा. व्य. समितीच्या दि. १५/११/२००८ चे सभेतील निर्णयाप्रमाणे कंपन्यांच्या प्रतिनीधींना वैद्यकिय प्रशासक, वैद्यकिय उप-संचालक व वैद्यकिय संचालक यांचे समक्ष बोलावुन दिलेल्या दरांबाबत चर्चा / वाटाघाटी करुन वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर निश्चीत करता येतील असे मत आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वरीलप्रमाणे एकुण ११७ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनीधींशी प्रत्यक्ष वाटाघाटी करुन दर निश्चीत करणेस व त्यानुसार येणाऱ्या एकुण रकमेच्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३९५** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वरीलप्रमाणे एकुण ११७ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनीधींशी वैद्यकिय प्रशासक, वैद्यकिय उपसंचालक व वैद्यकिय संचालक यांचे समक्ष प्रत्यक्ष वाटाघाटी करुन दर निश्चीत करणेस व त्यानुसार येणाऱ्या एकुण रकमेच्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४१** **मान्यवरांचे सत्कार करणेकामी प्रिंटेड शॉल खरेदी करणेबाबत**

**प्रस्ताव-** समाधी मंदिरात श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवर, अतिथी, व्ही.आय.पी व महत्वाचे पदसिद्ध अधिकारी वर्ग यांचा संस्थानचे वतीने शॉल, श्रीफळ देवून सत्कार केला जातो.

माहे एप्रील २००९ ते माहे मार्च २०१० या अर्थिक वर्षामध्ये मान्यवरांच्या सत्कारासाठी लागणारी संस्थान प्रिंटेड शॉल, खरेदी विभागामार्फत खरेदी करुन मंदिर विभागाचे मागणीनुसार पुरविण्यात आलेली आहे व वरिष्ठांच्या सुचनेनुसार वेळोवेळी खर्ची घातलेली आहे. सदरची शॉल २२५ से.मी. लांबी X १०५ से.मी. रुंदी ( कळसाचे चित्र असलेली पिवळा रंग नमुन्याप्रमाणे ) असून प्रति एक नग शॉल खरेदीस रुपये ३८/- प्रमाणे खर्च झालेला आहे. सदरचा शॉलबाबत पुरवठा आदेश मे. सुपर डाईंग ॲन्ड कॉटन मॅन्यु कं. प्रा. लिमीटेड, सातारा यांना देण्यात आला होता. त्यांनी चांगल्याप्रकारे शॉल पुरवठा केला असून नमुन्याप्रमाणे शाल आहेत.

सन २००९-१० मध्ये शॉल खरेदी निवीदासाठी उशीर झाल्याने माहे जुन २००९ ते जलै. २०१० अखेर पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. परंतू आपले आर्थिक वर्ष माहे एप्रील ते मार्च असल्याने चालू वर्षी दि.०१ एप्रील, २०१० ते माहे मार्च २०११ साठी अंदाजे एकूण १०००० प्रिंटेड शॉल खरेदी कराव्या लागतील असे नम्र मत आहे.

मे.सुपर डाईंग ॲन्ड कॉटन मॅन्यु कं. प्रा. लिमीटेड, सातारा यांनी वर्षभर चांगला पुरवठा केला असून मागील दर रु.३८/- प्रतिनग प्रमाणे ते सन २०१०-११ मध्ये पुर्वीच्या दराने शॉल पुरवठा करणेस तयार असून याबाबत त्यांनी दि.१२/०३/२०१० रोजी तसे लेखी पत्राने कळविले आहे.

तरी दि.०१ एप्रील, २०१० ते माहे मार्च, २०११ या वर्षासाठी एकूण १०००० प्रिंटेड शॉली मे.सुपर डाईंग ॲन्ड कॉटन मॅन्यु कं. प्रा. लिमीटेड, सातारा यांचेकडून थेट खरेदी करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३९६** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे दि.०१ एप्रील, २०१० ते माहे मार्च, २०११ या वर्षासाठी एकूण १०००० प्रिंटेड शॉली मे.सुपर डाईंग ॲन्ड कॉटन मॅन्यु कं. प्रा. लिमीटेड, सातारा यांचेकडून थेट खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.४२** **गुरुस्थान स्टेनलेस स्टिल रेलींग मॉडीफिकेशनचे कामास व खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** गुरुस्थान स्टेनलेस स्टील रेलींग मॉडीफिकेशनचे काम तातडीचे असल्याने त्वरीत कोटेशन मागवून काम करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६८,३००.०० इतक्या खर्चास दिनांक ०६-१०-२००९ चे टिपणीनुसार मान्यता मिळाली होती. त्यानुसार वर्कशॉप / फॅब्रिकेटरर्संना जा.नं. एसएसएस/ विद्युत /

१२८६९ / २००९ दिनांक २०-१०-२००९ अन्वये पत्र पाठवून कोटेशन्स मागविण्यात आली होती. यानंतर आलेली कोटेशन्स उघडण्यात आली व त्यामध्ये मे.साई इंजिनिअर्स, नाशिक यांनी दर कमी दिल्याने जा.क्र. एसएसएस / विद्युत / १४४०७ /२००९ दिनांक २५-११-२००९अन्वये त्यांना रक्कम रु.६६,१२८.०० इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आला आहे. दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| अ. क्र. | तपशील | मागणी | मे. साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक | मे.मेहता स्टील कॉर्पोरेशन, नाशिक | मे.मुकूंद एन्टरप्राईजेस, नाशिक | मे.एन.आर. एन्टरप्राईजेस, नाशिक |
|---|---|---|---|---|---|---|
| 01) | STAINLESS STEEL 304 GROUTING PIPE & BRACKET WITH HARDWARE PIPE SIZE-60MM DIA X 10छ LONG | 29 नग. | 13,050.00 | 14,065.00 | 14,500.00 | 14,790.00 |
| 02) | STAINLESS STEEL CANOPY | 29नग. | 04,930.00 | 05,365.00 | 04,785.00 | 04,930.00 |
| 03) | PROVIDING STAINLESS STEEL ROUND PIPE FOR INCREASING THE HEIGHT OF RAILING | 70 फूट. | 10,500.00 | 11,340.00 | . 12,600.00 | 12,040.00 |
| 04) | PROVIDING STAINLESS STEEL HORIZONTAL SUPPORT FOR EXISTING RAILING | 90 नग. | 10,800.00 | 12,330.00 | . 12,150.00 | 12,600.00 |
| 05) | STAINLESS STEEL WIRE MESH SIZE - 1 Feet Hight | 140 फूट. | 07,000.00 | 08,680.00 | 08,400.00 | 09,800.00 |
| 06) | CHARGES FOR FIXING OF RAILING AT NEW PLACE, TRANSPORT, MISC, MATERIAL, CIVIL WORK, FILLING EXISTING, HOLE WITH CEMENT, LEVELLING, WELDING, GRINDING, FINISHING & OTHER OVERHEADS | 01 जॉब. | 10,000.00 | 11,500.00 | 12,500.00 | 15,000.00 |
| 07) | REMOVING EXISTING RAILING GRINDING, POLISHING, FINISHING OF EXISTING RAILING FILLING, WELDING & LEVELING OF THE HOLES | 01 जॉब. | रु. 02,500.00 | रु. 02,250.00 | रु. 02,000.00 | रु. 04,000.00 |
| | एकुण रक्कम :- | | रु. 58,780.00 | रु. 65,530.00 | रु. 66,935.00 | रु. 73,160.00 |
| | वॅट 12.5% | | रु. 07,347.50 | रु. 08,191.25 | रु.08,366.88 | रु. 09,145.00 |
| | होणारी एकुण रक्कम :- | | रु. 66,127.50 | रु. 73,721.25 | रु.75,301.88 | रु. 82,305.00 |
| | पुर्णांकित रक्कम :- | | रु. 66,128.00 | रु. 73,721.00 | रु.75,302.00 | रु. 82,305.00 |

तरी मे.साई इंजिनिअर्स, नाशिक यांना दिलेल्या रक्कम रुपये ६६,१२८/- इतक्या रकमेच्या कार्यदेशास व आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३९७** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे गुरुस्थान स्टेनलेस स्टिल रेलींग मॉडीफिकेशनचे काम मे.साई इंजिनिअर्स, नाशिक यांना दिलेल्या रक्कम रुपये ६६,१२८/- रकमेच्या कार्यदेशास व आलेल्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४३** **शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना साफसफाईचे कामासाठी कंत्राटी सफाई कामगार देणे बाबत**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नगर- मनमाड रोड हा राज्य महामार्ग व साईबाबा मंदिर बाहेरील परिसरातील रस्ते साफसफाई करणेसाठी शिर्डी नगर पंचायतीचे आरोग्य विभागाकडील कर्मचारी कमी पडतात.त्यामुळे नगर मनमाड रोड, मनोज कुमार पथ, पालखी रस्ता या रस्त्यांची साफ सफाई करणे

करीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांनी देण्यात आलेली ४० अकुशल कंत्राटी कर्मचा-यांची मुदत दि.३१ मार्च २०१० अखेर संपुष्टात येत आहे.तरी दि.१ एप्रिल २०१० ते दि.३१ मार्च २०११ पुढील वर्षाच्या कालावधी साठी मुदत वाढ देणेस शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी त्राव्दारे मागणी केलेली आहे.

यापुर्वी व्यवस्थापन समितीचे दि. ०८/०३/२००९ रोजी सभेपुढील विषय नं.५४ व निर्णय क्र. २२३ ने ०१ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१० अखेर एक वर्षाचे मुदतीसाठी सफाईकरिता ४० अकुशल कंत्राटी कर्मचारी देण्याचे मंजुर करण्यात आले आहेत.

तरी दि.१०/०३/२०१० चे नगरपंचायतीचे पत्रानुसार या कामी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना पुढील एक वर्षासाठी ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी नेमल्यास खालील प्रमाणे अंदाजे खर्च येईल.

४० कंत्राटी अकुशल कर्मचा-यांचे वेतनावर होणारा खर्चः-

| | |
|---|---|
| प्रति दिन प्रति कर्मचारी दर रु. | १५२=७८ |
| प्रॉ.फंड १३.६१% | २०=७९ |
| सर्व्हिस चार्ज ०.७५% | ०१=१४ |
| सर्व्हिस टॅक्स १२.२४% | १५=७३ |
| | ----------------- |
| प्रति दिन प्रति कर्मचारी रु. | १९०=४४ |
| | x ४० कर्मचारी |
| | ----------------- |
| | रु.७६१७=६० एक दिवसा करिता |
| | x ३६५ दिवसांकरीता |
| | ----------------- |
| | रु.२७,८०,४२४=०० |
| + १०% वर्षात होणारी अपेक्षित वाढ | रु.२,७८,०४२=४० |
| | ------------------ |
| एकुण रुपये | ३०,५८,४६६=४० |

तरी उपरोक्त प्रमाणे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना ४० अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरवावयाचे असल्यास या ४० कंत्राटी कर्मचा-यांचे वेतना पोटी एक वर्षाचे कालावधी करीता अंदाजे रु. ३०,५८,४६६/- (तीस लाख अठ्ठावन्न हजार चारशे सहासष्ठ) मात्र पर्यंत खर्च येईल.

तसेच या करीता सन २०१०-२०११ चे आरोग्य विभागाचे अंदाजपत्रकात बजेट तरतूद करण्यात आलेली आहे.

**निर्णय क्र.३९८** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना ०१ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११अखेर एक वर्षाचे मुदतीसाठी सफाईकरिता ४० अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३०,५८,४६६/- खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-स्वच्छता विभागप्रमुख)

---

**विषय नं.४४** **साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील खोल्यांकरीता नवीन बेडशीट,उशीकव्हर खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये साईभक्तांचे निवासासाठी असलेल्या खोल्यांमध्ये गादीवर टाकणेकरीता बेडशीट व उशीकरीता उशीकव्हर यांचा वापर केला जातो. बेडशीट, उशीकव्हर सेट ६८५४ नग खालीलप्रमाणे दोन टप्यात खरेदी विभागाकडुन खरेदी करण्यात आले आहेत.

| अ.नं. | तपशील | टप्पा / खरेदी दिनांक | प्रत्यक्ष वापराचा दिनांक | वापर ३ वर्ष पुर्ण होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१. | बेडशीट, उशीकव्हर सेट नग ३३५४ | **पहिला टप्पा** दि.१/८/२००७ | दि.२६/२/२००८ | २६/०१/२०११ |
| ०२. | बेडशीट, उशीकव्हर सेट नग ३५०० | **दुसरा टप्पा** दि.१७/८/२००७ | दि.२२/४/२००९ | २२/०३/२०१२ |

उपरोक्तचे बेडशीट दैनंदीन वापरामुळे त्यापैकी काही बेडशीट फिक्ट रंगाचे होत आहेत. काही बेडशीट फाटण्यास व जिर्ण होण्यास आले आहेत. दि.६/८/२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.२७ निर्णय क्रंमाक ४१५ नुसार चादरी, गादी व बेडशीट हे जास्तीत जास्त ३ वर्षाचे धरण्यात यावे. व दर तिन वर्षानी गादी, चादर, बेडशीट बदलण्यात यावे असा निर्णय झालेला आहे.

पहिल्या टप्यात खरेदी केलेले बेडशीट व उशीकव्हर सध्या वापरात असुन त्यास जवळ जवळ २ वर्ष पुर्ण झालेले आहे व दुस-या टप्यात खरेदी केलेले बेडशीट, उशीकव्हर सध्या वापरात असुन त्यास जवळ जवळ १ वर्ष पुर्ण झालेले आहे. सदरचे बेडशीट, उशीकव्हर हे लॉण्ड्रीतील केमिकल्स/

डिटर्जंट यांचे वापरामुळे तसेच साईबाबा भक्तनिवासस्थानकडील खोल्या सरासरी ८० टक्के क्षमतेने भरलेल्या असल्यामुळे त्याचा पुरेपुर वापर होत असल्याने त्यास अनुक्रमे जानेवारी - २०११ व मार्च - २०१२ पर्यत ३ वर्ष पुर्ण होतील.

नवीन बेडशीट व उशीकव्हर यांची आवश्यकता आहे. त्यांचा तपशील व त्यासाठी अंदाजे येणारा अपेक्षीत खर्च खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशील | साईज | आवश्यक नग | दर प्रति नग रु. | एकुण खर्च रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | **बेडशीट (प्रिंटेड)** बॉम्बे डाईंग, प्रकाश कॉटन मिल किंवा इतर नांमाकीत कंपनीचे | ५४" X ९०" | ६००० | २५०/- | १५,००,०००/- |
| ०२. | **उशीकव्हर (प्रिंटेड)** बॉम्बे डाईंग, प्रकाश कॉटन मिल किंवा इतर नांमाकीत कंपनीचे | १८" X २४" | ६००० | ७५/- | ४,५०,०००/- |
| | | | | एकुण रुपये :- | १९,५०,०००/- |

वरीलप्रमाणे बेडशीट, उशीकव्हर खरेदीकामी एकुण रुपये १९,५०,०००/- (अक्षरी रुपये एकोणावीस लाख पन्नास हजार ) मात्र खर्च अपेक्षीत असुन त्यास व सदरचे बेडशीट व उशीकव्हर यांचे तयार नमुने मागवून खरेदी करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३९९ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.४५ अत्याधुनिक आटा मिल उभारणीकामी सल्लागार नियुक्तीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालय ८ जानेवारी २००९ पासून भक्तांच्या सेवेसाठी सुरु झालेले आहे. तेव्हापासून आजपर्यंत भक्तांची गर्दी दिवसेदिवस वाढत आहे. आजमितीस प्रतिदिन सरासरी ३० ते ३५ हजार भक्त प्रसाद भोजन घेत आहेत. उत्सव व गर्दीच्या कालावधीत प्रतिदिन ६५ ते ७० हजार भक्त प्रसादभोजन घेतात.

त्याकामी प्रसादभोजन, तत्परतेने, वेळेत पुर्ण होणेसाठी देशी, परदेशी बनावटीच्या अनेक मशिनरीचा वापर करुन अटोमायझेशन केलेले आहे. तथापि चपाती / पुरीचा आटा बनविणेसाठी व लाडू प्रसाद बुंदी - बेसन तयार करणेकामी सध्याचे असलेले ऑन लाईन चक्की युनिटची क्षमता कमी पडत आहे. ज्यामुळे जुन्या प्रसादालयातील पिठाच्या गिरण्या चालू ठेवाव्या लागतात. दोन्ही ठिकाणी मटेरियल वाहतूक करणेसाठी ट्रान्सपोर्टेशनचा खर्च येतो व जादा ऑपरेटरची नियुक्ती करावी लागते. दोन्ही ठिकाणी लागणारे मनुष्यबळ, जागा, वेळ, ट्रान्सपोर्टेशन कमी करणेसाठी नविन प्रसादालयात ऑन लाईन चक्की यूनिट मध्ये आवश्यक त्या मशिनरी बसवून एकुण फ्लोअर मिलचे आऊटपुट ताशी १० क्विटंल करणेसाठी त्या क्षेत्रातील तांत्रिक ज्ञान असलेल्या व्यक्तीस तज्ञ सल्लागार म्हणून नियुक्ती करणे आवश्यक आहे.

तरी नविन प्रसादालयात ऑन लाईन चक्की यूनिटमध्ये आवश्यक ती मशिनरी बसवून आत्याधुनिक वाढीव क्षमतेच्या फ्लोअर मिलमध्ये रुपांतर करणेकामी तज्ञ सल्लागार म्हणून अनुभवी व्यक्तीची नियुक्ती करणेस व त्याकामी वृत्तपत्रात जाहीरात देणेकामी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४०० यावर सविस्तर चर्चा होऊन, नविन प्रसादालयात ऑन लाईन चक्की यूनिटमध्ये आवश्यक ती मशिनरी बसवून आत्याधुनिक वाढीव क्षमतेच्या फ्लोअर मिलमध्ये रुपांतर करणेकामी तज्ञ सल्लागार म्हणून अनुभवी व्यक्तीची नियुक्ती करणेस व त्याकामी वृत्तपत्रात जाहीरात देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.४६ शाही प्रसादभोजन, स्पेशल प्रसादभोजन व स्वयंसेवी (बुफे) प्रसादभोजनातील पदार्थ ठरविणे, साईभक्तांचे माहितीसाठी फलक लावणे व सेवा पुरविणेसाठी आऊट सोर्सिंग पद्धतीने कर्मचारी घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** सध्या प्रसादालयामध्ये सन्मा.अतिथींसाठी रु.४०/- प्रौढ व्यक्तीस व रु.२०/- (१० वर्षाखालील) मुलास आकारणी करुन स्पेशल प्रसादभोजन देण्यात येत आहे. सदर प्रसादभोजनामध्ये खालीलप्रमाणे पदार्थ देण्यात येतात.

१) चपाती २) ऊसळ ३) भाजी ४) भात
५) वरण ६) चटणी ७) दही ८) पापड
९) कांदा , टोमॅटो सलाड १०) बर्फी

वरीलप्रमाणे स्पेशल प्रसादभोजनाचा दर्‌रोज सरासरी सकाळी २०० व दुपारी २०० पर्यंत भक्त लाभ घेत आहेत. त्यांना सेवा पुरविणेसाठी सध्या प्रति शिफ्टमध्ये खालीलप्रमाणे कर्मचारी काम करतात.

१) पुरुष कर्मचारी - ०६ प्रसादभोजन वाढणेसाठी,
२) स्त्री कर्मचारी - ०५ थाळी उचलणे,धुऊन घेणे व साफ करणेसाठी, कांदा टोमॅटो सलाड कापणे.

आता दि.२५/०२/२०१० चे मा.व्यवस्थापन उपसमिती सभेमध्ये साई दरबार कॉन्फरन्स हॉलमध्ये रु.१००/- आकारुन शाही प्रसादभोजन , साई अतिथी हॉलमध्ये रु.४०/- आकारुन स्पेशल प्रसादभोजन व साई तृप्ती बुफे हॉलमध्ये रु.२०/- आकारुन स्वयंसेवी प्रसादभोजन व्यवस्था सुरु करण्यात यावी व साईभक्तांचे माहीतीसाठी संस्थान परिसरात फलक लावावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानूसार खालीलप्रमाणे प्रसादभोजनामध्ये द्यावयाचे पदार्थ निश्चित करणे गरजेचे आहे.

| अ.नं. | शाही प्रसादभोजन | अ.नं. | स्पेशल प्रसादभोजन | अ.नं. | स्वयंसेवी प्रसादभोजन |
|---|---|---|---|---|---|
| १) | लाडू | १) | बर्फी | १) | बर्फी |
| २) | चपाती | २) | चपाती | २) | चपाती |
| ३) | ऊसळ | ३) | ऊसळ | ३) | ऊसळ |
| ४) | पालेभाजी /फळभाजी | ४) | पालेभाजी / फळभाजी | ४) | पालेभाजी / फळभाजी |
| ५) | भात | ५) | भात | ५) | भात |
| ६) | वरण | ६) | वरण | ६) | वरण |
| ७) | दही | ७) | दही | ७) | दही |
| ८) | चटणी | ८) | चटणी | ८) | चटणी |
| ९) | पापड | ९) | पापड | ९) | पापड |
| १०) | कांदा,टोमॅटो,गाजर,काकडी | १०) | कांदा , टोमॅटो | १०) | कांदा , टोमॅटो |
| ११) | सुकी भाजी | | | | |
| १२) | सुकी भाजी | | | | |
| १३) | ताक किंवा कढी | | | | |
| १४) | मिनरल वॉटर | | | | |
| १५) | लोणचे | | | | |

वरीलप्रमाणे पदार्थांचे अवलोकन होणेस विनंती. त्याचप्रमाणे साईभक्तांचे माहीतीसाठी उपरोक्तप्रमाणे भोजन व्यवस्थेबाबत फलक लावल्यानंतर साईभक्तांची गर्दी वाढणार आहे. त्यानूसार वाढणा-या गर्दीची शक्यता गृहीत धरुन सेवा पुरविणेसाठी खालीलप्रमाणे कर्मचारी लागतील.

| शाही प्रसादभोजन | स्पेशल प्रसादभोजन | स्वयंसेवी प्रसादभोजन |
|---|---|---|
| प्रसादभोजन घेणा-या साईभक्तांची अंदाजे प्रति शिफ्ट संख्या<br>२५० x २ = ५०० | प्रसादभोजन घेणा-या साईभक्तांची अंदाजे प्रति शिफ्ट संख्या<br>५०० x २ = १००० | प्रसादभोजन घेणा-या साईभक्तांची अंदाजे प्रति शिफ्ट संख्या<br>५०० x २ = १००० |
| कर्मचारी | कर्मचारी | कर्मचारी |
| १) पुरुष कर्मचारी ०८ x २ = १६<br>२) स्त्री कर्मचारी ०५ x २ = १०<br>एकूण = २६ | १) पुरुष कर्मचारी १२ x २ = २४<br>२) स्त्री कर्मचारी ०८ x २ = १६<br>+ ४० | १) पुरुष कर्मचारी ०८ x २ = १६<br>२) स्त्री कर्मचारी ०६ x २ = १२<br>+ २८ |

वरीलप्रमाणे एकूण कर्मचारी २६+४०+२८ = ९४-२२ (सध्याचे कर्मचारी) = ७२ जादा लागणारे कर्मचारी

उपरोक्तप्रमाणे तीनही प्रकारचे प्रसादभोजन घेणारांची संख्या कमी झाल्यास / वाढल्यास अथवा सध्या स्थितीत येणा-या अडचणींचा विचार करुन कर्मचारी कमी / जास्त लावणेबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत येईल. मात्र सध्या वरीलप्रमाणे वर्ग ४ चे ७२ कर्मचारी आऊट सोर्सिंग पध्दतीने लावणेस मान्यता असावी.

सध्या एकाच सन्मा.अतिथी भोजन कक्षामध्ये भोजन व्यवस्था सुरु आहे. त्या ठिकाणी वापरात असलेली ताट ,वाटी , चमचे , ग्लास , वगैरे भांडी धुण्यासाठी पुरेशी व्यवस्था नाही. जी व्यवस्था केली आहे. त्याठिकाणी चपातीचे कर्मचा-यांची हात पाय धुण्याची व्यवस्था केलेली नसल्यामुळे तेच कर्मचारी हातपाय धुतात, घाण करतात त्यामुळे व्ही.आय.पींची भांडी धुणेसाठी फार त्रास होतो. सध्या भांडी धुण्यासाठी तळमजल्यावर घेवून जाणे व धुतलेली भांडी पुन्हा पहिल्या मजल्यावर घेऊन येणे यामध्ये बराच वेळ वाया जातो. सध्या भोजन घेणारांची संख्या मर्यादीत आहे म्हणून त्रास सहन करुन भांडी धुण्याचे काम करण्यात येते. परंतू उपरोक्तप्रमाणे ३ प्रकारची भोजन व्यवस्था सुरु केल्यानंतर भोजन घेणारांचे संख्येत वाढ होणार आहे. ताट,वाटी,ग्लास,चमचे,वगैरे अनुषंगिक भाडयांची संख्या वाढणार आहे. त्यामुळे भांडी धुण्यासाठी प्राधान्याने त्याच मजल्यावर व्यवस्था करणे गरजेचे आहे त्यास मान्यता असावी.

तरी उपरोक्तप्रमाणे तीनही प्रकारचे प्रसाद भोजनामध्ये द्यावयाचे पदार्थास मान्यता व प्रसाद भोजन व्यवस्थेकामी जादा ७२ कामगार आऊट सोर्सिंग पध्दतीने घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४०१ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. याकामी आवश्यक असणारे कर्मचारी आऊटसोर्सिंग पध्दतीने घेणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. सदरचे भोजन**

**व्यवस्थेची माहिती साईभक्तांना व्हावी या दृष्टीने आवश्यक माहितीफलक करुन लावण्यात यावेत.**

**याचवेळी बुफे पध्दतीने जेवण घेणाऱ्या साईभक्तांना जिन्याने वर घेण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग/कामगार अधिकारी )

---

**विषय नं.४७ श्री साईचरित्राची इंग्रजी भाषेतील ऑडीओ सी.डी संस्थानतर्फे निर्मिती करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्रीमती एम.एल.दिपा, सिकंदराबाद यांचे दि.०२.०३.२०१० च्या अर्जाने "त्यांनी तयार केलेली श्री साईचरित्राची इंग्रजी भाषेतील ऑडीओ सी.डी. संस्थान मार्फत निर्मिती करावी. या ऑडीओ सीडीचे सर्व हक्क संस्थानला देत आहे. सदर सी.डी. तपासून काही सूचना असल्यास त्या कळवाव्यात त्यानुसार अंतिम ऑडीओ सी.डी. तयार करुन देण्यात येईल" अशी विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं.१७ ठ.मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

श्री साईबाबा संस्थानतर्फे अद्याप पावेतो साईचरित्रासाठी इंग्रजी भाषेतील ऑडीओ सी.डी. निर्मिती केलेली नाही. सदर ऑडीओ सी.डी. इंग्रजी भाषेत असल्याने जगभरातील इंग्रजी जाणकार साईभक्तांना त्याचा चांगला उपयोग होईल.

गायकाने सुमधूर आवाजात श्री साईचरित्राचे गायन केले आहे. साईभक्तांना ऑडीओ सीडी ऐकून चरित्राचा आनंद घेता येईल.

सदर ऑडीओ सी.डी.बाबत तज्ञ व्यक्तिचा अभिप्राय घेणेस तसेच सदर सी.डी. संस्थानतर्फे निर्मिती करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४०२ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईचरित्राची इंग्रजी भाषेतील ऑडीओ सी.डी .बाबत तज्ज्ञ व्यक्तिचा अभिप्राय घेणेस तसेच सदर सी.डी. संस्थानतर्फे निर्मिती करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४८ श्री साईसच्चरित मराठी,शिर्डी डायरी, श्री साई दी सूपरमॅन, साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) या पुस्तकांचे बंगाली भाषेमध्ये अनुवाद करणेस परवानगी मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईदास, चेअरमन, शिर्डी श्री साईबाबा भक्त संस्थान ट्रस्ट , वेस्ट बंगाल यांनी दि.२८.०१.२०१० चे इमेल पत्रान्वये संस्थान प्रकाशित पुस्तके १) श्री साईसच्चरित - मराठी २) शिर्डी डायरी ३) श्री साई दी सुपरमॅन ४) साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) या पुस्तकांचे बंगाली भाषेमध्ये भाषांतर करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

दिवसेन दिवस साईभक्तांची संख्या संपूर्ण देशात वाढतच आहे. वेस्ट बंगालमध्ये पण भक्त साईबाबांचे भक्तीकडे वळत आहे. म्हणून ब-याच साईभक्तांना साईबाबांचे जीवन व लिला समजणेसाठी बंगाली भाषेत पुस्तकांचे भाषांतर केल्यास बंगाली साईभक्तांना वाचन करता येईल.

श्री साईबाबांचे जीवनावर श्री साई सुधा नावाचे मासिक त्यांनी प्रकाशित केले आहे. त्या मासिकासाठी चांगल्या प्रमाणात बंगाली साईभक्तांचा प्रतिसाद मिळाला असलेबाबत त्यांनी कळविले आहे.

श्री साईबाबांचा प्रचार-प्रसार बंगाली जनतेमध्ये होणेसाठी उपरोक्त प्रमाणे अ.नं. १. श्री साई सच्चरित मराठी चरित्राचे बंगाली भाषेत रुपांतर करणेसाठी श्री साईलीला इंग्रजी-हिंदी मासिक, झरिनद्वारा अनुवादीत इंग्रजी साईचरित्राचा आधार घेऊन बंगाली भाषेत साईचरित्र तयार करणार आहेत, उपरोक्त अ.नं. २,३,४ या पुस्तकांचे बंगाली भाषेत भाषांतर करणेसाठी विनंती केली आहे.

संस्थानमार्फत श्री साईचरित्र व श्री साईनाथ सगुणोपासना आरती बंगाली ही २ पुस्तके प्रकाशित करुन भक्तांना काऊंटरवर विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

संस्थान प्रकाशनांचे हक्क संस्थानकडे असल्याने इतरांना संस्थान प्रकाशनांतील माहिती छपाई करणेस संस्थानने यापूर्वी छपाई हक्क व परवानगी देण्यात आलेली नाही.

तथापी संस्थान प्रकाशित भागांची छपाई करण्यास परवानगी दिल्यास श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार पश्चिम बंगाल मध्ये होण्यास मदत होईल.

**निर्णय क्र.४०३ श्री साईदास, चेअरमन, शिर्डी श्री साईबाबा भक्त संस्थान ट्रस्ट , वेस्ट बंगाल यांनी दि.२८.०१.२०१० चे इमेल पत्रान्वये संस्थान प्रकाशित पुस्तके १) श्री साईसच्चरित - मराठी २) शिर्डी डायरी ३) श्री साई दी सुपरमॅन ४) साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) या पुस्तकांचे बंगाली भाषेमध्ये भाषांतर करणेस परवानगी मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४९ श्री साईनाथ -स्तवनमंजरी व श्री साई सुमनांजली मराठीचा तेलगू अनुवाद संस्थानव्दारे प्रकाशित करणेबाबत**

**प्रस्ताव-** श्रीमती मनी अम्मा, हैदराबाद यांनी १०.०३.२०१० चे पत्रान्वये संस्थान प्रकाशित श्री साईनाथ - स्तवनमंजरी व श्री साई सुमनांजली (ह.भ.प.दासगणू महाराज लिखीत) मराठी भाषेचा तेलगू भाषेत अनुवाद केला आहे. सदर तेलगू भाषेतील स्तवन मंजरी संस्थान मार्फत प्रकाशित करण्याची इच्छा प्रकट केली आहे. सदर तेलगू भाषेतील स्तवन मंजरीचे सर्व हक्क संस्थानला प्रदाण करण्याची तयारी दर्शविली आहे. पत्रासोबत तेलगू भाषेतील स्तवन मंजरीची सी.डी. पाठविली आहे.

संस्थानद्वारा श्री साईस्तवन मंजरी तेलगू भाषेत नसल्याने मा.महोदय डॉ.एकनाथराव गोंदकर, विश्वस्त यांनी दि.१०.०३.१० रोजी सदरचा विषय मा.व्य.समितीचे सभेत सादर करणेचे निर्देश दिले आहे.

यापूर्वी श्रीमती मनी अम्मा, हैंदराबाद यांनी संस्थान प्रकाशित कै. गोविंद रघुनाथ दाभोलकरकृत श्री साईसच्चरित मराठी (पोथी ) चा ओवी टू ओवी तेलगू अनुवाद संस्थानव्दारा प्रकाशित करुन दक्षिण भारतीय तेलगू भाषिक साई भक्तांना उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदर पुस्तकास दक्षिण भारतातून उत्तम प्रकारचा प्रतिसाद मिळत आहे. संस्थानद्वारा यापूर्वी १) साईसच्चरित मराठी (पोथी ) चा ओवी टू ओवी तेलगू अनुवाद २) श्री साई सत् चरित्र,तेलगू ३) श्री साईंचे सत्यचरित्र, तेलगू ४) मातृसाई, तेलगू ५) मुलांचे साईबाबा, तेलगू ६) श्री साईनाथ पूजा विधी आरती तेलगू इत्यादी ६ प्रकारची पुस्तके दक्षिण भारतीय श्री साईभक्तंसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

संस्थानमार्फत साई स्तवन मंजरी - तेलगू प्रकाशित करण्यात आलेली नाही. संस्थानमार्फत साई स्तवन मंजरी प्रकाशित केल्यास तेलगू भाषेतील साईभक्तांना स्तवन मंजरी वाचून आनंद घेता येईल. श्री साई स्तवन मंजरीची सी.डी. सोबत दिली आहे.

सदर श्री साई स्तवन मंजरी तेलगू पुस्तक संस्थानद्वारा प्रथम आवृत्ती ५००० प्रती प्रकाशित करणेसाठी अंदाजे छपाई दर रु.५/- प्रमाणे रु.२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४०४ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साई स्तवन मंजरी तेलगू पुस्तक संस्थानद्वारा प्रथम आवृत्ती ५००० प्रती प्रकाशित करणेसाठी अंदाजे छपाई दर रु.५/- प्रमाणे रु.२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग )

---

**विषय नं.५० निवडक प्रेसधारकांचे यादीत प्रेमियर प्रिंटर्स, कोल्हापूर यांचे नावाचा समावेश करणे बाबत**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

उपरोक्त तरतुदीनुसार श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करणेकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी तर्फे श्री साईसच्चरित, फोटो वगैरे मा.व्य.समितीचे मान्यतेने छपाई करुन प्रकाशीत केले जातात.

पुस्तके/ फोटो छपाईकामासाठी मा.व्य.मंडळाचे दि.२९-३१.२००४ च्या सभेतील निर्णय क्र.१३८ नुसार रुपये एक कोटीपेक्षा जास्त उलाढाल असणा-या प्रेसची निवडक यादी तयार केलेली आहे. व मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०९.२००८ चे सभेतील निर्णय क्र.६५४ नुसार रुपये दोन कोटीपेक्षा जास्त वार्षिक उलाढाल असलेल्या प्रेसधारकांकडून श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका छपाईकामाच्या निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले आहे.

छपाईकामासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०३.०९ चे सभेतील निर्णय क्र.२५० नुसार २२ प्रेसधारक व मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१.६.२००९ चे सभेतील निर्णय क्र.५८९ नुसार १ प्रेसधारक तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७.०१.१० चे सभेतील निर्णय क्र.२३६ नुसार ३ प्रेसधारक असे एकूण २६ प्रेसधारकांची एक/दोन कोटी पेक्षा जास्त उलाढाल असणा-या प्रेसची निवडक यादी तयार करण्यात आलेली आहे.

प्रिमीअर प्रिंटर्स कोल्हापूर यांचे नावाचा समावेश निवडक यादीत करणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी निर्देश दिलेले आहेत. प्रिमिअर प्रिंटर्स यांची वार्षिक उलाढाल रुपये २ कोटी असून, त्यांचे खालील प्रमाणे मशिनरी व कर्मचारी आहेत.

१) ४ व ५ रंगात छपाईसाठी मशिन.
२) पेपर कटींग मशिन ४ नग.
३) ॲटोमॅटीक पेपर फोल्डर मशिन २ नग.
४) सेक्शन सेविंग मशिन १ नग.
५) डी.टी.पी., स्कॅनिंग आणि कलर सेपरेशन युनिटची व्यवस्था.

६) कर्मचारी संख्या २५

मा.व्यवस्थापन समितीने ठरवून दिलेल्या निकषानुसार प्रिमिअर प्रिंटर्स्, कोल्हापूर पात्र असल्याने त्यांचे नावाचा समावेश निवडक यादीत करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४०५** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीने ठरवून दिलेल्या निकषानुसार प्रिमिअर प्रिंटर्स्, कोल्हापूर पात्र असल्याने त्यांचे नावाबरोबर मे. मे.टॅको व्हिजन्स् प्रा.लि. मुंबई यांचेही नावाचा समावेश निवडक यादीत करण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभागप्रमुख)

---

**विषय नं.५१** **श्रीसाईचरित्र तामिळ भाषेत ऑडिओ सी.डी. निर्मितीबाबत.**

**प्रस्ताव-** Shri Chockalingam Subramanian, Tamil Nadu यांनी दि.२४.१२.२००९ चे पत्राने श्री साईचरित्र तामिळ भाषेत ऑडिओ सी.डी. काढणेबाबत खालील प्रमाणे सविस्तर माहिती दिली आहे.

Published by sri sai journal centre, Chennai यांना श्री साईबाबांची शिकवण व तत्त्वज्ञान यावर आधारित असलेल्या Shri Sai Margam या Tamil Magazine चे सी.डी. निर्मितीचा ७ वर्षापासून अनुभव आहे. तसेच त्यांचे सेंटरमधून साईबाबांवर पार्श्वगायन केलेल्या गायकांच्या सी.डी. ची निर्मिती केली जाते. त्यांनी ना नफा ना तोटा या तत्त्वावर श्री साईसतचरित्र तामिळची ऑडीओ सी.डीची मास्टरची निर्मिती करणेस सहमती दर्शविली आहे.

Published by sri sai journal centre, Chennai यांनी मास्टर बनविणेसाठी येणा-या खर्चाचे खालील प्रमाणे दरपत्रक पाठविलेले आहे.

| Recording | Per Hour | Multiplying | Total |
|---|---|---|---|
| 70 Hours<br>Within 15 days | Rs.250/- Only | Rs.250 X 70 Hours | 17,500.00 |
| 10 Hours<br>Correction & Final Shape | Rs.250/- Only | Rs.250X10 Hours | 2,500.00 |
| Engineers Bata<br>For 15 days | | | 750.00 |
| Total | | | **20,750.00** |

उपरोक्त Published by sri sai journal centre, Chennai यांनी श्री साईचरित्र-तामिळची मास्टरची निर्मिती करणेसाठी रु.२०,७५०/- मात्र रक्कम दरपत्रकात कळविली आहे मास्टरची निर्मितीचे काम चालू करणेसाठी ५०% रक्कम चेक/डी.डी. ने sri sai journal centre, Chennai या नावाने पाठविणेबाबत विनंती केली आहे व उरलेली ५०% रक्कम मास्टर निर्मितीचे काम पूर्ण झाल्यानंतर पाठविण्याची व्यवस्था करणेबाबत कळविले आहे.

Shri Chockalingam Subramanian, Tamil Nadu यांना श्री साईचरित्र- तामिळची मास्टर तयार करेसाठी मानधनाची अपेक्षा नाही. फक्त येण्या-जाण्याचा प्रवास खर्च, त्यांचे आवाजात साईचरित्राचे रेकॉर्डीग करणे असल्याने चेनई येथे १० दिवस लॉजवर राहाण्याचा व जेवणाचा खर्च, रक्कम रु.१५,०००/- मात्रची मागणी केली आहे.

संस्थानने Shri Chockalingam Subramanian, Tamil Nadu यांना मास्टर सी.डी. बनविणेसाठी पूर्ण अधिकार दिल्यानंतरच ते साईचरित्राची मास्टर ऑडीओ सी.डी. रेकॉर्डीगचे काम चालू करणार आहेत.

श्री साईचरित्र तामिळ ची मास्टर सी.डी. तयार झालेनंतर ऑडीओ सी.डी. निर्मितीबाबतचे दरपत्रक नंतर कळविणेबाबत दरपत्रकात सुचित केले आहे.

श्री साईचरित्र तामिळ ची मास्टर सी.डी. तयार करुन घ्यावयाचे झाल्यास sri sai journal centre, Chennai यांना ५०% रक्कम रु.१०३७५/- चेक/डी.डी. ने पाठवावी लागेल. व उर्वरित रक्कम १०३७५/-मात्र मास्टर सी.डीचे काम पूर्ण झाल्यानंतर रक्कम रु.१०३७५/- व Shri Chockalingam Subramanian, Tamil Nadu यांना येण्याजाण्याचा प्रवास खर्च लॉजवर १० दिवस राहाण्याचा व जेवणाचा खर्च रक्कम रु.१५,०००/- पाठवावी लागेल.

तरी Shri Chockalingam Subramanian, Tamil Nadu यांचा वरील प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.४०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईचरित्र तामिळ भाषेत ऑडिओ सी.डी.निर्मितीबाबत मा.श्री के.व्ही.रमणी यांना विचारणा करावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.५२** **कु.सुनंदा किसन जगताप,परिचारिका श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे विनापरवानगी गैरहजेरी बाबत**

**प्रस्ताव-** कु. जगताप या जा.नं.एस एस एस /वशी १/५२१६/२००६ दि. २२/०४/०६ अन्वये दि. २८/०४/०६ पासुन श्री साईबाबा हॉस्पिटल येथे परिचारीका म्हणून कार्यरत आहेत. त्या दि. ०१/०३/०९ पासुन सतत, सलग, विनापरवानगी, रजा अर्जा शिवाय कामावरुन गैरहजर आहेत. त्याच्या गैरहजेरीमुळे रूग्णालयाच्या दैनंदिन कामकाजात अडचणी येतात. त्या बद्दल इकडिल जा.नं.एस एस एस / वशी-७बी/८५६७/२००९ दि. १०/०७/२००९ अन्वये रजिस्टर ए.डी.पोस्टव्दारे त्यांना पत्र पाठवुन कळविण्यात

आले की, गैरहजेरीबाबतचा लेखी खुलासा सादर करुन कामावर हजर व्हावे. अन्यथा तुम्हास संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजुन तुमचे नांव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल. सदरचे पत्र त्यांचे सध्याचे पत्यावर व कायमचे पत्यावर पोस्टा मार्फत पाठविण्यात आले होते. सध्याच्या पत्यावर पाठवलेले पाकीट पोस्ट खात्या मार्फत परत आलेले आहे. कायमच्या पत्यावर पाठवलेले पत्र त्यांना प्राप्त झाले आहे.

कु. जगताप यांनी दि.०५/०९/०९ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे. त्या खुलाशात त्यांनी ०१/०३/०९ पासुन सतत सलग विनापरवानगी गैरहजर असल्याचे कबुल केले आहे. सदरच्या खुलाशात गैरहजेरीचे कारण प्रेगनन्सीचे दिलेले आहे. गैरहजेरी बाबत वरीष्ठांना कळविले नसल्याचेही त्यांनी कबुल केले आहे. प्रेगनन्सी पिरेडमध्ये डॉक्टरांनी बेडरेस्ट घेण्याबाबत सुचविलेले आहे. कामावर हजर होणेसाठी अजुन सहा महिने मुदतीची त्यांनी मागणी केली आहे.सिजरींन ऑपरेशन झाल्यामुळे सध्या कामावर येऊ शकत नाही असे म्हटले आहे. सदरच्या खुलाशासोबत त्यांनी डॉ. पंकज नांवदर सिन्नर, यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडलेले आहे. सदरच्या प्रमाणपत्रात सुनंदा स्वरुप खांबेकर अशा नावाचा ऊल्लेख आहे.त्या दिनांक ०३/०९/०९ रोजी बाळंतपणासाठी दवाखान्यात दाखल झाल्या होत्या. त्यांना कन्या रत्न झ ााले आहे. त्यांना दि. १०/०९/०९ रोजी रुग्णालयातुन डिसचार्ज दिल्याचे म्हटले आहे.वैद्यकीय प्रमाणपत्रात येथुनपुढे सहा महिने बेडरेस्ट घ्यावी असा ऊल्लेख नाही. सदरच्या खुलाशावर सहाय्यक आधिसेविका यांचा असा अभिप्राय आहे की, कु. जगताप यांनी दि. १८/११/०८ ते २८/०२/०९ या दिर्घ कालावधिसाठी रजा ऊपभोगलेली आहे. त्या नंतर दि. ०१/०३/०९ पासुन त्या सतत सलग गैरहजर आहे. त्या किती तारखेला कामावर हजर होणार या बाबतचा खुलाशात स्पष्ट उल्लेख नाही. सध्या परीचारीकेची संख्या अपुर्ण असल्याने त्यांनी कामावर हजर होणे आवश्यक आहे. संस्थान नियमानुसार मॅटरनिटी लीव्ह संपल्यानंतर त्यांनी तात्काळ कामावर हजर व्हावे असे मत आहे.

द मॅटरनेटी बेनिफिट ॲक्ट १९६१ चे कलम ५ (३) नुसार १२ आठवडेची मॅटरनेटी लीव्ह बाळतंपणापुर्वी ६ आठवडे व बाळतंपणानंतर ६ आठवडे अशी ऊपभोगता येईल. परंतु कलम ६ (२) अन्वये अर्जदाराने अशा प्रकारची नोटिस व्यवस्थापनाला देणे आवश्यक आहे. सदरच्या नोटिस सोबत वैद्यकीय प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.अशा प्रकारची पुर्तता कु. जगताप यांनी केलेली नाही. कलम ६ (३) नुसार ज्या अर्जदाराने अशी पुर्तता केली नसेल त्यांनी बाळतंपणा नंतर शक्यतो लवकरात लवकर पुर्तता करणे आवश्यक आहे.

कु. जगताप या दि. १८/११/०८ पासुन कामावर येत नाही. मॅटरनेटी बेनिफिट ॲक्ट १९६१ नुसार बाळंतपण रजेचा कालावधि पुर्ण झालेला आहे. तरी देखिल आणखी सहा महिन्याच्या रजेची मागणी केली आहे. कु. जगताप यांची मागणी कायदेशिर नाही. त्या बद्दल इकडिल जा.नं.एसएसएस/ वशी- ७बी/ १३४१०/२००९ दिनांक ०३/११/०९ अन्वये त्यांना रजिस्टर ए.डी पोस्टाद्वारे पत्र पाठवुन कळविण्यात आले होते की, द मॅटरनेटी बेनीफिट ॲक्ट १९६१ मधिल तरतुदी, कामाची निकड, त्यांचे खुलाशावरील वैद्यकीय संचालक यांचा अभिप्राय विचारात घेता त्यांना या पुढची दिर्घकालीन रजा मंजुर करता येणार नाही. तरी सदरचे पत्र मिळताच सात दिवसांचे आत कामावर हजर व्हावे, अन्यथा संस्थान सेवेत स्वारस्थ नाही असे समजुन संस्थानच्या हजेरी पटावरुन नाव कमी करण्यात येईल. सदरचे पत्र कु. जगताप यांना प्राप्त झाले आहे. परंतु त्या अद्याप पर्यंन्त कामावर हजर झाल्या नाहीत.

सबब, त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजुन त्यांचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करता येईल.

**निर्णय क्र.४०७ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे कु.सुनंदा किसन जगताप,परिचारिका श्री साईबाबा हॉस्पिटल, यांचे नांव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-कामगार अधिकारी )

---

**विषय नं.५३ श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट जि.सोलापूर यांना यात्रीनिवास बांधकांमासाठी आर्थिक मदत देणे बाबत.**

**प्रस्ताव-** अध्यक्ष, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट यांनी दि.२२/०२/२०१० चे पत्रान्वये, अन्नछत्र मंडळामार्फत दररोज १०-१५ हजार भक्तांना मोफत महाप्रसाद दिला जातो. त्याचप्रमाणे दिवसेंदिवस परगांवाहून येणाऱ्या स्वामी भक्तांच्या संख्येत वाढ होऊ लागली आहे. अक्कलकोट शहरात सहकुटूंब रहाण्या योग्य लॉज नसल्यामुळे आमच्या मंडळाने रु.५ कोटी खर्च करुन यात्रीनिवास-१ चे काम पुर्ण केले असून सदर खोल्या वापरात आहे. आता संडास- बाथरुम ॲटॅच १०२ खोल्याचे यात्रीनिवास-२ चे काम हाती घेतले असून बांधकामासाठी रु.१ कोटी २० लाख खर्च झाला असून उर्वरित बांधकामासाठी रु. १.५० कोटी रुपये अपेक्षित आहे. दरारोजच्या महाप्रसादाच्या खर्चास प्राधान्य देणे आवश्यक असल्याने बांधकाम आर्थिक कमतरतेमुळे अतिशय मंदगतीने चालु आहे. सदरचे बांधकाम पुर्ण होण्याच्या दृष्टीने संस्थानतर्फे योग्य ते अनुदान मंजुर करावे अशी विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ मध्ये विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग याबाबत खालीलप्रमाणे तरतुद आहे.

कलम २१ (२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या

वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

कलम २१ मधील (२) पोट कलम (१) (एक)- राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृहे किंवा इतर धर्मदाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधीत असलेली एखादी नोदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी, मा.छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने अनुदान देण्याची तरतुद आहे.

**निर्णय क्र.४०८ श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट जि.सोलापूर यांना यात्रीनिवास बांधकामासाठी आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली. याकामी छाननी समितीची मान्यता घेण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**विषय नं.५४ श्रीरामपूर येथील भू-संपादन कक्षातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मुदतवाढ व मानधन वाढीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी करीता भू-संपादन करणेकामी दि.१५-१६-१७ जुलै २००० रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्र.२३८ नुसार मा. उपविभागीय अधिकारी महसूल श्रीरामपूर यांचे पर्यवेक्षणाखाली दि.०२/०८/२००० पासून एक कक्ष सुरु करण्यात आलेला आहे. या कक्षाकडे कंत्राटी पद्धतीने खालील कर्मचारी देण्यात आलेले असून त्यांना त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे एकत्रित मानधन देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे पद | हुद्दा | संख्या | मासिक एकत्रीत वेतन / मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | नायब तहसीलदार | कंन्सल्टंट | ०१ | रु.७०००/- |
| ०२ | अव्वल कारकुन संवर्गातील | अव्वल कारकुन | ०१ | रु.४५००/- |
| ०३ | लिपीकाचे कामासाठी | कंत्राटी कुशल कामगार | ०४ | रु.४०००/- |
| ०४ | कार्यालयीन कामकाजासाठी शिपाई | कंत्राटी अकुशल कामगार | ०१ | किमान वेतनानुसार हजेरी |
| | | **एकूण** | **०७** | |

जा.नं.एसएसएस वशी ०१/१६६६ व १६६७ /२००९ दि. २०/०५/२००९ अन्वये सदर भू-संपादन कक्ष व कक्षात काम करीत असलेले कर्मचारी यांना देण्यात आलेली एक वर्ष मुदतवाढ दि.३०/०४/२०१० रोजी संपुष्ठात येत आहे. दि. १२/०३/२०१० रोजी मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी मुदतवाढ प्रस्ताव सादर करुन भू-संपादनाची ५ प्रकरणे तसेच नगरपालिकेसाठी चालू असलेली ०७ प्रकरणे व बाहयवळण रस्त्यांसाठी चालू असलेले १३ प्रकरणांचा सद्य:स्थिती दर्शविणारी माहिती कळविली आहे. या सर्व प्रकरणांत भू-संपादनाची प्रक्रिया सत्वर पूर्ण करणेस आणखी कमीत कमी ०१ वर्षाचा कालावधी आवश्यक आहे. सबब ही भू-संपादन प्रकरणे सत्वर निर्गत करणेकामी या कक्षास तसेच या कक्षाकडे कार्यरत असलेले वरिल कर्मचारी यांना दि. ०१/०५/२०१० ते दि.३०/०४/२०११ अखेर एक वर्ष मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

मा.जिल्हाधिकारी कार्यालयात कंत्राटी पध्दतीवर तहसिलदार, नायब तहसिलदार या संवर्गातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दरमहा रु.१००००/- व सेवानिवृत्त अव्वल कारकून यांना दरमहा रु. ८०००/- मात्र मानधन दिले जाते तसेच शिर्डीसाठी काकडी येथे होणारे विमानतळासाठी भू-संपादनाकरीता कंत्राटी पध्दतीने नेमलेले तहसिलदार यांनाही दरमहा रु. १००००/- व सेवानिवृत्त अव्वल कारकून यांना दरमहा रु.८०००/- असे मानधन दिले जाते. त्यांचे प्रमाणेच एकत्रित मानधन वाढवून मिळावे असा विनंती अर्ज संबंधीत कक्षाकडे काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी केलेला आहे. तसेच कुशल कामगार यांना मासिक एकत्रित वेतन रु. ४०००/- दिले जाते त्याऐवजी त्यांना सध्या अस्थित्वात असलेल्या किमान वेतन हजेरीनुसार वेतन देण्यात यावे. अशी विनंती उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांनी केलेली आहे.

सदर बाबत वरिष्ठ उपमुख्य अभियंता बांधकाम विभाग यांनी " मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचे कार्यालयातील भू-संपादन कक्षास व सदरहू कक्षातील ०७ कर्मचाऱ्यांना उपरोक्त २५ प्रकरणांचा निपटारा लवकरात लवकर होणे गरजेचे असल्याने ०१ वर्ष मुदतवाढ देणेबाबत तसेच त्यांना द्यावयाचे मानधन / वेतनाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व निर्देशानुसार उचित निर्णय घेणेस हरकत नाही. " असे अभिप्राय दिलेले आहेत. त्यानुसार -

**अ)** उपरोक्त कक्षाकडे चालू असलेली कामे व मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांची सदर कक्षास मुदतवाढ मिळणेबाबतची विनंती तसेच वरिष्ठ उपमुख्य अभियंता,

बांधकाम विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता पूर्वीच्याच अटी-शर्तीवर दि.०१/०५/२०१० ते दि.३०/०४/२०११ अखेर सदर कक्षास व कक्षाकडे काम करीत उपरोक्त कर्मचारी यांना मुदतवाढ देता येईल.

**ब)** मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांनी केलेल्या विनंतीनुसार श्री वाव्हळ यांना देण्यात येत असलेल्या दरमहा मानधन रु. ७०००/- ऐवजी रु.१००००/- व श्री नागरे यांना रु.४५००/- ऐवजी रु.८०००/- एकत्रित मानधन देणेबाबत विचार करता येईल.

**क)** सदर कक्षाकडे रु.४०००/- मानधनावर काम करीत असलेल्या कंत्राटी ०४ कुशल कर्मचाऱ्यांनी किमान वेतन कायद्यानुसार कुशल कॅटेगरीचे वेतन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार त्यांना किमान वेतन कायद्यानुसार संस्थानकडे कंत्राटदारामार्फत नेमणूकीस असलेले कुशल कंत्राटी कामगार यांचेप्रमाणे हजेरी पत्रकानुसार किमान वेतन देता येईल.

**निर्णय क्र.४०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामपूर येथील भू-संपादन कक्षातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना पूर्वीचेच अटी शर्ती व मानधनावर एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.५५ महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम-२००९ नुसार निवासी वैद्यकीय अधिकारी (आर.एम.ओ.) यांना सुधारित वेतन देणे बाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०५/२००९ मधील निर्णयानुसार राज्य शासकिय कर्मचा-यांप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना ०६ व्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार वेतनश्रेणी जून-२००९ च्या पगारापासून लागू करण्यात आलेली आहे. वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार रु.८०००-१३५०० वेतनश्रेणीतील वैद्यकिय अधिकारी यांना खालील प्रमाणे वेतनश्रेणी देण्यात येत आहे.

| अ.नं. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारित वेतन बॅन्ड व ग्रेड वेतन | |
|---|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकिय अधिकारी | ८०००-१३५०० | वेतन बॅन्ड<br>रु. ९३००-३४८०० | ग्रेडवेतन<br>रु. ५४०० |

आता शासन अधिसुचना क्रमांक वेपूर १२०९/प्र.क्र.१५३/सुधारणा -५/सेवा-९ मंत्रालय मुंबई ३२ दि.०४/११/२००९ अन्वये उपरोक्त वेतनश्रेणी व सुधारित वेतनबॅन्ड मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारित वेतन बॅन्ड व ग्रेड वेतन | |
|---|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकिय अधिकारी | ८०००-१३५०० | वेतन बॅन्ड<br>१५६००-३९१०० | ग्रेडवेतन<br>रु. ५४०० |

सदर निर्णयानुसार ०१ जानेवारी २००६ पासून वेतननिश्चिती करावयाची असून प्रत्यक्ष लाभ दि.०१ सप्टेंबर २००९ पासून द्यावयाचा आहे. ०१ जानेवारी २००६ ते ३१ ऑगष्ट २००९ पर्यंतची थकबाकी अनुज्ञेय नाही अशी तरतूद आहे.

सुधारित शासन निर्णयानुसार वेतन बॅन्ड संस्थानचे हॉस्पीटल मधील संबंधीत वैद्यकिय अधिकारी, आर.एम.ओ. रक्तसंक्रमण अधिकारी यांना देण्यात यावा अशी विनंती वैद्यकिय संचालक, व वैद्यकिय अधिक्षीका, यांनी केली आहे.

त्यानुसार शासनाच्या सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार संस्थान कर्मचा-यांना वेतन देणेबाबत मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०५/२००९ मध्ये निर्णय झालेला असल्याने वैद्यकिय अधिका-यांना वरीलप्रमाणे सुधारित वेतन देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० रोजीच्या सभेपुढे सादर करण्यात आला होता. मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये पुढील प्रमाणे निर्णय झाला आहे.

**<u>निर्णय :-</u> महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन ) नियम-२००९ नुसार वैद्यकिय अधिकारी यांना सुधारित वेतन दिल्यास वैद्यकिय अधिका-यांचे वेतनात किती वाढ होईल व त्याचा संस्थानवर किती अर्थिक बोजा पडेल याबाबत सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.**

सध्या श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन्ही हॉस्पीटलचे आस्थापनेवर मिळूण एकुण ३० वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ, रक्तसंक्रमण अधिकारी,वैद्यकिय अधिकारी भूलतज्ञ) सेवेत आहेत. या सर्व वैद्यकिय अधिका-यांना सुधारित वेतन बँड रु.१५६००-३९१०० नुसार सुधारीत वेतन दिल्यास संस्थानवर खालील प्रमाणे बोजा पडेल.

- प्रती वैद्यकिय अधिका-यांचे वेतनात मासिक होणारी वेतनवाढ रु. ११५० + अनुशंगिक भत्ते -३१०.५० = एकूण रु. १४६०=५०

- एकूण ३० वैद्यकिय अधिकारी-यांचे वेतनात मासिक होणारी वेतनवाढ मूळवेतन रु.३४५०० + महागाई रु.९३१५ एकूण रु. ४३८१५=००

-एकूण ३० वैद्यकिय अधिका-यांचे वेतनात वार्षीक होणारी वेतनवाढ मूळवेतन रु. ४,१४,००० + महागाई रु. १,११,७८० = एकूण रु. ५,२५,७८०/-

तरी उपरोक्त प्रमाणे ३० वैद्यकिय अधिका-यांना सुधारित वेतन दिल्यास त्याचा संस्थानवर वार्षीक एकूण रु. ५,२५,७८०/- इतका अर्थिक बोजा पडेल.

**निर्णय क्र.४१० यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम -२००९ नुसार निवासी वैद्यकीय अधिकारी (आर.एम.ओ.) यांना सुधारित वेतन देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.५६ संस्थान आस्थापनेवर ११ महिने मुदतीकरीता तात्पुरत्या नेमणूका केलेल्या परिचारीकांचे, तसेच कंत्राटदारामार्फत घेतलेल्या कंत्राटी परिचारीकांचे वेतनात वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डी यांनी दि.२१/०१/२०१० रोजी सादर केलेल्या प्रस्तावाने " श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधात परिचारीका या पदासाठी १६० पदे वेतनश्रेणीवर व ४० पदे आऊट सोर्स पध्दतीने भरावे असे नमूद केले आहे. परंतू प्रत्यक्षात ११६ परिचारीका कामाकरीता उपलब्ध आहेत व ही संख्या अपूरी पडत आहे. हॉस्पीटल सुरळीत चालणेकामी १५० परिचारीकांची आवश्यकता आहे व ४० आऊटसोर्सने घेणेस मान्यता आहे परंतू सध्या आऊटसोर्स मार्फत पुरविले जात असणाऱ्या परिचारीकांना १४९.४३ हजेरी प्रमाणे प्रतिमाह रु.३८८५/- प्रतिमहा मिळतात त्यामुळे जी.एन.एम. प्रशिक्षीत कर्मचारी संस्थान रुग्णालयात हजर होत नाहीत. " असे कळविलेले आहे.

सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे परिचारीकांचा वेतन बँड रु. ९३००-३४८०० पे बँन्ड ग्रेड पे रु. ४२००/- + महागाई असा आहे. या दरानुसार परिचारीका या पदाचे दरमहाचे सुरुवातीचे मुळवेतन रु. ९३०० + महागाई भत्ता ३६४५ + ग्रेड पे रु.४२००/- + घरभाडे भत्ता रु.१३५०/- या प्रमाणे दरमहा रु. १८,४९५/- वेतन देय होत आहे.

११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या नेमलेल्या परिचारीकांना तसेच कंत्राटी परिचारीकांना खालील स्तंभ क्र ४ मध्ये नमूद केलेप्रमाणे सध्या एकत्रित वेतन देण्यात येत आहे.

वरिल बाब विचारात घेता खालील स्तंभ क्र.५ मध्ये नमूद केलेप्रमाणे उपरोक्त परिचारीकांना दरमहा रु. १०,०००/- मासिक एकत्रित वेतन देणेस मान्यता मिळावी.

| अ.क्र. | तपशिल | संख्या | सध्याचे मासिक नियतवेतन (Fix Pay) | प्रस्तावीत मासिक वेतन (Fix pay) |
|---|---|---|---|---|
| १) | संस्थान आस्थापनेवरील ११ महिने कालावधीसाठी नेमलेल्या परिचारीका | २५ | १) नियतवेतन (Fix Pay) दरमहा रु. ८,०००/- | दरमहा रु.१०,०००/- |
| २) | संस्थान कंत्राटदाराकडील कंत्राटी परिचारीका | २७ | २) कुशल वेतन दररोज रु. १४९.४३ दरमहा रु. ३८८५/- | दरमहा रु.१०,०००/- |

तसेच येथून पुढे ११ महिन्याकरीता तात्पुरत्या नेमण्यात येणाऱ्या व आवश्यकतेनुसार घेण्यात येणाऱ्या कंत्राटी (आऊटसोर्स) परिचारीकांनाही दरमहा रु.१०,०००/- एकत्रित वेतन देण्यात मान्यता असावी.

**निर्णय क्र.४११ यावर सविस्तर चर्चा होऊन, येथून पुढे संस्थान आस्थापनेवरील ११ महिने कालावधीसाठी नेमलेल्या परिचारीकांना दरमहा रुपये १०,०००/- एकत्रित वेतन व संस्थान कंत्राटदाराकडील कंत्राटी परिचारीकांना दरमहा रु.८,०००/- एकत्रित वेतन देण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.५७ श्री.चंद्रकांत जयवंत रणशूर कंत्राटी सल्लागार यांचा मुदतवाढ व मानधन वाढ मिळणेबाबतचा दिनांक २७.३.२०१० चा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री. चंद्रकान्त जयवंत रणशूर, कंत्राटी पध्दतीने सल्लागार बांधकाम विभाग यांनी दि.२७/०३/२०१० रोजी अर्ज केला असून "जमीन खरेदी विषयक प्रस्ताव, संस्थानचे साठी भसूपांदन विषयक प्रस्तावाबाबत पाठपुरावा करणे, संस्थानने खरेदी केलेल्या जमीनी बिगरशेती करणेबाबत प्रस्ताव तयार करुन बिनशेती आदेश प्राप्त करुन घेणे अशी व त्या अनुषंगीक कामे करीत आहे. मला वाढवून देण्यात आलेली मुदत दि.११/०५/२०१० अखेर संपुष्ठात येत आहे. मला रु.८५००/- एकत्रित मानधन मिळत आहे.केंद्र व राज्य शासनाने सर्वाना सहावा वेतन आयोग लागू केलेला आहे. पेन्शनर लोकांनाही पेन्शनमध्ये साधारणत: ४० टक्के वाढ करण्यात आलेली आहे. तरी माझे कामाचे मूल्यमापन होऊन मला मिळणारे मासिक मानधन रु.८५००/-ऐवजी मासिक रु.१२,०००/- मिळावे व एक वर्ष मुदतवाढ मिळावी" अशी विनंती केली आहे.

श्री. चंद्रकान्त जयवंत रणशूर, यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/८२७८/२००५ दि.०४/०८/२००५ अन्वये बांधकाम विभागाकडे कंत्राटी पध्दतीने प्रथम एक वर्ष मुदतीसाठी नेमणूक करण्यात आली असून ते दि. १२/०५/२००५ रोजी कामावर हजर झाले आहेत. जा.नं.एसएसएस/वशी-०१/१६६५/२००९ दि.२०/०५/२००९ अन्वये देण्यात आलेली मुदतवाढ दि.११/०५/२०१० अखेर संपुष्ठात येत आहे. त्यांचे बाबत माहिती पुढील प्रमाणे आहे.

**अ)** श्री. रणशूर हे सेवानिवृत्त नायब तहसीलदार (सरकारी कर्मचारी ) असून पेन्शनर आहेत.

**ब)** त्यांची जन्मतारीख दि.०३/०९/१९४१ असून सध्या त्यांचे वय ६८ वर्षे ०७ महिने इतके आहे.

**क)** श्री. रणशूर यांची नेमणूक रु.७०००/- या एकत्रित मानधनावर करण्यात आलेली असून त्यांना आतापर्यंत ०४ वर्षे मुदतवाढ देण्यात आलेली असून दोनवेळा मानधनात वाढ करण्यात आलेली असून सध्या त्यांना रु.८५०० इतके एकत्रित मानधन देण्यात येत आहे.

श्री.रणशूर यांचे काम समाधानकारक असून, भूसंपादन कक्षासह ते सध्या विविध प्रस्तावाच्या संबंधाने करीत असलेलया कामाचे स्वरुप पहात तूर्त त्यांना एक वर्ष मुदतवाढ देणेस व त्यांचे मानधनात मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने यथोचित वाढ करणेस हरकत नाही "असे वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी अभिप्राय दिले आहेत.

श्री. रणशूर यांनी मुदतवाढ व मानधन वाढीबाबत केलेली विनंती व उपरोक्त **अ,ब,क,** तसेच वरिष्ठ उपमुख्य अभियंता बांधकाम विभाग यांचे श्री. रणशूंर यांचे बाबत अभिप्राय विचारात घेता त्यांचे मुदतवाढ व मानधनवाढीबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४१२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. रणशूर यांना दिनांक ११/०५/२०१० पासून पुढील एक वर्ष कालावधीसाठी पूर्वीचेच अटी शर्ती व मानधनावर मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं. ५८ अहमदनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवीन बेंचेस खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१४.१०.२००६ मधील निर्णय क्र.८६४ नुसार अहमदनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना बसण्याकरिता आवश्यक असणारे ९१,०२२ नग बेंचेस खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.१,००,००,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.२८.०२.२०१० चे वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदांची विक्री शिर्डी व मुंबई कार्यालय येथून करण्यात आलेली होती. त्यानुसार मुदतीअंती प्राप्त झालेल्या निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | आवक क्रमांक /दिनांक |
|---|---|---|
| ०१. | गोदरेज ॲण्ड बायो.लि. पुणे | ८२६४/२५.०३.२०१० |
| ०२. | फेदरलाईट ऑफिस सिस्टीम प्रा.लि, मुंबई | ८२६३/२५.०३.२०१० |
| ०३. | स्टील केस, मुंबई | ८२६२/२५.०३.२०१० |
| ०४. | मे.दुराणी इंडस्ट्रीज लि.मुंबई | मु.का.५३५/२५.०३.२०१० |

उपरोक्त निविदाधारकांना आजचे सभेपुढे चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आलेले आहे. तरी प्राप्त निविदा आपणासमक्ष उघडून उपस्थित असलेल्या निविदाधारकांशी वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घेणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.४१३ उपरोक्त उपस्थित सर्व निविदासादरकर्त्यांना सभेसमक्ष बोलविण्यात येऊन, दिनांक ३०.४.२०१० अखेर बेंचचा नमूना देणेबाबत सांगण्यात आले. बेंचचे नमुने प्राप्त झालेनंतर संबंधित निविदासादरकर्त्यांना सभेपुढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे, असें ठरलें.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

---

**विषय नं. ५९ सौ भारती विजय गायकवाड, शिर्डी यांचे कुटूंबातील एक व्यक्तीस लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कामावर घेणे बाबत.**

**प्रस्ताव** सौ.भारती विजय गायकवाड रा.शिरडी ही महिला संस्थानचे श्री साईनाथ रूग्णालयात दि.०४ एप्रिल २०१० रोजी प्रसुतीसाठी दाखल झाली होती. सदर दिवशी सायंकाळी ६.५५ वाजेच्या दरम्यान सौ.भारती गायकवाड यांची प्रसूती होऊन तिला मुलगा झाला होता. तिची काळजी घेणारे तिचे नातलगही तिच्या जवळ असतांना दि.०५-०४-२०१० रोजी सकाळी ६.०० वाजेच्या दरम्यान सौ.भारती गायकवाड यांचे लहान मुल अचानक गायब झाल्याचे लक्षात आले. श्री साईनाथ रूग्णालयातील प्रसूतीवार्ड तसेच संपूर्ण रूग्णालयामध्ये शोधाशोध करूनही नवजात बालक सापडले नाही. सदर घटणेची खबर तिचे नातेवाईक व पोलीसांना कळविणेत आली होती. दरम्यान शिरडी पोलीस स्टेशन शिरडी येथे सौ.भारती गायकवाड यांचे नवजात बालक गायब झाल्याचा गुन्हा रजिस्टर क्र.५३/२०१० प्रमाणे बालक पळवून नेणे, चोरून नेणे यानुसार भारतीय दंड विधान कलम ३६३ प्रमाणे दाखल करणेत आला आहे. त्याबाबतचा तपास शिरडी पोलीस स्टेशन, शिरडी यांचेकडून चालू आहे.

तरी सौ.भारती विजय गायकवाड, रा.शिरडी यांचे कुटुंबास मानवतेच्या दृष्टीकोणातून सहानुभूतीपुर्वक विचार करुन सद्भावनेने मदत करणेबाबत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ४१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, सौ भारती विजय गायकवाड, शिर्डी यांचे कुटूंबातील एक व्यक्तीस लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कामावर घेण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-कामगार अधिकारी )

---

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१.** **दिनांक २७.०१.२०१० रोजी समिती सभागृह मंत्रालय,मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.४१५** **दिनांक २७.०१.२०१० रोजी समिती सभागृह मंत्रालय,मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,सभाकामकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२.** **मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचे शासकीय वाहन क्र.एमएच-१७/के-२१२१ चे दुरुस्तीसाठी रक्कम आदा करणे बाबत**

**निर्णय क्र.४१६** **सदरहू विषय मागे घेण्यात आला.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३.** **आयव्हीआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड प्रोजेक्ट लि.हैद्राबाद/पुणे यांचे शिर्डी येथे अतिथीगृह बांधणेचे प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. जनरल मॅनेजर, आयव्हीआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड प्रोजेक्टस् लि., पुणे यांनी मा. अध्यक्षसो. यांना अग्रेषित केलेल्या त्यांचेकडील जा. क्र. आयव्हीआरसीएल/पीआरओ/शिर्डी/०९-१०,दिनांक २३ जानेवारी, २०१० रोजी शिर्डी येथे अतिथीगृह बांधण्याचे विनंतीवजा प्रस्तावात खालीलप्रमाणे नमूद केले आहे. त्याचा थोडक्यात गोषवारा :

.. .. आमचे संस्थेने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेबरोबर नवीन प्रसादालय इमारतीचे बांधकाम ठेकेदार म्हणून काम केले आहे. आपले सहकार्याने, सहाय्याने व मार्गदर्शनाखाली सदर बांधकाम आपले अपेक्षेप्रमाणे मुदतीमध्ये पूर्ण केलेले आहे. आमचे संस्थेने या बांधकाम प्रकल्पामध्ये झालेला नफा रक्कम रुपये १,०१,०१,११६/- मात्र संस्थानला ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना वैद्यकिय सोयी-सवलती मिळाव्यात म्हणून परत दिलेला आहे. आम्हांस आनंद आहे की, हजारो भक्त याचा लाभ घेत आहेत.

आयव्हीआरसीएल आपल्या सामाजिक उत्तरदायित्वाबाबत जागृत असून, स्थानिक सामाजिक संस्थांबरोबर विकास कामांसाठी तत्पर आहे. याचाच एक भाग म्हणून, आमचे संस्थेने निवडक अशा धार्मिक स्थळांचे ठिकाणी अतिथीगृह बांधण्याचे ठरविले आहे.

मंदिर परिसरालगत, शिर्डी परिसरात संस्थानची मोठी जमीन आहे, आम्हांस अतिथीगृह बांधणेसाठी १० ते २० हजार चौरस फुट जागेची आवश्यकता आहे. सदर जागा उपलब्ध करुन देणेबाबत संस्थानच्या काय अटी व शर्ती आहेत, त्या आम्हांस कळविणेस विनंती आहे.

थोडक्यात, आयव्हीआरसीएल या संस्थेस शिर्डी येथे अतिथीगृह बांधणेसाठी संस्थानकडून जमीन मिळणेची अपेक्षा असून, यासाठी संस्थानच्या अटी - शर्ती कोणत्या आहेत, हे त्यांना जाणून घ्यावयाचे आहे.

**(ब)** यापूर्वी मा. व्यवस्थापन समितीने अलोक इंडस्ट्रिज, मुंबई व साईग्रेस फौडेंशन, मुंबई यांना शिर्डी येथे अनुक्रमे दहा हजार चौरस फुट व वीस हजार चौरस फुट जागा भक्तनिवासस्थान इमारत बांधणेसाठी मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील भूसंपादनाचे माध्यमातून मिळालेली व संस्थान मालकीची जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता दिलेली आहे. तथापि, संस्थानने उपलब्ध करुन दिलेली जागा या हरित पट्टयात असून, त्याठिकाणी बांधकाम करणेस सक्षम शासकीय कार्यालये मंजूरी देत नाही. अलोक इंडस्ट्रिज, मुंबई यांचे भक्तनिवासस्थान इमारतीचे बांधकाम आराखडे मान्यतेस्तव नगररचना कार्यालयाकडे पाठविणेत आलेले आहेत, परंतु त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही. साईग्रेस फौडेंशन, मुंबई यांना जागा उपलब्ध करुन देणेबाबत मान्यता मिळालेली आहे, तथापि अद्याप याबाबत समझोता करारनामा वगैरे बाबत कार्यवाही सुरु आहे.

सदरहू जमिनी हरित पट्टयातून निवासी पट्टयात समावेश करणेसाठी शासन स्तरावर संस्थानमार्फत प्रस्ताव सादर करणेत आलेला असून, त्यावर कार्यवाही सुरु आहे.

तसेच, एमपीए फायनान्शील सर्व्हिसेस लि., कलकत्ता यांनी याच धर्तीवर संस्थानकडे जमिनीची मागणी केलेली असून, त्यांचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ ठेवणेत आला होता मात्र व्यवस्थापन समितीने त्यांची मागणी मान्य केली नाही.

**(क)** आयव्हीआरसीएल यांचे प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे, खालील ढोबळ अटी शर्ती वर गेस्ट हाऊस बांधणेसाठी जागा देणे

०१. संस्थानच्या जागेवर साईभक्तांसाठी निवासस्थान बांधणेचे मान्य करणे आवश्यक आहे. त्यासाठी संस्थेच्या व्यवस्थापनाच्या सभेत ठराव / निर्णय घेणे आवश्यक आहे.

०२. सदरहू निवासस्थान इमारत वीज, पाणी पुरवठा, प्रसाधनगृहासह अद्ययावत व चांगल्या प्रतीचे बांधकाम असलेली असावी.

०३. सदरहू निवासस्थान इमारत बांधणेसाठी येणारा सर्व खर्च संस्थेने करावयाचा आहे.

०४. प्रस्तावित इमारतीचे नकाशे व इमारत बांधकाम आराखडे हे संस्थानकडून प्रथम मान्य करुन घ्यावयाचे आहेत, याकामी वास्तुविशारदाची नेमणूक उभय संस्थांनी सहमतीने करावयाची आहे.

०५. प्रस्तावित बांधकाम करण्यासाठी बांधकाम ठेकेदाराची नेमणूक ही संस्थान करील. याबाबत करावयाच्या वाटाघाटी, ठेकेदारास द्यावयाचा कार्यादेश व इतर बाबींची पध्दत संस्थान ठरविल.

०६. पुर्ण झालेल्या इमारतीचा ताबा व दैनंदिन व्यवस्था पाहणेसाठी संस्थानकडे राहील.

०७. संस्थेचा सदर इमारतीवर मालकी हक्क अथवा देणेत आलेल्या जमिनीवर कोणत्याही प्रकारे मालकी हक्क राहणार नाही.

०८. संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यांत येणारी जमीन ही फक्त साईभक्तांच्या निवासव्यवस्थेसाठी इमारत बांधणेसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

०९. संस्थान इमारतीचे बांधकामासाठी सक्षम अधिकाऱ्याकडून बांधकाम परवाना प्राप्त करवून घेणेबाबत कार्यवाही करील.

१०. संस्थानमार्फत उपलब्ध करण्यात येणाऱ्या जमिनींमध्ये अंतर्गत रस्ते तयार करणे, सांडपाण्याची व्यवस्था करणे इत्यादी कामे केली जातील.

११. प्रस्तावित इमारतीतील एकूण खोल्यांच्या ७५ टक्के खोल्या दैनंदिन वाटप करणेचा अधिकार संस्थेला राहील. मात्र याबाबत दैनंदिन व्यवस्थापन खर्च जो संस्थान निश्चित करील ते देणेची जबाबदारी संस्थेची राहील.

१२. संस्थेस त्यांचेसाठी राखून ठेवणेत आलेल्या खोल्यांचा कोणत्याही पध्दतीने व्यापारी अथवा आर्थिक तत्वावर वापर करता येणार नाही.

१३. निवासस्थान इमारतीसाठी विद्युत व पाणीपुरवठा संस्थानमार्फत करण्यात येईल. यासाठी संबंधित व्यक्ती / संस्था यांचेकडून इतर कुठलाही आकार / शुल्क आकारणेत येणार नाही.

१४. जमिनीचे / इमारतीचे सर्व प्रकारचे सरकारी-निमसरकारी कर संस्थान मार्फत भरण्यात येतील. या इमारतींची सर्व प्रकारची देखभाल दुरुस्ती संस्थान खर्चाने करण्यात येईल.

१५. संस्थान एकूण खोल्यांच्या ७५ टक्के खोल्या वाटप करण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे. तसेच याबाबत संस्थानच्या नियमाप्रमाणे भाडे तसेच स्वच्छता कर घेण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे.

१६. याबाबत करावयाच्या समझोता करारनाम्याचा खर्च संस्थेने करावयाचा असून, संस्थान वकिलांचा अभिप्राय घेणे व इतर कामासाठी येणारा खर्च संस्थान करील.

१७. याव्यतिरिक्त आवश्यक अशा बाबींचा / अटी - शर्तींचा समावेश संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन निश्चित करणेत येईल.

**(ड)** उपरोक्त परिच्छेद क मध्ये नमूद केलेल्या ढोबळ अटी - शर्ती आयव्हीआरसीएल, पुणे या संस्थेस कळविता येतील, तथापि मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १० जानेवारी, २०१० रोजीचे सभेत, साईग्रेस फौडेंशन, मुंबई यांना शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी साईआश्रम प्रकल्प भाग १ व २ ज्या धर्तीवर संस्थानला देणगी माध्यमातून बांधकाम पूर्ण करुन संस्थानकडे हस्तांतरीत करणार आहेत, त्याच धर्तीवर साईग्रेस फौडेंशन, मुंबई यांना जमीन उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी चर्चा होऊन सुधारीत निर्णय घेणेत आला आहे.

उपरोक्त परिच्छेद क मध्ये नमुद केलेल्या ढोबळ अटी व शर्ती असतील सदर अटी व शर्तीच्या अधिन राहुन आयव्हीआरसीएल यांना मौजे निमगांव- कोऱ्हाळे येथिल शेतीमहामंडळाच्या भुसंपादने मिळालेल्या जमिनीपैकी ००हे १० ते २० आर जमिन गट नंबर १८६ पैकीतील देणे उचित राहिल

आयव्हीआरसीएल यांनी साईभक्तनिवास इमारतीसाठी १०००० ते २०००० चौ. फुट जागा उपलब्ध करुन देणेस व त्यासाठी काय अटी व शर्ती असतील याबाबत विचारणा केली आहे. त्यानुसार त्यांना जागा उपलब्ध करुन देणे व सुधारीत अटी शर्ती ठरवुन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, आयव्हीआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड प्रोजेक्ट लि., हैद्राबाद यांना तसेच यापुर्वी मान्यता देण्यात आलेल्या साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई यांना १० ते २० हजार चौ. फुटाचे प्लॉट सर्व्हे नं. १८६ मध्ये उपलब्ध करुन देण्यात यावे, त्यासाठी त्यांना अलोक इंडस्ट्रीज, मुंबई व राजु वेगस्ना ट्रस्ट, हैद्राबाद यांना ज्या अटी शर्ती लागु करण्यात आलेल्या आहेत त्याच अटी शर्तीवर आयव्हीआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड प्रोजेक्ट लि.हैद्राबाद व साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई यांना अटी शर्ती लागू करण्यात याव्यात, अशी आजचे सभेत मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४.** **श्रीसाईबाबा मंदीर परिसरालगतचे पूर्वेकडील जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, अधिसुचना क्रमांक टिपीएस-१६०१/ १९२०/ प्र.क्र.१२७/२००३/नवि-९, दिनांक २४ ऑगस्ट २००४ अन्वये आ.क्र.१० बगीचा हे आरक्षण व त्यालगतचा १२.०० मी. रुंद रस्ता वगळून सदर आरक्षणाच्या मध्ये १२.०० मी. रुंद रस्ता दर्शवून या रस्त्याच्या दोन्ही बाजूस पट्टीच्या स्वरुपात टपरी दुकानदारांचे पुनर्वसनाकरीता आ.क्र.१० "दुकान केंद्र" हे नविन आरक्षण दर्शवून या आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण शिर्डी नगरपंचायत दर्शविण्यात आले आहे. तसेच प्रस्तुतचे अधिसुचनेअन्वये आ.क्र.९ बगीचा हे आरक्षण वगळून त्या खालिल क्षेत्रावर दुकानकेंद्र, ऑडीटोरिअम, दर्शन रांग व काही क्षेत्रावर बगीचा असा वापर प्रस्तावित करुन यासाठी समुचित प्राधिकरण शिर्डी नगरपंचायत दर्शविणेत आले आहे.

शिर्डी नगरपंचयत सर्वसाधारण सभा दि.२१/०६/२००६ मधिल ठराव क्र.२१ नुसार आ.क्र.१० मधिल १६ आर जागा (१२.०० मीटर दक्षिणोत्तर विकास योजना रस्त्याचे क्षेत्र धरुन) काही अटी व शर्तीवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कंपाउंडलगत देण्याचे ठरले होते.

दि.१६/०९/२००६ रोजी झालेल्या संस्थानचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.७८१ अन्वये शिर्डी नगरपंचायत यांनी वरीलप्रमाणे देऊ केलेली १६ आर जागा स्विकारणेत यावी असे ठरले. त्यानुसार सदर जागेचा ताबा संस्थानने घेतलेला आहे.

अशाप्रकारे श्री साईबाबा मंदिर परिसराचे पूर्वेकडील हद्दीलगत असलेले क्षेत्र हे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे मालकीचे झालेले आहे. या क्षेत्रापैकी सुमारे १६ आर क्षेत्र हे आरक्षण क्र.१० आणि त्यामधिल दक्षिणोत्तर १२ मी. रुंद रस्त्याखाली येत आहे. संस्थानतर्फे या क्षेत्राचा वापर गर्दीचे काळात दर्शनेच्छुक साईभक्तांच्या गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी होत आहे. तसेच पालखीव्दारे व गटाने येणाऱ्या साईभक्तांना या जागेतूनच दर्शन रांगेत प्रवेश देण्यात येतो. दर्शनरांगेतील साईभक्तांना आपत्कालीन परिस्थितीत तातडीने बाहेर पडता यावे यासाठी सदर ठिकाणी मंदिर परिसराचे पूर्व बाजुचे हद्दीवरील कम्पाऊंडमध्ये व दर्शन रांग हॉलला आपत्कालीन दरवाजे ठेवण्यात आलेले आहेत.

वर नमूद केलेप्रमाणे आ.क्र.१० साठी करण्यात आलेला फेरबदल हा सन २००४ मध्ये करण्यात आलेला आहे. परंतू त्यानंतर आजतागायत सहा वर्षांचे कालावधीमध्ये श्री साईबाबांचे सामधीचे दर्शनार्थ येणाऱ्या साईभक्तांचे संख्येमध्ये फार फोठ्या संख्येने वाढ झालेली आहे.

साईभक्त आणि सामान्य जनतेच्या सुरक्षिततेचा आणि व्यापक हिताचा विचार करुन शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्र.१० व त्यामधील १२ मी. रुंद रस्त्याचे विद्यमान तरतुदीमध्ये खालिलप्रमाणे फेरबदल करणे अत्यावश्यक आहे.

शिर्डी विकास योजना आरक्षण क्र.१० मध्ये दर्शविण्यात आलेला १२ मी. रुंद विकास योजना रस्ता व या रस्त्याचे दुतर्फा टपरी दुकानदारांचे पुनर्वसनाकरीता "दुकान केंद्र" हे पट्टीच्या स्वरुपात दर्शविण्यात आलेले आरक्षण वगळून त्याखालिल क्षेत्रामध्ये पूर्वेकडील हद्दीलगत ४.५० मी. रुंद दक्षिणोत्तर सार्वजनिक रस्ता आणि सदर रस्त्याचे पश्चिम बाजूस मंदिर परिसराचे हद्दीपर्यंत उर्वरित क्षेत्रावर "मंदिर परिसर विस्तारीकरण" असा वापर प्रस्तावित करुन यासाठी समुचित प्राधिकरण श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी दर्शविणे असा फेरबदल होणेकामी मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडे इकडील जा. नं. ५४९६/२०१० दिनांक ०३.०४.२०१० अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

अशाप्रकारे श्री साईबाबा मंदिर परिसराचे पूर्वेकडील हद्दीलगत असलेले संस्थान मालकीचे १६ आर क्षेत्रामध्ये साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असल्याने पावसाळ्यामध्ये सदर ठिकाणी पाणी साचते, चिखल होतो याकरीता सदर ठिकाणी पॉलीमर कोटेड पेव्हिंग बसवून पावसाचे पाण्याची ड्रेनेज व्यवस्था करणेकामी येणारे अंदाजे रुपये २२,८४,०७२/- मात्रचे खर्चास मा .व्यवस्थापन समितीचे दिनांक २१.०६.२००९ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ५३० अन्वये मान्यता देणेत आली आहे. सदर अंदाज पत्रकामध्ये संपुर्ण जागेची खोदाई करुन, मुरुम भरणे, सोलींग करणे, पी. सी. सी. करणे, व त्यावर ८० एम. एम. जाडीचे पेव्हिंग ब्लॉक बसविणे तसेच पावसाचे पाण्यासाठी २२५ एमएम व्यासाचे आर. सी. सी. पाईप टाकणे इ. बाबींचा समावेश होता.

याकामी आर्किटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर यांनी सुधारीत रुपये ३५,१७,७६६/- मात्र रकमेचे अंदाज पत्रक सादर केले असून, त्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

१) सदर क्षेत्राचे दोन्ही बाजूस फ्लॉवर बेड, त्याचे डॅडोकरीता ब्लॅक ग्रेनाईट.

२) पाथवेकरीता पूर्व बाजूस ६.०० व पश्चिम बाजूस ११.०० मी. रुंदी करीता पेव्हिंग ब्लॉक तसेच मध्यभागी ६.०० मी. रुंदीकरीता रफ - शहाबाद फरशी व त्याचे पूर्व-पश्चिम बाजूस Red Mandana flooring.

३) पावसाचे पाण्याकरीता ४५० एम.एम. व्यासाचे आर. सी. सी. क्रॉस पाईप लाईन.

४) इलेक्ट्रीक केबलकरीता २२५ एम. एम. व्यासाचे आर. सी. सी. क्रॉस पाईप लाईन.

५) तसेच जुना पिंपळवाडी रस्त्याचे बाजुने कास्ट आयर्न ग्रीलचे कम्पांउंड व कास्ट आयर्न ग्रीलचे सरकते गेट.

६) कॉंक्रीटवर चेंबर

७) टेलिफोन व संगणक केबल तसेच सुरक्षा कर्मचारी कॅबीन.

उपरोक्त प्रमाणे कामाचा नव्याने समावेश करुन आर्किटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर यांनी सुधारीत रु. ३५,१७,७६६/- मात्र रकमेचे अंदाज पत्रक सादर केले आहे. करीता मंजूर रक्कम रु. २२,८४,०७२/- पेक्षा रु.१२,३३,६९४/- मात्र इतका जादा खर्च येणार आहे.

तरी याकामी येणारे सुधारीत रक्कम रुपये ३५,१७,७६६/- मात्रचे खर्चास व याकामी वर्तमान पत्रातील जाहीरातीव्दारे निवीदा मागविणेस मंजूरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४१८ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्रीसाईबाबा मंदीर परिसरालगतचे पूर्वेकडील जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणेकामी येणारे सुधारीत रक्कम रुपये ३५,१७,७६६/- मात्रचे खर्चास व याकामी वर्तमान पत्रातील जाहीरातीव्दारे निवीदा मागविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५. मौजे निमगाव-कोऱ्हाळे येथील गट नं.२३९ मधील ०० हे.१८ आर जमिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** श्री मच्छिंद्र सुरेश वदक व सुरेखा सुरेश वदक यांनी त्यांची मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं २३९ मधील ०० हे १८ आर जमिन संस्थानने खरेदी करावी म्हणुन पत्राने दिलेला प्रस्ताव दिनांक १२/०४/२०१० रोजी संस्थानला प्राप्त झाला आहे.

मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नंबर २३९ चा उतारा पाहिला असता खालील प्रमाणे वस्तुस्थिती दिसुन येते.

| अ.नं. | गट नंबर | भोगवटदाराचे नाव | क्षेत्र | इतर हक्क |
|---|---|---|---|---|
| ०१. | २३९ | मच्छिंद्र सुरेश वदक<br>अ पा क सुवर्णा सुरेश<br>म वा बबन जयवंता वदक, विठ्ठल जयवंता वदक, सुरेश जयवंत वदक, हौशाबाई करपे,<br>लिलाबाई बाळासाहेब थोरात, सुमन भाऊसाहेब पवार, अनुसयाबाई जयवंत वदक<br>क्षेत्र ०- ६० | ०० हे<br>१८ आर<br><br><br>००हे<br>६०आर | निमगाव निघोज विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लिमिटेड, |

गट नंबर २३९ चा ७/१२ चा उतारा पाहिला असता मच्छिंद्र सुरेश वदक हे अज्ञान आहेत, अज्ञानाची मालमत्ता विकण्यासाठी मा. दिवाणी न्यायाधीश यांची परवानगी आवश्यक्ता असते. अर्जदार यांनी त्याप्रमाणे दिवाणी न्यायाधीश यांची परवानगी आणुन दिल्यानंतर जमिन खरेदी करता येईल.

**ब)** अर्जदाराने जमिनीची किंमतीची मागणी नमुद केलेली नाही. ती वाटाघाटीने निश्चित करता येईल.

**क)** सदर जमिन संस्थानच्या जमिनीच्या लगत आहे. जमिन उपयुक्त आहे.

असे असले तरी जोपर्यंत सदर जमिन विक्री करणेबाबत अर्जदार मा. दिवाणी न्यायाधीश यांची परवानगी आणत नाही. तो पर्यंत संस्थानला जमीन खरेदी करता येणार नाही.

खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती,

श्री मच्छिंद्र सुरेश वदक व सुरेखा सुरेश वदक यांची मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं. २३९ मधील ०० हे १८ आर जमिन खरेदी करावी किंवा नाही.

**निर्णय क्र.४१९ आजचे सभेत जमिनमालक व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांना सभेने रुपये १.७५ लाख प्रति आर हा दर देऊ केला. तथापि जमिनमालक यांनी याबाबत नंतर निर्णय कळवू असे सांगितले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६. मुदतबाह्य औषधे नष्ट करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटलचे औषध भांडार व विविध वॉर्डमध्ये दि.०१.०४.२००९ ते २८.०२.२०१० या कालावधीमध्ये एकुण रु.६०,९४१.८२ ची औषधे मुदतबाह्य झालेली आहे. त्यांची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे.

अ) दोन्ही रुग्णालयाचे विविध वॉर्ड व श्री साईनाथ रुग्णालयाचे उपभांडारमधून जमा झालेले एकुण औषधे -

| Sr.No. | Name of Wards | Total Amt.in Rs. |
|---|---|---|
| 1 | All Wards | 5144.31 |
| 2 | Sainath Sub Store | 13475.27 |
| | **Total Amt.in Rs.--** | **18619.58** |

ब) मध्यवर्ती औषधे भांडारातील एकुण औषधे -

| Sr.No. | Name of Wards | Total Amt.in Rs. |
|---|---|---|
| 1 | Donation | 566.32 |
| 2 | Not Replaced by Company | 32850.43 |
| 3 | Store | 8905.48 |
| | **Total Amt.in Rs.--** | **42322.23** |

अ + ब = रु.६०९४१.८२

उपरोक्त पैकी मध्यवर्ती औषध भांडारात एकुण रु.४२,३२२.२३ तर दोन्ही रुग्णालयाचे विविध वॉर्ड व श्री साईनाथ रुग्णालयातील उपभांडारमध्ये रु.१८,६१९.५८ इतक्या रक्कमेची औषधे मुदतबाह्य झालेली आहे. अशी सर्व मिळून एकुण रु.६०,९४१.८२ इतक्या रकमेची औषधे मुदतबाह्य झालेली आहे. सदरची औषधे ही सन २००७-०८ व सन २००८-०९ या आर्थीक वर्षात खरेदी केलेली होती.

सन २००८-०९ चा आर्थिक वर्षामध्ये एकुण रु.१४,२०,८३,५३०/- ची औषधे खरेदी करण्यात आलेली आहे. त्यानुसार मुदतबाह्य औषधांची टक्केवारी ०.०४२८ इतकी आहे. सदरची यादी अंतर्गत लेखा परिक्षक (Auditors) यांचेकडून तपासून घेतलेली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे औषधे जमिनीत खोलवर खड्डा घेऊन नष्ट करण्यास व सदरचा मुदतबाह्य औषधसाठा भांडारातील संगणकामधून कमी करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४२० प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे औषधे जमिनीत खोलवर खड्डा घेऊन नष्ट करण्यास व सदरचा मुदतबाह्य औषधसाठा भांडारातील संगणकामधून कमी करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७. मयत कु.धनश्री सुनिल देहाडराय यांचे बाबत श्री.प्रशांत कुलकर्णी,पत्रकार शहा,ता.सिन्नर यांचे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** दि. १५.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये श्री प्रशांत प्रकाश कुलकर्णी, पत्रकार, शहा, सिन्नर यांनी त्यांचे बहिणीची मुलगी कु. धनश्री सुनिल देहाडराय हिचे श्री साईबाबा हॉस्पिटलच्या नेत्र शिबीरामध्ये दि. २३.०९.२००६ रोजी मयत झाली. याबाबत संस्थानकडून मयताच्या कुटूंबास आर्थिक मदत मिळणेबाबत मागणी केली असुन त्यांच्यामते विश्वस्तांचे मिटींगमध्ये चर्चा होऊन सदरचा विषय मंजुर झालेबाबत समजल्याचे त्यांनी कळविले आहे. याबाबत ते मा. ना. श्री राधाकृष्ण विखे पा., प्रशासकीय अधिकारी आर.एस.साबळे सो. यांना प्रत्यक्ष, फोनवर भेटले असले बाबतही नमुद केले आहे. परंतू चार वर्षात सदर विषयावर काय निर्णय झाला याची माहिती मिळालेली नाही. तसेच त्यांनी याबाबत मा. ना. श्री विखे सो.यांची वेळोवेळी भेट घेऊन निर्णय पुर्ण करण्यास सांगितले या करिता २००९ मध्ये त्यांनी ३ ते ४ वेळेस भेट घेऊनही निर्णय घेतला नाही, तरी सदर मयताचे नातेवाईकांना सहानुभूती म्हणून आर्थिक मदत मिळावी ही विनंती संदर्भीय पत्रान्वये केली आहे.

कु. धनश्री सुनिल देहाडराय वय - २ वर्षे या रुग्णाची संस्थान तर्फे दि. १८.०८.२००६ ते दि. २०.०८.२००६ आयोजित नेत्र शिबीरामध्ये नोंदणीनुसार दि. १९.०९.२००६ रोजी बॉम्बे हॉस्पिटलचे नेत्ररोग तज्ञ डॉ. कपूर आर.के. यांनी भुलतज्ञ डॉ. रेठे यांचे सहाय्याने शस्त्रक्रिया पार पाडली. तद्नंतर तिची तब्बेत नाजुक झालेने तिला अतिदक्षता विभागात दि. २१.०९.२००६ पर्यंत ठेवण्यात आले तरीही तिच्या प्रकृतीत सुधारणा न झाल्याने तिला नाशिक येथील संजीवनी रुग्णालयात दि. २१.०९.२००६ रोजी दाखल केले, मात्र सदर रुग्णाचा उपचारा दरम्यानच दि. २३.०९.२००६ रोजी मृत्यु झाला.

यापुर्वी श्री प्रशांत प्रकाश कुलकर्णी यांनी (कु. धनश्री हिचे मामा) यांनी वेळोवेळी पत्राद्वारे मयताचे कटुंबास आर्थिक मदत मिळणेबाबत इकडील कार्यालयास अर्ज सादर केले होते. याबाबतीत हॉस्पिटल प्रशासनातर्फे चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्यात आला होता. सदर अहवालावर मा. व्यवस्थापन समितीचे दि. २८.०७.२००७ चे सभेत सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. ५१४/२० नुसार मा. ना. श्री राधाकृष्ण विखे पा. यांनी संबंधीताशी चर्चा करुन नुकसान भरपाई बाबत

निर्णय घ्यावा असे ठरले होते. श्री कुलकर्णी यांनी या संदर्भात वेळोवेळी दुरध्वनी करुन विविध मान्यवरांना वारंवार भेटून या मागणीबाबत तगादा लावला असूनही प्रशासनाला अद्याप त्यांचे नेमके उत्तर शक्य झाले नसल्याने सदरचा विषय दि. २४.०५.२००८ च्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे फेर सादर करणेत आला होता, सदरहु विषय तुर्त स्थगित करण्यात यावा असे निर्णय क्र. ५३० नुसार ठरले.

तरी पुनःश्चः अर्जदाराकडून तगादा होत असल्याने मा. व्यवस्थापन मंडळापुढे चर्चा होउन निर्णय होणेकामी सविनय सादर.

निर्णय क्र.४२१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संबधितांना व्यवस्थापन समितीचे सभेपूढे बोलवून अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/अधिक्षिका,श्री साईनाथ रुग्णालय )

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८. श्रीसाईनाथ रुग्णालयातील विविध मशिनचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयात विविध मेडिकल इन्स्ट्रुमेंट व मशिनरी खरेदी करण्यात आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी काही मशिन्सचे अंदाजे एकुण १४ कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता मा. व्य. समितीच्या विविध निर्णयांन्वये दरवर्षी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात येत आहे. सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्यांचे इंजिनीअर त्यांच्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन व्यवस्थित काम देत आहेत. सध्या काही मशीन्सचे वॉरंटी कालावधी संपलेले असुन माहे मार्च २०१० अखेर काही मशीन्सचे कॉन्ट्रॅक्ट कालावधी संपत आहेत.

वार्षीक सर्व्हिस कॉट्रॅक्टबाबत मा. व्य. समितीच्या दि. २०/०५/२००७ च्या सभेतील विषय क्र. ३३ निर्णय क्र. ३८६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलरला देण्यात यावे असे ठरले."

सोबतच्या तक्त्यामध्ये दिलेल्या अ. क्र. १ ते १८ अन्वये एकुण १४ कंपन्यांच्या ४६ नग मशीन्सचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट / वॉरंटी कालावधी माहे मार्च २०१० अखेर संपत आहेत. पुढील कालावधीत सदर मशिन्सचे दुरुस्ती व देखभालीकरीता संबंधीत कंपन्यांकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे आवश्यक असुन सदरकामी मा. व्य. समितीच्या दि. १५/११/२००८ चे सभेतील निर्णयाप्रमाणे कंपन्यांच्या प्रतिनीधींना वैद्यकिय प्रशासक, वैद्यकिय उप-संचालक व वैद्यकिय संचालक यांचे समक्ष बोलावुन दिलेल्या दरांबाबत चर्चा / वाटाघाटी करुन वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर निश्चीत करता येतील असे मत आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील वरीलप्रमाणे एकुण ४६ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनीधींशी वैद्यकिय प्रशासक, वैद्यकिय उप-संचालक व वैद्यकिय संचालक यांचे समक्ष प्रत्यक्ष वाटाघाटी करुन दर निश्चीत करणेस व त्यानुसार येणाऱ्या एकुण रकमेच्या खर्चास मान्यता असावी ही विनंती.

निर्णय क्र.४२२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील वरीलप्रमाणे एकुण ४६ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनीधींशी वैद्यकिय प्रशासक, वैद्यकिय उप-संचालक व वैद्यकिय संचालक यांचे समक्ष प्रत्यक्ष वाटाघाटी करुन दर निश्चीत करणेस व त्यानुसार येणाऱ्या एकुण रकमेच्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९. दुध दरवाढीबाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे कॅन्टीन विभागाकरिता सन २००९-१० साठी प्रति लिटर रु.१४.५० दराने दररोज अंदाजे ८५० लिटर्स गाय दुध पुरवठा करणेकामी गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोपरगांव व संगमनेर तालुका सहाकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित, घुलेवाडी यांना वार्षिक पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

तथापि राज्यात दुष्काळी परिस्थितीमुळे महाराष्ट्र शासनाने दि.०१.०१.२०१० पासून गाय दुध खरेदी दरात प्रती लिटर रु.१/- व संघाचे कमिशनमध्ये (वाहतुकीपोटी) १.५० पै. वाढ केली आहे.

त्यामुळे उपरोक्त दोन्ही दुध पुरवठादार संघाने त्यांचे संदर्भीय पत्रान्वये दुध पुरवठा दरात रु.२.५० दरवाढीची मागणी शासन निर्णय क्र.एमएलके/१००९/१८७९२/प्र.क.१४९/पदुम.८, मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि.३१.१२.२००९ अन्वये केली आहे. याबाबत दरवाढ झाल्याचे महाराष्ट्र शासनाचे आदेशाची सत्यप्रत अवलोकनार्थ जोडली आहे. सदरची दरवाढ ही पुढील आदेश होऊपावेतो राहिल असे शासनाचे आदेशात नमुद करणेत आले आहे. निविदा व पुरवठा आदेशातील शर्ती/अटीनुसार महाराष्ट्र शासनाने दुध खरेदी दरात दरवाढ केल्यास, दरवाढ देण्याची तरतूद आहे.

तरी शासनाचे परिपत्रकानुसार पुरवठादार दुध संघांना दि.०१.०१.२०१० ते दि.१५.०४.२०१० अखेर प्रति लिटर रु.२.५० प्रमाणे दरवाढ देय आहे. तरी दरवाढ देणेस व दोन्ही संघाचे उपरोक्त कालावधीचे फरकबीले त्यांना आदा होणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाने जेवढी दुध दरवाढ केली आहे.तेव्हढीच दरवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०. प्रसादालयासाठी तांदूळ खरेदीस कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** प्रसादालयासाठी सन २००९-१० करिता (दि.०१.०४.२००९ ते ३१.०३.२०१० अखेर कालावधीसाठी) ६००० क्विंटल तांदुळ विहित पद्धतीने वृत्तपत्रात जाहिरात देऊन, तसेच मा.व्यवस्थापन मंडळाचे सदस्यांनी हैद्रबाद येथील तांदुळ मिलला समक्ष भेटी देऊन स्विकारार्ह नमुन्यांची पाहणी करुन दर व नमुने सादर केले होते. त्यावर दि.१७.०५.२००९ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन मे.कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड यांना इकडील जा.नं.४४०२/ २०.०४.२००९ अन्वये खालीलप्रमाणे तांदुळ पुरविणेकामी कार्यादेश देणेत आलेला होता.

| अ.नं. | तपशिल | परिमाण (क्विंटल) | दर प्रती क्विंटल रु.पै. |
|---|---|---|---|
| ०१. | सोना मसुरी ए टाईप, जुना तांदुळ | ४००० | २५८१/- |
| ०२. | सोना मसुरी ए टाईप, नवा तांदुळ | २००० | २३८१/- |

पुरवठा आदेशानुसार त्यांनी १ महिन्यात मालाचा पुरवठा पुर्ण केला आहे.

साईभक्तांच्या वाढत्या गर्दीमुळे तांदुळाचा खप वाढला असून मार्च-२०१० अखेर पुरेल इतका तांदुळाचा साठा नसल्याने मा.व्य.मंडळाचे दि.२७.०१.१० चे सभेतील निर्णय क्र.२२९ अन्वये १००० क्विंटल सोना मसुरी ए टाईप जुना तांदुळ मे.कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड यांचेकडून मागील मान्य दरानेच खरेदी केला असून इकडील पुरवठा आदेश क्र.१५८७८ अन्वये मालाचा पुरवठा झालेला आहे.

सन २०१०-११ करिता तांदुळ खरेदीबाबत अद्याप मा.व्य.मंडळाचे सभेत निर्णय झालेला नसल्याने प्रस्ताव प्रलंबित आहे. आज अखेर भांडारकडे २८० क्विंटल तांदुळ साठा उपलब्ध असून तो १०-१५ दिवस पुरेल. करिता तातडीने १००० क्विंटल सोना मसुरी ए टाईप, जुना तांदुळ खरेदी करावा लागेल. मे.कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड यांचेशी दुरध्वनीवर संपर्क करुन सदर प्रकारचा १००० क्विंटल जुना तांदुळ मागील मान्य दराने पुरविणार किंवा कसे? याबाबत विचारणा केली असता, त्यांनी संस्थानसाठी मागील मान्य दर प्र.क्विं.२,५८१/- मध्ये रु.१०/- विशेष सुट देऊन प्र.क्विंटल रु.२,५७१/- दराने तांदुळ पुरविण्याचे मान्य केले असून, तसे लेखी फॅक्सपत्र पाठविले आहे. सदर खरेदीकामी रु.२५,७१,०००/- खर्च अपेक्षित आहे.

तांदुळाची निकड लक्षात घेता मा.कार्यकारी अधिकारी सो.यांचे दि.२२.०३.२०१० चे खरेदी विभागाचे टिपणीवरील मान्यतेने तातडीने १००० क्विंटल जुना तांदुळ पुरविणेकामी मे.कैलास ट्रेडिंग कंपनी, नांदेड यांना इकडील जा.नं.५३१५/२९.०३.२०१० अन्वये पुरवठा आदेश देणेत आलेला असून तांदुळाचा पुरवठा सुरु झालेला आहे.

तरी सदर खरेदीस व त्याकामी झालेल्या रु.२५,७१,०००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४२४ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११. नॅशनल रिफायनरी प्रा.लि., मुंबई यांचेकडे वितळविण्यात आलेल्या चांदी वस्तु अलंकाराच्या वजनात आलेल्या घटीस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१ मार्च २००७ रोजीचे सभेतील निर्णयानूसार व संदर्भ क्रं. १ अन्वये इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचेकडून श्री साईंची प्रतिमा असलेली चांदीची (२० ग्रॅम), सोन्याची (प्रत्येकी २.५, ५, १० ग्रॅमची ) नाणी साईभक्तांना योग्य किंमतीत उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेण्यात आलेला होता. त्यासाठी संस्थानला देणगी म्हणून प्राप्त झालेले सोने-चांदी वस्तु इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचेकडेदि. २६ एप्रिल, ०९ चे मंजुर टिपणी अन्वये वितळविणेकामी दि.१३ मे, २००९ रोजी नेण्यात आलेल्या होत्या

मात्र इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांनी सोने-चांदी मौल्यावान वस्तु अलंकारापैकी फक्त सोने वस्तु अलंकार येथे वितळविता येतील मात्र चांदी वस्तु अलंकार वितळविण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री उपलब्ध नसल्याने सदरच्या वस्तु अलंकार मे. नॅशनल रिफायनरी प्रा. लि. मुंबई येथे वितळविण्यात याव्यात, असे त्यांचे पत्र क्रमांक XXI-SILVER/३० /COIN/२००९ दिनांक १४ मे, २००९ अवये लेखी सुचित केलेले होते, त्यामुळे वितळविणेकामी नेण्यात आलेले सर्व चांदी वस्तु-अलंकार वजन ४३०७०९.५९० ग्रॅम मिंटने ताब्यात न घेतल्याने इंडिया गर्व्हमेंट मिंट, मुबंई यांचे स्ट्रॉगरुम मध्येच सिलबंद पिशव्यात ठेवण्यात आलेल्या होत्या. वरील पत्रानुसार मे. नॅशनल रिफायनरी प्रा.लि. मुबंई यांचे कडे चांदी वस्तु अलंकार वितळविणे, शुध्दीकरण करुन विहीत वजनाची नाणी तयार करणे, व त्याबाबतचे दर आदीबाबत इकडील पत्र क्र.एसएसएस/वशी-लेखा/ ६२४१/२००९ दिनांक २२ मे, २००९ अवये विचारणा करण्यात आलेली होती.

मे. नॅशनल रिफायनरी प्रा.लि. मुबंई यांनी त्याचे पत्र क्र.NS-S१२-II/Q-/०१२१ दिनांक २८ मे, २००९ अन्वये, संस्थानकडील चांदी वस्तु अलंकार वितळविणे, शुध्दीकरनकरणे, विहीत वजनाची नाणी तयार करणे आदीबाबत संमती दर्शविली होती व त्यासाठी त्यांनी खालील प्रमाणे दर कळविलेले होते.

१. चांदी वस्तु अलंकार वितळविणे मजुरी रुपये ५५/- प्रती किलो
२. चांदी शुध्दीकरण मजुरी रुपये ६००/- प्रती किलो
३. शुध्दीकरणातील घट ०१ टक्के प्रती किलो.
४. चांदी नाणी (२० ग्रॅम ) मजुरी प्रती नग रुपये ३०/ अधिक टॅक्स

दिनांक २६ एप्रिल, २००९ चे मंजुर टिपणी अन्वये दि.३१ मार्च, २००८ अखेर संस्थानला देणगी दाखल प्राप्त झालेले चांदी वस्तु अलंकार ४३०७०९.५९० ग्रॅम मे. नॅशनल रिफायनरी प्रा. लि., मुंबई यांचेकडे हस्तांतरण करुन वितळवून उपरोक्त वजनाची नाणी व पेंडट तयार करणेकामी मान्यता मिळालेली होती त्यानुसार वितळविण्या योग्य चांदी वस्तु अलंकार मा. कार्यकारी अधिकारी, उप कार्यकारी अधिकारी, तसेच विधी व न्याय विभाग यांचे प्रतिनिधीचे उपस्थितीत दि.२५ नोव्हेंबर, २००९ रोजी नॅशनल रिफायनरी प्रा.ली., मुंबई यांचेकडे हस्तांतरीत करुन समक्ष वितळविण्यात आलेले आहे.

उपरोक्तपणे वितळविण्यात आलेल्या व त्यापासुन प्राप्त झालेली शुध्द चांदी तसेच वितळवितांना, रिफायनींग करतांना आलेली घट याबाबतचा अहवाल नॅशनल रिफायनरी प्रा.ली.,मुंबई यांचेकडील दि.०२/०४/१० चे पत्रान्वये संस्थानला प्राप्त झालेला असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| **चांदी वस्तू :-** | **किलो** | **ग्रॅम** | **मिली ग्रॅम** |
|---|---|---|---|
| १) चांदी रजिस्टर प्रमाणे असलेले वजन | ४३० | ७०९ | ५९० |
| २) नॅशनल रिफायनरी प्रा.ली. यांचे वजन काटयावर घेतलेले प्रत्यक्ष वजन | ४३० | ७०० | ००० |
| ३) वितळविणेकामी नेण्यात आलेल्या चांदी वस्तुमध्ये निघालेले खडे, फुटलेले व इतर प्लॅस्टीकचे खडे, रूद्राक्ष इ. | ० | ८३३ | ००० |
| ४) वितळविणेकामी नेण्यात आलेल्या चांदी वस्तुतील वेगळे करण्यात आलेल्या खडयासह चांदीच्या ३ मुकुटाचे वजन | १ | ०७६ | ००० |
| ५) वितळविणेकामी देण्यात आलेल्या शिल्लक चांदीचे वजन | ४२८ | ७९१ | ००० |
| ६) नॅशनल रिफायनरी प्रा.ली. व संस्थानकडील वजनात पडलेला फरक | (-) | - ९ | ५९० |
| ७) मेल्टींगनंतर समक्ष घेतलेले वजन (४२३७५० ग्रॅम+२४९ ग्रॅम रिफायनरी सॅम्पल) | ४२३ | ९९९ | ००० |
| ८) संस्थानसाठी घेतलेल्या सॅम्पलचे वजन | | १९१ | ८०० |
| ९) मेल्टींगनंतर आलेली घट (Melting loss) | ४ | ६०० | २०० |
| १०) फाईन व रिफायनींग नंतर मिळणा-या शुध्द चांदीचे वजन | ३२२ | ५७७ | ९१७ |
| ११) फाईन व रिफायनींग नंतर आलेली घट | १०१ | ४२१ | ०८३ |
| १२) मेल्टींग व रिफायनींग करतांना आलेली एकुण घट | १०६ | ०३० | ८७३ |

मे. नॅशनल रिफायनरी प्रा. लि., मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार संस्थानला मिळणारी शुध्द चांदी ३२२ किलो ५७७ ग्रॅम ९१७ मिली ग्रॅम एवढी आहे. सदर चांदीपासुन भक्तांना विक्रीसाठी २० ग्रॅम वजनाची नाणी उपलब्ध करून द्यावयाची आहेत त्यासाठी पुढील कार्यवाही आवश्यकतेनुसार करण्यात येईल.

संस्थानने मे. नॅशनल रिफायनरी प्रा.लि.,मुंबई यांचेकडे हस्तांतरीत केलेल्या चांदी वस्तु अलंकार वितळविणे, बार तयार करणे तसेच रिफायनींग करून शुध्द चांदी संस्थानला उपलब्ध करून देणे याकामी करण्यात आलेल्या प्रक्रियेत एकुण चांदीमध्ये १०६ किलो ०३० ग्रॅम ८७३ मिली ग्रॅम एवढी घट आलेली आहे. संस्थानला मिळणा-या देणगी चांदीमध्ये २०,४०,६०,७०,८०,९० व ९५ टंच पर्यंतच्या प्रतीची चांदी जमा असल्याने मेल्टींग व रिफायनींग केल्यानंतर त्यापासुन मिळणारी शुद्ध ९९ टंच चांदी त्या त्या प्रमाणांत कमी मिळते. त्यामुळे एकुण वजनात जादा घट दिसुन येते. चांदीच्या एकुण

वजनात जरी घट दिसत असली तरी चांदीची एकुण किंमत मात्र तेवढीच राहते. सदर घटीस मान्यता मिळणेस विनंती. तसेच नॅशनल रिफायनरी प्रा.ली., जोगेश्वरी, मुंबई यांचेकडे असलेल्या उपरोक्त चांदीमधुन २० ग्रॅम वजनाची नाणी तयार करून घेणेस मंजुरी मिळणेस विनंती. सोबत मे. नॅशनल रिफायनरी प्रा. लि., मुंबई यांचे कडील अहवालाची प्रत अवलोकनार्थ जोडली आहे.

**निर्णय क्र.४२५** **सदरहू विषयावर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे चांदी वितळविताना आलेल्या १०६ किलो ०३० ग्रॅम ८७३ मिली ग्रॅम एवढया घटीस मान्यता देण्यात आली. तसेच नॅशनल रिफायनरी प्रा.ली., जोगेश्वरी, मुंबई यांचेकडे असलेल्या उपरोक्त चांदीमधुन २० ग्रॅम वजनाची नाणी तयार करून घेणेस व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२.** **कॅनरा बँक, शाखा शिर्डी यांच्याकडून संस्थानला सेवा घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** कॅनरा बँक यांनी त्यांचे जा.नं. CB/SHI/SSS/BD/२०१० दिनांक २६/०३/२०१० रोजीचे पत्रान्वये श्री क्षेत्र शिर्डी येथे कॅनरा बँक या बँकेची शाखा सुरू झालेली आहे. तसेच, याच पत्रात त्यांनी श्री साईबाबा विश्वस्तव्यवस्थेचे बचत खाते कॅनरा बँक, शिर्डी मध्ये उघडणे, देणगी दाखल आलेल्या चेक/डी.डी. कलेक्शन, तसेच दक्षिणापेटी मोजणीकामी त्यांना पाचारण करणेसाठी विनंती केलेली आहे. आणि संस्थानच्या मुदतठेवी त्यांच्याकडे नियमानुसार गुंतविण्यासाठी सुध्दा विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम २० अन्वये संस्थानची रक्कम फक्त राष्ट्रीयकृत बँकेतच ठेवण्याचे बंधन असुन सदर बँक ही राष्ट्रीयीकृत आहे.

दक्षिणा पेटीतून उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या स्थानिक बँकेकडे उच्चत्तम दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळवीता येतील. तसेच संस्थानचे वैधानिक लेखापरीक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्टीयकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी, असे लेखापरीक्षक यांनी सुचविलेले आहे.

तरी कॅनरा बँक, शाखा शिर्डी यांना संस्थानच्या नियम/अटी व शर्तीनुसार दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीकामी पाचारण करणे, त्यांचेकडे संस्थानच्या मुदतठेवी ठेवणे व संस्थानचे बचत खाते उघडणेस मान्यता मिळणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.४२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅनरा बँक, शाखा शिर्डी यांना संस्थानच्या नियम/अटी व शर्तीनुसार दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीकामी पाचारण करणे, त्यांचेकडे संस्थानच्या मुदतठेवी ठेवणे व संस्थानचे बचत खाते उघडणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३.** **शांतीनिवास इमारत १ ला मजला दर्शनलाईन स्टेनलेस स्टिल रेलींगचे मॉडीफिकेशन कामास व खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** शांतिनिवास इमारत १ ला मजला दर्शनलाईन स्टेनलेस स्टील रेलींगचे मॉडीफिकेशनचे काम तातडीचे असल्याने त्वरीत कोटेशन मागवून काम करुन घेण्यास व येणा-या रक्कम रुपये ९६,०००.०० मात्र खर्चास मान्यता मिळाली होती. त्यानुसार जा.क्र.एसएसएस / विद्युत / २८० ते २९१ / २०१० दि.०५-०१-२००९ अन्वये वर्कशॉप-फॅब्रिकेटरसँना पत्र पाठवून कोटेशन मागविण्यात आली होती. यानंतर आलेली कोटेशन्स उघडण्यात आली व त्यामध्ये मे.साई इंजिनिअर्स, नाशिक यांची दर कमी दिल्याने जा.क्र. एसएसएस / विद्युत / ४९२८ / २०१० दिनांक २०-०३-२०१० अन्वये त्यांना रक्कम रु.९४,०००/- इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आला आहे.दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र | तपशील | मागणी | मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक | मे.मेहता स्टील कॉर्पोरेशन, नाशिक | मे.मुंकूंद एन्टरप्राईजेस, नाशिक | मे.एन.आर. एन्टरप्राईजेस, नाशिक |
|---|---|---|---|---|---|---|
| 01) | Removing existing Railling Grinding, Polishing, Finishing of existing Railing Filling, Welding & Leveling of the holes | 1 Job | 0,01,200.00 | 0,01,400.00 | 0,01,535.00 | 0,01,450.00 |
| 02) | Converting existing Railing Barricade into operational Gate < using cutting blade/grinding wheel>with proper finish. | 1 Job | 0,00,950.00 | 0,00,900.00 | 0,00,954.00 | 0,01,940.00 |
| 03) | Providing Locking Arrangement by using Stainless Steel Aldrop with welding, grinding & Finishing. | 1 Job | 0,00,800.00 | 0,01,000.00 | 0,01,165.00 | 0,01,200.00 |
| 04) | Stainless Steel Back Plate for Aldrop. | 1 Job | 0,00,500.00 | 0,00,400.00 | 0,00,450.00 | 0,00,900.00 |
| 05) | Fixing of New Converted Gate by making grout hole into fiooring with providing grouting pipe, proper cement work. | 1 Job | 0,01,500.00 | 0,01,800.00 | 0,01,870.00 | 0,01,050.00 |
| 06) | Charges for transport, misc, material, welding, grinding, finishing & other overheads. | 1 Job | 0,01,050.00 | 0,00,950.00 | 0,01,265.00 | 0,00,700.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Total (For One Gate Only) Rs. | 0,06,000.00 | 0,06,450.00 | 0,07,239.00 | 0,07,240.00 |
| | Total For All 16 Gates Rs. | 0,96,000.00 | 1,03,200.00 | 1,15,824.00 | 1,15,840.00 |
| | Vat 12.5% | 0,12,000.00 | 0,12,900.00 | 0,14,478.00 | 0,14,480.00 |
| | **Total Cost of Railings Rs.** | 1,08,000.00 | 1,16,100.00 | 1,30,302.00 | 1,30,320.00 |
| | Less Dicount Rs. | 0,14,000.00 | - | - | - |
| | **Net Cost Rs.** | 0,94,000.00 | 1,16,100.00 | 1,30,302.00 | 1,30,320.00 |

तरी मे.साई इंजिनिअर्स, नाशिक यांना दिलेल्या रक्कम रुपये ९४,०००/- इतक्या रकमेच्या कार्यदेशास व आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४२७** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे शांतीनिवास इमारत १ ला मजला दर्शनलाईन स्टेनलेस स्टिल रेलींगचे मॉडीफिकेशन कामाचे मे.साई इंजिनिअर्स, नाशिक यांना दिलेल्या रक्कम रुपये ९४,०००/- इतक्या रकमेच्या कार्यदेशास व आलेल्या खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४.** **मंदिर परिसर, नवीन भक्तनिवासस्थान, श्री साईबाबा हॉस्पिटल, साईनगर, श्री साईनाथ रुग्णालय, नवीन धर्मशाळा, नवीन प्रसादालय, पाणीपुरवठा साठवण तलाव या परिसरातील पॉवरींग स्टँण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे विविध ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं. चा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर करावयाच्या पर्यायी वीजपुरवठयासाठी डिझेल जनरेटरसेट बसविण्यात आलेला आहे. हे जनसेट नेहमी कार्यदक्ष असावेत म्हणून त्यांचे रेगुलर मेन्टेनन्स करणे गरजेचे आहे. यासाठी वार्षिक कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे गरजेचे आहे. वार्षिक कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट केल्यास आपणाला वेळोवेळी येणा-या अडी-अडचणींबाबत मार्गदर्शन व मदत मिळू शकते. त्यामुळे जनरेटरसेट कायम कार्यक्षम ठेवणे शक्य होणार आहे.

कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट केल्यानंतर, (१) कंपनीची आपणाला २४ x७ सर्व्हिस मिळेल. (२) शिरडीत कायम स्वरूपी एक रेसिडेण्ट इंजिनिअर उपलब्ध राहणार आहे. (३) वर्षभरात सर्व्हिसिंगसाठी कोणतेही मटेरीअल लागले तर त्याचा वेगळा खर्च देण्याची ( आदा करण्याची ) गरज नाही. (४) सर्व्हिसिंगसाठी लागणारे मटेरीअलच्या ट्रान्स्पोर्टसाठी कोणतेही वेगळे चार्जेस द्यावे लागणार नाहीत. (५) जनसेट चालल्याच्या कालावधीत दर ३०० तासानी बी चेक कंपनी मार्फत केला जाईल. यात लागणारे नविन फिल्टर्स , नविन ऑईल, नविन ओ रिंग वगैरे कंपनीमार्फत पुरविले जाणार असून याचे वेगळे चार्जेस देण्याची गरज राहणार नाही. (६) जनसेट सुस्थितीत ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी कंपनीवर राहील.

सध्या शिरडी परीसरात दररोज चालू ७ ते ८ तास लोडशेडींगव्यतिरीक्त ऐन वेळा होणारे सक्तीचे भारनियमन, फॉल्टमुळे होणारे भारनियमन मिळून दर महिन्यास एकुण २१० तास ते २२० तास भारनियमन होते. एका वेळच्या सर्विसिंगची बी चेक कीटची ऑईलसह किंमत जनसेट क्षमतेनुसार नुसार रु. २५,००० ते रु. ३०,०००.०० च्या आसपास आहे. आपणाकडे एकुण १० जनसेट असून सरासरी ७ सर्व्हिसिंग गृहीत धरल्या तर ७० सर्व्हिसिंग होतात. व एका सर्व्हिसिंग़चा खर्च रु..२५,०००/- धरला तर रु. १७,५०,०००.०० इतका खर्च बी चेक कीटचा होतो. शिवाय आपत्कालीन लागणारे इतर स्पेअर्स जसे इंजिन बेल्ट, होज पाईप, क्लॅप वगैरे कंपनी कोणताही वेगळा चार्ज न घेता पुरविणार आहे. या स्पेअर्सची यादी कंपनीने पत्रासोबत दिलेली आहे. याशिवाय १५०० तासानंतर करावे लागणारे सी चेक यातच समाविष्ट असून त्याबद्दल कंपनी कोणताही वेगळा चार्ज घेणार नाही. या सी चेक मध्ये लागणारे स्पेअर्ससाठीही कंपनी कोणताही वेगळा चार्ज घेणार नाही. सी चेक कीटचा खर्च साधारणत: रु.४५,०००.०० इतका आहे.

कमिन्स या कपनीकडे लेखी विचारणा केली असता त्यांनी अहमदनगर, नासिक, जळगांव व औरंगाबाद जिल्ह्याकरीता तसेच संपूर्ण गोवा राज्याकरीता एकमेव मान्यताप्राप्त अधिकृत सेल्स अॅण्ड सर्व्हिस डिलर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स अॅण्ड सर्व्हिसेस, नाशिक हे असल्याचे लेखी कळविलेले आहे.

दिनांक२०-०५-२००७ रोजी झालेल्या मा.व्य.समितीच्या सभेतील विषय.३३निर्णय क्र.३८६अन्वये दरवर्षी संस्थानमधील महत्त्वाच्या मशिनरींचे (उदा.प्रसादालयामधील विविध मशिनरी, विद्युत विभागातील विविध मशिनरी, एअर कंडीशनिंग वायुवीजन यंत्रणा वगैरे) वार्षिक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या मशिनरींच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशिनरींच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या डिलरला देण्यात यावे असे ठरले.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडीच्या (०१) मंदिर परीसर, (०२) नविन भक्तनिवासस्थान, (०३) श्री साईबाबा हॉस्पिटल + साईनगर, (४) ) नविन धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय (०५) नविन प्रसादालय (०६) पाणीपुरवठा साठवण तलाव या वेगवेगळ्या परीसरातील जनरेटरसेटच्या इंजिनचे सन २०१०-२०११ या वर्षाकरीता दिनांक ०१-०४-२०१० ते दिनांक ३१-०३-२०११ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी जनरेटरसेट तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | जनरेटरसेट ठिकाण | जनसेट क्षमता | ईएसएन क्र. | मॉडेल क्र. | संख्या | वार्षिक कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१) | श्री साई मंदिर परीसर (नविन) | ५०० केव्हीए | २५२६०००३ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. | २,५०,०००.०० |
| ०२) | श्री साई मंदिर परीसर (जुना) | ५०० केव्हीए | २५१६७८०९ | व्हीटीए-१७१०-जी. | ०१ नग. | २,५०,०००.०० |
| ०३) | नविन भक्तनिवास (५०० रुम) | ५०० केव्हीए | २५२४२३१७ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. | २,५०,०००.०० |
| ०४) | नविन भक्तनिवास (५०० रुम) | १०० केव्हीए | २५१८७२९६ | एनटी-४९५-जी. | ०१ नग. | १,००,०००.०० |
| ०५) | धर्मशाळा/ श्री साईनाथ रुग्णालय जनसेट क्र.०१ | २५० केव्हीए | २५२४९०८५ | एनटीए-८५५-जी | ०१ नग. | १,५०,०००.०० |
| ०६) | धर्मशाळा/ श्री साईनाथ रुग्णालय जनसेट क्र.०२ | २५० केव्हीए | २५२४९२८५ | एनटीए-८५५-जी | ०१ नग. | १,५०,०००.०० |
| ०७) | श्री साईबाबा हॉस्पिटल / साईनगर | ५०० केव्हीए | २५३०९०२८ | केटीए - १९-जी -९ | ०१ नग. | २,२५,०००.०० |
| ०८) | श्री साईबाबा हॉस्पिटल / साईनगर | २५० केव्हीए | २५२४९०८७ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. | १,५०,०००.०० |
| ०९) | श्री साई प्रसादालय | ५०० केव्हीए | २५३२०२७१ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. | २,२५,०००.०० |
| १०) | पाणीपुरवठा साठवण तलाव | १०० केव्हीए | २५१५४५१४ | एनटी -४९५-जी. | ०१ नग. | १,००,०००.०० |
| | | | | एकुण (सर्व टॅक्स समाविष्ट ) :- | | १८,५०,०००.०० |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडीच्या (०१) मंदिर परीसर, (०२) नविन भक्तनिवासस्थान, (०३) श्री साईबाबा हॉस्पिटल + साईनगर, (४) ) नविन धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय (०५) नविन प्रसादालय (०६) पाणीपुरवठा साठवण तलाव या वेगवेगळ्या परीसरातील जनरेटरसेटच्या इंजिनचे वार्षिक कौंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मे. ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक यांना देणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.४२८ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे (०१) मंदिर परीसर, (०२) नविन भक्तनिवासस्थान, (०३) श्री साईबाबा हॉस्पिटल + साईनगर, (४) ) नविन धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय (०५) नविन प्रसादालय (०६) पाणीपुरवठा साठवण तलाव या वेगवेगळ्या परीसरातील जनरेटरसेटच्या इंजिनचे वार्षिक कौंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट या वर्षाकरीता अहमदनगर जिल्ह्याकरीता असलेले कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर मे. ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक यांना देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५. श्री साई प्रसादालय येथील मेंटेनन्स ब्लॉक इमारतीचे विद्युतीकरण करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालय परिसरात उत्तर बाजुचे टॉयलेट ब्लॉकसमोर सध्या मेन्टेनन्स ब्लॉक इमारतीचे बांधकाम करण्यात येत आहे. सदर कामाचे निविदेमध्ये विद्युतीकरणाचे कामाचा समावेश नाही. तरी नियोजित मेन्टेनन्स ब्लॉक इमारतीसाठी विद्युतीकरणाचे काम करुन मिळणेकामी बांधकाम विभागाने दि.२३-०३-२०१० चे पत्रान्वये कळविले आहे.

श्री साई प्रसादालय इमारतीचे उत्तर बाजुस मेन्टेनन्सकरीता पाच रुमची इमारत बांधण्यात आलेली आहे. या इमारतीचे बांधकाम पुर्णत्वास आलेले असून मेन्टेनन्स ब्लॉक इमारतीचे विद्युतीकरण करुन घ्यावे लागणार आहे.

मेन्टेनन्स ब्लॉक इमारतीचे विद्युतीकरण कामाची माहिती तसेच येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr.No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | NON CSR | Point Wiring for Light / Fan / Bell | 40 Nos. | 465.00 | 8,600.00 |
| 02) | NON CSR | Supplying and Erecting main with 3x2.5 Sq.mm. | 300 Mtr. | 59.85 | 17,955.00 |
| 03) | 2-1-11 | Supplying and Erecting T-5 28 Watt Energy efficient fluorescent tube. | 014 Nos. | 130.20 | 1,822.80 |
| 04) | 1-2-12 | Supplying and laying PVC trunking (PVC casing-n-capping) of size 32mm. | 100 Mtr. | 44.10 | 4,410.00 |
| 05) | 5-3-2 | Suppling,erecting & marking SPMCB 6A to 32A, | 024 Nos. | 25.20 | 604.80 |
| 06) | 5-4-3 | Supplying and Erecting triple pole and neutral distribution board (TPNDB), SPMCB of 36 ways, | 001 Nos. | 4,755.45 | 755.47 |
| 07) | 2-6-3 | Supplying and Erecting Ceiling fan of 1200 mm. | 010 Nos. | 1,323.00 | 13,230.00 |
| 08) | 5-6-6 | Providing, erecting & commissioning RCCB of 63A 4 pole | 001 Nos. | 3,223.50 | 3,223.50 |
| 09) | 1-8-13 | Supplying and Erecting modular type 3 pin 6A socket | 010 Nos. | 107.10 | 1,071.00 |
| 10) | 1-8-15 | Supplying and Erecting modular type 3 pin 16A combined unit | 010 Nos. | 185.85 | 1,858.50 |
| 11) | 1-8-31 | Supplying and Erecting 1 modular PVC Surface switch box | 005 Nos. | 108.15 | 504.75 |
| 12) | 1-8-33 | Supplying and Erecting PVC Surface 3 modular switch box | 010 Nos. | 130.20 | 1,302.00 |
| 13) | 1-8-35 | Supplying and Erecting PVC Surface 6 modular switch box | 005 Nos. | 197.40 | 987.00 |
| 14) | 1-8- | Supplying and Erecting PVC Surface 12 modular switch | 007 | 305.55 | 2,138.85 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 37 | box | Nos. | | |
| 15) | 7-1-17 | Supplying and Erecting PVC armoured cable 3 ½ core 25 sq.mm aluminimum conductor | 050 Mtr. | 205.80 | 10,290.00 |
| 16) | 17-1-3 | Making the trench in Hard murum / Tar road | 020 Mtr. | 202.65 | 4,053.00 |
| | | | | Total. | 86,761.65 |
| | | | | + Contigency 5% | 04,342.13 |
| | | | | Total Amount :- | 91,184.78 |
| | | | | **Round up :-** | **91,185.00** |

उपरोक्तप्रमाणे श्रीसाई प्रसादालय येथील मेन्टेनन्स ब्लॉक इमारतीचे विद्युतीकरणाचे काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ९१,१८५.०० इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४२९ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्रीसाई प्रसादालय येथील मेन्टेनन्स ब्लॉक इमारतीचे विद्युतीकरणाचे काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ९१,१८५/- चे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६. श्रीसाईबाबा इंग्लिश मीडियम स्कुलकडील संगणक लॅबचे इलेक्ट्रिकल वायरिंग करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १०-०१-२०१० रोजी सभेतील विषय क्र.७९ निर्णय क्र.७९ अन्वये श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकरीता नवीन ३० संगणक असलेली प्रयोगशाळा तयार करणे व त्यासाठी येणारे रक्कम रुपये १५,१६,६६७/- मात्र खर्चास मान्यता मिळालेली आहे. या रकमेत त्याठिकाणी करावयाच्या वायरींग कामाचा समावेश केलेला नाही. या संगणक लॅबमधील वीजपुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे वायरींग काम करुन घ्यावे लागणार आहे. खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 1-2-12 | Supplying and laying PVC trunking (PVC casing-n-capping) of size 32mm. with accessories on wall/ceiling as per specification No: WG-MA/CON, para no.1.1.2 | 400 Meter. | 44.10 | 17,640.00 |
| 02) | 1-3-3 | Supplying and erecting mains with 2x2.5 sq.mm. F.R. stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places. as per specification No:WG-MA/BW | 200 Meter. | 39.90 | 7,980.00 |
| 03) | 1-3-3 P.N.3 Note No.4 | Supplying and erecting mains with 1x2.5 sq.mm. F.R. stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places. as per specification No:WG-MA/BW | 750 Mtr. | 19.95 | 14,962.50 |
| 04) | 1-3-5 | Supplying and erecting mains with 2x4 sq.mm. F.R. stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places. as per specification No:WG-MA/BW | 500 Meter. | 56.70 | 28,350.00 |
| 05) | 5-4-11 | Supplying and erecting triple and neutral distribution board (TPNDB) with door surface/flush mounted SP (24 Poles) / TP (8 Poles) MCB of 8 ways (24 Poles) on iron frame/laminated board. (Vertical Busbar type) as per specification No.SW-SWR/MCBDB | 001 Nos. | 6,381.90 | 6,381.90 |
| 06) | 5-3-3 | Supplying, Erecting and marking SPMCB 6A to 32A B series.(for lighting) in provided distribution board as per specification No.SW-SWR/MCB | 024 Nos. | 162.75 | 3,906.00 |
| 07) | 5-6-6 | Providing, erecting & commissioning RCCB of electro magnetic type with 20 kA breaking capacity of 63A 4 pole complete as per specification No.SW-RCCB/RCCB | 002 Nos. | 3,223.50 | 6,447.00 |
| 08) | 1-8-2 | Supplying and erecting modular type switch type 16A ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 150 Nos. | 118.65 | 17,797.50 |
| 09) | 1-8-15 | Supplying and Erecting modular type 5 pin 16A combined socket unit ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 150 Nos. | 185.85 | 27,877.50 |
| 10) | 1-8-37 | Supplying and Erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 12 module duly erected in an approved manner. | 035 Nos. | 305.55 | 10,694.25 |
| 11) | 1-8-33 | Supplying and Erecting PVC Surface modular | 010 | 130.20 | 1,302.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | switch box with double mounting plate for 3 module duly erected in an approved manner. | Nos. | | |
| | | | | **Total :-** | **1,43,338.65** |
| | | | | +Contigency 5% | 0,07,166.93 |
| | | | | Total Amount :- | 1,50,505.58 |
| | | | | **Round up :-** | **1,50,506.00** |

उपरोक्तप्रमाणे श्रीसाईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडील संगणक लॅबचे वायरींग काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १,५०,५०६.०० इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४३० प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्रीसाईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडील संगणक लॅबचे वायरींग काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,५०,५०६/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७. श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे रेडिओलॉजी विभागात सीटी स्कॅन मशिनकरिता नविन ए.सी. खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये रेडिओलॉजी विभाग कार्यरत असून त्यामध्ये सी.टी.स्कॅन मशिन सुस्थितीत चालणेकामी मशिन बसवितेवेळीच त्या रुममधील तापमान नियंत्रीत ठेवण्यासाठी संबंधीत कंपनीमार्फतच ए.सी.बसविण्यात आलेले होते. सदरचे ए.सी.अहोरात्र कार्यरत आहेत. गेल्या ५ वर्षापासून ए.सी. सतत कार्यरत आहेत. त्यांची अनेक वेळा दुरुस्ती व देखभाल करण्यात आलेली आहे. सध्या तीव्र उन्हाळा असल्याने वातावरणातील वाढीव उष्णता आणि मशिनच्या निर्माण होणा-या उष्णतेमुळे सध्या वापरात असलेल्या ए.सी.मार्फत तापमान नियंत्रीत होत नाही. परिणामी सी.टी.स्कॅन मशिनचे तापमान वाढून मशिन हॅंग होऊन बंद पडल्याच्या अनेकवेळा रेडिओलॉजी विभागाकडून तक्रारी आलेल्या आहेत. त्यामुळे रुग्णांची गैरसोय निर्माण होते. तसेच एखादया रुग्णाची स्कॅनिंग चालू असतांना मशिन बंद पडल्यास गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर ठिकाणी सी.टी.स्कॅन मशिन सुस्थितीत विनातक्रार कार्यरत राहण्यासाठी जुने ए.सी.काढून नविन ए.सी. बसवावे लागणार आहे.

रेडिओलॉजी विभागातील सी.टी.स्कॅन मशिनसाठी नविन ए.सी. स्प्लिट टाईप २ टनी ए.सी. बसविणे गरजेचे आहे. त्यासाठी ते खालीलप्रमाणे खरेदी करावे लागणार आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | व्होल्टास मेक, स्प्लिट टाईप,<br>वॉल माऊंटेड एअर कंडिशनर,<br>क्षमता :- २ टन, मॉडेल :- व्हर्टीस प्लस | ०७ नग. | रु. ३७,०००.०० | २,५९,०००.०० |
| | | | एकुण रक्कम :- | २,५९,०००.०० |

उपरोक्तप्रमाणे श्रीसाईबाबा हॉस्पीटलचे रेडिओलॉजी विभागात C.T.स्कॅन मशिनकरीता नवीन ए.सी.खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये २,५९,०००.०० इतका खर्च अपेक्षित आहे.

**निर्णय क्र.४३१ प्रस्तावात नमूद केलेनुसार श्रीसाईबाबा हॉस्पीटलचे रेडिओलॉजी विभागात C.T.स्कॅन मशिनकरीता आवश्यक नवीन व्होल्टास कंपनीचे ए.सी.कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,५९,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८. टी.व्ही. ठेवण्याच्या स्टील स्टॅंण्डची विक्री करणेकामी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पत्र देणे बाबत**

**प्रस्ताव-** संस्थान इमारतीतील दर्शन लाइनमधून दर्शनाला जाताना भक्तांना श्रींचे टीव्हींच्या स्क्रीनवर दर्शन व्हावे यासाठी सन २००१ मध्ये व्हीडीओकॉन कंपनीचे १०० नग नॉर्मल कॅथॅरॉड टीव्ही खरेदि केले, तसेच टीव्ही खरेदि होणेपुर्वी टीव्ही ठेवणे साठी सन २०००मध्ये १०० नग स्टीलचे स्टॅंड बनवून घेतलेले आहेत. परंतू वशी-ध्वनी-८५२दि.३०मार्च,२००६च्या यादीप्रमाणे ९९ स्टॅंड आहेत, आता सदर स्टॅंडचा सन २००१ ते २००९ पर्यंत उपयोग झालेला आहे. आता दर्शन लाईनमध्ये व ईतर ठिकाणी नविन तंत्रज्ञानाचे एल.सी.डी टीव्ही बसविलेले आहेत,एल.सी.डी.टीव्हींसाठी स्टील स्टॅंडची गरज नाही त्यांना वॉल माउंटींग ब्रॅकेटच्या सहाय्याने भींतीवर फिट करता येतात, त्यामूळे तेथील स्टील स्टॅंड काढून ठेवलेले आहेत,सदर टीव्ही स्टॅंडमूळे दोन रूमची जागा व्यापलेली आहे,त्या स्टॅंडची आता किंवा भविष्यात गरज भासणार नाही किंवा संस्थानच्या कोणत्याही विभागात त्याचा उपयोग होणार नाही, मात्र ९९ स्टॅंडपैकी आवश्यक तेथे नॉर्मल कॅथॅरॉड टीव्ही ठेवणेसाठी ०९ स्टॅंडची

गरज असल्याने उर्वरीत ९० स्टँडची कोटेशनच्या उच्चतम दराने विक्री करता येईल. अशा स्टँडची माहिती खालीलप्रमाणे

| अ नं | संगणक नं. | स्टँड साईज | दिनांक | नग | प्रत्येकी किंमत | एकुण किंमत | विक्री करण्याचे नग | प्र. घसारा किंमत | ९० स्टँडची घसारा किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | CCTV/55 | 35"x35"x3mm | ३०/०९/२००० | ९९ | २९७०/- | २,९४,०३०/- | ९० | ७७१/- | ६९,३९०/- |

वरील ९० स्टँडची घसारा किंमत रू.५०,०००/-(अक्षरी रूपये पन्नास हजार) पेक्षा जास्त असल्याकारणाने, स्टँड विक्री करणे बाबदची मान्यता घेणे बाबद, मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय मुंबई यांना पत्र पाठविणेस मान्यता मिळावी हि विनंती.

**निर्णय क्र.४३२ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे टी.व्ही. ठेवण्याच्या स्टील स्टँण्डची विक्री करणेकामी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पत्र देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-ध्वनीक्षेपण विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९. शिर्डी येथील मंदिर परिसरात कै.रावबहादूर हरि विनायक साठे यांचा स्मृती फलक लावणे व एखाद्या वास्तूस नांव देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे हयातीत त्यांची सेवा केलेले व त्यांचे करीता योगदान दिलेले या भक्तांचे फोटो समाधी मंदिराचे सभामंडपात लावणेत आलेले आहेत. आशा फोटोंची संख्या ५३ आहेत. आता त्याठिकाणी समकालीन भक्तांचे फोटो लावणेसाठी जागा उपलब्ध नाही. श्री सुरेश द. साठे, पुणे साठे-साठ्ये-साठये कुलपुरस्कृत न्यास संस्थेचे कार्यवाह यांनी पाठविलेल्या पत्रात खालील प्रमाणे विनंती केलेली होती.

०१. लिंबाचे झाडाजवळ एक फलक लावून त्यावर कै. हरि विनायक यांची थोडक्यात माहिती व त्यांनी बाबांना देणगी रुपाने दिलेल्या वाड्याची नोंद करावी.

०२. मंदिर परिसरातील एखाद्या वास्तूस अथवा संपूर्ण प्रशासकीय इमारतीस कै. हरि विनायक यांचे नांव द्यावे कारण ते उपजिल्हाधिकारी होते व आयुष्यभर त्यांनी प्रशासकीय कामातच लक्ष दिले होते.

०३. दीक्षित वाड्यात ठेवलेल्या प्रदर्शन दालनात कै. रावबहादूर साठे यांचे छायाचित्र व वर्णनाप्रमाणे एखादे रेखाचित्र लावावे.

श्री साईबाबांच्या हयातीत त्यांची सेवा केलेले व त्यांना अर्पण केलेल्या वास्तू अ.नं. (१) बुटी वाडा- (समाधी मंदिर) (२) दीक्षित वाडा - (म्युझीयम हॉल) (३) नवलकर वाडा (४) साठे वाडा. पैकी अ.नं. ३ व ४ या वास्तू आज रोजी अस्तित्वात नाहीत मात्र त्यांचा श्री साईचरित्रात नामोल्लेख आहे.

श्री सुरेश साठे यांचे उपरोक्त अ.नं. ०१ चे विनंती नुसार साठे वाडा आजमितीस अस्तीत्वात नसल्याने त्याठिकाणी बोर्ड लावणे उचित वाटत नाही._तसेच लिंबाच्या झाडाजवळ फलक लावणेस सूचीत केले आहे. लिंबाच्या झाडाचा संबध श्री साठे यांचेशी नाही. श्री साईबाबा लिंबांच्या झाडाखाली बसत होते. ज्यावेळी वास्तू दान केलेली आहे. त्यावेळी अटी घातलेल्या नव्हत्या. श्री साठे यांचे मागणीप्रमाणे स्मृती फलक लावल्यास सध्या अस्तीत्वात नसलेल्या नवल कर वाडा यांचे वंशजही स्मृतीफलक लावणे बाबतची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

श्री सुरेश साठे यांचे उपरोक्त अ.नं. ०२ चे विनंती नुसार संस्थानच्या सध्याचे स्थितीत असलेल्या सर्व प्रशासकीय इमारती व इतर भक्तांच्या निवासासाठी बांधलेल्या इमारतीस किंवा इतर वास्तूस फक्त बाबांचे नांव देण्यात आलेले आहे. त्याठिकाणी साईभक्ताचे नांव देणे उचित वाटत नाही. असे साईभक्त बाबांचे वेळी अनेक होते त्या प्रत्येकाचे नांव देणेबाबत मागणी होवू शकते. यापुर्वीही संस्थान परिसरात असलेले चार महाद्वारांना कै.बायजाबाई कोते प्रेवशद्वार, कै.तात्या पाटील कोते प्रवेशद्वार, कै.म्हाळसापती प्रवेशद्वार, कै.माधवराव देशपांडे प्रवेशद्वार, कै.रामचंद्र दादा कोते पाटील प्रवेशद्वार अशी श्रीचे समकालीन भक्तांची नांवे द्यावीत अशा प्रकारची गांवकरी यांनी अनेकवेळा मागणी केली परंतू संस्थानने तसे केलेले नाही.

श्री सुरेश साठे यांचे उपरोक्त अ.नं. ०३ चे विनंती नुसार दिक्षित वाड्यात ठेवलेल्या प्रदर्शन दालनात फक्त श्रींचे समकालीन संताचे फोटो लावणेत आलेले आहेत. त्या ठिकाणी श्रींचे समकालीन भक्तांचे फोटो लावणे उचित वाटत नाही.

श्री सदाशिवराव गोरक्षकर, मुंबई हे वास्तूशास्त्र पुरातत्व तज्ञ असून संस्थानचे सल्लागार आहेत. त्यांचेशी झालेल्या विस्तृत चर्चेप्रमाणे त्यांनी असे सुचविले आहे की, " शिरडीला येणाऱ्या भक्तांचा मूळ हेतू श्री बाबांचे दर्शन व बाबां बद्दलची माहिती करुन घेणे हा आहे. मंदिरात जातांना भक्तांचे सर्व लक्ष श्री बाबांवर केंद्रीत असते आणि त्यात आपण कुठल्याही प्रकारची बाधा आणू नये, किंबहुना तिथे इतर भक्तांविषयी माहिती अभिप्रेत नाही. त्यामुळे आशाप्रकारे मजकूर लिहणे उचीत ठरणार नाही.

याकरीता शांतीनिवास इमारती दर्शन रांगेमध्ये मोठ्या आकाराचा लांब बोर्ड तयार करुन त्यावर भक्तांचे फोटो व त्याखाली थोडक्यात माहिती द्यावी जेणेकरुन भक्तांचे निर्दशनास येईल". असे श्री गोरक्षकर यांनी आपले लेखी मत प्रकट केलेले आहे.

यापुर्वीही भक्तांचे फोटो सभामंडपात लावणेबाबत व्यवस्थापन मंडळाच्या सभेपुढे दि.२८.०७.२००७ रोजी विषय ठेवण्यात आला होता. परंतू सदरचा विषय तहकूब करण्यात आला त्यावर अद्यापही निर्णय झालेला नाही. आज साठे वाड्याचे अस्तित्व नाही. तसेच समकालीन भक्तांची माहिती बुटी वाडा (समाधी मंदिर) वगळता कुठेही बोर्डावर लावलेली नाही. अगदी सुरुवातीपासून जे नाहीत ते आज कोणी मागणी करते म्हणून करावे किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४३३ उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०. श्री साई दैनंदिनी /दिनदर्शिका -२०१० खर्ची टाकणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका मागील अनेक वर्षे मंत्रालयातील संस्थान कामकाजासंबंधीत अधिका-यांना व कर्मचा-यांना विनामुल्य सप्रेम भेट दिली जाते. या अधिका-यांना व कर्मचा-यामार्फत शासनाकडून मंजूर होणारे प्रस्ताव सादर होत असतात. शासनाच्या अधिका-यांसोबत व कर्मचा-यांसोबत संपर्क ठेवण्याकरीता तसेच त्यांच्या मनात संस्थान विषयी सद्भावना निर्माण करण्याकरीता श्री साई दैनंदिनी त्यांना सप्रेम भेट देणे हे एक साधन आहे. याशिवाय श्री साईबाबा संस्थानची माहिती, विश्‍वस्तांचे दूरध्वनी, दिवसभरातील शिर्डी येथील धार्मिक कार्यक्रम, संस्थान मार्फत साजरे होणारे उत्सव, रथ पालखी तसेच आरती, रेल्वेचे वेळापत्रक, श्रीक्षेत्र शिर्डी येथील दर्शनाची पवित्र स्थाने इ. माहिती त्यांना सहजतने होणेकरीता खालील प्रमाणे दैनंदिनी/दिनदर्शिका मुंबई कार्यालयामार्फत भेट म्हणून देण्यात आल्या आहेत.

| अ.नं. | मौखिक आदेशानुसार श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका २०१० विनामुल्य सप्रेम भेट देण्याबाबतची माहिती | भेट देण्यात आलेले दैनंदिनी नग विक्री किंमत रु.५०/- | भेट देण्यात आलेले दिनदर्शिका नग विक्री किंमत रु १०/- | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या मौखिक आदेशानुसार दि.१.०१.१० रोजी | १५० | १५० | ७,५००/-<br>१,५००/- |
| ०२ | मा.व्यवस्थापन समितीचे सभा दि.२४.०१.१० रोजी मंत्रालय, मुंबई येथे मा.मंत्री, विधी व न्याय यांच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात आली होती. या सभेत श्री साई दैनंदिनी १० चे विनामुल्य वाटप करण्याकरीता संस्थान कार्यालयाकडून निर्देशित करण्यात आले होते. | ४५ | -- | २,२५० |
| | एकूण नग | १९५ | १५० | ११,२५०/- |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी यांना भेट म्हणून देण्यात आलेले श्री साई दैनंदिनी १९५ नग व श्री साईबाबा दिनदर्शिका १५० नग पोस्टेज स्टॉकमधून कमी होणेस, संभावना खाते खर्ची टाकणेस तसेच सदरचे रु.११,२५०/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४३४ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी यांना भेट म्हणून देण्यात आलेले श्री साई दैनंदिनी १९५ नग व श्री साईबाबा दिनदर्शिका १५० नग पोस्टेज स्टॉकमधून कमी करुन संभावना खाते खर्ची टाकणेस तसेच सदरचे रु.११,२५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१. कनिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २००९-१० या वर्षाकरिता नियुक्त असलेल्या प्रयोगशाळा तसेच अर्धवेळ व तासिका तत्वावरील शिक्षणसेवक यांना सन २०१०-११ मध्ये फेर नेमणूका देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००८-०९ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयात इ.११ वी व इ.१२ वी च्या कला,विज्ञान आणि वाणिज्य शाखांच्या प्रत्येकी दोन वर्गतुकडया अशा एकूण १२ वर्गतुकडया सुरू आहेत.या १२ वर्गतुकडयांमध्ये ९०१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

या वर्गाच्या अध्यापनासाठी मागास प्रवर्गानुसार नियुक्त करावयाच्या स्टाफ करीता ऑगस्ट २००८ मध्ये मा.व्यवस्थापन समितीने मुलाखती घेऊन प्रवर्गनिहाय आरक्षण विचारात घेऊन,त्यानुसार या मुलाखतीमध्ये निवड झालेल्या खालील संबंधित कर्मचाऱ्यांना सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षाकरीता आणि त्यानंतर सन २००९-१० या शैक्षणिक वर्षाकरीता नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

| अ.नं. | नाव | सन २००९-१० मधील पदनाम | सन २०१०-११ मधील पदनाम | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | सन २००९-१० मधील मानधन | सन २०१०-११ मधील मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सौ.वैशाली प्रशांत देवरे (NT) | प्रयोगशाळा सहाय्यक (जीवशास्त्र) | प्रयोगशाळा सहाय्यक (जीवशास्त्र) | बी.एस्सी. बी.एड. (प्राणीशास्त्र) | रु.२५००/- प्रति माह | रु.२५००/- प्रति माह |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | श्री.दत्तू अशोक लांडे | अर्धवेळ शिक्षणसेवक | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.ए. बी.एड. (अर्थशास्त्र) | रु.२५००/- प्रति माह | रु.२५००/- प्रति माह |
| ३ | श्रीमती संगिता रंगनाथ बनसोडे (SC) | CHB शिक्षणसेवक | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.एस्सी. बी.एड. (वनस्पतीशास्त्र) | रु.७२/- प्रति घ. तास | रु.२५००/- प्रति माह |
| ४ | श्रीमती उषा कोंडाजी गायके (OPEN) | CHB शिक्षणसेवक | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.सी.एम. | रु.७२/- प्रति घ. तास | रु.२५००/- प्रति माह |
| ५ | श्री.प्रमोद भिवसेन चौधरी (OBC) | CHB शिक्षणसेवक | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.एस्सी. बी.एड. (भौतिकशास्त्र) | रु.७२/- प्रति घ. तास | रु.२५००/- प्रति माह |
| ६ | श्री. रंगनाथ चांगदेव राहाणे (OPEN) | CHB शिक्षणसेवक | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.ए. बी.एड. (भूगोल) | रु.७२/- प्रति घ. तास | रु.२५००/- प्रति माह |

अ.नं.१ यांचे पद SC/ST करीता राखीव असल्याने त्यांना वार्षिक नेमणूक देण्यात आलेली आहे.सन २००८-०९ तसेच २००९-१० मध्ये पूर्णवेळ पदासाठी कार्यभार उपलब्ध नसल्याने अ.नं.२ ते ४ यांना वार्षिक नेमणुका देण्यात आलेल्या आहेत.

अ.नं. १ व २ यांचा सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षामध्ये सन २००९-१० प्रमाणेच कार्यभार उपलब्ध होणार असल्याने त्यांची वरील तक्त्यात दर्शविल्यानुसार तसेच वरील तक्त्यामधील अ.नं. ३ ते ६ यांचेसाठी अर्धवेळ पदाचा कार्यभार उपलब्ध होत असल्याने त्यांना रू.२५००/- प्रति माह या मानधनावर नियुक्ती करता येईल. वरील सर्वांची मा.व्यवस्थापन समितीने मुलाखतीद्वारे निवड केलेली असल्याने त्यांना दि.१४ जून २०१० पासून दि.३० एप्रिल २०११ अखेर पर्यंत,सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षासाठी, अ.नं.१ ते ६ यांना नेमणूका देता येतील.सदरची शिक्षणसेवकांची पदे पूर्णवेळ झाल्यावर आरक्षणानुसार जाहिरात देऊन भरता येतील.

**निर्णय क्र.४३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना )

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२. स्टीम बॉयलरकरिता ०२ नग फोटो सेल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयामध्ये अन्न शिजविणेसाठी सोलर स्टीम कुकींग यंत्रणेबरोबरच थरमॅक्स कंपणीचे दोन बॉयलर कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. (RX -४०० व RX - ८५०).

सदर दोन्ही बॉयलरची थरमॅक्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर मे. मॅकसीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचे मार्फत वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टद्वारे दर दोन महिन्यानी सर्व्हीसींग केली जाते. दि.०५/०४/२०१० रोजी Rx-८५० बॉयलर चालू असतांना अचानक बंद पडला. त्यामुळे तातडीने दुसरा बॉयलर Rx-४ कार्यान्वीत करावा लागला. बंद पडलेल्या बॉयलरची प्रसादालय मशिनरी दुरुस्ती देखभाल अभियंत्यांनी दुरुस्ती केली असता फोटोसेल खराब झाल्याचे आढळले. त्यामुळे तातडीने मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद सर्व्हीस डिलर यांना दुरध्वनी करुन टेक्निशियन पाठविणेस सांगितले. त्यानुसार दि.१२/०४/२०१० रोजी टेक्निशियनने येवून बॉयलरची तपासणी करुन सर्व्हीस रिपोर्ट दिला आहे.

त्यांच्या सर्व्हीस रिपोर्टमध्ये बॉयलरचे फोटोसल विक झालेले असुन ब्रेकडाऊन होवू नये याकरीता तातडीने दोन फोटोसेल दोन्ही बॉयलरकरीता स्पेअरमध्ये ठेवण्याचे सुचीत केले आहे. सध्या उन्हाळयाची सुटी असल्याने भक्तांची गर्दी वाढत असून मोठया प्रमाणावर प्रसाद भोजन तयार करावे लागत आहे. सध्या एक बॉयलर फोटोसेल अभावी बंद असून दुस-याचा फोटोसेल विक झालेला आहे. त्यामुळे प्रसाद भोजन बनविणेचे प्रक्रियेत अडचण निर्माण होवू नये याकरीता तातडीची बाब म्हणून फोटोसेल खरेदी करणे गरजेचे आहे. थरमॅक्स कंपनीच्या बॉयलरचे स्पेअरपार्ट अन्यत्र बाजारात उपलब्ध होत नसलेने अधिकृत सर्व्हीस डिलर मार्फत फोटो सेल खरेदी करावे लागतील.

त्यासाठी मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांनी दि.१२/०४/२०१० चे पत्रानुसार खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे कळविलेली आहे.

| अ.नं. | कोटेशन क्र. दिनांक | स्पेअरपार्टचे नांव | नग | दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १) | २४२७<br>दि.१२/०४/२०१० | फोटोसेल QRA १OC<br>Excise १०.२४%<br>Vat १२.५%<br>Packing & Forward ३% | १ | २४०५३.००<br>२४६३.०३<br>३००६.६३<br>७२१.५९ | २४०५३.००<br>२४६३.०३<br>३००६.६३<br>७२१.५९ |
| | | | | **एकूण रु =** | **३०२४४.२५** |

उपरोक्तप्रमाणे एका फोटोसेलसाठी रक्कम रुपये ३०,२४४/- खर्च कळविलेला आहे. RXG-०४ व RXD - ८५० दोन्ही स्टीमबॉयलरसाठी दोन फोटोसेल थरमॅक्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर

मॅक्सीथर्म वर्क्स,औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणे व त्याकामी येणा-या रक्कम रु.६०,४८८/- चे खर्चाबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४३६ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे RXG- ०४ व RXD - ८५० दोन्ही स्टीमबॉयलरसाठी दोन फोटोसेल थरमॅक्स कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर मॅक्सीथर्म वर्क्स,औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणे व त्याकामी येणा-या रक्कम रु.६०,४८८/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३. ताराचंद विठ्ठलरात म्हस्के, लिपीक, प्रकाशने यांचे मा.कामगार न्यायालय,अहमदनगर यांच्या आदेशाची अंमलबजावणी होणेसंदर्भातील अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** **संदर्भः-** १) श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के,लिपीक,प्रकाशने विभाग यांचा दि.१६-०४-२०१० रोजीचा विनंती अर्ज

२) संस्थान कामगार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील, ॲडव्होकेट,अहमदनगर यांचेकडील दि.२०-०८-२००७ रोजीचा कायदेशीर अभिप्राय...

श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांची जा.नं.एसएसएस/वशी-१/३६०१/१९९२ दि.२१-०४-१९९२ अन्वये संस्थानचे जनसंपर्क कार्यालयात जनसंपर्क अधिकारी या पदावर रु.१६४०-६०-२६०० ईबी-७५-२९०० (सुधारीत ५५००-१५०-९०००) या वेतनश्रेणीत सर्व मिळून मासिक नियत वेतन रु. २०००/- (अक्षरी रुपये दोन हजार) मात्र वर नियुक्ती करण्यात आली. त्यानुसार श्री.म्हस्के हे दि.२१-०४-१९९२ रोजी संस्थान सेवेत कामावर हजर झाले. दि.२०-१०-१९९२ अखेर त्यांचा प्रारंभिक सहा महीन्यांचा परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झालेनंतर त्यांचा सहा महीन्यांच्या टप्या टप्याने तीन वेळा म्हणजे दि.२०-०४-१९९४ अखेर परिविक्षाधीन कालावधी वाढविण्यात आला. तथापी, मुळ व वाढीव परिविक्षाधीन कालावधीमध्ये श्री.म्हस्के यांचे काम समाधानकारक आढळून न आल्यामुळे दि.२०-०४-१९९४ रोजी त्यांची सेवा संपुष्टात आणण्यात आली.

त्यामुळे श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांनी दि.२०-०४-१९९४ रोजीचा सेवा समाप्ती आदेश बेकायदेशीर ठरवून रद्द व्हावा व सलग नोकरी धरुन मागील काळातील वेतनासह पुर्ववत सेवेत घ्यावे या मागणीसाठी मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे संस्थान विरुध्द तक्रार (यु.एल.पी.) क्र.४१/१९९४ ही कोर्ट केस दाखल केली होती.

श्री.म्हस्के यांचे तक्रार (यु.एल.पी.) क्र.४१/१९९४ संदर्भात मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी प्राथमिक मुद्दयावर श्री.म्हस्के हे " वर्कमन " असलेबाबत दि.१८-१०-१९९४ रोजीचे आदेशान्वये निर्णय दिला. संस्थानने सदर आदेशा संदर्भात मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.४७/१९९४ चा अर्ज दाखल केला. त्यामध्ये मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी श्री.म्हस्के यांचे बाबतीत मा.कामगार न्यायालयाचा आदेश कायम करुन सदर रिव्हीजन दि.३१-०१-१९९५ रोजी डीसमीस करुन संस्थानचे विरुध्द निर्णय दिला होता.

मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांचे दि.३१-०१-१९९५ रोजीचे आदेशा विरुध्द संस्थानने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.१७८४/१९९५ दाखल केले होते. सदर रिट पिटीशन पेंडींग असतांना श्री.म्हस्के यांनी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल केले. त्यामध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी श्री.म्हस्के यांचे संदर्भात मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे न्यायप्रविष्ठ असलेल्या तक्रारीचे कामकाज सुरु करावे असा हुकुम केला. या हुकुमा विरुध्द संस्थानने पुन्हा मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे रिव्हीव ॲप्लीकेशन दाखल केले. सदर रिव्हीव ॲप्लीकेशनमध्ये मा.उच्च न्यायालयाने " श्री.म्हस्के यांना पुढील आदेश होईपर्यंत " लिपीक " या पदावर कामावर हजर करुन घ्यावे. तसेच ते " जनसंपर्क अधिकारी " म्हणून संस्थानकडे कार्यरत असतांना त्यांना दरमहा जे वेतन आदा करण्यात येत होते (म्हणजे दरमहा रु.२१००/-) तेवढे वेतन श्री.म्हस्के यांना दरमहा देण्यात यावे " असा हुकुम मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.२६-०२-१९९७ रोजी दिला होता.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचे दि.२६-०२-१९९७ चे आदेशास अनुसरुन श्री.म्हस्के यांना दि.०२-०६-१९९७ पासून संस्थान सेवेत " लिपीक " या पदावर हजर करुन घेण्यात आले. दि.०२-०६-१९९७ पासून श्री.म्हस्के यांना मा.उच्च न्यायालयाच्या हुकमानुसार मासिक नियम वेतन रु.२०००/- व अंतरीम वाढ रु.१००/- असे एकूण रु.२१००/- दरमहा वेतन देण्यात येत होते. श्री.म्हस्के हे दि.०१-०९-२००३ पासून कामावरुन गैरहजर असल्याने त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१५२१/२००४ दि.२१-०५-२००४ अन्वये आरोपपत्र देण्यात आले असून त्यांचे खातेचौकशीचे कामकाज, कोर्टकेस प्रकरण मा.न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्याने पेंडींग ठेवण्यात आले होते.

दरम्यान रिट पिटीशन क्र.१७८४/१९९५ मध्ये मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी श्री.म्हस्के हे " वर्कमन " आहेत असा निर्णय दि.२३-०४-२००४ रोजी देऊन सदर रिट पिटीशन डिसपोज्ड ऑफ करुन निकाली काढले. त्यानंतर मा.कामगार न्यायालय अहमदनगर येथे तक्रार (यु.एल.पी.) क्र.४१/१९९४ चे कामकाज चालू होऊन मा.कामगार न्यायालयाने दि.०५-०१-२००६ रोजी खालीलप्रमाणे जज्जमेंट/अंतिम आदेश श्री.ताराचंद म्हस्के यांचे बाजूने दिला होता.

**ORDER**

१. The complaint at Exh.U/१ is hereby allowed.

२. It is hereby declared that, the respondent is engaged in an unfair labour practice under item १(b) of Schedule IV of MRTU & PULP Act १९७१ while terminating the services of the complainant w.e.f. २०-०४-१९९४ not in good faith but in colourable exercise of the employerड्ड rights. The respondent does desist from the said unfair labour practice.

३. The respondent is directed to reinstate the complainant with continuity in service and full back wages from the date of termination, excluding the period of service by virtue of Courts order during the period from July १९९६ to November २००२

४. Parties to bear their own costs,

५. Order be complied within the period of two months from the date of order

(V.P.KAREKAR)
JUDGE
AHMEDNAGAR
Dated- ०५-०१-२००६

१ ST LABOUR COURT
A H M E D N A G A R

उपरोक्तप्रमाणे मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी तक्रार (यु.एल.पी.) क्र.४१/१९९४ मध्ये दि.०५-०१-२००६ रोजी दिलेले जज्जमेंट/अंतिम आदेश बेकायदेशीर ठरवून रद्द होऊन मिळावा या करीता संस्थानचे वतीने मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांचे विरुध्द रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.११/२००६ चा अर्ज दाखल केला होता. श्री.ताराचंद म्हस्के यांनी माहे जुलै १९९६ ते माहे नोव्हेंबर २००२ या कालावधीतील मा.कामगार न्यायालयाने नाकारलेले वेतन/बॅक वेजेससह कामावर रुजू करुन घ्यावे यामागणीसाठी संस्थान विरुध्द रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.१९/२००६ दाखल केले होते.

उपरोक्त दोन्हीही रिव्हीजनमध्ये मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी दि.०३-०७-२००८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले होते.

**ORDER**

१. The Revision ULP.No.१९/२००६ is dismissed.

२. The Revision ULP.No.११/२००६ is partly allowed.

३. The order of the learned Labour Court passed in Complaint ULP.No.४१/९४ is modified and be substituted as follows:-

४. The Complaint is allowed.

५. It is hereby declared that the respondent has engaged in unfair labour practice under item १ (b) of Sch.IV of the MRTU & PULP Act.

६. The respondent is directed to pay compensation of Rs.७०, ०००/- (Rupees Seventy Thousand only) to the complainant within one month from the date of order instead of reinstating the complainant with continuity and full back wages.

७. No.costs.

८. The R & P be sent back

९. Original of this judgment be kept in Revision ULP.No.११/०६ and copy in Revision ULP.No.१९/०६

Ahmednnagar
Date-३/७/२००८

(V.P.UTPAT)
Member

उपरोक्तप्रमाणे संस्थानने श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांचे विरूध्द दाखल केलेले रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.११/२००६ मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी दि.०३-०७-२००८ रोजी आदेश देऊन, पार्टली अलौऊड केले होते. त्यात त्यांनी श्री.म्हस्के यांना मागील सेवा सलग धरून पुर्ववत कामावर न घेता, व मागील काळातील वेतन/बॅक वेजेस श्री.म्हस्के यांना न देता, नुकसान भरपाई पोटी रूपये ७०, ०००/-(अक्षरी रूपये सत्तर हजार) मात्र दि.०३-०७-२००८ रोजीचे आदेशाचे तारखेपासून एक महिन्यांचे आंत म्हणजे दि.०२-०८-२००८ अखेर श्री.म्हस्के यांना अदा करणेत यावे असे निर्देश दिले होते. तसेच श्री.म्हस्के यांनी माहे जुलै १९९६ ते माहे नोव्हेंबर २००२ या कालावधीतील मा.कामगार न्यायालयाने नाकारालेले वेतन/बॅक वेजेससह पुर्ववत कामावर रूजू करून घ्यावे, या मागणीसाठी संस्थान विरूध्द दाखल केलेले रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.१९/२००६ मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी दि.०३-०७-२००८ रोजी डिसमिस ऑर्डर करून निकाली काढले होते.

मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.११/२००६ व रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.१९/२००६ संदर्भात दि.०३-०७-२००८ रोजी दिलेल्या उपरोक्त आदेशाबाबत संस्थान कामगार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील, ॲडव्होकेट अहमदनगर यांचा जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/ १०१३४/ २००८ दि.१०-०७-२००८ रोजीचे पत्रान्वये लेखी, कायदेशीर अभिप्राय मागविणेत आला होता. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचा दि.१६-०७-२००८ रोजीचा लेखी कायदेशीर अभिप्राय खालीलप्रमाणे दिलेला होता.

The Honडble Member has disposed off both the revision petitions referred herein above by its Judgment and order dated ३.०७.२००८ directing us to pay Rs.७०, ०००/-in stead of reinstatement of Shri Mhaske Tarachand as compensation. The Honङ ble Industrial Court has refused other reliefs as prayed for by shri Mhaske. According to me, the order so passed by Industrial Court seems to be reasonable because original complaint of Shri Mhaske is of १९९४ and between a period about १४ years has been elapsed and I feel the order so passed by Industrial Court should be implemented accordingly. I am also of the opinion that Shri Mhaske may file a Writ Petition challenging the legality of this order and therefore, it is advisable to file the caveat petition in the Honङ ble High Court bench at Aurangabad.

मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांचे दि.०३-०७-२००८ रोजीचे आदेशास अनुसरून व संस्थान कामगार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील, ॲडव्होकेट अहमदनगर यांचे दि.१६-०७-२००८ रोजीचे कायदेशीर अभिप्रायास अनुसरून सदर मॅटर कालमर्यादेचे असल्यामुळे श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांना नुकसान भरपाई पोटी रूपये ७०, ०००/-(अक्षरी रूपये सत्तर हजार) मात्र स्टेट बँक ऑफ इंडिया शिरडी शाखेचा डिमांड ड्राफ्ट क्र. ०५२५६८ दि.२४-०७-२००८ इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/११०४५/२००८ दि.२८-०७-२००८ रोजीचे पत्रासोबत रजिस्टर पोस्ट एडीद्वारे पाठविणेत येऊन, सदर रक्कम श्री.म्हस्के यांना अदा करणेत आलेली आहे. त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६-०९-२००८ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.७०१ अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली आहे. श्री.म्हस्के यांनी नुकसान भरपाईची संस्थानने अदा केलेली रक्कम रूपये ७०, ०००/- under protest स्वीकारली असून, तसे दि.०८-०८-२००८ रोजीचे पत्रान्वये लेखी कळविले आहे.

त्यानंतर श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांनी मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांचे रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.११/२००६ व रिव्हीजन (यु.एल.पी.)क्र.१९/२००६ मधील दि.०३-०७-२००८ रोजीचे आदेशा संदर्भात श्री.म्हस्के यांनी संस्थान विरूध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.५६२०/२००८ दाखल केलेले आहे.सदर रिट पिटीशन संदर्भात मा.सिंगल जज्ज, उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.१५-०१-२०१० रोजी आदेश करून, रिट पिटीशन क्र.५६२०/२००८ ॲडमिट करून, मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांचे दि.०३-०७-२००८ रोजीचे आदेशास स्थगिती (स्टे) दिला होता.

मा.सिंगल जज्ज, उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचे रिट पिटीशन क्र.५६२०/२००८ मधील दि.१५-०१-२०१० रोजीचे आदेशासंदर्भात संस्थानने श्री.ताराचंद म्हस्के यांचे विरूध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथील डिव्हीजनल बेंन्च समोर लेटर्स पेटंन्ट अपिल क्र.५९/२०१० दाखल केली आहे. त्यामध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.०५-०३-२०१० रोजी आदेश करून, मा.सिंगल जज्ज यांचे दि.१५-०१-२०१० रोजीचे आदेशास अंतरिम स्थगिती दिलेली आहे.

सध्या मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांनी संस्थान विरूध्द दाखल केलेले रिट पिटीशन क्र.५६२०/२००८ व संस्थानने श्री.म्हस्के यांचे विरूध्द दाखल केलेले लेटर्स पेटंन्ट अपिल क्र.५९/२०१० प्रलंबीत असून, न्यायप्रविष्ठ आहे.

असे असतांनाही श्री.ताराचंद म्हस्के यांनी मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांच्या आदेशाची अंमलबजावणी होणेबाबत दि.१६-०४-२०१० रोजीचा अर्ज सादर केला असून, त्यात त्यांनी " श्री साईबाबा संस्थानात जनसंपर्क अधिकारी या पदावर कार्यरत असतांना मला दि.२०-०४-११९४ रोजी कमी केले. या संबंधीचा विवाद मी मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांचे कोर्टात नेला. (तक्रार क्र.यु.एल.पी.४१/१९९४) या संदर्भात मा.वरील कोर्टाने दि.०५ जानेवारी २००६ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाल्यास मी सर्व विवाद संपुष्टात आणण्यास तयार आहे. तरी आवश्यक ते सहकार्य करावे ही विनंती." असे म्हटलेले आहे.

श्री.ताराचंद म्हस्के यांनी ते कोणत्या मुद्यावर तडजोड करणेस तयार आहेत व त्यांना संस्थान कडून किती रक्कम मिळणे अपेक्षीत आहे, तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे संस्थान विरूध्द दाखल केलेले रिट पिटीशन क्र.५६२०/२००८ ते काढून घेणेस तयार आहेत किंवा कसे? याबाबत त्यांनी सविस्तर व स्पष्ट प्रस्ताव सादर केलेला नाही.

श्री.म्हस्के यांचे न्यायालयीन प्रकरणा संदर्भात यापूर्वी संस्थान कामगार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील, ॲडव्होकेट, अहमदनगर यांचा जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१२९४६/२००७ दि.१६-०८-२००७ रोजीचे पत्रान्वये लेखी कायदेशीर अभिप्राय मागविणेत आला होता. त्याप्रमाणे श्री.अशोकराव पाटील, ॲडव्होकेट, अहमदनगर यांनी त्यांचा दि.२०-०८-२००७ रोजीचा लेखी अभिप्राय दिला होता. त्याची प्रत सोबत अवलोकनार्थ सादर केली असून, सदर लेखी अभिप्रायाचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

१. According to me sansthan is at liberty to take decision by taking in to Consideration his two spells i.e.

a. २०.०४.१९९४ to June १९९६.
b. December २००२ to August २००३
c. Other benefits of the post.

} because revisions are pending.

२. I can not express any opinion of the disputed period until revisions filed by both parties before industrial court are finally disposed off. Further he has not worked from ०१.०९.२००३ till date. therefore, I cannot express my opinion about his entitlement unless it is determined by Court.

उपरोक्त कायदेशीर अभिप्रायास अनुसरून श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांचे कायदेशीर देणे देणबाबत प्रस्ताव यापूर्वी तयार करून तो मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०-०१-२००८ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता. त्यावर चर्चा होऊन निर्णय क्र.९१ अन्वये सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमिती सभेत निर्णय घेणेत यावा असे ठरले होते.

श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांचे संदर्भात मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.११/२००६ व रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.१९/२००६ या कोर्ट केसेमध्ये मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी दि.०३-०७-२००८ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरून, श्री.म्हस्के यांना मागील काळातील पूर्ण वेतन/बॅकवेजस न देता, नुकसान भरपाईपोटी फक्त रूपये ७०,०००/-(अक्षरी रूपये सत्तर हजार) मात्र रक्कम दि.२४-०७-२००८ रोजीचे डिमांड ड्राफ्ट क्र.०५२५६८ अन्वये अदा केलेली आहे व सध्या उपरोक्तप्रमाणे रिट पिटीशन क्र.५६२०/२००८ व लेटर्स पेटंन्ट अपिल क्र.५९/२०१० या दोन कोर्ट केसेस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे प्रलंबीत असून, न्यायप्रविष्ठ आहे.

सबब (अ) श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांना त्यांचे दि.१६-०४-२०१० रोजीचे विनंती अर्जाप्रमाणे मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी तक्रार (यु.एल.पी.) क्र.४१/९४ संदर्भातील दि.०५ जानेवारी-२००६ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावयाची झाल्यास श्री.म्हस्के यांना पुन्हा जनसंपर्क अधिकारी या पदावर पुर्वलक्षी प्रभावाने सलग सेवा धरून, नेमणूक देऊन कामावर रुजू करुन घ्यावयाचे किंवा कसे? तसेच श्री.म्हस्के यांना सेवासमाप्तीचे तारखेपासून म्हणजे दि.२०-०४-१९९४ पासून ते माहे जुलै-२००७ अखेरपर्यंत या कालावधीतील जनसंपर्क अधिकारी या पदासाठीचे मागील वेतन/बॅक वेजेस ची रक्कम (माहे जुलै-१९९६ ते माहे नोव्हेंबर-२००२ हा कालावधी वगळुन) अंदाजे रूपये ८, ३२, ९, ४९/- (अक्षरी रूपये आठ लाख बत्तीस हजार नऊशे एकोणपन्नास मात्र) अधिक माहे ऑगस्ट-२००७ ते माहे मार्च-२०१० या कालावधीतील वेतनाची रक्कम व इतर अनुज्ञेय भत्ते, ग्रॅच्युईटी, पी.एफ. इत्यादी अन्य लाभ दयावयाचे किंवा कसे? अथवा

**(ब)** संस्थान कामगार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील, ॲडव्होकेट, अहमदनगर यांनी यापूर्वी दि.२०-०८-२००७ रोजी दिलेल्या लेखी कायदेशीर अभिप्रायास अनुसरुन श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांना i] दि.२०-०४-१९९४ पासून ते दि.३०-०६-१९९६ अखेर २७ महिने व ii] माहे-डिसेंबर-२००२ ते माहे-ऑगस्ट-२००३ अखेर ९ महिने अशा एकुण-३ वर्षे कालावधीतील बॅकवेजेस/मागील काळातील

वेतन रक्कम अंदाजे रुपये २, १०, ८१७/-(अक्षरी रुपये दोन लाख दहा हजार आठशे सतरा) मात्र व इतर अनुज्ञेय भत्ते, ग्रॅज्युईटी, शैक्षणिक फी-परतावा, पी.एफ., सानुग्रह अनुदान, शिल्लक हक्काचे रजेचे वेतन इत्यादि अन्य आर्थिक फायदे/लाभ दयावयाचे किंवा कसे? याबाबत चर्चा होऊन, निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, ताराचंद विठ्ठलरात म्हस्के, लिपीक, प्रकाशने विभाग यांचे मा.कामगार न्यायालय,अहमदनगर यांच्या आदेशाची अंमलबजावणी होणेसंदर्भातील अर्जाबाबत व न्यायालयीन प्रकारणांबाबत संस्थान कायदेसल्लागार श्री आर.एन.धोर्डे, हायकोर्ट ॲडव्होकेट, औरंगाबाद यांचा लेखी कायदेशिर अभिप्राय घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४. श्री साईसच्चरित्र पारायण सोहळा आयोजित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हयात असताना शके १८३३ साली प्रथम रामनवमी साजरी करण्यात आली व त्यापासून आजपर्यत प्रतीवर्षी चालु वर्षी चैत्र शु.९ शके १९३२ म्हणजेच दिनांक २४/०३/२०१० रोजी १०० वा रामनवमी उत्सव संस्थानतर्फे साजरा करण्यात आला. त्यानसार शके १९३२ हे रामनवमीचे शताब्दीवर्ष आहे.

उपरोक्त बाब विचारात घेता मा. अध्यक्ष महोदय यांनी खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत. शदाब्दी वर्षानिमीत्ताने यावर्षी श्रावण महिन्यात होणारे साई सच्चरित पारायण सोहळा संस्थानतर्फे मोठया प्रमाणात साजरा करावा. श्री साईसच्चरीत ग्रंथात एकूणे ९३३४ ओव्या आहेत. ही संख्या विचारात घेता यावेळी पारायणासाठी ९३३४ वाचक असावेत अशी संकल्पना आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

समितीची कर्तव्ये व अधिकार- १७.(१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

१७. (२) ठ - श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

त्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) नाट्य रसिक संच, शिर्डी यांचे मदतीने गेल्या १४ वर्षापासून दरवर्षी सामुदायीक श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित केला जातो. यात सुमारे २,००० साईभक्त सहभाग घेत असतात. दर वर्षी पारायण सोहळा खालील प्रमाणे आयोजीत केला जातो.

(०१) दररोज सकाळी ७.०० ते ११.०० - साई सच्चरिताचे पारायण,
(०२) दररोज दुपारी ४.०० ते ५.०० - प्रवचन ,
(०३) दररोज रात्रौ ७.३० ते ९.३० - निमंत्रीतांचे कीर्तन/व्याख्यान/इतर करमणुकीचे कार्यक्रम.
(०४) आठव्या दिवशी साईचरित्र ग्रंथाची गांवातुन शोभा यात्रा ,
(०५) नवव्या दिवशी कालाकीर्तन व महाप्रसाद भंडारा.

या वर्षी श्रावण शुध्द २ ते श्रावण शुध्द १० शके १९३२, म्हणजे वार बुधवार, दि.११/०८/२०१० ते वार गुरुवार , दि.१९/०८/२०१० अखेर साजरा करणे करीता खालील प्रमाणे कामे करावी लागतील. तसेच त्यासाठी खालील प्रमाणे अंदाजे खर्च लागेल त्यास मान्यता असावी.

| **अ.नं.** | **तपशील** | **मागील वर्षाचे बजेट** | **प्रत्यक्ष खर्च** | **चालू वर्षाचे कार्यक्रमासाठी अंदाजे खर्च** |
|---|---|---|---|---|
| ०१. | मंडप व्यवस्था खर्च | १,२५,०००.०० | १,३६,०००.०० | १०,००,०००.०० |
| ०२. | बोर्डस्, बॅनर्स व निमंत्रण पत्रिका इ. खर्च | ५०,०००.०० | २४,५८४.०० | ७५,०००.०० |
| ०३. | प्रवचनकार /कीर्तनकार इ. चे मानधन, प्रवासभाडे इ.खर्च | १,५०,०००.०० | ९०,०५१.०० | ७,००,०००.०० |
| ०४. | मिरवणुक, बँड, सत्कार - बक्षिसे इ. खर्च | ५०,०००.०० | ००.०० | १,००,०००.०० |
| ०५. | इतर किरकोळ खर्च | ७५,०००.०० | २०,१८४.०० | १,००,०००.०० |
| ०६. | चहा,नाष्टा,फराळ व शेवटच्या दिवशी भंडारा इ.चा | २,००,०००.०० | १,८६,८९५.०० | ५,००,०००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | खर्च | | | |
| ०७. | जादा कंत्राटी कर्मचारी खर्च | ००.०० | ०४,५११.०० | १,००,०००.०० |
| | **एकूण खर्च-** | **६,५०,०००.००** | **४,६२,२२५.००** | **२५,७५,०००.००** |

पारायणार्थींना संस्थान तर्फे शॉल, श्रीफळ, उदीप्रसाद देणे बाबत विचार होणेस विनंती.

या वर्षी १०,००० वाचक बसविण्याचा संकल्प असल्याने या कार्यक्रमासाठी आदमासे ५ एकर जागेची आवश्यकता लागेल. सदर पारायण सोहळा साईनगर परिसराशेजारी श्री लोढा यांचे संस्थानने घेतलेल्या जागेत करता येईल.

यात पारायणात भाग घेणा-यांची नांव नोंदणी करावी लागेल, प्रवचनकार, कीर्तनकार यांचेशी फोनवरुन संपर्क साधुन त्यांची तारीख, वार, बिदागी, प्रवास खर्च इ. निश्चीत करावा लागेल. प्रवचनकार, कीर्तनकार निश्चित झालेवर त्यांना पत्र पाठविणे, त्यानुसार निमंत्रण पत्रिका तयार करणे, छपाई करुन घेणे, इ. कामे करावी लागतील.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी उपरोक्त दर्शविलेप्रमाणे अंदाजे खर्चास मंजूरी मिळणेस विनंती.

तरी उपरोक्तप्रमाणे पारायण सोहळा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजीत रु.२५,७५,०००/- (अक्षरी रु. पंचविस लाख पंचाहत्तर हजार मात्र) चे व त्याअनुषंगाने येणा-या इतर खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.४३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईसच्चरित्र पारायण सोहळा आयोजित करणेस याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २५,७५,०००/- चे व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५. रेल्वे तिकीट बुकींग काऊंटरचे मासिक भाड्याबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे मंदीर परिसरात फेब्रुवारी -२००० पासून भक्तांचे सोयीसाठी रेल्वे आरक्षण कक्ष सुरु करणेत आलेले आहे. त्यासाठी सर्व्हे नं. २/५ मधील १४५.५६ स्क्वेअर फुट जागा रेल्वे खात्यास संगणकिय आरक्षण कक्षासाठी वापरांस दिलेली आहे. रेल्वे खाते संस्थानला रेंन्ट ( भाडे ) अदा करीत नाही. करीता रेल्वे खात्याशी प्रारंभीपासून पत्रव्यवहार चालु आहे. सन- २००४ पासुन संस्थानसाठी नविन अधिनियम लागु झाला आहे. यातील तरतुदीनसुार शासनाचे पुर्व परवानगी शिवाय एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी जागा भाडेपट्टयाने देता येत नाही. जागेचे भाडे संदर्भात ॲड.श्री एस.डी.कुलकर्णी,कोपरगांव यांचेमार्फत दि. ०७/०८/२००९ रोजी रजिस्टर पोस्टाने रेल्वे खात्यांस नोटीस पाठविण्यात आली असून सदर जागेचे मासिक रेंन्ट (भाडे ) रक्कम रुपये -५,०००/- (अक्षरी रुपये- पांच हजार ) मिळावे, अन्यथा रेल्वे खाते विरुध्द कायदेशिर कारवाई करणेत येईल, असे त्यांना सदर नोटीसमध्ये कळविणेत आले आहे.

त्यानंतर प्रस्तुत विषयी दि. २१/११/२००९ रोजी डॉ.श्री एस.व्ही. देऊलकर, डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर, कमर्शियल ब्रॅच, भुसावळ हे शिरडी येथे येऊन त्यांनी मा.कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा केली. चर्चेमध्ये पी.डब्ल्यु.डी. खात्यांचे रेंन्ट (भाडे ) विचारात घेऊन त्याप्रमाणे भाडे अदा करणेबाबत कार्यवाही करणेत येईल, असे त्यांनी सांगितले असून सदर मिटींगचा कार्यवृत्तांत त्यांनी दि. २१/११/२००९ रोजीचे पत्राने पाठविला आहे. रेंट आदा करणेबाबतचा प्रस्ताव ( fresh ) रेल्वे खात्याकडून संस्थानकडे पाठविणेत येईल व मासिक परवाना फी बाबतचे मुद्यावर मा. व्यवस्थापन समिती निर्णय घेईल, अशा अर्थाची चर्चा झाली असल्याबाबत मिटींग वृत्तांतात नमुद आहे.

दरम्यान मा.व्यवस्थापन समिती सभा दि. १०/०१/२०१० रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं. ८९, निर्णय क्रं. १९२ अन्वये संस्थान परिसरातील रेल्वे रिझेंवेशन कांऊटर जुने प्रसादालय परिसरांत हलविणेचे ठरले असून तसे जा.नं.एसएसएस/वशी-०२/५६५०/१० दि.०६/०४/२०१० रोजीचे पत्राने रेल्वे खात्यास कळविले आहे.

त्यापुढे डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर, डिव्हीजनल ऑफीस भुसावळ यांनी दि.१५/०२/२०१० रोजीचे पत्राने संगणीकृत रेल्वे कांऊटर सन २००० पासून शिरडी संस्थानमध्ये भक्तांना सोयी - सुविधा पुरविणे करीता सुरु केले आहे. संस्थानचे पाठपुराव्यास अनुसरुन सदर उपक्रम सुरु करणेत आला आहे. त्याचप्रमाणे श्री साईबाबांच्या दर्शनाला साईभक्त येतात. त्यांची रेल्वे रिझर्वेशनसाठी सुविधा पुरविणेसाठी सदर सुविधा सुरु केली आहे. सदर सुविधेसाठी जागेची व्यवस्था संस्थान विना मोबदला रेल्वे डिपार्टमेंटसाठी केली आहे. त्यानंतर जागेचे भाडेबाबत मागणी संस्थानने केली आहे, असे सदर पत्रात नमुद केले आहे.

सदर विषयावर सेंट्रल रेल्वे जी.एम.श्री बी.बी.मोडगिल यांचे सोबत संस्थानचे मा.विश्वस्त, श्री अशोकराव खांबेकर यांची दि. २५/११/२००९ रोजी चर्चा झाली आहे. सदर चर्चेत मा.विश्वस्त श्री खांबेकर यांनी रेल्वे डिपार्टमेंटला सदर सुविधासाठीची जागा विना मोबदला पुरविणेबाबत सकारात्मक विचार केला जाईल, असे सुचित केले आहे, असे नमुद करुन रेल्वे काऊंटरसाठी दिलेल्या जागेचा सध्याचा वापर विना मोबदला चालू ठेवणेस संस्थानला विनंती केलेली आहे.

तरी रेल्वे खात्याचे विनंतीस अनुसरुन जागेचा वापर भक्तांचे सोयीसाठी होत आहे. याचा विचार होऊन :-

**अ)** रेल्वे खात्यास संस्थान परिसरात वापरांस दिलेल्या जागेच्या वापराबाबत मासिक रेंट (भाडे) न आकारणेबाबत.

**किंवा-**

**ब)** रेल्वे खात्याकडून सदरची जागा दिल्यापासून ( फेब्रुवारी-२००० ) नाममात्र मासिक रेंट (भाडे ) रु. ५००/- ते रु. १,०००/- इतकी रक्कम आकारणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरात असलेल्या रेल्वे तिकीट बुकींग काऊंटर प्रसादालय परिसरात हलविण्यात यावे. तसेच सदर रेल्वे तिकीट बुकींग काऊंटरचे मासिक भाडे आकारणेबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा.विश्वस्त सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांना प्रदान करण्यात आले.** (कार्यवाही-विधी अधिकारी )

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६.** **शिर्डी नगरपंचायत शिर्डी विशेष स्वच्छता व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर (पथकर) बाबत.**

**प्रस्ताव-** शिरडी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी देशातून व परदेशातून दररोज हजारो साईभक्त येतात. संस्थानतर्फे साईभक्तांना आवश्यकतेप्रमाणे सेवा सुविधा देण्यात येतात. तसेच शिरडी नगरपंचायतीमार्फत देखिल आवश्यक उपाय योजना राबविल्या जातात. शिरडी नगरपंचायतीकडून दि.०१/०४/१९९२ पासून वाहन कर ( विशेष स्वच्छता व आरोग्य प्रदुषण कर ) आकारला जात होता. मात्र या कर आकारणीमुळे भक्तांच्या भावना दुखावतात व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांचेकडूनच सदरचे कराची आकारणी होते, असा साईभक्तांचा गैरसमज निर्माण होतो, असे दिसून आले.

नगरपंचायतीने असा कर आकारणी करु नये, यासाठी श्री साईबाबा संस्थानने इकडील जा.नं. एसएसएस/वशी-०२/१३२१०/२००४ दि. ३१/१२/२००४ चे पत्राने शिरडी नगरपंचायतीस लेखी कळविले होते. याबाबत नगरपंचायतीने दि. ११/०५/२००५ चे पत्राने टोल नाक्यापासून प्रतिवर्ष मिळणाऱ्या रक्कमे एवढी रक्कम त्यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत मिळावी. सन २००४-०५ साली रुपये-४५,६१,९९०/- एवढी रक्कम त्यांना प्रतिवर्षी मिळावी व प्रतिवर्षी त्यात २०% वाढ करण्यात यावी, असे संस्थानला कळविण्यात आले होते.

नगरपंचायतीचे उपरोक्त पत्राबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत सविस्तर चर्चा होऊन शिरडी नगरपंचायत शिरडीस यांना द्यावयाच्या अनुदानाबाबत तत्वःता मान्यता देण्यात आली. शिरडी नगरपंचायत शिरडी यांना द्यावयाच्या रक्कमेबाबत मा.जिल्हाधिकारी,अ.नगर व स्थानिक विश्वस्त यांचे समंतीने निर्णय घ्यावयाचे ठरले. त्यानंतर दि.०१/१०/२००५ रोजीचे सल्लागार परिषद सभेमध्ये भक्तांकडुन शिरडी नगरपंचायत शिरडी यांना स्वच्छता व आरोग्य (प्रदुषण ) नियंत्रण कर आकारु नये, यासाठी शिरडी नगरपंचायतीने मागणी केलेली रक्कम प्रतिवर्षी रुपये- ४०,००,०००/- ( अक्षरी रुपये-चाळीस लाख ) मात्र म्हणजेच प्रति ३ महिन्यास रुपये- १०,००,०००/- ( अक्षरी रु.- दहा लाख) आगाऊ देण्यात यावे,असे मा.जिल्हाधिकारी, अ.नगर यांनी सांगितले व सर्वानुमते त्यांस मान्यता देण्यात आली.

त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/११/२००५ च्या सभेत विषय नं.०२, निर्णय क्रं.६५१ (६) उपरोक्त प्रमाणे रक्कम अदाईसाठी मान्यता देणेत आली. तसेच याकामी शासनाची परवानगी घ्यावी, असे ठरले.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता शिरडी नगरपंचायत शिरडी यांनी भक्तांकडुन स्वच्छता व आरोग्य (प्रदुषण ) कर आकारु नये.भक्तांच्या सोईसाठी अनुदान रक्कम रु.- ४०,००,०००/- (अक्षरी रु.-चाळीस लाख ) मात्र शिरडी नगरपंचायत शिरडी यांना प्रतिवर्षी देण्यास मान्यता मिळणेकामी संस्थानने जा.नं.एसएसएस/वशी-०२/१३०५४/०५ दि.०९/११/२००५ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्रस्ताव सादर केलेला आहे. दरम्यानच्या काळात संस्थानने नगरपंचायत शिरडी यांना मा.व्यवस्थापन मंडळाच्या ठरावास अनुसरुन शासन मान्यतेस अधिन राहुन खालील प्रमाणे रक्कम अदा केलेली आहे.

**नोव्हेंबर-२००५ ते मार्च-२००९ अखेर शिरडी नगरपंचायत यांना अदा करण्यात आलेली रक्कम-**

| अ.नं. | शिरडी नगरपंचायत यांचे कडील मागणी दिनांक / महिना | शिरडी नगरपंचायत यांना अदा केलेली रक्कम | मा.व्यवस्थापन मंडळाचा ठराव क्रं. निर्णय क्रं. | शिरडी नगरपंचायत यांना अदा केलेली रक्कम पा.क्र. |
|---|---|---|---|---|
| ०१ | नोव्हेंबर-/डिसेंबर -०५ ते जानेवारी -२००६ | रु.१०,००,०००/- | दि.०४/०२/२००६ आ.वे.वि.नं.२३, निर्णय क्रं.९८ | पा.न.५०३०३ दि.१३/०३/२००६. |
| ०२ | फेब्रुवारी /मार्च / एप्रिल-२००६ | रु.१०,००,०००/- | दि.०३/०६/२००६ आ.वे.वि.नं.३३,निर्णय क्रं.४०८ | पा.न.५१७४६ दि.२७/०६/२००६. |
| ०३ | मे-२००६ ते जुलै-२००६ | रु.१०,००,०००/- | दि.१४/१०/२००६,आ.वे.वि. नं.४४,निर्णय क्रं.८२७ | पा.न.५३२२९ दि.१९/१०/२००६. |
| ०४ | ऑगष्ट-२००६ ते ऑक्टोबर-२००६. | रु.१०,००,०००/- | दि.०६/०१/२००७ आ.वे.वि.नं.३८,निर्णय क्रं.१०६ | पा.न.५४६६४ दि.२६/०१/२००७. |
| ०५ | नोव्हेंबर/ डिसेंबर-०६, ते जानेवारी-२००७ | रु.१०,००,०००/- | दि.०६/०१/२००७ आ.वे.वि.नं.३८,निर्णय क्रं.१०६ | पा.न.५४६७९ दि.१३/०३/२००७. |
| ०६ | फेब्रुवारी-२००७ ते डिसेंबर-२००७ | रु.३६,६६,६६६/- | दि.१०/०१/२००८ आ.वे.वि.नं.२२,निर्णय क्रं.१३३ | पा.न.५६७०७ दि.०१/०२/२००८. |
| **डिसेंबर -२००७ अखेर रक्कम** | | **८६,६६,६६६/-** | | |
| ०७ | जानेवारी-२००८ ते जून-२००८ | रु.२०,००,०००/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.१९, निर्णय क्रं.६२४ | पा.न. २६७६ दि.१६/०७/२००८. |
| **जुन-२००८ अखेर रक्कम** | | **१,०६,६६,६६६/-** | | |
| ०८ | जून -२००८ अखेर १०% वाढ | रु.९,५९,९९९/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५,निर्णय क्रं.५९३ | पा.न.६३४४० दि. १८/०८/२००८. |
| ०९ | जुलै-२००८ ते ऑगष्ट-२००८ | रु.८,०६,६६६/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५, निर्णय क्रं.५९२ | पा.न.४६२२५१ दि.१८/१०/२००८. |
| १० | सप्टेबर-२००८ ते डिसेंबर-२००८ | रु.१६,१३,३३२/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५, निर्णय क्रं.५९२ | पा.न.६५५१० दि. १८/०२/२००९. |
| ११ | जाने.२००९ ते मार्च -२००९ | रु.१२,०९,९९९/- | दि.०७/०७/२००८ आ.वे.वि.नं.३५, निर्णय क्रं.५९२ | पा.नं.६६८८९ दि.०४/०५/२००९ |
| | **एकुण रक्कम रुपये-** | **रु.१,५२,५६,६६२/--** | | |

शिरडी नगरपंचायत शिरडी यांनी जा.क्रं.नपं/साप्र/कावि-०१/५०/२००९ दि.०४/०७/२००९ रोजीच्या पत्राने (माहे एप्रिल -२००९ ते मार्च-२०१० या वर्षाकरीता रक्कम रुपये-५३,२४,०००/- या रक्कमेनुसार ) प्रति माह रुपये- ४,४३,६६६/- प्रमाणे माहे एप्रिल-२००९, मे , जून-२००९ ची ( ३ महिन्याची ) एकुण रक्कम रुपये- १३,३०,९९८/- ( अक्षरी रुपये- तेरा लाख, तीस हजार, नऊश आठ्ठयान्नो ) मात्र इतकी रक्कम मिळणेस विनंती केली होती. पंरतू शासन मान्यता त्यावेळी प्राप्त नव्हत. करीता शिरडी नगरपंचायतीस रक्कम अदाई करणेत आलेली नाही.

महाराष्ट्र शासन यांनी त्यांचे क्रमांक /सांसवि-२००५/६६२/(१३३)-का-सोळा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई -३२, दि.११/०८/२००९ रोजीच्या पत्राने शिरडी नगरपंचायतीस विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कराची भरपाई करणेबाबत शिरडी नगरपंचायत व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी यांच्यात लेखी करार करण्यात यावा व तसे शासनास अवगत करण्यात यावे. जेणेकरुन शासनास पुढील कार्यवाही करणे सोपे जाईल, असे कळविले आहे व त्याप्रमाणे दि.२३/०१/२०१० रोजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी व शिरडी नगरपंचायत यांच्यात विशेष स्वच्छता आरोग्य प्रदुषण नियंत्रण कराबाबत समजुतीचा ( MOU मेमोरंडम ऑफ अंडरस्टँडींग) चा करारनामा करण्यात आलेला आहे व शासनाकडे माहितीसाठी व शिरडी नगरपंचायतीस रक्कम अदाईचे मान्यतेसाठी जा.नं.एसएसएस/वशी-०२/१७०७/१० दि.२४/०१/२०१० रोजीचे पत्राने पाठविली असून दि.१३/०४/२०१० रोजी शासनाकडून शिरडी नगरंपचायतीस रक्कम अदाई करणेस मान्यता मिळालेली आहे.

आता शिरडी नगरपंचायत शिरडी यांनी जा.क्रं.न.पं./सा.प्र./कावि-०१/२०९/२०१० दि.०९/०३/२०१० रोजीच्या पत्राने सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात म्हणजेच माहे एप्रिल-२००९ ते पासून मार्च-२०१० पर्यत विशेष स्वच्छता आरोग्य रक्षण कर मिळणेस विनंती केली आहे.

माहे एप्रिल -२००९ पासून थकीत प्रती माह रुपये- ४,४३,६६६/- प्रमाणे एप्रिल -२००९ ते मार्च-२०१० अखेर १२ महिन्याची ( प्रति माह रुपये- ४,४३,६६६/- X १२ महिने = एकुण रक्कम रुपये- ५३,२३,९९२/-(अक्षरी रुपये- त्र्येपन्न लाख, तेविस हजार, नऊशे ब्यान्नो ) मात्र रक्कम करापोटी मिळणेस विनंती केली आहे.

शिरडी नगरपंचायत शिरडी यांना मार्च-२००९ अखेर कालावधीपर्यंत स्वच्छता व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर अदा केला आहे. प्रति माह रुपये- ४,४३,६६६/- प्रमाणे माहे एप्रिल-२००९ ते मार्च -२०१० अखेर १२ महिन्याची ( प्रति माह रुपये- ४,४३,६६६/- x १२ महिने = अशी एकुण रक्कम रुपये-५३,२३,९९२/- अक्षरी रुपये- त्र्येपन्न लाख, तेविस हजार, नऊशे ब्यान्नो मात्र ) इतकी रक्कम मागणी केली आहे. मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७/०७/२००८ रोजीचे निर्णयानुसार मागील वर्षी शिरडी नगरपंचायत शिरडीस अदाई केलेल्या रक्कमेवर १०% वाढ करुन रक्कम देण्यात यावी, असे ठरले आहे. शिरडी नगरपंचायतीस सन २००८-२००९ सालासाठी प्रति माह रुपये-४,०३,३३३/-प्रमाणे ( माहे एप्रिल-२००८ ते मार्च-२००९ अखेर १२ महिन्याचे रक्कम रुपये -४८,४०,०००/- ( अक्षरी रुपये- आठ्ठेचाळीस लाख, चाळीस हजार ) इतकी रक्कम अदा केलेली आहेत. त्यामध्ये सन २००९-२०१० ( एप्रिल-२००९ ते मार्च-२०१० ) या रक्कमेमध्ये १०% वाढ करुन प्रति माह रुपये- ४,४३,६६६/- x १२ महिने प्रमाणे रक्कम मागणीची रक्कम बरोबर असून शिरडी नगरपंचायत यांना एप्रिल-२००९ ते मार्च-२०१० अखेर १२ महिन्याचे प्रति माह रक्कम रुपये- ४,४३,६६६/- प्रमाणे रक्कम रुपये- ५३,२३,९९२/-( अक्षरी रुपये- त्र्येपन्न लाख, तेविस हजार, नऊशे ब्यान्नो ) मात्र इतकी रक्कम अदा करणेत येत आहे.

**निर्णय क्र.४४० उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७. नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीमधील गाळे लिलावाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. १५/११/२००८ चे ठरावास अनुसरुन संस्थानचे नविन भक्त निवासस्थान इमारती मधील १७ गाळयांचा लिलाव प्रति गाळयास १,००,०००/- (अक्षरी रुपये- एक लाख ) मात्र इतके डिपॉझीट रक्कम आकारुन लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर दि १९/०३/२००९ रोजी करण्यात आला. त्यामध्ये खालील प्रमाणे गाळे लिलावधारकांस लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर दि.०१/०४/२००९ ते दि.२८/०२/२०१० अखेर ११ महिन्याच्या कालावधीसाठी मंजूर झालेले आहे.

**प्रत्येक गाळयासाठी डिपॉझिट रक्कम रुपये- १,००,०००/- (अक्षरी रुपये-एक लाख मात्र )**

| अ.क्र. | लिलाव धारकाचे नांव | लिलावाची अंतीम बोली | गाळ्याचा तपशील |
|---|---|---|---|
| ०१ | श्री साई संस्थान एम्लॉईज को.ऑप.सोसा. | १२,१००/- | गाळा नं.०१ अे-विंग- बाहेरील बाजु-जनरल स्टोअर्स |
| ०२ | श्री साई संस्थान एम्लॉईज को.ऑप.सोसा. | ९,२५०/- | गाळा नं.०२ अे-विंग- बाहेरील बाजु- आईस्क्रिम पार्लर |
| ०३ | कर्मचारी संघटना- रोजेंद्र जगताप. | ८,६००/- | गाळा नं.०३ अे-विंग- बाहेरील बाजु- टेलिफोन बुथ |
| ०४ | श्री साई संस्थान एम्लॉईज को.ऑप.सोसा. | ६,७००/- | गाळा नं.०४ अे-विंग- बाहेरील बाजु- फोटो स्टॉल |
| ०५ | श्री श्रीकांत शांताराम जगताप | १०,३००/- | गाळा नं.०५ अे-विंग- बाहेरील बाजु- फोटो दुकान |
| ०६ | श्री साई संस्थान एम्लॉईज को.ऑप.सोसा. | १०,२००/- | गाळा नं.०६ अे-विंग- बाहेरील बाजु-जनरल स्टोअर्स |
| ०७ | श्री साई संस्थान एम्लॉईज क्रे.को.ऑप.सोसा. | ११,०००/- | गाळा नं.०७ अे -विंग- बाहेरील बाजु-जनरल स्टोअर्स |
| ०८ | श्री संत सद्‌गुरु हरीहर महाराज, अ.नगर | ११,१००/- | गाळा नं.१० अे-विंग- बाहेरील बाजु- स्वयं रोजगार |
| ०९ | श्री बाबासाहेब जगधने. | ४,६००/- | गाळा नं.१८ अे-विंग- बाहेरील बाजु- लॉन्ड्री |
| १० | सौ. रत्ना नंदू कोळपकर | ४१,०००/- | गाळा नं.०१ अे-विंग- आतिल बाजु आईस्क्रिम पार्लर |
| ११ | श्रीराम दुध संघ बाभळेश्वर | ४७,०००/- | गाळा नं.०१ डी -विंग- आतिल बाजु दुध व दुग्धजन्य पदार्थ |
| १२ | श्री अशोक सुर्यभान पवार | ४२,०००/- | गाळा नं.०७ डी -विंग-आतिल बाजु ड्रायफ्रुट सुकामेवा |
| १३ | प्रवरा फळे फुले भाजीपाला उत्पादक | २२,०००/- | गाळा नं.०८ डी -विंग-आतिल बाजु मिनरल वॉटर |
| १४ | कर्मचारी संघटना - राजेंद्र जगताप | २२,०००/- | गाळा नं.११डी -विंग- बाहेरील बाजु जनरल स्टोअर्स |
| १५ | श्री साई संस्थान एम्लॉईज को.ऑप.सोसा. | १२,५००/- | गाळा नं.१२ डी -विंग बाहेरील बाजु दुध व दुग्धजन्य |
| १६ | श्री किरणकुमार आर. येमुलपत्ती | ५,१००/- | गाळा नं.१३ डी -विंग बाहेरील बाजु मिनरल वॉटर |
| १७ | श्री डी. रविंद्र, | ८०,०००/- | गाळा नं.१४ व १५ डी -विंग बाहेरील बाजु उपहार गृह |

दिनांक १४/०२/२०१० रोजी दैनिक सार्वमत / लोकमत व सकाळ वर्तमान पत्रातून जाहीरात प्रसिध्द करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीचे नविन भक्तनिवास्थान इमारतीमधील उपरोक्त १७ गाळे पुढील मुदतीसाठी दि. ०१/०३/२०१० ते दि.३१/०१/२०११ अखेर पर्यंत ११ महिने कालावधीसाठी लिव्ह अन्ड लायसेन्स तत्वावर गाळे धारकांस वापरांस देणेबाबत गाळयांचा लिलाव

गुरुवार दि. १८/०२/२०१० रोजी ठेवण्यात आला. सदर लिलावामध्ये उच्चतम बोली बोलून खालील प्रमाणे १० गाळयांचा प्रत्यक्ष जाहीर लिलाव करण्यात आला.

**अ) प्रत्येक गाळयासाठी डिपॉझिट रक्कम रुपये- १,००,०००/- (अक्षरी रुपये-एक लाख मात्र )**

| अ.नं. | विंग / गाळा नंबर | दि.१९/०३/२००९ रोजीचे जाहीर लिलावाचे मासिक परवाना फी | दि.१८/०२/२०१० रोजीचे जाहीर लिलावाचे मासिक परवाना फी | लिलाव धारकांचे नांव ( दि.०१/०४/२०१० ते दि.३१/०१/२०११ अखेर ११ महिने कालावधीसाठी ) |
|---|---|---|---|---|
| ०१ | अे-बाहेरील-०१ | रु.१२,१००/- | रु.१०,१००/- | श्री नामदेव भटु पाटील, रा.शिरडी, |
| ०२ | अे-बाहेरील-०२ | रु.९,२५०/- | रु.१०,८००/- | श्री अनिल प्रभाकर बोरावके, रा.-कोपरगांव |
| ०३ | अे-बाहेरील-०३ | रु.८,६००/- | रु.१०,४००/- | श्री संतोष सोमनाथ शिंदे, रा.शिरडी, |
| ०४ | अे-बाहेरील-०४ | रु.६,७००/- | रु.१०,०००/- | श्री सर्जेराव अशोक कोते, रा.शिरडी, |
| ०५ | अे-बाहेरील-०५ | रु.१०,३००/- | रु.९,१००/- | श्री साईराम शांताराम जगताप, रा.शिरडी, |
| ०६ | अे-बाहेरील-०६ | रु.१०,२००/- | रु.५,५००/- | श्री विजय रामचंद्र गोलाणी, रा.शिरडी |
| ०७ | अे-बाहेरील-०७ | रु.११,०००/- | रु.८,००१/- | श्री नंदकुमार गणपत कोळपकर, रा.शिरडी, |
| ०८ | अे-बाहेरील-१० | रु.११,१००/- | रु.३,५००/- | श्री सुरेश लालचंद भुतडा, कोपरगांव |
| ०९,१० | डी-बाहेरील-१४,१५ | रु.८०,०००/- | रु.६५,०००/- | श्री गोरख तुकाराम गवळी, रा.शिरडी. |

त्याचप्रमाणे पुर्वीचे ७ गाळेधारक यांना मासिक भाडे परवडत आहे. त्यांना ११ महिने कालावधीसाठी वापरासं मुदतवाढ द्यावी, अशी विंनती केली. त्यांचे पुर्वीचे मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन पुर्वीचे अटी/शर्तीस अधिन राहून गाळा वापरास सहमती दर्शविली, त्यामुळे अशा खालील गाळयांचे जाहिर लिलाव करण्यात आलेला नाही. जाहिर लिलाव प्रकरणांची कार्यवाही उपस्थित मा.विश्वस्तांचे समक्ष झालेली आहे.

**ब ) प्रत्येक गाळयासाठी डिपॉझिट रक्कम रुपये- १,००,०००/- (अक्षरी रुपये-एक लाख मात्र )**

| अ.नं (०१) | विंग व गाळा नंबर (२) | मागिल लिलाव बोली प्रमाणे मासिक भाडे (०३) | १०% मासिक भाडे वाढ (०४) | एकुण गाळयाचे मासिक भाडे (०३+०४)= ०५ | लिलाव गाळा धारकांचे नांव (०६) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | अे-आतिल-०१ | रु.४१,०००/- | रु.४,१००/- | रु.४५,१००/- | सौ.रत्ना नंदु कोळपकर,शिरडी |
| ०२ | डी-आतिल-०७ | रु.४२,०००/- | रु.४,२००/- | रु.४६,२००/- | श्री अशोक सुर्यभान पवार,शिरडी |
| ०३ | डी-आतिल-०८ | रु.२२,०००/- | रु.२,२००/- | रु.२४,२००/- | प्रवरा फळे भाजीपाला उत्पा. प्रवरानगर |
| ०४ | डी-बाहेरील-१३ | रु.५,१००/- | रु.५१०/- | रु.५,६१०/- | श्री किरणकुमार आर.येमुलपत्ती |
| ०५ | डी-आतिल-०५ | रु.४७,०००/- | रु.४,७००/- | रु.५१,७००/- | श्रीरामपुर दुध संघ बाभळेश्वर, |
| ०६ | डी-बाहेरील-११ | रु.२२,०००/- | रु.२,२००/- | रु.२४,२००/- | कर्मचारी संघटना -रा.सो.जगताप, शिरडी |
| ०७ | डी-बाहेरील-१२ | रु.१२,५००/- | रु.१,२५०/- | रु.१३,७५०/- | श्री साई संस्थान एम्प्लॉईज को.ऑप. सो. |
| | एकुण मासिक भाडे | रु. १,९१,६००/- | रु.१९,१६०/- | रु. २,१०,७६०/- | |

उपरोक्त प्रमाणे **"अ"** मधील गाळाधारकांस दि.०१/०३/२०१० ते दि. ३१/०१/२०११ अखेर ११ महिने कालावधीसाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर गाळे वापरांस दिलेले आहे.

पुर्वीचे **"ब"** मधील गाळेधारक यांना दि. ०१/०३/२०१० ते दि.३१/०१/२०११ अखेर ११ महिने कालावधीसाठी यापुर्वीच्या मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर गाळे वापरांस मुदतवाढ दिलेली आहे.

**निर्णय क्र.४४१ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त "अ" मधील गाळाधारकांस दि.०१/०३/२०१० ते दि. ३१/०१/२०११ अखेर ११ महिने कालावधीसाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर गाळे वापरांस दिलेले आहे. त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**तसेच पुर्वीचे "ब" मधील गाळेधारक यांना दि. ०१/०३/२०१० ते दि.३१/०१/२०११ अखेर ११ महिने कालावधीसाठी यापुर्वीच्या मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर गाळे वापरांस मुदतवाढ दिलेली आहे त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**याचवेळेस उपरोक्त "अ" मधील लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर देण्यात आलेल्या गाळयांपैकी काही गाळेधारकांनी गाळे परवडत नाहीत त्यांचा परवाना रद्द करणेत यावा, अशा गाळयांची मासिक परवाना फी (वापर तारखेपर्यंत) संबधित गाळेधारकांच्या अनामत रकमेतून**

**वसूल करुन सदर गाळे जाहिर लिलावाने लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर ११ महिने कालावधीसाठी देण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८** **शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पाअंतर्गत व्दितीय प्राधान्य गटातील बिरेगांव रस्ता संस्थान मार्फत विकसीत करणेबाबत**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. १९/०८/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६७८ अन्वये शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पाअंतर्गत शिर्डी शहरातील प्रमुख रस्ते तिन टप्प्यात प्राधान्य क्रमाणे विकसीत करणेस मान्यता मिळाली आहे. यानुसार प्रथम प्राधान्य गटातील पाच रस्ते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे यांचे मार्फत विकसीत करणेत येत असून, उर्वरीत सहा रस्ते थेट संस्थानमार्फत विकसीत करणेबाबत कार्यवाही करणेत येत आहे.

मा. अध्यक्ष सो यांचेशी झालेल्या चर्चेनुसार व्दितीय प्राधान्य गटातील बिरेगांव रस्ता (शिर्डी ते चौफुली ते बिरोबा मंदिर रस्ता लांबी ३१०० मी.) प्रथम प्राधान्य गटातील संस्थान मार्फत विकसीत करावयाच्या सहा रस्त्यांबरोबरच थेट संस्थान मार्फत विकसीत करण्यात यावा अशी मा. अध्यक्ष सो., यांनी सूचना केलेली आहे.

व्दितीय प्राधान्य गटातील बिरेगांव रस्ता थेट संस्थानमार्फत विकसीत करणेस व याकामी सल्लागार म्हणून युनीसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि. पुणे यांची नेमणूक करणेस मान्यता विनंती.

**निर्णय क्र.४४२** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय प्राधान्य गटातील बिरेगांव रस्ता थेट संस्थानमार्फत विकसीत करणेस व याकामी सल्लागार म्हणून युनीसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि. पुणे यांची नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २९** **पोलिस भरतीचे वेळी मृत्युमुखी पडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या कुटूंबीयांना आर्थिक मदत करणेबाबत.**

**निर्णय क्र.** श्री साईबाबा संस्थाननी माहे ऑगस्ट- १९८४ मध्ये श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र स्थापन केले. निरनिराळया उद्योग धदयांना पुरेसे कारागीर पुरवणे, ग्रामीण भागातील गरजू व होतकरु तरुणांना नोकरीच्या व स्वयंरोजगारांच्या संधी प्राप्त करुन देणे या हेतून हे केंद्र सुरु करण्यात आले.

या संस्थेमध्ये प्रवेश घेणारे विद्यार्थी हे गरीब, होतकरु व अत्यंत गरजू असतात. शासन नियमाप्रमाणे सन- १९८४ ते २००७ (२४ वर्ष) वार्षिक रु.१५००/- दराने प्रति सत्र शुल्क घेऊनप्रवेश देण्यात येत असत. सन- २००८ पासून शासनाने रु.६०००/- ते रु.१२०००/- पर्यंत फी वाढ केल्यानंतर आपण ही वाढीव शुल्क लागू केली. नोकरीच्या हमीमुळे गरीब कुटूंबातील तरुण हे आर्थिक कुवत नसतानाही येण-केन प्रकारे प्रवेश घेतात. प्रसंगी आईचे दागिने, शेती गहाण ठेवून घरातील दुभती जनावरे विकुन नोकरीच्या आशेने आपल्या संस्थेत प्रवेश घेऊन प्रशिक्षण पुर्ण करण्याकडे तरुणांचा कल आहे. यातील काही विद्यार्थी अत्यंत गरजू असल्याने ते प्रशिक्षण काळात ही अन्यत्र खुल्या नोकर भरतीसाठी जाऊन संधी घेण्यासाठी प्रयत्नशिल असतात.

अशाच प्रकारे आपल्या औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचा फिटर या व्यवसायात अंतिम वर्षात प्रशिक्षण घेत असलेला प्रशिक्षणार्थी रमेश गोपीनाथ आंबरे हा दि.०८.०३.२०१० ते दि.०९.०३.२०१० अशा दोन दिवसाच्या किरकोळ रजेवर होता. दि.०८.०३.२०१० रोजी तो नोकरीमिळण्याचे उद्देशाने पोलिस भरतीसाठी मुंबईच्या कलीना येथे गेला असता त्या ठिकाणी झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये त्याचे आकस्मीत दुर्देवी निधन झाले.

सदरील प्रशिक्षणार्थ्याची आर्थिक परिस्थिती हालाकीची असल्यामुळे त्याला नोकरीची अत्यंत आवश्यकता होती. त्यामुळे प्रशिक्षण कालावधीमध्ये तो खुल्या भरतीसाठी जात असे.

त्याचे वडील अपंग असून त्याचा मोठा भाऊ हा शेत मजुर आहे. तसेच त्याला लहान भाऊ हा शिक्षण घेत आहे.

संस्थेकडून राजीव गांधी सुरक्षा योजने अंतर्गत शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विद्यार्थी विमा योजने अंतर्गत विमा रकमेसाठीची कार्यवाही चालू आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून गरजू लोकांसाठी वैद्यकिय व नैसर्गिक आपत्तीमध्ये मानवतेच्या दृष्टीने आर्थिक मदत केली जाते.

तसेच संस्थेच्या कै.रमेश आंबरे या प्रशिक्षणार्थ्यांच्या कुटूंबावर त्याच्या मृत्युने आपत्ती ओढावलेली आहे. तरी विशेष परिस्थिती लक्षात घेऊन त्याच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतीसाठी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयासाठी साद

**निर्णय क्र.४४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, कै.रमेश आंबरे यांचे कुटूंबीयांना एक विशेष बाब म्हणून रुपये १ लाख (एक लाख) आर्थिक मदत देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०३)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३० श्रीमान गोकुळचंदजी विद्यालय, कोपरगांव यांचे नियोजित इमारत बांधकामास आर्थिक मदत देणे बाबत.**

**प्रस्ताव-** आजचे सभेत मा.श्री चंद्रकात ठोळे, चेअरमन, कोपरगांव एज्यूकेशन सोसायटी, कोपरगांव हे उपस्थित होते. त्यांनी कोपरगांव शहराची शैक्षणिक गरज लक्षात घेऊन १९३४ साली श्रीमान गोकुळचंदजी विद्यालयाची स्थापना केली असून सध्या या विद्यालयाच्या प्राथमिक व माध्यमिक विभागात विविध जाती धर्माचे एकूण ३३७६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यालयाचे शैक्षणिक विकासासाठी विद्यालयासाठी अद्ययावत इमारतीचे आवश्यकता आहे या इमारतीचे बांधकामासाठी अंदाजे रुपये दोन कोटी रुपये एवढा खर्च अपेक्षित आहे. विद्यालयाचे नूतन वास्तूसाठी रुपये ३० लाख एवढी आर्थिक मदत संस्थानमार्फत मिळावी अशी विनंती केली.

**निर्णय क्र.४४४ यावर सविस्तर चर्चा होऊन श्रीमान गोकुळचंदजी विद्यालय, कोपरगांव यांना विद्यालयाचे नुतन वास्तूचे बांधकामासाठी रुपये ३० लाख आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली. याकामी छाननी समितीची मान्यता घेण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३१ मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र. ४४५ मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

(०१) संस्थानसाठी आवश्यक असणारी जमीन खरेदीकामी मा.विश्वस्त शैलश श्रीहरी कुटे यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. या समितीत मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांचा सदस्य म्हणून समावेश असेल. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

(०२) श्री विकास मेहता, नवी दिल्ली यांनी "सांई की ओर मेरा पहला कदम " हे चित्रावलीचे पूस्तक तयार केले असून सदर पुस्तकात श्री साईबाबांचे जिवनातील रेखाचित्र प्रसंग तयार करणेत आले असून सदर चित्र लहान मुलांनी रंगाने भरावेत असे आहे. सदर पुस्तकामूळे मुलांना श्री साईबाबां विषयी माहिती मिळेल. सदर पुस्तकाचे प्रकाशनाचे हक्क ते संस्थानला देत आहेत. सदर पुस्तक संस्थानमार्फत छपाई करुन प्रकाशित करण्यात यावे. सदर पुस्तकात श्री साईबाबां खेरीज इतर मजकूर असल्यास सदरचा मजकूर/माहिती वगळण्यात यावी. या पुस्तकाच्या सुरुवातीस ५,००० प्रती छपाई करुन घेण्यास व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

०३) मे.साई ग्रेस फौडेशन, मुंबई यांनी त्यांचे दिनांक १७ एप्रिल,२०१० चे पत्रासोबत सादर केलेले फोटो सभेत पसंत पडले. मे.साई ग्रेस फौंडेशन, मुंबई यांनी सदर फोटो तयार करणेकामी विशेष तंत्रज्ञान वापरुन तयार करण्यात आल्याने विशेष बाब म्हणून स्विकारण्यात यावे. तसेच त्याकामी दरपत्रके मागविण्याची अट शिथील करुन त्यांना कार्यादेश देण्यात यावा. इतर प्रेसधारकांप्रमाणे त्यांचेकडून कार्यादेशाच्या रकमेच्या ५% अनामत रक्कम घेण्यात यावी तसेच काम संपलेनंतर त्यांची अनामत रक्कम परत करावी. त्यांचेकडून खालीलप्रमाणे फोटो छपाई करुन घेण्यास व त्याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या |
|---|---|---|
| ०१ | ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ ॲक्रेलिक स्टॅन्डी आकार ३.५"X २.५ | १०,००० |
| ०२ | ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ ॲक्रेलिक स्टॅन्डी आकार ७"X ५" | ५,००० |
| ०३ | ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ फायबर फ्रेम आकार ७"X ५" | ५,००० |
| ०४ | ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ फायबर फ्रेम आकार ११"X ८" (A४ ) | १०,००० |
| ०५ | ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ फायबर फ्रेम आकार १७"X १२" (A३ ) | १०,००० |
| ०६ | ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ फायबर फ्रेम आकार १३"X १३" | २,००० |

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

वरील निर्णय क्र ३५६ ते ४४५ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरित/- स्वाक्षरित/-

(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)